म ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. १८७९६

१०७९६

निबंध

समाधीवरील अश्रू

REFBK-0017304

पं द श्री:

७१२९२

६।२।७०   निबं

मोती ग्रंथ संग्रहालय, बाग, [illegible]
अनुक्रम ७१२९२ वि: निबंध
क्रमांक २७७६ नों. दि. ६।२।७०

क्र. १७३०४

प्रल्हाद केशव अत्रे

# समाधीवरील अश्रू

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ७११७२ दि: १-११-६४
८४८६ दि: ६।२।७०

REFBK-0017304

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य दहा रुपये

प्रकाशक :
विष्णु गजानन परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ २
गिरगांव, मुंबअी ४

पहिली आवृत्ति
१० नोव्हेंबर १९६९

मुखपृष्ठ सजावट
श्री मोहन वाघ

मुद्रक :
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ, पुणे ३०

७१२९२ वि: निबंध
१७७६ ... ९४२।६७

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | महात्मा गांधी अमर हो गये ! ... | १ |
| २. | भारताच्या स्वातंत्र्याचा सरदार ... | २१ |
| ३. | हुतात्मा श्यामाप्रसाद मुकर्जी ... | ३५ |
| ४. | महाराष्ट्राच्या सम्राटाचें निर्याण ! ... | ४५ |
| ५. | मृत्यूचें चुंबन घेणारा महाकवि ... | ६४ |
| ६. | न विचारतां गेलेले काका ! ... | ७४ |
| ७. | भारताचा उद्धारकर्ता महात्मा ... | ८२ |
| ८. | तुकोबांचा 'अवतार' ! ... | ९० |
| ९. | गुरुदेव रानडे ... | ९३ |
| १०. | महाराष्ट्राच्या कर्मवीरांना श्रद्धांजलि ... | ९६ |
| ११. | महर्षींचें स्वर्गारोहण ... | १०२ |
| १२. | विन्स्टन चर्चिल ... | १०७ |
| १३. | तात्या गेले ! ... | ११३ |
| १४. | महाकवि सावरकर ... | ११७ |
| १५. | शेवटचा प्रणाम ... | १२३ |
| १६. | महाराष्ट्राचे रँग्लर गेले ... | १२८ |
| १७. | सोनोपंतांचा वैकुंठवास ... | १३२ |
| १८. | वेदमूर्ति सातवळेकर ... | १३७ |

दा. १७३०४

# १

# महात्मा गांधी अमर हो गये !

गांधीजी गेले. महात्माजी गेले. स्वातंत्र्याचे जनक गेले. तेरा दिवस झाले जाऊन त्यांना. तीस जानेवारीला सायंकाळीं भारताच्या राजधानींत प्रार्थनेच्या पवित्र भूमीवर हुतात्म्याचे वीरमरण आलें त्यांना. देशांत पेटलेल्या द्वेषाच्या कुंडांत अखेर त्यांच्याच प्राणाची आहुति पडली. मानवतेच्या प्रेमाखेरीज ज्या हृदयांत दुसरा कधीं विचारच स्फुरला नाहीं, तें कोमल हृदय शेवटीं माणसाच्याच हातून छिन्नविच्छिन्न झालें. जगाच्या कल्याणासाठीं परमेश्वरानें घडविलेली एक महान् कलाकृति एका उन्मत्त पशूनें फोडून टाकली. प्रेमाचा आणि शांतीचा प्रकाश विश्वावर ढाळणारा एक विराट् दीपस्तंभ एका क्षणांत कोसळून खालीं पडला. दुसऱ्या दिवशीं यमुनेच्या तीरावर मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून लाख लोकांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं गांधीजींच्या पार्थिव देहाला निरोप दिला. आणि 'महात्मा गांधी अमर आहेत' असें स्वर्गातील तेहतीस कोटी देवांना तेथून बजावून सांगितलें. चंदनाच्या सुवासिक ज्वाळांवर आरूढ होऊन त्यांच्या देहांतला

तेजस्वी कण न् कण पंचमहाभूतांमध्यें जाऊन मिसळला. उद्यां त्यांच्या अस्थि प्रयाग क्षेत्रांत, त्रिवेणी संगमांत आणि त्यांचें चिताभस्म भारतामधील पवित्र सरितातीर्थांत अन् सागरतीर्थांत विसर्जन होत असतां या देशांतील कोट्यवधि जनता त्यांना अश्रूंची श्रद्धांजलि अर्पण करील. झाला— या युगामधला एक महान् अवतार समाप्त झाला! कसल्या भयानक कालखंडामधून चाललों आहोंत आपण! पांच महिन्यांपूर्वींच या महान् भारताचे तुकडे झाले आणि आतां त्या भारताचा भाग्यविधाता निघून गेला!

गेले तेरा दिवस सारें जग गांधीजींसाठीं अश्रू ढाळीत आहे. पृथ्वीतलावर असा एकहि देश नसेल, असें एकहि राष्ट्र नसेल किंवा असा एकहि समाज नसेल कीं, गांधीजींच्या मरणामुळें त्याच्या हृदयामध्यें दुःखाची कळ उठली नसेल. गांधीजींच्या क्रूर हत्येची वार्ता ऐकून जगामधल्या मोठमोठ्या राज्यांचे अधिपति, मोठमोठ्या राष्ट्रांचे अग्रणी, मोठमोठ्या धर्मपीठांचे आणि तत्त्वज्ञानाचे आचार्य शोकानें व्याकुळ होऊन गेले. आणि गांधीजींवर प्राणापलिकडे प्रेम करणारा त्यांचा भारतवर्ष तर त्यांच्यासाठीं गेले बारा दिवस एकसारखा धाय मोकलून रडतो आहे. लक्षावधि घरांतून, झोपड्यांमधून आणि शेतांमधून हृदयभेदक आक्रोश आणि हुंदके ह्यांच्यावांचून दुसरें कांहीं ऐकूंच येत नाहीं. दुःखानें लोकांना वेड लागायची पाळी आली आहे. जनतेच्या जीवनाचा ओघ गोठून अगतिक झाल्यासारखा दिसत आहे. गिरण्यांतल्या आणि कारखान्यांतल्या यंत्रांचीं चक्रें जागच्या जागीं स्थिर होऊन बसलीं आहेत. आगगाड्यांचीं धडधडतीं एंजिनें आणि गजबजलेले डबे शून्य मुद्रेनें रूळांवरून रेंगाळत आहेत. शहरांमधले रहदारीचे रस्ते आणि बाजारपेठा भकास चेहरे करून जेथल्या तेथें स्वस्थ बसलेल्या दिसत आहेत. नांगरावर हात ठेवून शेतकरी शेतांमध्यें निश्चल उभे राहिलेले आहेत. कामगारांच्या उचललेल्या हातांतले हातोडे तसेच वरच्यावर अधांतरीं अडून बसले आहेत. मुलें आपले खेळ विसरून गेलीं आहेत. माणसांचें कामांत लक्ष उरलें नाहीं. कोणालाहि कशाचेंहि भान राहिलें नाहीं. गेले तेरा दिवस साऱ्या देशावर शोकाचें एक जाड शेवाळें थिजून बसल्यासारखें दिसत आहे.

जगानें आजपर्यंत अनेक महापुरुषांचीं मरणें पाहिलीं असतील— सम्राटांचीं पाहिलीं असतील, साधूंचीं पाहिलीं असतील, महापराक्रमी वीरांचीं पाहिलीं असतील. पण ज्याच्या मरणानें साऱ्या मानवतेला दुःख झालें, ज्याच्या मरणासाठीं अब्जावधि डोळ्यांनीं अश्रू गाळले असें जगानें पाहिलेलें हें पहिलेंच मरण आहे. अर्ध्या जगावर राज्य करणाऱ्या राजराजेश्वराच्या मृत्यूसाठींहि जग कधीं एवढें रडलें नसेल. ज्यांच्या नांवाचा उच्चार होतांच चारी खंडांतल्या कोट्यवधि लोकांच्या माना आज भक्तिभावानें वाकल्या जात आहेत, त्या परमेश्वरी प्रेषितांनाहि

अवतारसमाप्तीच्या समयीं अश्रूंच्या मौक्तिकांचा एवढा अवाढव्य नजराणा मिळाला नसेल. जें अलौकिक जीवन इतिहासानेंहि पूर्वीं कधीं पाहिलें नाहीं आणि जें अद्वितीय जीवन भविष्यकाळाला अनेक शतकांनंतरहि पाहावयाला मिळेल किंवा काय याचा संशय आहे, तें भाग्यशाली जीवन आरंभापासून अखेरपर्यंत जगाला साक्षी ठेवून या वर्तमानानें भारतवर्षाला दाखविलेलें आहे. सर्व जगाला प्रकाश देणारा सूर्य रोज संध्याकाळीं मावळतांना जगाला पाहावयाला मिळतो. पण सर्व मानवतेला उष्णता आणि उजेड देणारा महापुरुष प्रकाशतांना आणि मावळतांना डोळ्यांनीं पाहण्याचें भाग्य युगायुगामधून एखादे वेळींच जगाला लाभतें. हा साक्षात्कार जगाला झाला म्हणूनच तें गांधीजींच्या वियोगानें आज इतकें विह्वल झालें आहे !

लेनिन, रूझवेल्ट, हिटलर, मुसोलिनी असे अद्वितीय पराक्रमाचे पुरुषोत्तम तर काल-परवां आपल्या डोळ्यांसमोर अस्तंगत झाले. त्याला कांहीं फार काळ लोटला नाहीं. लक्षावधि लोक त्यांच्यासाठीं रडले. नाहीं असें कसें म्हणावें ? पण साऱ्या जगानें कांहीं त्यांच्यासाठीं हुंदके दिले नाहींत. उलट त्यांच्या मरणानें पुष्कळांना समाधानच वाटलें. आपापल्या राष्ट्राच्या उद्धारासाठीं त्यांनीं अचाट पराक्रम केले, आणि ते पराक्रम करीत असतांना त्यांना आपल्या प्राणांचें बलिदानहि करावें लागलें. पण त्यांच्या कार्यांत आणि तत्त्वज्ञानांत आपलें कल्याण आहे असें एकमतानें जगाला मात्र कधींच वाटलें नाहीं. गांधीजींनी आपल्या मृत्यूनें जन्माच्या दावेदारांनाहि रडावयाला लावलें. मानवतेला तर आपला एक महान् मित्र गेल्यासारखें वाटत आहे. जगांतील दलितांना, गरिबांना आणि अनाथांना आपला एक पाठीराखा हरवल्यासारखें वाटत आहे. भारताला गांधीजींनीं स्वातंत्र्य दिलें म्हणून त्याला त्यांच्या मरणामुळें एवढें दुःख झालें आहे असें कोणी म्हणेल, पण बाकीच्या जगानें गांधीजींसाठीं कां बरें स्फुंदावें ? जगाला गांधीजींनीं काय दिलें ? शाश्वत सुखाचा आणि शांतीचा प्रकाश जगाला गांधीजींनीं देऊन ठेवला आहे. म्हणून कृतज्ञतेच्या भावनेनें जगाचे डोळे आज ओले झाले आहेत. आणि हा प्रकाश गांधीजींच्या अवताराबरोबर अस्तंगत होण्याइतका दुर्बळ नाहीं. त्या प्रकाशाचा अमर झोत त्यांच्यानंतर हजारों वर्षेपर्यंत मानवतेचा मार्ग उजळीत राहणार आहे. गांधीजी हे राष्ट्रपुरुष नसून ते विश्वपुरुष होते, हें जगाला आज पूर्णपणें पटलेलें आहे.

जगाला अवताराची कल्पना मान्य नसेल; पण हिंदु जनतेचा अवतारावर विश्वास आहे. प्रत्येक युगामध्यें मानवतेच्या कांहीं गुणांचा विकास होत असतो, आणि कांहीं गुणांचा ऱ्हास होत असतो. ऱ्हासाचा अतिरेक झाला म्हणजे मानवतेच्या प्रगतीचें चक्र गर्तेंत रुतून बसतें. म्हणून तिच्या उद्धारासाठीं परमेश्वराला

अवतार घ्यावा लागतो. तें अवतारकार्य हा त्या युगाचा धर्म ठरतो. गेल्या शतकांत मानवतेच्या बुद्धीचा विकास झाला हें खरें. पण त्याचबरोबर तिच्या हृदयाचा अधःपात होण्यास प्रारंभ झाला. हिंसेच्या राक्षसानें तिच्या अंतःकरणांत प्रवेश करून तिच्या जीवनाचा ताबा घेतला आणि तिची बुद्धिसंपदा मातीमोल करून टाकण्यास सुरुवात केली. चालू शतकांत मानवतेची ही हिंसावृत्ति इतक्या पराकोटीला जाऊन पोहोंचली कीं तिच्यामधून जगाला त्रासणारीं मोठमोठीं जुलमी साम्राज्यें निर्माण झालीं. आणि त्यांतून हिटलर-मुसोलिनीसारखे एकाहि-पेक्षां एक भयंकर असे अक्राळ-विक्राळ हुकूमशहा प्रकट होऊन महायुद्धाचे प्रचंड वणवे जगभर पेटवण्याला त्यांनीं सुरुवात केली. पृथ्वीगोलाला लागलेल्या या आगीमध्यें सारी मानवजात भस्मसात् होते आहे कीं काय असें भय निर्माण झालें. म्हणूनच हिंसेच्या या अग्निप्रलयामधून मानवतेचा उद्धार करण्यासाठीं तिला अहिंसेचा संजीवनी मंत्र देणारा महात्मा या युगामध्यें निर्माण करणें परमेश्वराला भाग पडलें. गांधीजी हे युगांतले अवतारी पुरुष होत आणि अहिंसा हा आजचा युगधर्म होय यांत मुळींच संशय नाहीं !

अहिंसेच्या या महर्षीला स्थंडिलावर मरण आलें हा कांहीं हिंसेचा विजय नाहीं. गांधीजींच्या देहाला ज्या क्षणीं हिंसेनें हात लावला त्याच क्षणीं ती मरून पडली. गांधीजी मेले नाहींत. हिंसा मेली. गांधीजी आणि त्यांची अहिंसा अमर झाली. जगाच्या अंतापर्यंत अमर झाली. दोन महायुद्धें झालीं. रक्ताच्या नद्या वाहिल्या. भारताची फाळणी झाली. लक्षावधि लोकांची हत्या झाली. पण एवढा प्राणनाश होऊनहि जगांत हिंसेची एवढी कधीं बदनामी झाली नाहीं, जेवढी गांधीजींच्या मृत्यूनें आतां झाली. हिंसेनें जगाचें काळीजच जेव्हां हिरावून नेलें तेव्हां हिंसेचें अघोरी स्वरूप जगाला कळून आलें. आतां मान वर करून उजळ माथ्यानें आणि फुशारकीनें हिंसेला माणसाच्या समाजांत कधींहि फिरतां येणार नाहीं. हिंसेच्या पराक्रमाचीं आणि सामर्थ्याचीं स्तोत्रें मोठमोठ्या गर्जना करून कोणालाहि या जगांत आतां म्हणतां यावयाचीं नाहींत. गांधीजींच्या आयुष्यांत जी अहिंसा पुष्कळांना दुबळी वाटली आणि ज्या अहिंसेचें कित्येकदां हंसू झालें, त्या अहिंसेचें देदीप्यमान आणि प्रखर स्वरूप अखेर गांधीजींच्या मरणांत प्रकट झालें. अहिंसेमध्यें केवढें सामर्थ्य आहे हें बंदुकीच्या गोळ्या आपल्या उघड्या छातीवर निर्भयपणें झेलून गांधीजींनीं जगाला दाखविलेलें आहे. कोणत्या शूरांची, कोणत्या वीरांची, कोणत्या सैनिकांची आणि कोणत्या सेनापतीची अशा मरणाला तोंड देण्याची छाती आहे ? अहिंसा भ्याड आहे, अहिंसा दुर्बल आहे, असें म्हणण्याची कोणाला आतां हिंमत आहे ? हजारों लोकांना मारून स्वतःचे प्राण शाबूत ठेवण्याला जी शिकविते ती हिंसा शूर म्हणावयाची कीं

हजारों लोक वांचावेत म्हणून जी स्वतःच्या प्राणाचें बलिदान करावयाला सांगते ती अहिंसा शूर म्हणावयाची ? छे, छे, अहिंसेचा एवढा मोठा विजय आजपर्यंत जगांत कधीं झालेला नसेल. गांधीजींच्या पवित्र रक्तानें भरलेलीं तीं काषाय वस्त्रें अहिंसेची पताका कल्पान्तापर्यंत या विश्वावर फडफडत ठेवतील यांत मुळींच संशय नाहीं !

चिलखतानें, शिरस्त्राणानें, तरवारीनें, पिस्तुलानें किंवा बंदुकीनें का माणसांच्या प्राणांचें रक्षण होतें ? अलोट शरीरबळ कमावून ठेवलें म्हणजे का माणूस मृत्यूपासून निर्भय होतो ? उभ्या अठ्ठयाहत्तर वर्षांत गांधीजी मृत्यूला कधींच भ्याले नाहींत. कोणाकडूनहि त्यांनीं आपल्या प्राणांचें रक्षण कधीं करून घेतलें नाहीं. आठ सालीं दक्षिण आफ्रिकेंत मीर आलम पठाणानें त्यांच्या डोक्यावर लाठीचे प्रहार करून त्यांना मृत्यूच्या उंबरठ्यापर्यंत ओढीत नेलें. तरी देखील ते मृत्यूला भ्याले नाहींत. शुद्धीवर येतांच ‘ मीर आलमला मुक्त करा ! ’ हीच देववाणी पहिल्यांदा त्यांच्या तोंडून बाहेर पडली. ते शब्द ऐकतांच मीर आलम त्यांच्या पायांवर कोसळून पडला आणि एखाद्या मुलाप्रमाणें रडूं लागला. एवढी मोठी ब्रिटिश साम्राज्यसत्ता. कायसर आणि हिटलर देखील तिनें धुळीला मिळविले. पण सत्तावीस वर्षांच्या झगड्यांत या बलाढ्य साम्राज्यशाहीचें एकदां देखील गांधीजींना कधीं भय वाटलें नाहीं. तिच्या तोफांची, तिच्या बंदुकीची, तिच्या तुरुंगाची आणि लाठ्यांची क्षणभरहि त्यांनीं कधीं परवा केली नाहीं. मग मृत्यूची त्यांना काय कदर वाटणार ? उलट, प्राणांतिक उपोषणें करून आपण होऊनच त्यांनीं मृत्यूला भेटण्याचा कित्येक वेळां प्रयत्न केला. त्रेचाळीस सालच्या उपोषणाचे वेळीं तर आगाखान वाड्यांत ब्रिटिश सरकारनें त्यांच्याकरितां चंदनाची चिता देखील रचून तयार ठेविली होती. पण मृत्यूच घाबरून मागें पळाला आणि त्यानें आपल्या भूतमहालाचे दरवाजे बंद करून घेतले, तेव्हां गांधीजींना नाइलाजानें परत फिरावें लागलें. मृत्यूच्या छातींत धसका उत्पन्न करणारी या पृथ्वीतलावरची अहिंसा ही एकच अद्‌भुत शक्ति आहे हें गांधीजींनीं आतां जगाला सिद्ध करून दाखविलेलें आहे.

स्वतंत्र भारताच्या राजधानींत शेकडों लोकांच्या समक्ष स्वातंत्र्याच्या जनकाचा खून दिवसाढवळ्या कसा होऊं शकतो याचें पुष्कळांना आश्चर्य वाटतें. त्यांचें रक्षण करण्यासाठीं शेकडों गुप्त पोलीस त्यांच्याभोंवतीं कां उभे केले नाहींत, असा सवाल पुष्कळ विचारतात. पण असा प्रश्न विचारणाऱ्यांना गांधीजींच्या महान् जीवनाचें रहस्यच मुळीं कळलें नाहीं असें म्हणावयाला हवें ! ज्यांनीं आतांपर्यंत भारताच्या प्राणाचें रक्षण केलें त्यांच्या प्राणाचें कोण रक्षण करूं शकणार ? तें माणसांचें काम नाहीं. तें परमेश्वराचें काम आहे. मृत्यूचें भय

तुम्हां-आम्हांला. भ्याडांना, नामर्दांना मृत्यूचें भय. ज्यांचें नांव उच्चारतांच मृत्यू-थरथरां कांपतो, त्यांना मृत्यूचें भय कसें वाटणार ? गेल्या वर्षापासून जातीय द्वेषाच्या काळ्याकुट्ट रेड्यावर बसून मृत्यू या देशामधून उघडपणें वावरूं लागला होता. आणि देशाची फाळणी झाल्यापासून तर एखाद्या दारू पिऊन झिंगलेल्या खुनी मवाल्याप्रमाणें तो खांद्यावर कुऱ्हाड धरून लांब लांब टांगा टाकीत टाकीत देशामधून राजरोसपणें फिरूं लागला होता. आज पश्चिम पंजाबांत, परवां सिंध-मध्यें, तर तेरवां पूर्व बंगल्यांत, असा देशभर त्यानें जणुं कत्तलखानाच उघडलेला होता. इतकें रक्त पिऊन बेहोष झाल्यामुळेंच त्याला वीस जानेवारी रोजीं गांधीजींच्या प्रार्थनेच्या सभेंत येण्याची पहिल्यांदा छाती झाली. पण गांधीजींच्या जवळ येण्याचें धैर्य कांहीं त्याला झालें नाहीं. त्यांच्यापासून चाळीस यार्ड अंतरावर तो अदबीनें एका भिंतीला टेकून उभा राहिला. गांधीजींच्या प्रार्थनेचे शब्द त्याच्या कानीं पडले मात्र. त्याची खुनी धुंदी एकदम उतरली आणि हातांतला बॉंब जागच्या जागीं फेकून देऊन तो एकदम पळून गेला. तथापि आपल्या भ्याडपणाची त्याला लाज वाटली म्हणूनच कीं काय, भावलपूर संस्थानांत, आणि गुजरात स्टेशनवर जाऊन पुन्हा तो रक्ताचे हौदचे हौद पिऊन आणि बेफाम होऊन तीस तारखेला दिल्लीला परत आला, आणि गांधीजींच्या प्रार्थनेच्या वाटेवर दबा धरून बसला. गांधीजींची प्रार्थना ऐकण्याची त्याची छाती नव्हती. तथापि, मनाच्या तशा हिंस्र स्थितींतहि गांधीजींच्या पवित्र पायांना प्रथम त्यानें हात लावला आणि मगच त्यांच्या अंगावर त्यानें आपला खुनी हात उचलला. मृत्यूला देखील गांधीजींना वंदन करावें लागलें हा गांधीजींनीं चमत्कार करून मृत्यूवर विजय मिळविला. गांधीजी हे जिवंतपणीं महात्मा होते, पण आतां ते मृत्युंजय झाले ! गांधीजींना मारण्यासाठीं एखाद्या दरोडेखोराप्रमाणें मृत्यूला लपत छपत यावें लागलें हाच मृत्यूचा खरा पराभव आहे. गांधीजींना मारणें हें अतिशय सोपें काम होतें. पंतप्रधान खेर म्हणाले त्याप्रमाणें, 'बागेंत शिरून सहज एखादें फूल तोडावें तितकें तें सोपें होतें.' पण त्यासाठी मृत्यूनें एवढीं कारस्थानें कशाला केलीं ? मृत्यु गांधीजींना भ्याला हेंच खरें.

गांधीजींचें जीवन जसें अद्‌भुत होतें तसें त्यांचें मरणहि पण विलक्षणच म्हटलें पाहिजे. असें मरण त्यांना येईल असें कोणालाहि वाटलें नव्हतें ! हिंदु माणूस जास्तींत जास्त शंभर वर्षें जगण्याची इच्छा धरतो. पण गांधीजींना सव्वाशें वर्षें जगण्याची आकांक्षा होती. आणि तेरा जानेवारीला सुरू केलेलें आपलें शेवटचें उपोषण पूर्ण केल्यानंतर तर त्यांनीं एकशेंतेहतीस वर्षें जगण्याचा निर्धार केला होता. दीर्घ जीवनाचा इतका विश्वासपूर्ण निश्चय देवांनादेखील करतां आला असता किंवा काय याची शंका आहे. पण तो निश्चय प्रकट

झाल्यानंतर अवघ्या बारा दिवसांनींच गांधीजी आपली जीवनयात्रा संपवून या जगांतून चालते झाले. गांधीजींनीं आपल्या हयातींत हिमालयाएवढे पराक्रम आणि चुका करून आपल्या उपासकांची जशी तिरपीट उडवून सोडली, त्याचप्रमाणें आकस्मिक मरणाच्या आघातानें त्यांनीं आपल्या असंख्य भक्तांची अतिशय दाणादाण उडवून सोडली आहे. हिमालय कितीही उंच असला तरी त्याला शिखर आहे. महासागर कितीहि खोल असला तरी त्याला तळ आहे. समुद्राला कितीहि भरती आली तरी त्याच्या किनाऱ्याची सीमा ठरलेली आहे. पण युगप्रवर्तक महापुरुषाच्या निधनाने जगाला जें दुःख वाटतें त्याला तळ नाहीं, खोली नाहीं, आणि सीमा नाहीं. कुटुंबातील आप्त माणूस किंवा समाजांतील कर्ता पुरुष मरण पावला म्हणजे त्या प्रसंगीं दुःख कसें व्यक्त करावयाचें हें सर्वांना माहीत आहे, पण युगायुगामध्यें जो माणूस एखादे वेळींच जन्माला येतो त्याच्या निधनाबद्दल जगानें शोक तरी किती करावयाचा आणि अश्रूंचे धबधबे तरी किती सांडायचे ?

महापुरुषाच्या मरणाबद्दल दुःख कसें प्रगट करावें ह्याचें शास्त्र कांहीं कुणीं लिहून ठेवलेलें नाहीं. ती कांहीं वारंवार घडून येणारी गोष्ट नाहीं. तथापि, अवतारी पुरुषाच्या अवसानांच्या वेळीं सामान्य पद्धतीची रडारड आणि आरडाओरड करणें हें त्या प्रसंगाच्या गांभीर्याची आणि पावित्र्याची शुद्ध विटंबना करण्यासारखें आहे. हा त्या महात्म्यांचा अपमान आहे. गांधीजींना ज्या तऱ्हेनें मरण आलें, ती हृदयभेदक घटना तर खरीच. पण महान् जीवनाचा तो कांहीं शोचनीय शेवट नव्हे. करुणरस निर्माण करणाऱ्या दुःखान्त नाटकाचा तो कांहीं अखेरचा प्रवेश नव्हे. लढतां लढतां धारातीर्थीं पतन पावणाऱ्या वीराचें मरण हा काय रडण्याचा विषय आहे ? ज्या मरणानें गांधीजींना अमर पदावर नेऊन बसविलें आणि चिरंजीव केलें, त्या मरणाबद्दल शोक करीत बसणें वेडेपणाचें आहे. प्राणांतिक उपोषणांत गांधीजींना अंथरुणावर पडल्या पडल्या हळूहळू मरण आलें असतें तर तें मात्र त्यांच्या आयुष्याचें शोचनीय पर्यवसान झालें असतें. पण अठ्ठयाहत्तर वर्षांचा हा वृद्ध भीष्माचार्य पिस्तुलाच्या गोळ्या फुलाप्रमाणें आपल्या छातीवर झेलून आपल्या शत्रूवर विजय मिळवतो हा तुम्हीं-आम्हीं रडण्याचा विषय नसून एखाद्या व्यासानें आणि वाल्मीकीनें महाकाव्य रचण्याच्या योग्यतेचा तो पराक्रम आहे. शेक्सपीअरला किंवा कालिदासालाहि आपल्या नाटकांतील अलौकिक नायकाच्या आयुष्याचा शेवट इतका नाट्यपूर्ण रीतीनें करतां आला नसता. गांधीजींचें मरण हा विषाद मानीत बसण्याचा प्रसंग नाहीं. दृष्टि अंतर्मुख करून त्यांच्या जीवनप्रवाहाच्या अवाढव्य विस्ताराचें शांतपणें अवलोकन करण्याची ही घटिका आहे. गांधीजींच्या मृतदेहाशेजारीं सबंध रात्रभर एकसारखी जमिनीकडे

दृष्टि लावून सरदार वल्लभभाई पटेल पुतळ्यासारखे निश्चेष्ट बसलेले होते. त्यांच्या डोक्यामधून गांधीजींच्या जीवनाचे केवढे मोठे देखावे आणि चित्रपट सरकत असले पाहिजेत त्या वेळीं ! महापुरुषाच्या मरणाबद्दल सुज्ञ माणसांनीं असें दुःख करावयाला हवें. ती कांहीं वैयक्तिक आपत्ति नाहीं. राष्ट्राच्या आयुष्यांतली ती एक रौद्र ऐतिहासिक घटना आहे !

गांधीजींच्या जीवनाची कशाशीं तुलनाच करायची झाली तर ती केवळ गंगानदीच्या प्रवाहाशींच करतां येईल. हिमालयामध्यें उगम पावल्यापासून तों बंगालच्या सागरामध्यें विलीन होईपर्यंत गंगेच्या वेगांत, विस्तारांत आणि वैभवांत केवढी विविधता निर्माण झालेली दिसून येते. मानससरोवरांतून बाहेर पडणाऱ्या लहानशा स्फटिक-प्रवाहाला सागरासमीप येईपर्यंत केवढें भव्य धवल आणि विशाल स्वरूप प्राप्त झालेलें आहे. हजारों मैलांच्या गंगेच्या प्रवासांत किती जलप्रवाह आणि किती सरिता तिच्या जीवनांत येऊन एकरूप झालेल्या आहेत. पर्वताच्या कड्यावरून आणि खडकांवरून वेगानें उड्या घेत उतरणारें तिचें पाणी सपाट भूप्रदेशावर संथ आणि स्थिर झाल्यानंतर किती असंख्य लोकांच्या जीवनांत तिनें सुख, शांति आणि समृद्धि निर्माण केलेली आहे ! पुढें पुढें तिचें पात्र जसजसें प्रगल्भ आणि विशाल होत गेलें, तसतसें तिचें पावित्र्य आणि वात्सल्य एकसारखें वाढत गेलेलें आहे. आणि त्यामुळें लक्षावधि लेकरांना अंगाखांद्यावर खेळवणाऱ्या महन्मंगल मातेची महती तिला शेवटीं प्राप्त झालेली आहे. गंगेचा हा भूगोल आणि इतिहास लक्षांत आणला म्हणजे अठ्याहत्तर वर्षांपूर्वी पोरबंदर येथें करमचंद गांधींच्या पोटीं जन्माला आलेला एक चिमुकला बालक आणि पंचावन्न वर्षांपूर्वीं पोट भरण्यासाठीं दक्षिण आफ्रिकेंत भटकत गेलेला एक बेकार बॅरिस्टर हा गेल्या तीस वर्षांच्या अवधींत कोट्यवधि जीवन्मृतांना जागृत करून त्यांना स्वातंत्र्याची संजीवनी पाजणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी कसा झाला हे कळून येण्यासारखें आहे. या तीस वर्षांत भारतवर्षाचें जीवन गांधीजींच्या जीवनाशीं इतक्या सूक्ष्म आणि विविध तऱ्हेनें समरस झालेलें आहे कीं, गांधीजींच्या चारित्र्याला एखाद्या महासागराचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. गांधीजींनींच एके ठिकाणीं म्हटलेलें आहे कीं, "गंगेचा प्रवाह जसजसा वाहात जातो, तसतसे त्याला निरनिराळे ओघ येऊन मिळतात आणि मुखापाशीं गंगेचें पात्र इतकें विस्तीर्ण होतें कीं, त्यांतून नदीचा शेवट कोठें आहे आणि समुद्राचा आरंभ कोठें आहे हें कळेनासें होतें." काळाच्या सागरांत गांधीजींचें जीवन आज विसर्जन होत असतांना भारतवर्षाचें जीवन कोणतें आणि गांधीजींचें जीवन कोणतें, हें एकमेकांपासून अलग करून पाहणें आतां अगदीं अशक्य आहे. भारताचें जीवन तेंच गांधीजींचें जीवन आणि गांधीजींचें जीवन तेंच भारताचें

जीवन असें अद्भुत अद्वैत आज दोघांमध्यें निर्माण झालेलें दिसून येतें.

कोट्यवधि शेतकऱ्यांचा आणि खेडवळांचा हा देश— तेहतीस कोटी देवांची पूजा करणारा देवभोळा देश. पण गेल्या तीस वर्षांत तो आपल्या देवांना-देखील विसरून गेला, आणि गांधीजींचें भजन करायला लागला. जागोजाग गांधीजींचीं देवळें त्यानें बांधलीं नाहीं इतकेंच, पण देशांतलें प्रत्येक घर आणि झोपडी गांधीजींचें देऊळ झालें. प्रत्येकाचें हृदय हें गांधीजींचें राऊळ बनलें. देवळांमधला देवांचा जयजयकार थांबला; आणि मैदानावर गांधीजींच्या नांवाचा जयजयकार सुरू झाला. स्वर्गांतल्या देवांना देखील वैषम्य वाटलें असेल. ते खालीं पृथ्वीतलाकडे टक लावून एकसारखे पाहात बसले असतील. आणि विचारीत असतील कीं, या देशांतल्या माणसांना आमच्या नांवाचा देखील विसर पडणारा हा कोण अद्भुत माणूसदेव किंवा देवमाणूस या देशांत एकदम निर्माण झालेला आहे? शेषशायी विष्णूच्या पायाशीं बसलेली लक्ष्मी पाय दाबण्याचें आपलें काम थांबवून उद्गारली असेल कीं, “देवाधिदेवा, या भारतांतल्या लोकांना वेड लागलें आहे कीं काय? आजपर्यंत आमची म्हणजे लक्ष्मीनारायणाची पूजा करणारे हे लोक एकाएकीं डोकें फिरल्याप्रमाणें या दरिद्रीनारायणाच्या भजनीं काय लागले आहेत?” अंगाला राख फासून स्मशानांत एखाद्या झाडाखालीं आपल्या गणांच्या घोळक्यांत सदैव बसणाऱ्या भोळ्या शंकराच्या पायांवर डोकें ठेवून पार्वती ओशाळा चेहरा करून म्हणाली असेल कीं, “भगवन्, आपला हा उघडावाघडा अवतार बघून आजपर्यंत मी तुम्हांला हिणवीत होतें. भारतवर्षांत तुम्हांला मिळालेल्या ह्या जोडीदाराच्या पायावर तेथील जनता भक्तिभावानें लोटांगणें घालत असलेली बघून मी माझें बोलणें सपशेल मागें घेतें. मला क्षमा करा!” देवादिकांना देखील कोडें पडलें असेल.

ब्रिटिश राज्यकर्त्यांनाहि गांधीजींचें कोडेंच पडलें. ते म्हणत, “अर्ध्या जगावर राज्य करणारे आम्ही— आमच्या साम्राज्यावर जो सूर्य कधीं मावळत नाहीं, त्या सूर्याला गिळूं पाहणारा अस्थिपंजर हनुमान या हिंदुस्थानांत निर्माण झालेला आहे!” गोऱ्या जगालाहि गांधीजींचें कोडेंच पडलें. पण त्यानें त्याच्यावर विचारच करावयाचें मुळीं सोडून दिलें. उपेक्षेनें मान उडवीत तें म्हणाले, “ठाऊक आहे. हिंदुस्थान हा बोलूनचालून जादुगारांचा आणि मांत्रिकांचा देश आहे. त्यांपैकींच कोणी तरी किमया, नजरबंदी करणारा हा एक वस्ताद नंगा फकीर प्रकट झाला असावा. दुसरें काय?” जगांत सर्वांना गांधीजींचें कोडें वाटून राहिलें. पण भारतांतल्या जनतेला मात्र गांधीजींचें कोडें कधींच वाटलें नाहीं. उलट गांधीजींकडे बघतांना दीडशें वर्षें अडून पडलेलें स्वातंत्र्याचें कोडें आपोआप एकदम सुटल्यासारखें जनतेला वाटलें.

आणि तसें गूढ आणि कूट असें गांधीजींच्या जवळ कांहींच नव्हतें. गंगाजळाप्रमाणें गांधीजींचें जीवन शुभ्र आणि निर्मळ होतें. स्फटिकाप्रमाणें त्यांची बुद्धि स्वच्छ आणि तेजस्वी होती. बिलोरी भिंगाप्रमाणें त्यांचें अंतःकरण लखलखीत आणि पारदर्शक होतें. लोकांपासून लपवून ठेवण्यासारखें गांधीजीं-जवळ कांहींच नव्हतें. सूर्यप्रकाशासारखें गांधीजींचें बोलणें आणि वागणें लख्ख आणि मोकळें होतें. गांधीजींच्या बिऱ्हाडाला भिंती नव्हत्या आणि दारेंहि नव्हतीं. उघड्या चव्हाट्यावर त्यांनीं आपला संसार मांडून ठेवलेला होता. डोंगर दूर असतात म्हणून ते साजरे दिसतात. तारे उंच असतात म्हणून ते तेजस्वी दिसतात. असा दूरपणा किंवा दुजाभाव गांधीजींबद्दल लोकांना कधींच वाटला नाहीं. आपल्या अंगणामधलाच हा हिमालय आहे. आपल्या आढ्यावर बसून चमकणाराच हा एक चंद्र आहे असें प्रत्येकाला वाटे. जवळपणामुळें किंवा परिचयामुळें वस्तूंचा मोठेपणा कमी होतो असा समज आहे. हा समज गांधीजींनीं खोटा ठरविला. आपल्या कुटुंबांतल्या माणसांपेक्षां लोकांना ते अधिक जवळचे वाटत. अतिपरिचय हाच मुळीं त्यांच्या मोठेपणाचा पाया आहे. आजपर्यंत या देशांत होऊन गेलेल्या कोणत्याहि महान् विभूतीबद्दल जनतेला एवढा आपलेपणा कधीं वाटला नसेल. कांहीं साधु आणि संत उणे केले तर या देशांतले कोणतेहि पूर्वींचे पराक्रमी वीर, बुद्धिमान्, तत्त्वज्ञानी आणि लोकप्रिय समाजसेवक जनतेच्या जीवनाशीं गांधीजींएवढे एकरूप झालेले आढळणार नाहींत ! जनताजनार्दनाच्या निःसीम उपासनेमधून आणि उत्कट भक्तिभावनेमधूनच गांधीजींच्या संन्यासी जीवनाची आणि व्यक्तिमत्त्वाची उत्क्रांति झाली. राज्यकर्त्यांची विलायती विद्या, संस्कृति आणि वेषभूषा हीं स्वदेशांतील जनतेशीं समरस होण्याच्या मार्गामध्यें जशीं जशीं आड येऊं लागली, तसा तसा त्या त्या गोष्टींचा गांधीजी धैर्यानें त्यागच करीत गेले. त्यांनीं बूट फेकला, कोट फेकला, विजार फेकून दिली, अंगरखा काढून टाकला. काठेवाडी फेटा झुगारून दिला. एका फेट्यांत दहा टोप्या होतात, म्हणून टोपी घालायला सुरुवात केली. पुढें ती टोपीहि काढून टाकली. सदरा सोडला. आणि कमरेला हातभर पंचा गुंडाळून ते राष्ट्रासमोर— नव्हे, जगासमोर— उघडी छाती करून उभे राहिले. तेव्हां सात लक्ष खेडेगांवां-मध्यें राहणाऱ्या कोट्यवधि जनतेची खात्री झाली कीं, आपल्याप्रमाणें झोपडींत राहणारा, चरख्यावर सूत कांतणारा, शेळीचें दूध पिणारा, कमरेला पंचा लावून आणि डोक्यावर वीतभर फडकें टाकून आपल्याप्रमाणेंच उन्हातान्हांतून उघड्यानें हिंडणारा हाच आपला आणि आपल्या देशाचा तारणहार आहे. आणि त्याबरोबर ' महात्मा गांधी की जय ! ' अशा हर्षाच्या आरोळ्या कोटि कोटि मुखांतून एकदम देशामध्यें उमटल्या !

गरिबांबद्दल, दलितांबद्दल आणि दुःखितांबद्दल अथांग प्रेमाचा आणि सहानुभूतीचा सागर हेलावत होता गांधीजींच्या हृदयांत. त्या माणुसकीच्या उत्कट भावनेमधूनच त्यांच्या जीवनांतलें सारें सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान निर्माण झालें. गरिबांच्या हालअपेष्टा त्यांना बघवत नसत. दलितांची छळणूक त्यांना पाहवत नसे. दुःखितांचे सुस्कारे आणि हुंदके त्यांना ऐकवत नसत. धर्माच्या, वर्णाच्या आणि पैशाच्या तत्त्वावर कोणत्याहि समाजाची विषम विभागणी व्हावी आणि वरिष्ठ वर्गानें कनिष्ठावर राजरोसपणें जुलूम करण्याची मिरासदारी मिळवावी किंवा एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राचें स्वातंत्र्य हिरावून घेऊन तेथील जनतेवर वर्षानुवर्षें जनावराचें जिणें लादावें हें गांधीजींच्या भूतदयेला कधींहि सहन होण्यासारखें नव्हतें. सत्तेच्या, संपत्तीच्या आणि साम्राज्याच्या अनावर हव्यासामुळें पृथ्वीतलावर माणसाचा नरक निर्माण होतो, हा भेसूर देखावा त्यांनीं वयाच्य तेविसाव्या वर्षीं दक्षिण आफ्रिकेंत जेव्हां स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिला तेव्हां त्यांचा हृदयस्थ पुरुषोत्तम एकदम जागा झाला. आणि त्यानें त्यांच्या अंगावरचा पोटभरू बॅरिस्टरीचा झगा एकदम भिरकावून देऊन व त्यांच्या हातांत मानवतेचें वकीलपत्र देऊन त्यांना सांगितलें कीं, "यापुढें जगांतील गरिबांच्या आणि गुलामांच्या उद्धारासाठीं झगडणें हाच तुझ्या उपजीविकेचा व्यवसाय ! अन् दलितांच्या, दुःखितांच्या डोळ्यांमधले अश्रु पुसणें हाच तुझ्या जीवनाचा धर्म !" त्याच क्षणीं बॅरिस्टर गांधींची आकृति विरघळून अंतर्धान पावली आणि तिच्या-मधून महात्मा गांधींचा तेजस्वी अवतार प्रकट झाला. मोहनदास करमचंद गांधी हे जरी हिंदुस्थानांत जन्माला आले असले तरी महात्मा गांधींचा जन्म मात्र दक्षिण आफ्रिकेंत झाला, असेंच इतिहासाला नमूद करावें लागेल. ज्या गंगोदकाच्या अमृतधारांखालीं सतत तीस वर्षें न्हाऊन हा भारतवर्ष धन्य आणि मुक्त झाला, त्याच्या गंगोत्रीच्या दर्शनासाठीं आपल्याला दक्षिण आफ्रिकेंतल्या नाताळाचीच यात्रा करून यावें लागेल.

भारतीय स्वातंत्र्याच्या युद्धांत ब्रिटिश साम्राज्यशाही नष्ट करण्यासाठीं तिच्या अंगावर गांधीजींनीं 'सत्याग्रह' नांवाचें जें पाशुपतास्त्र पुन्हा पुन्हा सोडलें त्याची प्राप्ति त्यांना प्रथम दक्षिण आफ्रिकेंतच झाली. हें शस्त्र प्राप्त करण्यासाठीं त्यांना त्या ठिकाणीं जी घोर तपश्चर्या करावी लागली आणि ज्या प्रखर अग्निदिव्यांतून त्यांना जावें लागलें, त्याची आठवण झाली कीं अंगावर शहारे उभे राहतात. डोक्यावर हिंदु पगडी घालून डरबानच्या कोर्टांत पहिल्या दिवशीं त्यांनीं पाऊल ठेविलें नाहीं तोंच मॅजिस्ट्रेटनें त्यांचा अपमान करून त्यांना कोर्टांतून हाकून दिलें. डरबानहून प्रिटोरियाला जातांना आगगाडीच्या पहिल्या वर्गांत बसून ते चालले असतां वाटेंत एका स्टेशनावर गोऱ्या शिपायांनी त्यांना

धक्के मारून डब्याबाहेर ढकलून दिलें. धोड्याच्या शिग्रामामधल्या गोऱ्या उतारूंनीं त्यांना लाथाबुक्क्यांनीं झोडपून चालत्या गाडींतून बाहेर ढकलण्याचा प्रयत्न केला. पण 'मनगट तुटलें तरी दांडा सोडायचा नाहीं' अशा निर्धारानें तें गाडीच्या पितळी दांड्याला धरून मार खात तसेंच लोंबकळत राहिले. डरबानच्या बंदरावर बोटींतून एकदां खालीं उतरतांच गोऱ्या गुंडांच्या जमावानें त्यांच्यावर अंड्यांचा आणि धोंड्यांचा जबर मारा केला. त्या प्राणघातक हल्ल्यामधून शिकस्तीनेंच त्यांचे प्राण बचावले. जोहान्सबर्गच्या नोंदणी-कचेरीसमोर मीर आलम पठाणानें त्यांच्या डोक्यावर सोट्याचा प्रहार करून त्यांचा जवळ जवळ कपाळमोक्षच केला होता. आत्मक्लेशाची एवढी खडतर तपश्चर्या त्यांनीं केली, तेव्हां त्यांच्या अंतःकरणांत सत्याग्रहाचा साक्षात्कार झाला आणि त्यांच्या मुखांतून सत्याग्रहाची अमर गीता प्रकट झाली : "प्रत्येक माणसाच्या अंतःकरणांत सद्भावाचा स्फुलिंग असतोच. त्यावरील राख झाडण्याचें, तो फुलविण्याचें कार्य सत्याग्रह करतो. प्रतिपक्षाच्या अंतःकरणांतील सद्भावनेवर सत्याग्रहीचा अढळ विश्वास असतो. अनेकदां त्यानें फसविलें तरी त्याजवरचा सत्याग्रहीचा विश्वास ढळत नाहीं. तो आपल्या त्यागानें, हालानें, बलिदानानें शत्रूच्या हृदयांतील न्यायबुद्धि जागृत करतो. पाषाणहृदयी माणूस देखील सत्याग्रहानें द्रवतो. सत्याची उपासना करतां करतां मृत्यु येणें यापरती आनंदाची दुसरी गोष्ट नाहीं. सत्याग्रहाच्या युद्धांत द्वेषाला थारा नाहीं, स्वार्थाला स्थान नाहीं. त्यांत कोणी नेता नाहीं, कोणी अनुयायी नाहीं. त्यामुळें कोणा एकाला मृत्यु आला, तर लढा मंदावत नाहीं. उलट तो बळावतोच. शस्त्रबळानें शत्रूला जिंकण्याचा प्रयोग हजारों वर्षें पृथ्वीवर चालू आहे. द्वेषांतून द्वेष आणि हिंसेतून हिंसा निर्माण होते. त्यामुळें मानवजातीचा भयंकर संहार होत आहे. सत्याग्रहाचें युद्ध सदैव प्रगतिशील आणि विजयशाली असतें. कमींत कमी अशी न्याय्य मागणी करून जास्तींत जास्त आत्मबळ सत्याग्रही उपयोगांत आणतो. ईश्वरावर श्रद्धा ठेवून स्वावलंबनानें आणि स्वार्थत्यागानें सत्याग्रही जें कार्य करतो त्याला अंतीं यश मिळालेंच पाहिजे !"

दक्षिण आफ्रिकेच्या यमपुरींत सडत पडलेल्या हिंदी मजुरांच्या हातीं आत्मोद्धाराचें प्रभावी शस्त्र देऊन आणि साम्राज्यशाहीच्या धुंदीनें उन्मत्त झालेल्या तेथल्या वर्णद्वेष्ट्या गोऱ्या सरकारला ताळ्यावर आणून आपल्या कोट्यवधि हिंदी बांधवांना सत्याग्रहाच्या मंत्राची दीक्षा देण्यासाठीं गांधीजींनी नऊ जानेवारी एकोणीसशें पंधरा रोजीं आपल्या मातृभूमीवर पाऊल टाकलें. पहिल्या महायुद्धाचा भयानक वणवा त्या वेळीं युरोपांत भडकला होता. आणि जगाचा चेहरा भयानें आणि चिंतेनें काळवंडून काळा ठिक्कर पडला होता. अशा परिस्थितींत मुंबई बंदरांत डोक्याला बावळट पागोटें आणि अंगांत अंगरखा घालून अन् हातांत

पडशी घेऊन उतरलेल्या एका लहानशा माणसाकडे हिंदी जनतेचें कसें लक्ष जाणार ? नामदार गोखले हे गांधीजींचे गुरु. मुंबईंत उतरल्यावर त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठीं गांधीजी सरळ पुण्याला गेले. गुरूंनीं त्यांना उपदेश दिला कीं, आधीं देशभर प्रवास करून ये, मातृभूमीचें डोळे भरून दर्शन घे आणि मग कामाला लाग, तोंपर्यंत एक अक्षर बोलूं नकोस. एका हातांत गुरूंनीं दिलेला फराळाचा डबा आणि काखोटींत लहानशी वळकटी मारून हा चिमुकला माणूस आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत दाटीवाटीमध्यें बसून मायदेशाची यात्रा करायला निघाला. गांवोगांव धर्मशाळेंत उतरावयाचें, मोठमोठ्या शहरांमध्यें अन्नछत्रांत जाऊन जेवावयाचें, मैलच्या मैल पायीं चालावयाचें. गाडीभाड्यासाठीं अवघे एकतीस रुपये खर्च करून त्यांनी साऱ्या भारताची प्रदक्षिणा एका वर्षामध्यें पुरी केली. त्याच सुमारास बनारस हिंदु विश्वविद्यालयाची स्थापना होत होती. पंडित मदनमोहन मालवीयांनीं कोनशिला-समारंभाला या मातृभूमीच्या यात्रेकरूला बोलावलें आणि समारंभांत भाषण करावयाची विनंति केली. समोर हिऱ्यामोत्यांच्या कंठ्या गळ्यांत घालून आणि मूल्यवान् भरजरी कपडे अंगांत पेहरून मोठमोठे राजेरजवाडे बसले होते. त्यांना पाहतांच देशांतलें अठरा विश्वें दारिद्र्य डोळ्यांनीं बघून आल्यामुळें अत्यंत व्यथित झालेल्या गांधींचा सात्त्विक संताप भडकून उठला. आणि ते म्हणाले, “ संस्थानिकांनो, देशांत कोट्यवधि जनता कंगाल आणि भुकेबंगाल असतांना हीं हिरेमाणिकें अंगावर घालून या समारंभांत मिरवायला तुम्हांला लाज कशी वाटत नाहीं ? उतरा हें अंगावरचें सारें जडजवाहीर. तें तुमचें नाही. तें शेतकऱ्यांच्या मालकीचें आहे. तें त्यांच्या उद्धारासाठीं खर्च करा. इंग्रज लोक हिंदुस्थान सोडून गेल्यावांचून या देशाचा कधीं उद्धार व्हायचा नाहीं, अशी जर माझी खात्री झाली तर ‘ तुम्ही या देशांतून चालते व्हा ! ’ असें उघडपणें त्यांना सांगावयाला मी मागेंपुढें पाहणार नाही ! ” त्याबरोबर सभेंत एकच हलकल्लोळ उडाला. राजे लोक संतापून सभेंतून निघून गेले. व्यासपीठावर बसलेले सन्मान्य पाहुणे मागल्यामागें पसार झाले. सभा मोडली. आणि आपलें भाषण तसेंच अपुरें सोडून हा लहानसा ‘ भयंकर ’ माणूस गर्दीमध्यें कुठें तरी नाहींसा झाला. भारताच्या राजकीय क्षितिजावर उगवणाऱ्या सूर्याचा हा पहिला प्रकाशझोत जनतेला त्या वेळीं पाहावयाला मिळाला.

“ सत्याग्रहाची मौज ही आहे कीं, तो आपोआप आपल्याकडे चालत येतो. त्याला शोधण्यासाठीं आपल्याला जावें लागत नाहीं ! ” या गांधीजींच्या श्रद्धेची कसोटी सोळा सालच्या अखेरीस आकस्मिक रीतीनें लागली. चंपारण्यांतल्या गोऱ्या मळेवाल्यांच्या जुलमाने संत्रस्त झालेल्या हजारों मजुरांनी गांधीजींना

हाक मारली. त्यांचा तो आर्त हंबरडा ऐकून मगरीच्या मुखांत सांपडलेल्या गजेंद्राला सोडविण्यासाठीं सुदर्शन चक्र घेऊन देवाने जशी धाव घेतली, तसें आपलें सत्याग्रहाचें अस्त्र घेऊन तातडीनें धावत गांधीजी चंपारण्यांत गेले ! पंचारत्या ओवाळून जनतेनें त्यांचें स्वागत केलें. त्यांच्या गाडीचे घोडे सोडून देऊन लोकांनी त्यांची गाडी ओढली. हत्तीवर बसून मजुरांचीं गाऱ्हाणीं ऐकत ऐकत ते चंपारण्यांतून हिंडूं लागले. हजारों शेतकरी आपल्या अमानुष छळाच्या कहाण्या सांगावयाला त्यांच्याभोंवतीं जमा झाले. गोऱ्या मळेवाल्यांची भयानें आणि संतापानें गाळण उडून गेली. सरकारनें तातडीचा हुकूम काढून गांधीजींना चंपारण्यांतून निघून जा असें सांगितलें. गांधीजींनीं सरकारी हुकूम चुरगाळून फेकून दिला. सरकारनें त्यांच्यावर खटला भरला. सरकारला वाटलें, गांधीजी आपला गुन्हा नाकबूल करतील. पण गांधीजी मान वर करून म्हणाले, " होय, तुम्ही म्हणतां तो गुन्हा मीं केला. जनतेची सेवा करण्यासाठीं मी चंपारण्यांत आलों. मी कायदा पाळणारा माणूस आहें. पण कायदा पाळून जनतेची सेवा करणें अशक्य आहे. तुमच्या कायद्याचा अनादर करण्याचा माझा हेतु नाहीं. पण त्याहूनहि थोर असा कायदा माझ्या अंतरात्म्याचा आवाज मला सांगतो आहे. तो मला पाळला पाहिजे ! " सत्याग्रही गांधीजींच्या भारताच्या राजकीय रंगभूमीवरचा तो पहिला तेजस्वी प्रवेश होता. आत्मिक बळाचें त्याच्या मुद्रेवरचे तें अद्‌भुत तेज बघून सरकारचे डोळे दिपले. सरकारनें त्यांना सोडून दिलें. आणि शेतकऱ्यांच्यावरचे सर्व अन्यायी आणि जुलमी कर रद्द करण्याचें मान्य केलें. गांधीजींच्या जयजयकारानें सारें चंपारण्य दुमदुमून गेलें. कृतज्ञतेच्या अश्रूंच्या फुलांचा शेतकऱ्यांनीं त्यांच्यावर वर्षाव केला. साठ वर्षें चाललेला शेतकऱ्यांचा छळ गांधीजींनीं सहा महिन्यांत नाहींसा करून टाकला. काश्मीर-पासून तों कन्याकुमारीपर्यंत गांधीजींच्या विजयाच्या नौबती वाजूं लागल्या. आपलीं संकटें नाहींशीं करणारा आणि आपल्याला नवीन जीवन देणारा आपला पालनहार आतां आपल्या भूमींत अवतीर्ण झाला आहे, असेंच कोट्यवधि किसानांना आणि कामगारांना वाटलें. अहमदाबादच्या मजुरांनीं गांधीजींना मदतीसाठीं हाक मारली. खेडा जिल्ह्यांतल्या शेतकऱ्यांनीं साहाय्यासाठीं त्यांना आरोळी दिली. देशांतला सारा किसानवर्ग खडबडून जागा झाला. एका नवीन सामर्थ्याचा आपल्यामध्यें संचार होत असल्याचा जनतेला प्रत्यय आला. हीच स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ. राजेंद्रबाबू म्हणाले, " स्वराज्याचें बीजारोपण गांधीजींनीं प्रथम चंपारण्यांत केलें ! "

एकोणीस सालच्या नोव्हेंबर महिन्यांत पहिलें महायुद्ध संपलें. महायुद्धाच्या काळांत भारतानें सरकारशीं सहकार्य करावें अशी गांधीजींची भूमिका होती. शत्रु

अडचणींत असतां आपण त्याचा फायदा घेऊं नये. अडचण संपली म्हणजे त्याची न्यायबुद्धि जागृत होऊं द्यावी. ‘ आम्ही साहाय्य देतों, तुम्ही स्वराज्य द्या ’ असा सौदा करणें गांधीजींना पसंत नव्हतें. महायुद्धांत हिंदुस्थाननें केलेल्या मदतीबद्दल ब्रिटिशांनीं मॉंडफोर्ड सुधारणांचा नजराणा हिंदुस्थानच्या हातीं दिला त्याच वेळीं त्याला मातीमोल करून टाकणारीं दडपशाहीचीं काळीं रौलट बिलें हिंदुस्थानच्या गळ्यांत अडकवलीं. ब्रिटिशांच्या कृतज्ञताबुद्धीचा तो विलक्षण मासला बघून गांधीजींना अतिशय दुःख झालें. ‘ ब्रिटिशांच्या रक्षणासाठीं आम्हीं आपलें रक्त सांडलें त्याचें हें फळ काय ! नाहीं, आमच्या नागरिक हक्कांवर आणि स्वातंत्र्यावर गदा घालणारीं हीं अन्याय्य बिलें आम्ही कालत्रयींहि सहन करणार नाहीं ! ’ ब्रिटिशांच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं गांधीजींनीं सत्याग्रहाचें एकदम निशाण उभारलें आणि हरताळाची रौद्र तुतारी फुंकली. त्या तुतारीचे पडसाद देशभर निनादले. कोट्यवधि जनता गांधीजींच्या आदेशाला साद देण्यासाठीं सिद्ध झाली. जनताजनार्दनाचें तें विराट् रूप पाहून ब्रिटिश नोकरशाहीच्या छातींत धडकी भरली. या देशांतलें आपलें राज्य आतां संपुष्टांत आलें आहे असें तिला भय वाटलें. संतापानें आणि सूडानें तिचें माथें भडकून गेलें. दडपशाहीचा राक्षसी वरवंटा हातांत घेऊन ती जनतेला बेफामपणें ठेचीत सुटली. क्रौर्याला सीमा राहिली नाहीं. कायदा संपला, न्याय बुडाला, माणुसकी नष्ट झाली. पंजाबांत तर कहर उडाला आणि अमृतसर येथें जालियनवाला बागेंत निरपराध स्त्री-पुरुषांची आणि अर्भकांची अमानुष कत्तल करून ब्रिटिशांनीं नादिरशहा आणि तैमूरलंग यांनाहि खालीं पाहावयास लावलें. हा कत्तलीनें भारतवर्षाच्या काळजाला जखम झाली. आणि ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवरचा त्याचा विश्वास एकदम ढासळून पडला. सतत पंचवीस वर्षें ब्रिटिश सरकारशीं गांधीजींनीं जें सहकार्य केलें आणि त्यांच्या अन्यायी राजवटीबद्दल जी सहिष्णुतावृत्ति दाखविली तिचा जालियनवाला बागेमध्यें चक्काचूर झाला. ‘ यापुढें या जुलमी ब्रिटिश राजसत्तेशीं सहकार्य करणें अशक्य आहे ! ’ अशी गांधीजींची खात्री पटली. त्याबरोबर त्यांच्या हृदयांतला परमेश्वर रौद्र स्वरूप धारण करून एकदम प्रकट झाला आणि आपलें सारें सात्त्विक सामर्थ्य एकवटून त्यानें एक ऑगस्ट एकोणीसशें वीस रोजीं असहकारितेचा शंख फुंकला. त्याच दिवशीं भारताला स्वराज्याचा महामंत्र शिकवणारे लोकमान्य टिळक आपला अवतार संपवून निजधामाला गेले. ‘ भारताचा उद्धार करणारे गांधीजी हेच उद्यांचे महापुरुष आहेत, त्यांच्या मागून जा ! ’ असा लोकमान्यांनीं देशाला शेवटचा संदेश दिला. लोकमान्यांचा अस्त आणि गांधीजींचा उदय हा हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासांतील मानवी मनाला थक्क करून सोडणारी अशी ईश्वरी घटना होय !

वीस सालच्या सप्टेंबरमध्यें कलकत्त्याला राष्ट्रीय सभा भरली. तिच्या व्यासपीठावर असहकारितेचें देदीप्यमान अस्त्र हातांत घेऊन गांधीजी पुराणांतल्या एखाद्या महर्षीप्रमाणें उभे राहिले आणि त्यांनीं आपल्या तेजस्वी वाणीनें साऱ्या देशाला आज्ञा केली, "सरकारी पदव्या आणि नोकऱ्या सोडून द्या. सरकारी विद्यालयांत, न्यायमंदिरांत आणि कायदेमंडळांत पाय टाकूं नका. परदेशी कापडावर बहिष्कार टाका आणि हातांत चरखा घ्या ! एका वर्षाच्या आंत मी तुम्हांला स्वराज्य मिळवून देतों !" असहकारितेच्या त्या चतुःसूत्री महामंत्राच्या गर्जनेनें सारा भारतवर्ष खडबडून जागा झाला. असहकारिता ही भारताच्या आध्यात्मिक सामर्थ्याची अत्युच्च भरारी होती. पांच हजार वर्षांच्या इतिहासांत जें जें म्हणून कांहीं उज्ज्वल, उदात्त आणि दिव्य होतें, तें तें जिवंत होऊन आणि आकार घेऊन गांधीजींच्या असहकारितेंत पुन्हा प्रकट झालेलें होतें. दीडशें वर्षें पारतंत्र्याच्या काळोखांत निराशेनें चाचपडत असलेल्या भारताला 'एका वर्षात स्वराज्य देतों' या गांधीजींच्या आश्वासनानें प्रचंड धीर मिळाला ! आंधळ्याला एकदम डोळे मिळावेत तसें त्याला वाटलें. जनतेच्या अंतःकरणांतलें नैराश्य आणि औदासीन्य एकदम नाहींसें झालें. आशेची आणि उत्साहाची नवीन पालवी अन् टवटवी साऱ्या देशाच्या मुद्रेवर झळकूं लागली. जनतेच्या नसानसांतून नवीन चैतन्य वाहूं लागलें. देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत क्रांतीची एक प्रचंड लाट उठली. त्या क्रांतीच्या महापुरामध्यें सारा देश बुडून गेला. हजारों लोकांनीं सरकारी नोकरीच्या शृंखला तडातड तोडून टाकल्या. सरकारी शाळांना आणि न्यायमंदिरांना कुलुपें लागलीं. कायदेमंडळें ओस पडलीं. परदेशी कापडाच्या देशभर होळ्या पेटल्या आणि त्यांच्या धुरानें देशांतलें सारें वातावरण धूसर झालें. लक्षावधि चरखे देशांत फिरूं लागले, आणि 'चरखा चला चलाके, लेंगे स्वराज्य लेंगे' हा स्वराज्याचा महामंत्र एकस्वरानें गात गात सारा भारतवर्ष महात्मा गांधींच्या मागून स्वराज्याच्या दिशेकडे चालूं लागला. पंधरा सालच्या जानेवारी महिन्यांत गांधीजी दक्षिण आफ्रिकेमधून हिंदुस्थानांत परत आले; आणि एकवीस सालच्या जानेवारी महिन्यांत हिंदुस्थानांतील चाळीस कोटी जनतेनें एकमतानें त्यांचें नेतृत्व मान्य केलें. अवघ्या सहा वर्षांच्या आंत गांधीजींनीं हा जो विराट् चमत्कार करून दाखविला त्याला जगाच्या इतिहासांत कुठेंहि तोड सांपडणार नाहीं.

एकवीस सालापासून मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत संपूर्ण सव्वीस वर्षें हिंदी जनतेच्या हृदयसिंहासनावर एखाद्या चक्रवर्ती सम्राटाप्रमाणें आरूढ होऊन गांधीजी भारतावर राज्य करीत होते. भारताच्या इतिहासांत हा पाव शतकाचा कालखंड गांधीजींनीं अमर करून ठेवला आहे. या काळांत ब्रिटिश साम्राज्य-

शाहीला एका क्षणाचीहि उसंत न देतां स्वातंत्र्याचा लढा त्यांनीं लढवीत ठेवला आणि जनतेच्या अंतःकरणांत पेटलेला क्रांतीचा अंगार एकसारखा भडकवीत नेला. पुराणकाळांत देवाचें दानवांशीं युद्ध झालें. त्या वेळीं लढतांना देवांनींहि जितका मनाचा संयम राखला नसेल तेवढा संयम, मनःशांति आणि साधनांचें पावित्र्य राखून गांधीजींनीं या पंचवीस वर्षांत ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं लढा दिला. एका बाजूला बंदुका, तोफा, रणगाडे, लढाऊ जहाजें, विषारी धूर आणि वेगवान् विमानें घेऊन सज्ज असलेली बलाढ्य ब्रिटिश लष्करी सत्ता आणि दुसऱ्या बाजूला कपाळीं कुंकुमतिलक लावून आणि आधारासाठीं हातांत सोटा घेऊन दंतहीन मुखानें शांतपणें हसत असलेला एक सत्तर-पंचाहत्तर वर्षांचा लहानसा पंचाधारी म्हातारा अन् त्याच्यामागें उभी असलेली उघडीनागडी, दीन, दुःखित, दरिद्री आणि भुकेकंगाल जनता! एका महान् राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं झालेला असला अद्‌भुत आणि विलक्षण लढा जगाच्या पाठीवर कधीं कुणीं पाहिला आहे काय? जगांत आजपर्यंत मोठमोठे वीर, योद्धे आणि सेनापति होऊन गेले असतील; पण शत्रूच्या हातून मरण पत्करून त्याला शरण आणण्याचें असलें चमत्कारिक युद्धशास्त्र एका तरी लष्करी तज्ज्ञाच्या डोक्यामधून कधीं निर्माण झालें आहे काय? गेल्या शतकांत जगामध्यें मोठमोठे वैज्ञानिक शोध लागले आणि शास्त्रज्ञांनीं युद्धाकरितां नवनवीन अस्त्रें अन् शस्त्रें शोधून काढलीं. बलाढ्य साम्राज्यशाहीला दांतीं तृण धरून शरण आणायला लावणाऱ्या पाशुपतास्त्राचा शोध एकट्या गांधीजींखेरीज दुसऱ्या कोणी लावला आहे? विसाव्या शतकाचा वैज्ञानिक शोध अणुगोल नसून अहिंसा आहे याची जगाला आतां खात्री पटली आहे.

अहिंसा ही एक महान् दैवी शक्ति आहे. या शक्तीच्या सामर्थ्यावर गेल्या पंचवीस वर्षांत गांधीजींनीं जे एकाहिपेक्षां एक अद्‌भुत चमत्कार करून जगाला दाखविलेले आहेत, तसे चमत्कार पुराणकाळांत मोठमोठ्या ऋषींना आणि योग्यांना देखील करतां आले नाहींत. ओंजळभर मंतरलेलें पाणी अंगावर मारून ऋषि जसे राक्षसांना पळवून लावीत, त्याप्रमाणें अहिंसेचा मंत्र म्हणून तयार केलेल्या समुद्र-पाण्याच्या पुडीभर मिठानें किंवा जंगलांतून उपटलेल्या गवतानें ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या छातींत भयाची धडकी उठलेली आहे. पंचवीस वर्षांच्या स्वातंत्र्ययुद्धांत गांधीजींच्या नेतृत्वाखालीं जनतेनें जो त्याग, जे पराक्रम आणि जें बलिदान केलें, तसे अघटित पराक्रम भारतीय युद्धामध्यें देखील झाले नाहींत. देशांतले तुरुंग तुडुंब भरून वाहूं लागले. घरादारांच्या आणि संसाराच्या होळ्या पेटल्या. लाठ्यांच्या आघातांनीं शेकडों मस्तकें फुटलीं. बंदुकीच्या गोळ्यांनीं हजारों छात्या छिन्नविच्छिन्न झाल्या. फांसाच्या दोरीला अनेक धडें लोंबकळूं लागलीं. एवढें होऊनहि जेव्हां ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या अंतःकरणांत शहाण-

पणाचा आणि न्यायाचा प्रकाश पडेना, तेव्हां बेचाळीस सालच्या ऑगस्ट महिन्यांत आपलें तपःसामर्थ्य एकवटून 'छोडो हिंद'ची प्रचंड रौद्र गर्जना गांधीजींनीं केली. त्या गर्जनेचे कोट्यवधि पडसाद साऱ्या देशांत निनादले. श्रीकृष्णाच्या उघडलेल्या मुखांत अर्जुनाला जसें विश्वस्वरूप दिसलें, त्याप्रमाणें 'छोडो हिंद'च्या आंदोलनांत ब्रिटिश सरकारला चवताळलेल्या हिंदी जनतेचें अक्राळविक्राळ नारसिंह स्वरूप दिसलें. तें पाहतांच ब्रिटिशांच्या अंतःकरणाचा सपशेल ठाव सुटला. यापुढें या देशावर एक क्षणभरहि राज्य करणें अशक्य आहे अशी त्यांची खात्री झाली. दीडशें वर्षें आपल्या हातीं असलेलीं राज्यसूत्रें मुकाट्यानें जनतेच्या हवालीं करून ब्रिटिश राजसत्ता एकोणीसशें सत्तेचाळीसच्या पंधरा ऑगस्टला या देशांतून मान खालीं घालून चालती झाली. हर्षानें जवळजवळ वेड्या झालेल्या हिंदी जनतेनें त्या दिवशीं स्वातंत्र्याचा एवढा जयजयकार केला कीं, त्यामुळें आभाळ खालीं कोसळून पडतें आहे असें वाटलें. हिंदी स्वातंत्र्याचा जयजयकार हा महात्मा गांधींचा जयजयकार होता! अहिंसेच्या सामर्थ्यानें चाळीस कोटी जनतेच्या हातापायांतल्या पारतंत्र्याच्या बेड्या तुटून देश स्वतंत्र झाला, हा गांधीजींच्या जीवनाचा आणि तत्त्वज्ञानाचा विजय होता! देवाधिदेवालाहि हेवा वाटावा असाच तो विजय नव्हता काय?

गांधीजींच्या भगीरथ प्रयत्नांनीं स्वातंत्र्याची गंगा आकाशांतून धो धो करीत भारताच्या मस्तकावर उतरली; पण त्याबरोबर फाळणीची वीजहि देशाच्या डोक्यावर कोसळली. आणि अखंड भारताचीं छकलें झालीं. एकाच प्याल्यांत अमृत आणि विष घालून हसत हसत आणि रडत रडत तो देशाला प्यावा लागला. स्वर्गांतून पृथ्वीवर पडणारी गंगा मस्तकावर झेलण्याचें काम ज्या शंकराला करावें लागलें, त्यालाच समुद्रमंथनांतून निर्माण झालेलें हालाहल विष गिळून नीळकंठ बनावें लागलें. ज्यानें देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलें, त्या स्वातंत्र्यजनकालाच देशाच्या फाळणीचें हालाहल गिळावें लागलें आणि आपल्या प्राणांचें बलिदानहि करावें लागलें. 'देशाचे तुकडे झाले तर माझ्या देहाचे तुकडे होतील', ही महात्माजींची भविष्यवाणी दुर्दैवानें शेवटीं खरी ठरविली. तीस वर्षांपूर्वीं चंपारण्यांत आपल्या हातानें लावलेल्या स्वराज्याच्या वृक्षाला शेंडेफळ आलेलें पाहण्याचें थोर भाग्य गांधीजींना लाभलें खरें, पण त्याबरोबर साम्राज्यशाहीनें या देशांत पेरून ठेवलेल्या जातीय दुहीच्या विषवल्लींना अत्याचाराचीं हिंस्र फळें उगवलेलीं बघून त्यांचें अंतःकरण किती रक्तबंबाळ झालें असेल बरें! दुःखितांच्या डोळ्यांतून वाहणारा प्रत्येक अश्रू पुसण्यासाठींच मुळीं ज्यानें अवतार घेतला होता त्याला सभोंवार चहूंकडे अत्याचाराचा वणवा पेटलेला बघून, जिकडेतिकडे रक्ताचे पाट वाहत असलेले पाहून, आणि गुंडांच्या हांतात सांपडलेल्या

अर्भकांच्या आणि अबलांच्या करुण किंकाळ्या ऐकून काय वाटलें असेल बरें ! कुठेंकुठें जाऊं, कोणाकोणाचे अश्रू पुसूं, कोणाकोणाच्या जखमा बांधूं, कोणा-कोणाचें सांत्वन: करूं, कोणाकोणाला धीर देऊं या विचारानें त्या महात्म्याचें धैर्य गळून गेलें असेल आणि त्याच्या चित्ताला भोवळ आली असेल. पण तशाहि व्याकुळ मनःस्थितींत आपलें सर्व दुःख गिळून तो महात्मा निर्वाणीच्या निर्धारानें उठून उभा राहिला आणि बाहेर चालूं लागला. अमावास्येपेक्षांहि गडद आणि भीषण काळोख भोंवतीं पडला आहे, रक्ताला चटावलेले हिंस्र पशू भेसूर आरोळ्या ठोकीत सभोंवार हिंडत आहेत, प्रकाशाचा एक किरणदेखील डोळ्यांना दिसत नाहीं, काळोखांतून हुंदके, सुस्कारे, कण्हणें आणि आक्रोश यावांचून दुसरें कांहींहि ऐकूं येत नाहीं, तरीहि तशा अंधारांतून काठी टेकीत आणि हळूहळू मार्ग काढीत अठ्याहत्तर वर्षांचा हा म्हातारा, ' रघुपति राघव राजाराम, पतित पावन सीताराम। ईश्वर-अल्ला तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान। ' हा जातीय ऐक्याचा महामंत्र म्हणत म्हणत चालेला होता. रामनामाच्या मंत्रानें जातीयवादाच्या रावणाचें निर्दालन करीत आणि पुन्हा देशाचीं दोन्ही शकलें जोडून तो सारखा अखंड आणि प्रचंड बनवीन असा आत्मविश्वास त्या महात्म्याच्या अंतःकरणांत निर्माण झाला. तो नौखालींत गेला, कलकत्त्याला आला. सारा बंगाल रामानामाच्या गजरानें दुमदुमूं लागला. देशाला पुन्हा धीर वाटूं लागला. इतक्यांत दिल्लीची हांक आली म्हणून घाईघाईनें महात्मा दिल्लीला आला. महात्म्याच्या दर्शनानें दिल्लीची व्यथा निवाली. दिल्लीचा अंतरात्मा शांत झाला. रामनामाच्या गजरानें सारी दिल्ली गर्जूं लागली. महात्म्याची मुद्रा प्रफुल्लित दिसूं लागली. आणि—आणि एके दिवशीं संध्याकाळीं अचानकपणें तो गजर एकदम शांत झाला. त्या मंत्राचा महान् उद्गाता चिरनिद्रेच्या आधीन झाला होता.

गांधीजींच्या निधनानें भारताचें पंचवीस वर्षांचें एक स्वर्गीय स्वप्न समाप्त झालें ! हें स्वप्न डोळ्यांनीं पाहण्याचें भाग्य ज्यांना लाभलें त्यांच्यासारखे भाग्यशाली कोणी नाहींत ! असें महान् स्वप्न जगांत पुन्हां कधीं कोणास पाहावयाला मिळणार नाहीं. कोट्यवधि जनतेच्या अंतःकरणामधले सर्व विसंवादी सूर स्वतःच्या षड्जाशीं जमवून घेऊन स्वातंत्र्याचें असें सुंदर संगीत पंचवीस वर्षेपर्यंत या देशांत एकसारखें गांधीजींनीं घुमवीत ठेवलें होतें म्हणतां ! जनतेनें जवाहरलाल नेहरूंचें ऐकावयाचें. जवाहरलालांनीं गांधीजींचें ऐकावयाचें. गांधीजींनीं परमेश्वराचें ऐकावयाचें. असा सुरेल आणि लयबद्ध समन्वय जमून गेला होता या राष्ट्राचा ! तें सारें मधुर मनोहर स्वप्न आतां कायमचें नाहींसें झालें ! गांधीजींचें आतां काय काय आठवायचें ? किती किती आठवायचें ? अनेक साध्या, सोप्या, अवघड आणि विलक्षण गोष्टींचा गांधीजींमध्यें अद्भुत आणि मनोहर संगम

झालेला होता ! तो त्यांचा पंचा, ती त्यांची शेळी, तो त्यांचा आहार, तो चरखा, तें सोमवारचें मौन, तीं त्यांचीं उपोषणें, त्या त्यांच्या प्रार्थना आणि तो त्यांचा आश्रम हीं त्यांच्या त्यागी आणि तपस्वी जीवनाचीं सर्व वैशिष्ट्यें कल्पान्तापर्यंत जगाच्या स्मरणांत राहतील ! ह्या सर्व गोष्टींचा ते हयात असतांना ज्यांनीं कोणी उपहास केला, त्यांना त्यांतील एकेक गोष्ट आठवून जन्मभर स्फुंदून स्फुंदून रडावें लागेल. गांधीजींचें माहात्म्य भारतानें ओळखलेंच नाहीं, असें कुणालाहि म्हणतां येणार नाहीं. तथापि आपल्या कांहीं देशबांधवांकडून गांधीजींची जी अवहेलना झाली, ती पाहून ' फार लहान आणि क्षुद्र माणसांच्या देशांत अतिशय मोठा पुरुष जन्माला आला ' असेंच एखादे वेळीं उद्यांचें जग हळूहळू म्हणेल. तथापि, या देशामध्यें जन्म घेऊन वेदांना, उपनिषदांना, ऋषींना, योग्यांना आणि साधु-संतांना प्रसविणाऱ्या या महान् देशाची पांच हजार वर्षांची प्राचीन परंपरा गांधीजींनीं सांभाळली आणि देशाची अब्रू वाचवली यांत मुळींच संशय नाहीं. अडीच तपें भारताचें जीवनचक्र ज्या एका महान् आंसाभोंवतीं फिरत होतें, तो आंस एकाएकीं तुटल्यामुळें भारताचा तोल आज ढळल्यासारखा झालेला आहे. तीस वर्षें ज्या महन्मंगल मूर्तीची एकनिष्ठपणें भारतवर्ष पूजा करीत होतें, ती मूर्ति नाहींशी झाल्यामुळें आपलें स्वातंत्र्याचें मंदिर आज सुनें झाल्यासारखें वाटत होतें. तथापि, गांधीजींचें शरीर आणि आत्मा भारतामधून हिरावून नेण्याचा काळ-पुरुषाचा कुटिल डाव मात्र सपशेल फसलेला आहे. नद्या-नद्यांमधून आणि तीर्थां-तीर्थांमधून गांधीजींच्या पवित्र अस्थि आणि चिताभस्मांतले तेजस्वी अणू साऱ्या भारतामध्यें वाहत जातील आणि या भूमीमधल्या प्रत्येक कणाकणाच्या हृदयांत घुसून बसतील. गांधीजींच्या तेजस्वी देहाचा साऱ्या भारताच्या देहांत आतां संचार होईल. मृत्यूनें गांधीजींचें शरीर नष्ट केलें नाहीं. त्यांच्या लहान देहाला विराट् स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. शरीराच्या पिंजऱ्यांतून मुक्त झालेला गांधीजींचा आत्मा आतां साऱ्या विश्वाचा संचार करावयास मोकळा झालेला आहे. भारताच्या सीमांनीं आजपर्यंत मर्यादित असलेला गांधीजींच्या आत्म्याचा दिव्य प्रकाश वाढत वाढत जाऊन चारी खंडांना आतां व्यापून टाकील ! पृथ्वीतलावर कदाचित् यापुढें पूर्वींपेक्षांहि भयंकर महायुद्धें होतील. मोठमोठीं राज्यें आणि साम्राज्यें धुळीला मिळतील. साऱ्या भूगोलावरून रक्ताचे पाट वाहूं लागतील. आणि मानवजातीचा भयंकर संहार होऊन ती या पृथ्वीतलावरून अजिबात नष्ट होते कीं काय, असें भय निर्माण होईल. तेव्हां भूतकालाच्या आकाशांत ध्रुवाप्रमाणें अढळ तेजानें चमकणारी महात्मा गांधीजींची देदीप्यमान मूर्तीच जगाला आशा आणि धीर देऊन मानवतेच्या उद्धाराचा दिव्य मार्ग दाखवील ! खरोखरच, ' महात्मा गांधी अमर हैं ! '

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत
अनुक्रम ...७९२९२... दि: ...१९५१...
क्रमांक ...१५७६८... नों. दि. ६।२।७०

# २

# भारताच्या स्वातंत्र्याचा सरदार

तीन महिन्यांपूर्वी नाशिकच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनामध्यें सरदार पटेलांना मी पाहिलें. अगदीं जवळून पाहिलें. एकदां नाहीं, पण अनेकदां पाहिलें. त्या अधिवेशनांतील तरुणांच्या परिषदेंत झालेलें त्यांचें एकुलतें एक भाषण अगदीं शेजारून ऐकलें. मला घडलेलें तेंच त्यांचें शेवटचें दर्शन. त्याच वेळीं त्यांच्या चेहऱ्यावरची ती चमत्कारिक कळा बघून माझ्या काळजांत धस्स झालें. आणि मन आंतून अशुभ जिभेनें चुकचुकलें कीं, हा महापुरुष आतां कांहीं फार दिवसांचा सोबती नाहीं. माझ्या अंतर्यामीं ती भीति निकटच्या कांहीं मित्रांना मीं बोलूनहि दाखविली. पंचेचाळीस सालीं मुंबई येथें गोवालिया मैदानावर भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या अधिवेशनाला मी हजर होतों. तीन वर्षांच्या तुरुंगवासांतून सरदार त्या वेळीं नुकतेच बाहेर आलेले होते. त्या वेळींहि त्यांची प्रकृति कांहीं विशेष चांगली नव्हती. नगरच्या तुरुंगांतहि ते पोटाच्या विकारानें आजारीच होते. तथापि तशा परिस्थितींतहि ते त्या वेळीं मला सिंहासारखे उग्र आणि

क्रुद्ध वाटलें. आपल्या गगनभेदी गर्जनेनें त्यांनीं तें अधिवेशन अक्षरशः हलवून सोडलें. पण नाशिकच्या अधिवेशनांत मात्र सरदारांनीं एकदांहि तोंड उघडलें नाहीं. त्यांना हलवत नव्हतें, चालवत नव्हतें आणि बोलवतहि नव्हतें. अधिवेशन चालू असतां ते व्यासपीठावर मागच्या बाजूला कोचावर किंवा गादीवर स्वस्थपणें कलंडून पडलेले असत. कधींमधीं सरकारी कागदांवर ते सह्या करीत. पंडित नेहरू आणि चक्रवर्ती राजगोपालाचारियर ह्यांच्याशीं एकदां-दोनदां बोलतांना ते किंचित् हसलेले मीं पाहिले. पण त्यांचें तें हसणें मला अतिशय खिन्न वाटलें. हसतांना त्यांना फार कष्ट पडताहेत असा मला भास झाला. जीवनाचें ओझें वाहण्यांत आतां त्यांना अनिर्वचनीय यातना होत असाव्यात आणि आंतून त्यांना कसली तरी ओढ लागलेली असावी अशी त्यांची त्रासलेली मुद्रा पाहून माझी समजूत झाली. नाशिक अधिवेशनांत सरदारांनीं कोणत्याहि तऱ्हेचा भाग घेतला नाहीं. ह्यामध्यें त्यांचें कांहीं तरी राजकारण असलें पाहिजे असा कांहीं लोकांनीं संशय घेतला. पण सरदारांच्या शारीरिक आणि मानसिक अवस्थेची ह्या लोकांना खरोखरच कल्पना नव्हती असेंच म्हणावयाला पाहिजे.

पाऊणशें वर्षांचें वय हें कांहीं लहानसान वय नाहीं. ह्या वयांत अनेक म्हाताऱ्यांच्या पाठीच्या घड्या पडतात आणि तोंडें जमिनीकडे वळतात. सतत तीस वर्षें अनेक संकटांना, देहदंडांना आणि व्याधींना तोंड देऊन सार्वजनिक जीवनाच्या फरसबंदीवर स्वतःचें शरीर धोतराप्रमाणें अहर्निश एकसारखें आदळा-वयाचें नि आपटावयाचें आणि फिरून छाती, डोकें आणि हिंमत ताठ ठेवावयाची ही कांहीं सोपी गोष्ट आहे होय? ही अवघड गोष्ट सरदारांनीं साधली ह्याबद्दल त्यांचें खरोखरच कौतुक करावयाला हवें होतें. पाऊणशें वर्षांच्या वयांतहि सरदार तसे वृद्ध दिसत नव्हते. पण तीस वर्षांच्या अपरंपार झगड्यानंतर आणि श्रमानंतर ते अतिशय दमले होते, भागले होते, चिरविश्रांतीसाठीं त्यांचे नेत्र पैलतीराकडे लागले होते असा नाशिकच्या अधिवेशनांत त्यांना पाहून माझा मात्र समज झाला. काळपुरुषाच्या पावलाची चाहूल स्वतः सरदार पटेल ह्यांनाहि गेल्या पांच-सहा महिन्यांत ऐकूं येऊं लागली होती. गेल्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं त्यांनीं जें भाषण केलें त्यामध्यें 'काळपक्ष्याला थोडेंच अंतर कापावयाचें असून त्याचे पंख थकले आहेत' किंवा 'काळ आपल्या विळ्यानें आमच्यांतील भरदार कणसें तोडून नेऊन मागें केवळ वाळलेलीं ताटें ठेवतो' हे जे दोन करुणरसानें ओथंबलेले काव्यमय उल्लेख आढळतात त्यांवरून जीवनाच्या संध्यासनईचे सूर त्यांच्या कानांत घुमूं लागले असावेत असें दिसतें. एकतीस ऑगस्ट रोजीं अहमदाबाद येथ पंचाहत्तराव्या वाढदिवसाच्या समारंभाच्या दिवशीं साबरमती आश्रमांत तर ते सद्गदित कंठानें म्हणाले, "महात्मा गांधी, कस्तुरबा व

महादेवभाई ज्या ठिकाणीं गेले तेथें जाण्यास जरी मी उत्सुक असलों तरी आणखी कांहीं दिवस मी जगूं इच्छितों. त्या पुण्यात्म्यांच्या इच्छेनुसारच मी जिवंत आहें. त्यांचें अपुरें राहिलेलें काम पुरें करण्याचा त्यामागें हेतु आहे." निष्ठुर काळानें सरदारांची ही इच्छा मान्य केली नाहीं. अवघ्या दीड महिन्यानेंच चिरविश्रांतीसाटीं काळपुरुषानें त्यांना बोलावणें पाठविलें. मृत्यूपूर्वीं अवघे तीन-चार दिवस आधींच त्यांनीं आपल्या अंगावरचीं वीरवस्त्रें उतरून खालीं ठेवलीं. आणि आपल्या पत्नीनें आणि वडील बंधूनें ज्या स्थळीं आपले देह ठेवले त्याच ठिकाणीं आणि त्यांच्या सान्निध्यांत आपल्या देहाचें विसर्जन करण्याकरतां आपल्या सहकाऱ्यांचा अश्रुपूर्ण नेत्रांनीं निरोप घेऊन ते दिल्लीहून मुंबईला आले.

संपली ! पंडित नेहरू म्हणाले त्याप्रमाणें एका महान् जीवनाची कथा पंधरा डिसेंबर एकोणीसशें पन्नास रोजीं सकाळीं नऊ वाजून सदतीस मिनिटांनीं संपली ! आधुनिक भारताच्या स्वातंत्र्ययुद्धामधील एका असामान्य वीराच्या लोकोत्तर जीवनाची कथा होती ही ! अनेक रोमहर्षण समरप्रसंगांनीं, अभूतपूर्व पराक्रमांनीं, देदीप्यमान दिग्विजयांनीं आणि गगनचुंबी जयजयकारांनीं आमूलाग्र ओथंबलेली कथा आहे ही. शत्रूच्या आणि विरोधकांच्या छातींत धडकी भरविणारी, शूरांना आणि शाहीरांना स्फूर्ति देणारी, स्वजनांना आणि अनुयायांना आनंदानें बेहोष करून टाकणारी आणि एखाद्या तेजस्वी ताऱ्याप्रमाणें उद्यांच्या उगवत्या पिढ्यांना ध्येयाचा प्रकाश पुरविणारी अशी जिवंत आणि ज्वलंत कथा आहे ही ! पर्वताच्या एखाद्या उत्तुंग शिखराकडे पाहतांना डोळ्यांना कसें वाटतें ? उंच कड्यावरून जोरानें कोसळणारा प्रचंड धबधबा बघून छातीमध्यें काय होतें ? विस्तीर्ण नदीच्या पात्रामधून गर्जना करीत चाललेला महापुराचा लोंढा पाहून पोटांत काय उठतें ? धूर आणि जाळ आभाळांत ओकणाऱ्या ज्वालामुखीचा निमुळता जबडा लांबून दृष्टीस पडतांच काळजामध्यें काय भावना होते ? सरदारांच्या तीस वर्षांच्या अवाढव्य सार्वजनिक जीवनाचें सिंहावलोकन करतांना कोणाहि माणसाच्या मनांत अशाच प्रकारच्या भावनांचा कल्लोळ उत्पन्न होतो.

स्वातंत्र्यप्रेमाचा व वीरवृत्तीचा वारसा घेऊनच मुळीं सरदार जन्माला आले होते. सत्तावन्न सालच्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेतलेल्या एका बहाद्दूर शेतकऱ्याचे ते पुत्र होते. आणि तत्त्वासाठीं आपलें सर्वस्व पणाला लावणाऱ्या एका झुंझार जमदग्नीचे ते बंधु होते. तथापि, वयाचीं चाळीस वर्षें उलटून जाईपर्यंत आपल्या महान् जीवितकार्याचा संदेश त्यांना मिळालेला नव्हता. सर्वांगावर विलायती पेहराव चढवून आणि डोक्यावर तिरपी साहेबी टोपी ठेवून अहमदाबादच्या 'गुजरात क्लब' मधील विलायती जीवनाचा उपभोग घेणाऱ्या करमसदच्या ह्या रंगेल बॅरिस्टराला सोळा सालीं महात्मा गांधींनीं त्यागाची, दारिद्र्याची आणि

लोकसेवेची दीक्षा दिली. त्याबरोबर त्यांच्या जीवनांत एकदम क्रांति झाली. अंगावरचे विलायती कपडे ताडकन् त्यांनीं भिरकावून दिले आणि खादीचा गणवेष अंगावर चढवून गांधीजींच्या सत्याग्रही सैनिकांत ते दाखल झाले. भारतामधल्या एका क्रांतिकारक खंडाला ह्या वेळीं सुरुवात झालेली होती. राष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर महात्मा गांधींच्या रूपानें एक नवीन शक्ति उदय पावूं लागलेली होती. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पाशांतून बाहेर पडण्यासाठीं असहकारितेचा आणि कायदेभंगाचा नवीन मंत्र गांधीजींनीं राष्ट्राला दिलेला होता. आणि त्या मंत्राच्या गर्जनेनें देशांतील कोट्यवधि जनता जागृत होऊन कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं एकत्र येऊं लागली होती. ह्या काळांत गांधीजींच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळें आकर्षित होऊन देशांतील जीं कांहीं थोडींशीं बुद्धिमान्, पराक्रमी आणि तत्त्वनिष्ठ माणसें त्यांच्याभोवतीं जमा झालीं आणि आपल्या सर्वस्वावर पाणी सोडून स्वातंत्र्यासाठीं त्यांच्या नेतृत्वाखालीं आमरण लढण्याची ज्यांनीं प्रतिज्ञा केली त्यांमध्यें वल्लभभाई पटेल ह्यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव करावा लागेल. गांधीजींनीं फुंकर घालतांच वल्लभभाईंच्या व्यक्तिमत्त्वामधील वीरवृत्तीचा अंगार एकदम भडकून बाहेर पडला. आणि त्यांनीं आरोळी देतांच बारडोलीचा एक लाख शेतकरी दंड थोपटून त्यांच्यामागें उभा राहिला.

बारडोलीमध्यें राज्य पटेलांचें आहे कीं इंग्रज सरकारचें आहे, एवढा भ्रम उत्पन्न करण्याइतकी त्या ठिकाणीं वल्लभभाईंनीं क्रांति घडवून आणली! प्रांतांच्या गोऱ्या गव्हर्नरानें संतापून गर्जना केली कीं, ब्रिटिश साम्राज्याचें सारें सामर्थ्य खर्चीं पडलें तरी हरकत नाहीं, पण आम्ही ही बारडोली ठेचून काढूं! पण शूर बारडोली कांहीं ठेचली गेली नाहीं. बारडोली विजयी झाली. आणि त्या ठिकाणीं प्रत्ययास आलेल्या गांधीजींच्या अहिंसात्मक लढ्याचें सामर्थ्य बघून ब्रिटिश राज्यकर्त्यांचे डोळे दिपून गेले. साऱ्या भारताने हर्षभरित होऊन वल्लभभाईंवर पुष्पवृष्टि केली. आणि 'बारडोलीचे सरदार' अशी पदवी देऊन महात्मा गांधींनीं त्यांच्या शौर्याचा गौरव केला. स्वातंत्र्याच्या महाभारतामधील 'बारडोलीचा लढा' हें एक अत्यंत तेजस्वी पर्व म्हणून समजलें जातें. त्यानंतर दोनच वर्षांनीं कराची येथें भरलेल्या शेहेचाळिसाव्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थानीं वल्लभभाईंची निवड झाली. कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून 'मी शेतकरी आहे!'—हुं खेडूत छूं!—अशी गर्जना करणारे वल्लभभाई हे पहिलेच अध्यक्ष होत. तेव्हांपासून तों देशाला स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत कॉंग्रेसच्या प्रत्येक मोहिमेंत, आंदोलनांत आणि अग्निदिव्यांत महात्माजींच्या पावलावर पाऊल ठेवून, हातांत हात घालून आणि खांद्याला खांदा भिडवून अगदीं आघाडीवरचे वीर म्हणून सरदार तळपले आणि लढले. महात्मा गांधी हे स्वतंत्र भारताचे जनकच होते. पण ब्रिटिश

साम्राज्यशाहीच्या दाढेंतून त्यांनीं परतंत्र भारताला ज्या दोन वीरबाहूंनीं ओढून बाहेर काढले त्यांपैकीं त्यांचे एक बाहु सरदार वल्लभभाई हे होत आणि दुसरे बाहु पंडित जवाहरलाल हे आहेत !

सामान्यपणें पंडित जवाहरलाल नेहरू हे गांधीजींचे वारसदार म्हणून समजले जातात. पण त्या वारशांत सरदार पटेल हेहि हिस्सेदार होते हें विसरतां येत नाहीं. गांधीजींनीं आपल्या गुणांची आणि सामर्थ्याची वांटणी केली आणि त्यांपैकीं एक हिस्सा पंडितजींना दिला, आणि दुसरा सरदारांना मिळाला. गांधीजींचा विचार आणि तत्त्वज्ञान नेहरूंना मिळालें. त्यांचा आचार नि व्यवहार पटेलांकडे आला. तेजस्विता आणि लोकप्रियता पंडितजींना मिळाली. कठोरता अन् दाहकता सरदारांच्या वांट्याला आली. त्यामुळें गांधीजींचें कार्य त्यांच्या हयातींत आणि त्यांच्या मृत्यूनंतर पुढें चालविण्यासाठीं नेहरू आणि पटेल ह्यांना एकत्र येणें मुळीं अपरिहार्यच होऊन बसलें. कॉंग्रेसच्या वीस-पंचवीस वर्षांच्या लढ्यांत गांधी, पटेल आणि नेहरू ह्यांचें जीवन आणि व्यक्तिमत्त्व एकमेकांमध्यें इतकें विलीन होऊन गेलें होतें कीं, देशाच्या राजकारणाचीं सूत्रें त्यांपैकीं कोण हलवितें, कोण बोलवितें आणि कोण चालवितें हें बाहेरच्या माणसांना कळणें मुष्कील होऊन बसलें होतें. दत्तात्रेयाच्या मूर्तीप्रमाणें हीं तीन तेजस्वी मस्तकें एका महान् देहामध्यें येऊन बसलीं होतीं. आणि एकाच प्रश्नाचा एकाच वेळीं तीं तीन निरनिराळ्या दृष्टिकोणांनीं विचार करीत असत. प्रत्येक निर्णय गांधीजीच देत आणि त्याची बजावणी पटेल आणि नेहरू करीत असें मुळींच नव्हतें. कित्येकदां पटेल आणि नेहरू निर्णय ठरवीत आणि गांधीजींना त्यांच्या मागें जावें लागे.

फाळणीचें मोल देऊन भारत स्वतंत्र करावयाचा हा महान् निर्णय गांधीजींचा नव्हता, नेहरू आणि पटेल ह्यांचा होता. ही गोष्ट जगजाहीर आहे. 'देशाचे तुकडे होण्यापूर्वीं माझ्या देहाचे तुकडे होतील' ही गांधीजींची प्रतिज्ञा होती. नेहरू आणि पटेल हेहि अखंड भारताचे गांधींएवढेच कट्टर पुरस्कर्ते होते. ब्रिटिश शिष्टमंडळाची 'सोळा मे'ची योजना मान्य करून कॉंग्रेसनें 'घटना समितींत जेव्हां जावयाचें ठरविलें तेव्हां सरदार म्हणाले, "मुस्लीम लीगला या योजनेंत पाकिस्तान दिसतें. पण आम्हांला ह्या योजनेंत तर अखंड हिंदुस्थान दिसतें. कोण बरोबर आहे हें बघूं." दुर्दैवानें ब्रिटिशांचा आणि मुस्लिम लीगवाल्यांचा कावा पटेल आणि नेहरूंच्या ध्यानांत आला नाहीं. शेवटीं मुसलमानांना पाकिस्तान दिल्यावांचून 'भारता'ला स्वातंत्र्य मिळणें ही गोष्ट अशक्य आहे अशीच परिस्थिति मुळीं निर्माण होऊन बसली. कोणत्याहि राष्ट्राच्या इतिहासांत एवढा बिकट प्रसंग निर्माण झाला नसेल. पुढें पाऊल टाकावें तर फाळणी. मागें पाऊल टाकावें तर पारतंत्र्य. इतिहासाच्या आणि

भूगोलाच्या रूपानें आव्हान देणाऱ्या भूतकाळाच्या छातींत खंजीर खुपसावयाचा कीं कोट्यवधि लोकांना गुलामगिरीच्या नरकांत तसेंच सडत ठेवून भविष्यकाळाच्या नरड्याला नख लावावयाचें ? ह्यांपैकीं कोणताहि मार्ग पत्करला तरी त्यांत धोका आणि नाशच होता. नेहरू आणि पटेल ह्यांनीं वज्राचीं अंतःकरणें करून कमी धोक्याच्या आणि अंतिम कल्याणाच्या मार्गानें जावयाचें अखेर ठरविलें. कोट्यवधि लोकांना मरणापेक्षांहि अधिक दुःख झालें. गांधीजींचें काळीज रक्तबंबाळ झालें. पण साऱ्या राष्ट्राच्या वतीनें नेहरू-पटेलांनीं निर्णय घेतलेला होता. तो आतां अटळ होता. स्वतःचे अश्रू आणि रक्त आंतल्या आंत गिळून नेहरू–पटेलांच्या ह्या निर्णयामागें साऱ्या राष्ट्राला खेचून आणण्यासाठीं हातांत काठी घेऊन महात्माजी पुन्हा पायावर धैर्यानें उभे राहिले आणि चोहोबाजूंनीं पेटलेला जातीय द्वेषाचा वणवा शांतीच्या व प्रेमाच्या वर्षावानें विझवीत विझवीत देशभर संचार करूं लागले. त्यांतच अखेर त्यांना आपल्या प्राणाची आहुति टाकावी लागली.

गांधीजींच्या जीवनानें एकत्र आलेल्या नेहरू-पटेलांच्या जोडींत गांधीजींच्या मरणानें एका निराळ्याच जिव्हाळ्याचें नातें निर्माण केलें. गांधीजींच्या रक्तानें दोघांचें आत्मे परस्परांशीं चिकटून एकजीव होऊन गेले. नेहरूंना सांभाळण्याची गांधीजींची जबाबदारी साहजिकच वयाच्या वडीलकीमुळें आणि स्वभावाच्या स्थिरतेमुळें सरदारांकडे आली. पिता, भ्राता, सहकारी आणि अनुयायी अशा निरनिराळ्या प्रेमाच्या आणि कर्तव्याच्या नात्यांनीं डोळ्यांत तेल घालून भारताचें अनमोल ' जवाहीर ' सरदारांनीं आतांपर्यंत सांभाळलें ह्यांत काय शंका आहे ? नाशिकच्या अधिवेशनांत लक्षावधि लोक नेहरूंना डोक्यावर घेऊन त्यांच्या नावाचा जयजयकार करीत होते तेव्हां मागल्या बाजूला व्यासपीठावर डोळे मिटून पडलेल्या वृद्ध सरदारांच्या आत्म्याला केवढा हर्ष आणि केवढी धन्यता वाटत असली पाहिजे ह्याची कोण कल्पना करूं शकेल ? मध्यवर्ती सरकारांत ' नेहरू-पक्ष ' आणि ' पटेल-पक्ष ' असे दोन तट पडल्याच्या बातम्या कांहीं लुच्चा लोकांनीं मध्यंतरी पिकवल्या होत्या. त्या वेळीं सरदार संतापून म्हणाले, " नेहरूंशीं बेइमान होणें म्हणजे गांधीजींचा द्रोह करण्यासारखें आहे. " आणि नेहरू हसून म्हणाले, " सरदारांत आणि माझ्यांत दोन पक्ष पडले आहेत ही खरी गोष्ट आहे. मीं नुसतें सांगावयाचा अवकाश कीं सरदार राजीनामा देतील. पण सरदारांनींहि मला सांगावयाचा अवकाश कीं मलाहि पण राजीनामा देऊन बाहेर पडावें लागेल. " मृत्यूपूर्वीं सरदारांच्या मनांत एकच विचार होता. आणि तो म्हणजे नेहरूंचा. दिल्लीहून निघतांना डोळ्यांत अश्रू आणून सरदार राष्ट्रपतींना म्हणाले, " पंडितजींवर आतां फार मोठा बोजा पडणार आहे. "

प्रेमाचा आणि कारुण्याचा केवढा अथांग डोह उचंबळतो आहे ह्या उद्गारांत ! सरदारांच्या मृत्यूनंतर लोकसभेंत बोलतांना पंडित नेहरू व्याकुळ स्वरांत म्हणाले, "ज्या जागेवर आम्ही दोघे आतांपर्यंत शेजारीं शेजारीं बसत असूं ती जागा यापुढें मोकळी पडलेली पाहून माझ्या हृदयांत कालवाकालव झाल्यावांचून राहणार नाहीं." सरदारांच्या मृत्यूमुळें पंडितजींच्या जीवनांत केवढी मोठी पोकळी निर्माण झालेली आहे त्याची कल्पना फारच थोड्यांना होऊं शकेल. पंडितजी आणि सरदार ह्यांच्या प्रेमाचें वर्णन करावयास एखाद्या महाकवीलाच अवतार घ्यावा लागेल. उभयतांमध्यें वितुष्ट उत्पन्न करून त्यांना एकमेकांपासून अलग करण्याचा आजपर्यंत अनेकांनीं प्रयत्न केला, पण त्या कामीं मृत्यूखेरीज दुसऱ्या कोणालाहि यश आलेलें नाहीं. आणि मृत्यूलाहि पण बिचाऱ्याला अर्धवटच यश आलें !

गांधी, पटेल आणि नेहरू हे एका दृष्टीने खरोखरच फार मोठे भाग्यशाली म्हणावयास पाहिजेत. कारण, स्वातंत्र्याच्या युद्धात विजय मिळवून आपली मातृभूमि पारतंत्र्यातून मुक्त झालेली स्वतःच्या डोळ्यांनीं पाहण्याचें परम भाग्य त्यांना लाभलें. आपल्या हयातींत हिंदुस्थान स्वतंत्र होणें अशक्य आहे अशा विचारानें निराश होऊन लोकमान्यांसारखे मोठे मोठे नेते कंटाळून निघून गेले. बेचाळीस सालीं गांधीजींनीं 'चले जाव'ची जेव्हां घोषणा केली तेव्हां ब्रिटिश सरकारनें कॉंग्रेसच्या सर्व वयोवृद्ध नेत्यांना तीन वर्षें कारागृहांत कोंडून ठेवलें. ह्या अग्निदिव्यांतून ते सर्वजण सुखरूप बाहेर पडतील अशी कोणाला आशा वाटत होती ? आगाखान वाड्यांत गांधीजींनीं प्राणांतिक उपोषण आरंभलें तेव्हां त्यांच्या चितेसाठीं ब्रिटिश सरकारनें आधींपासून लाकडेंदेखील आणून ठेविलीं होतीं. कस्तुरबा आणि महादेव देसाई तर आधींच बंदीवासांतच मरण पावलीं होतीं. सत्तर वर्षांचे वल्लभभाई पोटाच्या असाध्य व्याधीने इतके जर्जर झाले होते कीं ते जगण्याची आशाहि सर्वांनीं सोडून दिली होती. पण देश स्वतंत्र झालेला पाहण्याची कॉंग्रेसने त्यांची इच्छा इतकी ज्वलन्त आणि रौद्र होती कीं त्यांच्या अंगाला स्पर्श करण्याची मृत्यूला देखील छाती झाली नाहीं. दुसरें महायुद्ध संपतांच ब्रिटिश सरकारनें ह्या नेत्यांना जेव्हां कारागृहांतून बाहेर काढलें तेव्हां स्वातंत्र्याच्या गगनभेदी आरोळ्या ठोकीत खवळलेल्या सिंहाप्रमाणें आयाळी पिंजरीत आणि शेपट्या आपटीत एकेक नेता तुरुंगांतून बाहेर पडला. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राणावर उदार झालेल्या ह्या वयोवृद्ध वीरांचे दर्शन मुंबईच्या गोवालिया मैदानावर घेण्याचें भाग्य ज्यांना लाभलें ते धन्य होत. सत्तर वर्षांच्या सरदारांचा त्या वेळचा तो प्रखर आणि रौद्र अवतार बघून तर लोकांचे डोळे दिपले. त्यांना कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं असें लोकांना होऊन गेले. सरदारां-

वरील जनतेच्या प्रेमाला त्या अधिवेशनांत पराकाष्ठेची भरती आली होती. शरच्चंद्र बोस व सरदार पटेल ह्यांनीं धावत येऊन एकमेकांना कडकडून मिठी मारली आणि एकमेकांच्या खांद्यावर डोकीं ठेवून जेव्हां ते स्फुंदूं लागले तेव्हां तीस हजार प्रेक्षकांच्या काळजाचें त्या वेळीं अगदीं पाणी पाणी होऊन गेलें. हें रोमहर्षण दृश्य तर मी माझ्या आयुष्यांत कधीं विसरणार नाहीं. सरदारांच्या वक्तृत्वाला तर त्या वेळीं असा कांहीं विलक्षण बहर आला होता म्हणून सांगूं ! 'बेचाळीसच्या आंदोलना'बद्दल बोलतांना जेव्हां सरदार म्हणाले, "सरकारनें ह्या आंदोलनाला 'काँग्रेसचे बंड' असें नांव दिलें आहे, ह्या नांवाचा मी मोठ्या आनंदानें स्वीकार करतों. मला वाईट एवढेंच वाटतें कीं, बेचाळीसच्या बंडाची आम्हां तयारी केली नव्हती. तयारी करून जर का आम्हीं हें बंड केलें असतें तर आमच्या स्वातंत्र्याचा प्रश्न ह्या घटकेला आज शिल्लकच उरला नसता." त्या वेळीं हजारों श्रोते बेभान होऊन उभे राहिले आणि पांच मिनिटेंपर्यंत सरदार वल्लभभाईंच्या जयजयकारानें तो प्रचंड मंडप निनादत होता. एखाद्या 'महांकाळी' तोफेमधून मोठमोठे लाल आणि रसरसणारे शिशाचे गोळे जसे बाहेर पडावेत, तशीं एकामागून एक छातीठोक आव्हानें सरदारांच्या क्रुद्ध मुखामधून त्या अधिवेशनात बाहेर पडलीं. 'बंगालच्या दुष्काळांत लक्षावधि लोक मरूं देणाऱ्या नालायक लॉर्ड लिनलिथगोला ह्या देशावर राज्य करण्याचा अधिकार नाहीं,' असें त्यांनीं गर्जून सांगितलें. 'केवळ हिंदुस्थानांतूनच नव्हे तर साऱ्या आशिया खंडामधून तुमची हकालपट्टी केल्यावांचून आम्ही थांबणार नाहीं,' असा ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना त्यांनीं दम भरला. आणि ब्रिटिशांचें मजूर मंत्रिमंडळ पांच वर्षें टिको किंवा न टिको, आम्ही मात्र पांच वर्षांच्या आंत ह्या देशाचा राज्यकारभार आपल्या ताब्यांत घेतल्यावांचून राहणार नाहीं,' असें ॲटली मंत्रिमंडळाला त्यांनीं आव्हान दिलें.

वल्लभभाईंचें वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व पाहून मला तरी क्षणोक्षणीं लोकमान्य टिळकांची आठवण होई. दोघांचाहि वर्ण, मुद्रा, गुर्मी आणि गुरगुर अगदीं सारखीं होतीं. अंगावर उपरणें पांघरून अगदीं साध्या व शुभ्र पोषाखांत हळूहळू पावलें टाकीत सरदार जेव्हां व्यासपीठावर येत तेव्हां प्रत्येक पाऊल जणूं कांहीं आपल्या विरोधकांच्या छातीवर आपण टाकीत आहोंत अशा आवेशानें आणि आत्मविश्वासानें ते येत. उत्तम हिंदी किंवा उर्दू त्यांना बोलतां येत नसे. पण भाषेसाठीं म्हणून ते कुठें अडत नसत. आणि त्यांच्या भाषणाचा आशय श्रोत्यांना उत्तम तऱ्हेनें कळत असे. त्यांचें एकेक वाक्य म्हणजे घणाचा घाव होता. त्यामुळें श्रोत्यांच्या काळजाचा ते ताबडतोब ठाव घेत असत. प्रचंड लोकसमुदायापुढें राजकारणांतल्या कोणत्याहि कठीण विषयावर सोपें बोलणारा

त्यांच्याएवढा सामर्थ्यवान् वक्ता लोकमान्य टिळकांनंतर दुसरा झालाच नाहीं असें माझें स्पष्ट मत आहे. वीररस हा त्यांच्या वक्तृत्वाचा स्थायीभाव होता. मीरत काँग्रेसच्या अधिवेशनामध्यें त्यांच्या वीरवृत्तीचें अतिशय विशुद्ध आणि देदीप्यमान स्वरूप पहावयास मिळालें. पाकिस्तानी मुसलमानांच्या जातीय अत्याचारामुळें अर्जुनाप्रमाणें घाबरून आणि गोंधळून गेलेल्या व अगतिक झालेल्या स्वबांधवांना ताळ्यावर आणण्यासाठीं सरदारांनीं जो स्फूर्तिदायक संदेश दिला तो ' वल्लभगीता ' म्हणून अमर झालेलाच आहे. सरदार या संदेशांत म्हणाले, " तुम्हांला स्वतःचें रक्षण करतां आलें पाहिजे. तुम्हांला शेजाऱ्याचें रक्षण करतां आलें पाहिजे. ' आमचें रक्षण करा हो ' अशा लष्कराला आणि पोलिसांना तुम्ही हाका मारूं नका. भ्याडपणापेक्षां हिंसा श्रेष्ठ आहे. आत्मरक्षणासाठीं हिंसा करणें अवश्य असेल तर ती बेलाशक करा. रक्तपातानें आणि तलवारीनें मुसलमानांना पाकिस्तान मिळणार नाहीं. तलवारीला तलवारीनेंच उत्तर मिळेल !" गांधीजींच्या अहिंसातत्त्वावर एवढें उदात्त आणि तेजस्वी भाष्य त्यांच्या कोणत्याहि अनुयायाने त्यापूर्वी केलेलें नव्हतें, देशाला स्वातंत्र्य मिळण्या-पूर्वी देशामध्यें राष्ट्रवादाचा आणि जातीयवादाचा प्राणान्तिक झगडा चालू होता. जातीयवादाच्या आक्रमणापासून राष्ट्रवादानें आपला बचाव कसा करावा ह्याचा असंख्य राष्ट्रवादी जनतेला संशय पडलेला होता. तो त्यांचा संशय ' तलवारीला तलवारीनेंच उत्तर मिळेल ' असें जातीयवादाला आव्हान देऊन सरदारांनीं दूर केला, आणि राष्ट्रवादामध्यें नवीन जोम निर्माण केला. जातीयवादी पाकिस्तानी मुसलमान सरदारांच्या नांवानें जे दांतओठ खात असतात आणि मनगटें चावीत असतात त्याचें हेंच कारण होय !

आपल्या शत्रूचे वाभाडे काढण्याचें जबरदस्त सामर्थ्य सरदारांच्या वक्तृत्वांत होतें. २ सप्टेंबर १९४६ रोजीं नेहरूंच्या नेतृत्वाखालीं ' मध्यंतर सरकार 'ची दिल्ली येथें स्थापना झाली. ह्या सरकारांतून काँग्रेसमंत्र्यांना बाहेर हाकून देण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें आणि मुस्लिम लीगवाल्यांनीं जंग जंग पछाडले. पण काय वाटेल तें झालें तरी ' मध्यंतर सरकार 'मधून बाहेर पडावयाचें नाहीं असें सरदारांनीं ठरविलें. या धोरणाबाबत ' मीरत काँग्रेस 'मध्यें भाषण करतांना सरदार म्हणाले, " मध्यंतर सरकारांत आम्ही जे शिरलों, ते तेथें मुक्काम ठोकण्याचा पूर्ण निश्चय करूनच शिरलों. आपण होऊन ह्या जागेवरून हलण्याचा आमचा मुळींच विचार नाहीं. कांहीं लोक आम्हांला विचारतात कीं, देशांतले जातीय दंगे जर तुम्हांला थांबवतां येत नाहींत तर या मध्यंतर सरकार-वर लाथ मारून तुम्ही बाहेर कां पडत नाहीं ? त्याबद्दल मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, ब्रिटिशांची आणि मुस्लिम लीगवाल्यांची आतां दोस्ती जमलेली आहे.

ही दोस्ती फोडून काढण्यासाठीं आम्हांला मध्यंतर सरकारमध्यें राहावयाचें आहे. हें मध्यंतर सरकार आम्हांला वाटेल तेव्हां मोडून टाकतां येईल. पण आम्ही तें इतक्यांत मोडणार नाहीं. आम्ही ब्रिटिशांच्या तोंडाला डांबर फासून त्यांची साऱ्या जगांत जेव्हां यथेच्छ बदनामी करूं तेव्हांच मग हें मध्यंतर सरकार मोडून त्यांतून बाहेर पडूं !" 'याद राखा, तुम्हीं तलवार उपसली तर आम्ही तलवार उपसूं' असें मुस्लिम लीगला छातीठोकपणें सांगणारा आणि 'लक्षांत ठेवा, आमच्याविरुद्ध कारस्थानें कराल तर तुमच्या तोंडाला डांबर फासून तुमची साऱ्या जगांत बदनामी करूं' असें ब्रिटिशांना निर्भयपणें बजावणारा मर्द सरदार पटेलां-खेरीज कॉंग्रेसमध्यें दुसरा झालेला नाहीं. ह्याच्यामुळेंच शत्रूंना वल्लभभाईंचें भय वाटे आणि स्वकीयांना त्यांचा भारी दरारा वाटे. मुंबईच्या एका सभेंत ध्वनियंत्र बंद पडलें म्हणून लोक मोठमोठ्यानें ओरडावयाला लागले. तेव्हां वल्लभभाई शांतपणें म्हणाले, "ज्या वेळीं आम्ही तुम्हांला ओरडा म्हणून सांगूं त्याच वेळीं ओरडा ! भलत्या वेळीं कशाला ओरडतां आहांत ?" त्याबरोबर लोक एकदम खजील होऊन गप्प बसले. वल्लभभाईंच्या लढाऊ आणि उग्र वक्तृत्वाला विनोदाची विलक्षण धार असे. त्यामुळें त्यांच्या मित्रांचीं हसतां हसतां पोटें दुखून येत आणि शत्रूंचीं भयानें पोटें फुटून आंतडीं बाहेर पडत. आपल्या या हृदयविदारक विनोदानें आपल्या विरोधकांची काय स्थिति होत असेल ह्याची ते मुळींच पर्वा करीत नसत. 'तुमच्या कार्यक्रमांतली क्रांति आतां संपली !' असा समाजवाद्यांनीं जेव्हां त्यांच्यावर हल्ला केला, तेव्हां आपल्या दाहक विनोदाचें शस्त्र उपसून ते त्यांना म्हणाले, "कांहीं लोक अजून भ्रमांत आहेत. त्यांना असें वाटतें कीं, तेच क्रांति घडवून आणतात. एक कुत्र्याची गोष्ट आहे. एका बैलगाडीमध्यें खूप सामान भरून चाललें होतें. त्याच्या खालून एक कुत्रें चाललें होतें. त्या कुत्र्याला वाटलें कीं आपण चाललों नाहीं तर ती गाडी चालणार नाहीं. तशी ह्या लोकांची समजूत आहे. मला त्यांना एवढेंच सांगावयाचें आहे कीं क्रांतीच्या नुसत्या बडबडीनें क्रांति होत नाहीं !" सरदारांचा हा भीषण विनोद समाजवाद्यांच्या अगदीं वर्मीं जाऊन झोंबला. 'मध्यंतर सरकार' मध्यें जाणें म्हणजे ब्रिटिश सरकारशीं सहकार्य करण्यासारखें आहे, अशी नेहरू-पटेलांवर कोणी टीका केली, तेव्हां सरदार उखडून म्हणाले, "छान, साहेबाचा बाडबिस्तरा बांधण्याच्या आणि त्याचा गाशा गुंडाळण्याच्या कामामध्यें आम्ही त्यांना मदत केली तर तें काय आम्ही त्यांच्याशीं सहकार्य करीत असल्याचें निदर्शन आहे होय ?" जनाब जीनांनीं घटना समितीवर बहिष्कार घालावयाची घोषणा केली, त्याच सुमारास मुंबईच्या एका जाहीर सभेंत सरदारांनीं 'म्हातारी आणि तिचें कोंबडें' ही गोष्ट सांगितली. आणि

मग त्यांनीं श्रोत्यांना सवाल केला कीं, " म्हातारीनें कोंबडें पाटीखालीं झाकलें म्हणून सूर्य उगवायचा थांबला का ? " श्रोते ओरडले, " नाहीं ! " तेव्हां सरदारांनीं पुन्हा विचारलें, " मग जीनांनीं घटना समितीवर बहिष्कार घातला म्हणून आमची घटना समिति भरावयाची थांबेल काय ? " श्रोते पुन्हा ओरडले, " नाहीं ! " आणि सभेंत प्रचंड हंशा पिकला.

बोचक आणि खोचक विनोद निर्माण करण्याच्या बाबतींत सरदारांचा जेवढा हातखंडा होता, तेवढा निरागस आणि निरुपद्रवी विनोद करण्याच्या कामांतहि ते अतिशय वाकबगार होते. अगदीं निकटची मित्रमंडळी जमली कीं सरदार त्यांना पोट धरधरून हसावयाला लावीत. गांधीजींनीं ह्याबाबत सरदारांना एक सर्टिफिकेट देऊन ठेवलें होतें : " सरदारांच्या सान्निध्यांत खिन्नतेला काळें तोंड करून पोबाराच करावा लागतो ! " ( Gloom hides its fiendish face in his presence ! ) असें गांधीजी म्हणत. एकदां सरदार आणि गांधीजी तुरुंगात असतांना प्रत्येकानें कोणकोणतीं कामें करावयाचीं ह्याची गांधीजी वांटणी करूं लागले. त्यांनीं सरदारांना विचारलें, " तुम्ही कोणतें काम कराल ? " सरदार म्हणाले, " मी पाकिटें चिकटवून तयार करीन ! " गांधीजी म्हणाले, " ठीक आहे. " त्याप्रमाणें सरदार भराभर पाकिटें तयार करूं लागले. कांहीं दिवसांनीं ते गांधीजींना म्हणाले, " बघा, आतां मी या पाकिटशास्त्राचा पदवीधर झालों आहे कीं नाहीं ! " गांधीजींनीं विचारलें, " उद्यां हिंदुस्थानला स्वराज्य मिळालें म्हणजे तुम्ही कोणतें काम आपल्याकडे घ्याल ! " सरदार शांतपणें म्हणाले, " हेंच– पाकिटमंत्र्याचें ! " गांधीजी आणि सरदार एकत्र आले म्हणजे दोघांच्याहि विनोदाला दुथडी पूर भरून येई. महादेव देसाईंनीं लिहून ठेवलेल्या ' डायरीं 'त उभयतांच्या विनोदाचीं किती तरी आल्हादकारक उदाहरणें इतस्ततः विखुरलीं आहेत !

पण वल्लभभाईंच्या ह्या कोमल हृदयंगम स्वभावाचें दर्शन घडण्याचा इतरांना क्वचित्च योग येई. जगाच्या दृष्टीनें ते गंभीर, लढाऊ, रागीट, कठोर आणि पोलादी पुरुष ठरले. चांगुलपणा आणि लोकप्रियता नेहरूंच्या वांट्याला आली. आणि वाईटपणाचा आणि अप्रियतेचा हिस्सा सरदारांच्या पदरांत पडला. नेहरूंनीं फुलें स्वीकारावयाचीं आणि वल्लभभाईंनीं शिव्या पत्करावयाच्या असा उभयतांचा आंतून गुप्त करार झाला कीं काय कोणास ठाऊक ! काँग्रेस संघटनेंतील आणि सरकारांतील सर्वच अवघड आणि अप्रिय कामें सरदारांनीं आपल्याकडे घेतलीं. त्यामुळें हळूहळू पुष्कळांचा त्यांच्याबद्दल गैरसमज होत गेला. आणि त्यांच्याकडे बघण्याचा जनतेचा दृष्टिकोन कलुषित झाला. पस्तीस सालीं ' काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डा 'चे ते अध्यक्ष झाल्यापासून काँग्रेसच्या अंतर्गत

संघटनेचें काम त्यांना अत्यंत कठोर शिस्तीनें करावें लागलें. वीर नरिमन, डॉ. खरे आणि सुभाषचंद्र बोस ह्यांजविरुद्ध शिस्तभंगाचें हत्यार त्यांनाच उपसावें लागलें. तेव्हांपासून त्यांच्या पोलादीपणाचा आणि हुकुमशाहीपणाचा भला किंवा बुरा लौकिक देशामध्यें विशेष पसरला. मुस्लिम लीगवाल्यांना त्यांनीं तलवारीचें आव्हान दिलें. हिंदूंचें जबरदस्तीनें धर्मान्तर झालेलें पाहून त्यांचें काळीज व्याकुळ झालें. " ह्या जबरदस्तीच्या धर्मान्तरानें माझ्या अंतःकरणाला जेवढें दुःख झालें तेवढें बंगालच्या दुष्काळांत तीस लाख मेल्यानेंहि झालें नाहीं ! " असे तळमळून त्यांनीं उद्गार काढले. काश्मीरसंबंधींच्या पाकिस्तानी धोरणाचा तुम्ही कडकडून कां निषेध करीत नाहीं ? असा भारतांतील मुसलमानांना त्यांनीं जबाब विचारला. ' राष्ट्रीय स्वयंसेवक संघा ' चे स्वयंसेवक हे मातृभूमीवर प्रेम करणारे देशभक्त आहेत असें लखनौ येथील भाषणांत त्यांनीं त्यांना शिफारसपत्र देऊन टाकलें. ह्यामुळें सरदार हे अंतःकरणांतून हिंदुत्वनिष्ठ आणि जातीयवादी आहेत अशा त्यांच्या दुर्लौकिकांत आणखीच भर पडली.

सरदारांच्या बुद्धिमत्तेला स्वाभाविक अशा कांहीं मर्यादा होत्या. त्यांना आधुनिक अर्थशास्त्र आणि समाजवाद कळत नव्हता. अर्थात् तो त्यांचा दोष नव्हता. ज्या काळांत आणि पिढींत ते जन्माला आले त्यांचा तो दोष होता. ' मी स्वतःच मुळीं समाजवादी आहें ! ' असें ते म्हणत. " श्रीमंतांचे पैसे हिरावून घेऊन ते गरिबांना वांटावयाचे आणि सर्वांना गरीब करून सोडावयाचें हाच ना तुमचा समाजवाद ! " अशी समाजवादाची ते टर करावयाला जात आणि स्वतःचेंच हसूं करून घेत. त्यामुळें भांडवलवाल्यांना ते आपले मित्र वाटत आणि समाजवाद्यांना ते आपले शत्रु वाटत. पण सरदार हे हाडाचे शेतकरी होते. जॉन गंथरनें लिहिलें आहे, ' शेतकरीपणा हीच फक्त त्यांची संस्कृति होती. ' ( His only culture is agriculture. ) बारडोलीच्या शेतकऱ्यांचा शूर पुढारी हा भांडवलवाल्यांचा मित्र कसा असूं शकेल ? पण सरदार मनांतून कसेहि असले तरी कॉंग्रेसमधल्या प्रतिगामी आणि भांडवलशाही प्रवृत्ति त्यांच्या आडोशाला येऊन लपून बसल्या होत्या ह्यांत मुळींच संशय नाहीं. संयुक्त महाराष्ट्राला निकराचा विरोध करण्यांत त्यांनींच पुढाकार घेतला आणि मुंबई ही महाराष्ट्रापासून वेगळी फोडून काढण्याचा त्यांनीं आग्रह धरला, त्यामुळें ते ' भांडवलशाहीचे हस्तक ' आहेत अशी त्यांच्या टीकाकारांची त्यांच्याविषयींची समजूत अधिकच दृढ झाली. देशांतील सहाशें संस्थानें त्यांनीं विसर्जन करून टाकलीं आणि देशाचा नकाशा बदलून टाकला हें खरें. पण संस्थानिकांच्या वार्षिक तैनाती आणि खाजगी इस्टेटी त्यांनीं कायम ठेवल्या आणि संस्थानीं जनतेला मान्य नसलेलीं नालायक मंत्रिमंडळें त्यांनीं तिच्यावर लादून ' संस्थानिक बरे पण हे कॉंग्रेसवाले नकोत ! '

असें तिला वाटावयाला लावलें. त्यामुळें संस्थानिकांना ते आपलें पाठीराखे वाटत. पण संस्थानी जनतेला मागच्या जन्मींचे ते आपले वैरी आहेत असें वाटे. भारताच्या घटनेंतील मूलभूत स्वातंत्र्याला मर्यादा घालण्यासाठीं 'प्रतिबंधक स्थानबद्धतेचा कायदा' घाईघाईनें मंजूर करून घेण्यांत सरदारांनीं पुढाकार घेतला. त्यामुळें नागरिक-स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांचा रोष त्यांनीं आपल्यावर ओढवून घेतला. बिहार आणि मद्रास येथील काँग्रेसमंत्र्यांवर पैसे खाल्ल्याचे, काळा बाजार केल्याचे आणि वशिलेबाजीचे एकाहिपेक्षां एक भयंकर आरोप करण्यांत आले असतां सरदारांनीं त्यांना शासन करण्याऐवजीं त्यांचीं प्रकरणें दप्तरीं दाखल करून त्यांच्या अपराधांवर पांघरूण घातलें. त्यामुळें काँग्रेसच्या नैतिक अधःपाताला सरदारच जबाबदार आहेत असा आचार्य कृपलानी व टी. प्रकाशम्‌सारखे कट्टर गांधीवादी त्यांच्यावर उघड उघड आरोप करूं लागले. सरदारांच्या निरनिराळ्या टीकाकारांचे त्यांजवरील हे सर्व आरोप एकत्र केले आणि ते खरे आहेत असें मानलें, तर सरदारांएवढा जनतेचा आणि स्वातंत्र्याचा कट्टर शत्रु, दुष्ट अन् प्रतिगामी शक्तीचा भयंकर पुरस्कर्ता आणि हृदयशून्य नि उलट्या काळजाचा हुकुमशहा ह्या देशांत कोणीहि होऊन गेला नाहीं असेंच म्हणावें लागेल! विरोधक आणि टीकाकार म्हणतात तसाच माणूस असतो असें मानण्याची जर प्रथा पडली तर ह्या जगांतले मोठमोठे महात्मे हे सैतान ठरल्या-वांचून राहणार नाहींत. देशाला स्वातंत्र्य मिळावें म्हणून सतत तीस वर्षें ज्यानें आपल्या सर्वस्वाचा त्याग केला आणि अनन्वित हालअपेष्टा भोगल्या त्या महान् देशभक्ताचें जीवन आणि अंतःकरण संपूर्णपणें समजून न घेतां आपण त्यावर टीका करण्यांत अन्याय केला असेंच सरदारांच्या सर्व टीकाकारांना कालांतरानें उमजून आल्यावांचून राहणार नाहीं. देशाला ज्या क्षणीं स्वातंत्र्य मिळालें त्याच क्षणीं सरदारांचें ऐतिहासिक कार्य संपलें ह्यांत कांहीं शंका नाहीं. त्यानंतर देशाच्या प्रगतीला किंवा उत्क्रांतीला आवश्यक असणारे फार थोडे गुण सर-दारांच्या अंगीं होते. पण कांहींहि असलें तरी सरदारांएवढे महान् देशभक्त आणि स्वातंत्र्यवीर फारच थोडे ह्या देशांत होऊन गेले असाच इतिहासाला निर्वाळा द्यावा लागेल. सरदारांवरील जनतेच्या अपरंपार प्रेमाचें हेंच खरें रहस्य होतें. गेल्या वर्षाच्या मार्च महिन्याअखेर जयपूरला जातांना सरदारांच्या विमानामध्यें बिघाड झाला. पायलटनें विमान मोठ्या शिकस्तीनें खालीं आणलें आणि सरदारांचे प्राण वांचविले. त्यानंतर दोन दिवसांनीं सरदार दिल्लीस परत आले आणि त्यांनीं लोकसभेंत जेव्हां प्रवेश केला तेव्हां 'सरदार वल्लभभाई पटेल की जय' असा प्रचंड जयजयकार करून लोकसभेनें त्यांचें स्वागत केलें. तीन मिनिटेंपर्यंत त्या जयजयकारानें लोकसभा निनादत होती. सरदार हात जोडून निश्चलपणें

आपल्या जागीं उभे होते. आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहात होत्या. जनतेचें सरदारांवर किती प्रेम आहे ह्याचा त्या क्षणीं प्रत्यय आला. भारतावरहि सरदारांचें निरतिशय प्रेम होतें. गेल्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणांत त्यांनीं आपलें हृदय संपूर्णपणें उघडें केलें. ते म्हणाले, “ देशाच्या भवितव्याबद्दल मला काळजी वाटते. आजच्या राज्यकारभारांतील आणि सार्वजनिक जीवनांतील कांहीं प्रवृत्ति बघून मी अस्वस्थ होतों. माझें हृदय खेदानें भरून जातें. इतिहास किंवा अनुभव ह्यापासून आम्ही कांहींच धडा घेतला नाहीं. सार्वजनिक जीवन कसें सुधारेल ह्याबद्दल मला चिंता आणि निराशा वाटते. देश मोठा होवो आणि स्वातंत्र्याचा पाया सामर्थ्यवान् होवो ! ” हे व्याकुळ उद्गार ज्या अंतःकरणामधून बाहेर पडले त्या अंतःकरणांत देशप्रेमाचा अथांग महासागर हेलावत असला पाहिजे ह्यांत काय संशय आहे ? सरदारांच्या आत्म्याला शांति मिळावी अशी जर जनतेची इच्छा असेल तर देशाला प्राप्त झालेलें स्वातंत्र्य अधिक सार्थ आणि समर्थ करण्याकडे तिनें यापुढें आपलें शक्तिसर्वस्व खर्च करावयाला हवें. त्या शूर आणि महान् आत्म्याची तेवढीच शेवटची इच्छा आहे.

# ३

# हुतात्मा श्यामाप्रसाद मुकर्जी

मृत्यूनें हें फार वाईट केलें. अत्यंत निर्दयतेनें त्यानें श्यामाप्रसादांचा घात केला. काश्मीरच्या लढ्यांतला एक महान् योद्धा गेला. भारतीय ऐक्याच्या आघाडीचा खांब कोसळला. देशाच्या इतिहासांत अशी शोककारक घटना क्वचित्च घडली असेल. भारतीय कीर्तीचे जे चार-पांच महापुरुष आज ह्या देशांत आहेत त्यांमध्यें श्यामाप्रसादांची गणना होती. बंगालचे तर ते एकमेव नेते होते. सुरेंद्रनाथ बानर्जी किंवा चित्तरंजन दास ह्यांच्या प्रखर बुद्धिसामर्थ्याची आणि प्रचंड कर्तृत्वाची वंगीय परंपरा त्यांनींच आज सांभाळली होती. भारताच्या सार्वजनिक जीवनांत त्यांच्याएवढा जबर धडाडीचा आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा पुरुष आज दुसरा कोणी नव्हता. लोकशाही राजकारणांतल्या लढाऊ शक्तीचें सेनापतित्वच मुळीं त्यांच्याकडे आलें होतें. आपल्या अमोघ वक्तृत्वाची प्रचंड गदा हातीं घेऊन दिल्लीच्या लोकसभेंत बुरुजासारखा उभा असलेला हा महाकाय भीमपुरुष साऱ्या भारताच्या कौतुकाचा नि आदराचा विषय होऊन

बसला होता. अलौकिक कर्तृत्वाच्या अशा ह्या महान् राष्ट्रपुरुषाला आपल्या मातृभूमींत स्थानबद्धतेमध्यें अशा रीतीनें मरण यावें ही भारतीय स्वातंत्र्याची अत्यंत हृदयद्रावक शोककथा होय. देशाच्या लोकशाही राज्यकारभाराला लागलेलें हें फार मोठें लांच्छन आहे. नागरिक-स्वातंत्र्याची ही लाजिरवाणी विटंबना होय.

वस्तुतः, श्यामाप्रसादांना स्थानबद्ध करून ठेवण्याचा काश्मीर सरकारला काय अधिकार? श्यामाप्रसाद काय सामान्य पुरुष होते? स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळामधले एक थोर मंत्री, कलकत्ता विश्वविद्यालयाचे एक वेळचे उपकुलगुरु, देशांतील एका मोठ्या राजकीय पक्षाचे प्रमुख आणि भारतीय लोकसभेचे सन्मान्य सभासद, अशा प्रतिष्ठित आणि जबाबदार पुढाऱ्याला यःकश्चित् एका घटक प्रदेशाच्या सरकारनें अटक करून स्थानबद्ध करावयाचें हा भारतीय नागरिकत्वाचा आणि घटनेचा अक्षम्य उपमर्द होय. काश्मीरच्या प्रदेशांत वाममार्गानें कांहीं त्यांनीं प्रवेश केला नाहीं. आपण येणार असल्याचें प्रकटपणें त्यांनीं काश्मीर सरकारला कळविलें. काश्मीर सरकारनें त्यांना परवाना देण्याचें नाकारलें. स्वतंत्र देशाच्या नागरिकाला एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत जावयाला परवाना लागावा ही का लोकशाही म्हणावयाची? आणि श्यामाप्रसादांना प्रवेशाचा परवाना नाकारण्याचें काश्मीर सरकारला काय कारण होतें? लोकशाहीच्या सर्व मर्यादा आणि बंधनें संभाळून प्रतिपक्षाशीं अत्यंत सभ्यतेनें आणि जबाबदारीनें वागणारा ह्या देशांत जर कोणी एकच पुरुष होता तर तो म्हणजे श्यामाप्रसाद. अशा पुरुषाला काश्मीरमध्यें प्रवेश करण्याला सुद्धां परवानगी नसावी ह्यापेक्षां अधिक जुलूम तो कोणता असूं शकेल? काश्मीरांत काय सुलतानशाही आहे का हुकुमशाही? काश्मीरांत सुरू असलेल्या प्रजापरिषदेच्या सत्याग्रहांत भाग घेण्यासाठीं किंवा तेथील हिंदू प्रजेला शेख अबदुल्लाच्या सरकारविरुद्ध चिथावणी देण्यासाठीं कांहीं ते तिकडे जात नव्हते. उलट प्रजा-परिषदेचा सत्याग्रह थांबावा एवढ्यासाठीं, ज्या कारणामुळें तो उद्भवला त्याचें प्रत्यक्ष अवलोकन करून त्याबाबत काश्मीर सरकारशीं तडजोड करावी अशा शांततेच्या आणि सामोपचाराच्या भावनेनें ते तेथें जाऊं इच्छीत होते. हा आपला हेतु काश्मीर सरकारला त्यांनीं स्पष्टपणें कळविला होता. काश्मीरमध्यें श्यामाप्रसादांनीं प्रवेश केला असता आणि तेथल्या परिस्थितीचें त्यांनीं अवलोकन केलें असतें तर काश्मीर सरकारवर काय मोठें आभाळ कोसळून पडलें असतें? श्यामाप्रसाद मरण पावल्यानंतर त्यांच्या शवावर काश्मीरी शालजोडी घालून त्यांची सन्मानानें कलकत्त्याला रवानगी करण्याची जी सद्भावना आणि जो शहाणपणा शेख अबदुल्लांनीं आतां दाखवला, तो जर त्यांनीं आरंभीं दाखवला

असता आणि श्यामाप्रसादांचें काश्मीरांत आतिथ्यपूर्वक स्वागत केलें असतें तर कांहीं बिघडलें असतें ?

अबदुल्लांची बाजू जर सत्याची आणि प्रामाणिकपणाची असती तर त्यांनीं छातीठोकपणें श्यामाप्रसादांना आव्हान दिलें असतें कीं, "काय, तुम्हांला काश्मीरांतली परिस्थितीच पाहावयाची आहे ना ? मग या. मीच ती तुम्हांला दाखवितों. आणि माझ्या सरकारचें धोरण कसें न्यायाचें आणि निःपक्षपातीपणाचें आहे ह्याची तुम्हांला खात्री पटवून देतों !" काश्मीरांतील परिस्थिति पाहण्यास श्यामाप्रसादांनीं मुळीं येऊंच नये, ह्या शेख अबदुल्लांच्या इच्छेच्या मुळाशीं काय असलें पाहिजे हें सांगण्याची सुद्धां जरूर नाहीं. तें सूर्यप्रकाशासारखें स्वच्छ आहे ! म्हणूनच काश्मीर सरकारचें पक्षपाती आणि जुलुमी धोरण जगाच्या वेशीवर टांगण्यासाठीं परवान्याची पर्वा न करितां श्यामाप्रसादांनीं अकरा मे रोजीं बेधडक जम्मूच्या हद्दींत प्रवेश केला. त्याबरोबर शेख अबदुल्लांनीं काश्मीर राज्य संरक्षण कायद्याचा बडगा त्यांच्यावर उपसला आणि अटक करून त्यांना श्रीनगर येथें स्थानबद्ध केलें. वस्तुतः, परवान्यावांचून जरी एखादा माणूस आपल्या प्रदेशांत शिरला तरी त्याला स्थानबद्ध करून ठेवण्याचा राज्यसरकारला कसा अधिकार पोहोंचतो ? जास्तींत जास्त काश्मीर सरकारनें श्यामाप्रसादांना उचलून भारताच्या हद्दीमध्यें परत आणून ठेवायचें ! ह्यापेक्षां त्याला कांहींहि करतां येणार नाहीं. पण सत्तेचा उन्माद चढलेल्या राज्यकर्त्यांना न्यायाचा आणि कायद्याचा एवढा विवेक कोठून राहणार ? आम्ही तुम्हांला आमच्या हद्दींत येऊं देणार नाहीं हा पहिला जुलूम ! आणि आलांतच तुम्ही आम्हांला न विचारतां, तर आम्ही तुम्हांला स्थानबद्ध करून ठेवूं हा दुसरा जुलूम.

डॉ. आंबेडकर परवां म्हणाले कीं, भारताचा एक सन्मान्य नागरिक एका प्रदेशांत स्थानबद्ध मुळीं होतोच कसा ? भारत सरकारचें गृहखातें किंवा परराष्ट्र-खातें काय करीत होतें ? ह्या त्यांच्या प्रश्नाचें उत्तर अगदीं उघड उघड आहे. श्यामाप्रसादांना जम्मूमध्यें प्रवेश करूं न देण्याच्या आणि केल्यानंतर त्यांना अटक करून स्थानबद्ध करण्याच्या काश्मीर सरकारच्या धोरणाला नेहरू सरकारचा निश्चित पाठिंबा असला पाहिजे. नेहरूंचा जर पाठिंबा नसता तर श्यामाप्रसादांच्या अंगाला हात लावण्याची शेख अबदुल्लांची काय छाती होती ? पंडित नेहरूंनीं लाडावून शिरजोर करून ठेवलेलीं भारतामध्यें जीं चार-दोन माणसें आहेत, त्यांत शेख अबदुल्लांचा क्रम वर लागेल. नेहरूंच्या ह्या भोंगळ धोरणामुळेंच भारताच्या ऐक्याला बाध येईल अशा तऱ्हेचीं वक्तव्यें आणि कृत्यें करावयास शेख अबदुल्लांना बिलकुल दिक्कत वाटेनाशी झाली आहे. गेल्या वर्षीं काश्मीर घटना समितीमध्यें तर त्यांनीं जाहीरपणें सांगितलें कीं, "काश्मीर घटना समिति ही

शंभर टक्के सार्वभौम आहे, व भारताच्या किंवा कोणत्याहि बाहेरील सत्तेचें आपल्या-वर नियंत्रण नाहीं." काश्मीर हें सार्वभौम आहे, त्याच्या प्रजासत्ताक राज्याचा स्वतंत्र अध्यक्ष निवडण्याचा आणि स्वतंत्र ध्वज निर्माण करण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे, येथपर्यंत शेख अबदुल्लांची मजल गेलेली आहे ! ह्या त्यांच्या घोषणेवर भारतीय वृत्तपत्रांनीं जेव्हां त्या वेळीं खूपच ताशेरे ओढले, तेव्हां ते असे भडकले म्हणतां कीं, त्या रागाच्या भरांत रणबीरसिंगपुरा येथें त्यांनीं आपल्या अंतःकरणांतलें सगळें गरळ ओकून टाकलें ! रणबीरसिंगपुरा येथील त्यांच्या ह्या बेफाम वक्तव्याची आम्ही आमच्या वाचकांना पुन्हा आठवण करून देतों. त्या भाषणांत ते म्हणाले, "भारताची घटना काश्मीरला संपूर्णपणें लागू आहे असें म्हणणारे लोक पोरकट आणि पागल आहेत. जोंपर्यंत भारताच्या भूमीवर जातीयवाद वावरत आहे, तोंपर्यंत मर्यादित स्वरूपानेंच काश्मीर भारतांत सामील होईल. उद्यां समजा पंडित नेहरूंचें कांहीं बरेंवाईट झालें तर आपलें कसें होईल ह्याची काश्मीरांतील मुसलमानांना काळजी वाटते. भारताच्या घटनेंत काश्मीरला जर निराळें स्थान नसेल तर काश्मीरच्या मुसलमानांची आम्ही कशी खात्री करून देऊं कीं काश्मीरच्या अंतर्गत प्रश्नांत ढवळाढवळ करण्याची भारताला इच्छा नाहीं म्हणून ?" शेख अबदुल्लांच्या ह्या बेशरमपणाच्या वक्तव्याला श्यामा-प्रसादांनीं तडाख्न उत्तर दिलें कीं, "काश्मीरमधील मुसलमानांचें जीवन फक्त एका माणसावर म्हणजे पंडित नेहरूंवर अवलंबून आहे असें म्हणणें बेजबाबदार-पणाचें आहे. भारतीय घटना सर्व प्रकारच्या जातीयतेपासून अलिप्त असतां, काश्मीरी मुसलमानांना भारताच्या जातीयतेची भीति वाटते हें शेख अबदुल्लांचें म्हणणें विचित्र आणि घातक आहे." तथापि, पंडित नेहरूंनीं मात्र अबदुल्लांच्या या विकृत आणि असत्य युक्तिवादाचा त्या वेळीं समाचार घ्यावयाचें सोडून त्याचें सर्व खापर 'जम्मू प्रजापरिषदे'च्या डोक्यावरच फोडलें. ते म्हणाले, "प्रजा-परिषदेच्या जातीयवादी धोरणामुळेंच शेख अबदुल्लांना असें बोलणें भाग पडलें." काश्मीर हें एक स्वतंत्र राष्ट्र आहे हें शेख अबदुल्लांच्या डोक्यांतलें वेड अद्यापहि गेलें नाहीं. गेल्याच आठवड्यांत त्यांनीं पुन्हा ही घोषणा केली अन् त्याबद्दल बाबू पुरुषोत्तमदास टंडन ह्यांनीं त्यांची हजेरीहि घेतली. भारताच्या घटनेमध्यें काश्मीर हें अपवादभूत समजलें जाऊं नये. काश्मीर आणि भारत ह्यांचें संपूर्ण ऐक्य व्हावें, उभयतांचें 'एक विधान, एक प्रधान अन् एकच निशाण' असावें अशी श्यामाप्रसादांची तीव्र इच्छा होती. ही इच्छा पूर्ण करण्याच्या कार्यांत त्यांनाच आपल्या प्राणांचें बलिदान करावयास लागावें ह्यापेक्षां अधिक विपरीत आणि हृदयद्रावक घटना दुसरी कोणती असूं शकेल ?

भारताच्या एका नागरिकाला घटकराज्यानें स्थानबद्ध करून ठेवणें हा

भारतीय घटनेचा भंग आहे किंवा काय, ह्या प्रश्नाचा श्यामाप्रसादांच्या अपमृत्यू-मुळें आतां कायदेशीर निर्णय लागूं शकणार नाहीं हें जरी खरें असलें, तरी सत्तेच्या जोरावर आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांची दंडेलीनें मुस्कटदाबी करण्याचें जें अविचारी धोरण श्यामाप्रसादांच्या बाबतींत स्वीकारलें गेलें, त्याबद्दल शेख अबदुल्लांइतके पंडित नेहरूहि जबाबदार आहेत. श्यामाप्रसादांच्या मृत्यूनें नेहरूंच्या चारित्र्यावर फार मोठा ठपका आलेला आहे असें आम्हांला वाटतें. कोणीं कांहीं म्हटलें तरी पंडित नेहरूंचा श्यामाप्रसादांवर फार मोठा राग होता ह्यांत कांहीं शंका नाहीं. आपल्या प्रत्येक भाषणामधून ‘ जातीयवादा ’वर जेव्हां नेहरू टीकेची आग ओतीत असत, तेव्हां त्यांच्या डोळ्यांसमोर श्यामाप्रसाद आणि त्यांचा ‘ जनसंघ ’ प्रामुख्यानें असावा असें वाटे. पाकिस्तानच्या आणि निर्वासितांच्या बाबतींतल्या नेहरू-सरकारच्या निष्क्रिय धोरणाची जर पद्धतशीर-पणें ह्या देशांत कोणी अब्रू घेतली असेल तर ती श्यामाप्रसादांनीं. मध्यवर्ती मंत्रिमंडळांत जवळ जवळ अडीच वर्षें श्यामाप्रसाद हे नेहरूंचे सहकारी होते. श्यामाप्रसाद हे हिंदुमहासभेचे पुढारी असतांना त्यांच्या अंगांतील थोर कर्तृत्व आणि गुण ओळखून त्यांना आपल्या मंत्रिमंडळांत घेण्यांत नेहरूंनीं जसा त्या वेळीं मनाचा मोठेपणा दाखवला, त्याप्रमाणें नेहरूंचें पाकिस्तानविषयक धोरण अगदीं प्रारंभापासून त्यांना पसंत नव्हतें, तरी देशाच्या कल्याणाकडे दृष्टि ठेवून, ते नेहरू-सरकारमध्यें संपूर्ण विलीन झाले. इतके कीं त्यांचे हिंदुसभेचे लोक त्याबद्दल त्यांची निर्भर्त्सना करूं लागले. पण पुढें पूर्व बंगालमधला अल्पसंख्याक हिंदूंवरील पाकिस्तानी अत्याचाराचें भयानक पर्व सुरू झालें तें थांबविण्यासाठीं नेहरू आणि लियाकत ह्यांनीं नवा करार केला. तथापि, हा करार म्हणजे पूर्वीं दोनदां झालेल्या इंडो-पाकिस्तानी कराराची पुनरावृत्ति आहे. पूर्वींच्या त्या कराराचें पाकिस्ताननें जेवढें पालन केलें, तेवढेंच तें या नव्या कराराचें करणार असें श्यामाप्रसादांनीं नेहरूंना निक्षून सांगितलें, आणि ‘ अशा ह्या करारांत भागीदार होण्याची आपली मुळींच इच्छा नाहीं ’ असें म्हणून त्यांनीं आपल्या मंत्रिपदाचा ताडकन् राजीनामा देऊन टाकला.

ह्या राजिनाम्याचें लोकसभेमध्यें त्यांनीं जें निवेदन केलें, तें त्यांच्या निर्भय, तेजस्वी आणि बिनतोड वक्तृत्वाचा देदीप्यमान विलासच होय. नेहरू त्यांच्या समोर बसले होते. त्यांच्या तोंडावर ते म्हणाले, “ नेहरू-सरकारचे आणि माझे मूलभूत मतभेद आहेत. त्यांचें धोरण मला पसंत नाहीं. असें असतां त्यांच्या मंत्रिमंडळांत मी कसा राहूं ? आपल्या निष्क्रियतेच्या आणि चांगुल-पणाच्या धोरणामुळें पाकिस्तानला वाटतें कीं, आपण दुबळे आहोंत. दर वेळेला आपलें धोरण बचावाचें असतें; आणि पाकिस्तानचें मात्र आक्रमणाचें असतें.

देशाची फाळणी मुसलमानांच्या आग्रहामुळें झाली. हिंदूंचा त्याला एकजात विरोधच होता. फाळणी अपरिहार्य आहे असें जेव्हां मला वाटलें, तेव्हां बंगालच्या फाळणीचा मींच आग्रह धरला. पूर्व बंगालमधील हिंदूंना मीं आश्वासन दिलें कीं तुम्ही भिऊं नका. भारत तुमच्या मागें आहे. गेल्या अडीच वर्षांत त्यांच्या छळाची पराकाष्ठा झाली. त्यांचें रक्षण मला कांहीं करतां आलें नाहीं. तेव्हां मला ह्या सरकारांत राहण्याचा नैतिक हक्कच मुळीं नाहीं. आम्हांला स्वातंत्र्य मिळावें म्हणून पूर्व बंगालमधल्या हिंदूंनीं पाकिस्तानांत राहण्याचा एवढा धोका पत्करला. पण त्यांचें आम्हांला रक्षण करतां येत नाहीं. पाकिस्तानचें त्यांना संपूर्ण इस्लामीकरण करावयाचें आहे. त्या राज्यांत हिंदूंना सन्मानानें राहणें अशक्य आहे. हा जातीय प्रश्न नाहीं, हा राजकीय प्रश्न आहे. पूर्व बंगालमधून पंधरा हजार निर्वासित इकडे आले, तेव्हां तिकडच्या अत्याचारांची आम्हांला कल्पना आली. त्याची प्रतिक्रिया येथें झाली, तेव्हां पाकिस्तानचे डोळे उघडले. पण ह्या करारानें शेवटीं आम्हीच आक्रमक ठरलों. दोघेहि सारखेच गुन्हेगार आहोंत असें ह्या करारानें सूचित केलेलें आहे. काश्मीरचा निम्मा प्रदेश पाकिस्ताननें व्यापला आहे. अन् असें असून एकमेकांविरुद्ध युद्धाची भाषा कोणी करावयाची नाहीं असें या करारांत म्हटलें आहे. ह्यापेक्षां अधिक हास्यास्पद काय आहे? यापुढें अल्पसंख्याक हिंदूंनीं आपल्या संरक्षणासाठीं पाकिस्तान सरकारकडेच जावें असें म्हणणें म्हणजे त्यांच्या जखमेंत उलटें मीठ घालण्यासारखें आहे. ह्या करारावर ज्यांचा विश्वास आहे त्यांनीं आपल्या बायकामुली आणि बहिणी घेऊन पूर्व बंगालमधल्या दुर्दैवी हिंदूंबरोबर राहावयाला जावें. कारण तीच त्यांच्या श्रद्धेची खरी कसोटी आहे!"

भावनाकंपित स्वरांत भाषण संपवून श्यामाप्रसाद खालीं बसले. नेहरू अधोवदन झाले आणि लोकसभेच्या सभासदांनीं टाळ्यांचा प्रचंड गजर केला! मतभेद आणि विरोध ह्या दोन गोष्टी नेहरूंना सहन होत नाहींत. आपण म्हणूं त्याला मान डोलविणारे स्तुतिपाठक त्यांना सदोदित भोंवतीं हवे असतात. ह्यामुळें श्यामाप्रसादांसारखा निःस्पृह आणि स्वाभिमानी माणूस त्यांच्या मंत्रिमंडळांत फार काळ टिकणें अशक्यच होतें. किंबहुना, प्रत्येक वेळीं आपला मतभेद नेहरूंच्या तोंडावर निर्भीडपणें सांगणारे श्यामाप्रसाद हे त्यांच्या मंत्रिमंडळामधले एकटे एकच मंत्री होऊन गेले असावेत!

मंत्रिमंडळांतून बाहेर पडल्यापासून गेल्या तीन साडेतीन वर्षांमध्यें नेहरू-सरकारचे जबरदस्त विरोधक म्हणून भारताच्या लोकसभेमध्यें त्यांनीं फारच मोठी कीर्ति मिळविली. एवढे मोठमोठे बुद्धिवान् आणि विद्वान् लोक भारताच्या निरनिराळ्या प्रांतांमधून लोकसभेंत निवडून आलेले. आपआपल्या क्षेत्रामध्यें

प्रत्येकानें गडगंज नांवलौकिक मिळविलेला. पण एखाद्या डोंगराच्या शिखराप्रमाणें श्यामाप्रसाद बोलायला उभे राहिले कीं त्यांच्या भोंवतालचीं सारीं माणसें टीचभर उंचीचीं दिसत. एखादा मेघच गर्जना करतो आहे असें वाटे. धबधब्याच्या लोंढ्याप्रमाणें भाषेचा ओघ सुरू होई. वाक्यांमागून वाक्यें उड्या घेत. मित्रांच्या अंगावर हर्षाचे रोमांच उठत, तर शत्रूंचे डोळे दिपून जात अन् ते जागच्या जागीं खिळून राहात. विषय कोणताहि असला तरी प्रतिपादन तेवढेंच आकर्षक. भावनेचा आवेश विलक्षण. पण तर्क आणि संयम कुठें सुटेल तर शपथ. वावगा शब्द काय वाटेल तें होवो तोंडांतून कधीं निघायचा नाहीं. प्रतिपक्षाला आपला धुव्वा होतो आहे असें वाटेल; पण आपली बेअब्रू होते आहे असें कधींच वाटणार नाहीं. दाहक आणि आक्रमक युक्तिवादानें प्रतिपक्षाची राळ उडविणारें हें अमोघ वक्तृत्व श्यामाप्रसादांना त्यांच्या वाडिलांकडून मिळालें. त्यांचे वडील सर आशुतोष मुकर्जी हे बंगालच्या सार्वजनिक जीवनामधलें एक प्रचंड प्रकरण होऊन गेलें ! बंगालचे गव्हर्नर लॉर्ड लिटन ह्यांची त्यांनीं कशी मस्ती जिरविली तो इतिहास तिकडे सुप्रसिद्ध आहे. अशा नरपुंगवाचे चिरंजीव श्यामाप्रसाद. बंगालच्या हक्क मंत्रिमंडळामध्यें ते पूर्वीं अर्थमंत्री होते. त्या वेळीं बंगालमध्यें भयंकर दुष्काळ पडला. तो निवारण करण्याचे कामीं हक्क मंत्रिमंडळ नालायक ठरलें. तेव्हां त्याचा दंभस्फोट करतांना श्यामाप्रसादांनीं जें ज्वलज्जहाल भाषण केलें, तें ऐकून पुष्कळांना हेस्टिंग्स विरुद्ध बर्क किंवा फॉक्स ह्यांनीं केलेल्या ऐतिहासिक वक्तृत्वाची आठवण झाली. ह्या त्यांच्या अलौकिक गुणांमुळेंच भारतीय लोकसभेंत त्यांना अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालें. त्यांच्यापेक्षां अधिक प्रभावी आणि सामर्थ्यवान् असा कोणीहि वक्ता तेथें नव्हता. कम्युनिष्ट सभासदांचें अक्राळविक्राळ वक्तृत्व हें त्यांच्यापुढें मोहरममधल्या वाघाच्या डुरकाळ्यांसारखें वाटे. नेहरू हे तर बोलून चालून लोकसभेच्या रंगभूमीवरचे लोकप्रिय ' नायक ' ! ते उभे राहिले कीं सारी सभा डोलूं लागे, त्यांच्या प्रत्येक वाक्याला टाळ्यांचा कडकडाट होई. पण नेहरूंनीं कितीहि प्रभावी भाषण केलें, तरी त्याचा परिणाम सपशेल धुऊन टाकण्याचें विलक्षण सामर्थ्य श्यामाप्रसादांच्या वक्तृत्वांत असे. श्यामाप्रसादांचें भाषण चालू असतां नेहरूंच्या अंगाचा तडफडाट होई. पण मान खालीं घालून ते स्तब्ध बसत, उत्तर देण्याचा त्यांना धीरच होत नसे.

गेल्या नोव्हेंबर महिन्यांत नेहरू सरकारच्या पाकिस्तानविषयक धोरणा-संबंधीं लोकसभेंत जी विलक्षण खडाजंगी झाली, त्या प्रसंगीं श्यामाप्रसादांनीं केलेलें भाषण अविस्मरणीय होतें. पाकिस्तानी अत्याचारांचीं इतकीं भयानक उदाहरणें त्यांनीं पुराव्यासकट पुढें मांडलीं कीं श्रोत्यांच्या अंगावर शहारे उभे राहिले. त्यानंतर ते शांत स्वरांत म्हणाले, " अशा स्थितींत पूर्वपाकिस्तानांत अल्पसंख्याक

हिंदूंना राहणें शक्य आहे काय ह्यासंबंधीं सरकारनें आपलें निश्चित मत एकदाचे जाहीर करावें. तेथें त्यांना राहतां येणें अशक्य आहे असें वाटलें तर त्यांच्या संरक्षणासाठीं सरकारला काय करतां येण्यासारखें आहे, किंवा नाहीं, तेंहि त्यांनी एकदां ठरवून टाकावें! बरें, पाकिस्तानांतील अल्पसंख्याकांना जर मरूंच द्यायचें असेल तर त्यांना एकदमच मरूं द्यावें. असें हाल हाल करून त्यांना मरण येऊं नये, सतत मानहानि आणि छळ जो ह्या अल्पसंख्याकांना सहन करावा लागत आहे, त्यानें ह्या महान् राष्ट्राचा अपमान होत आहे हें सरकारला कसें कळत नाहीं?" श्यामाप्रसादांच्या युक्तिवादाला नेहरूंपाशीं उत्तरच नव्हतें. ते एकदम भडकून म्हणाले, "भावनेच्या आहारीं जाऊन आपण ह्या प्रश्नाचा विचार करणार आहोंत का?" केवळ निर्वासितांच्या हृदयद्रावक कहाण्याच का आपण एकमेकांना सांगत बसणार? ह्या कहाण्यांनीं माथीं भडकून घेऊन का आपण मोठमोठ्या राजकीय प्रश्नांचा निर्णय लावणार आहोंत? ह्या गोष्टी सांगतांना निवेदकांनी आपल्या आवाजाचा एवढा चढउतार करण्याची काय आवश्यकता होती? प्रजासत्ताक भारताची ही लोकसभा म्हणजे काय नाट्यगृह आहे?" नेहरूंचें वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व लोकसभेंत एवढें केविलवाणें आणि पोरकें कधींच पडलें नसेल! असा एकदांच नाहीं, अनेक वेळां श्यामाप्रसादांनीं नेहरूंचा लोकसभेमध्यें बोजवारा केलेला आहे. प्रतिपक्षाला टोमणे मारण्यांत तर श्यामाप्रसदांचा हातखंडा होता. नेहरूंना तर त्यांनीं ताडकन् सांगितलें कीं "स्वतःचें माथें भडकावून घेण्याचा कायमचा मक्ता आपण घेतलेला दिसतोय्!" दिल्लीच्या एका निवडणुकींत काँग्रेसनें 'दारू आणि पैसा' ( wine and wealth ) ह्याचा सर्रास उपयोग केला. असा श्यामाप्रसादांनीं आरोप केला. तेव्हां नेहरू एकदम ओरडले, "काय बेजबाबदार आरोप करतां हा! काँग्रेसने दारू आणि बायका ( wine and women ) वाटल्या?" त्यावर श्यामाप्रसाद गरजले, "नीट ऐकून तरी घ्या! दारू आणि पैसा असें मी म्हणालों! दारू आणि बायका नव्हे!" मग दुसरे दिवशीं डोकें शांत झाल्यावर नेहरूंनीं श्यामाप्रसादांची क्षमा मागितली.

लोकसभेंतील नेहरूंच्या असहनशील आणि माथेफिरू स्वभावावर श्यामाप्रसाद हा एक रामबाण लेपच होता असें म्हटलें तरी चालेल. नेहरूंना असा खंबीर आणि जबरदस्त विरोधक आयुष्यांत कधीं भेटला नसेल. ह्या दोघांचें तुंबळ द्वंद्वयुद्ध हें लोकसभेचें एक ठरून गेलेलें वैशिष्ट्य होतें. पण एवढें असूनहि नेहरूंचा उपमर्द होईल असा अपशब्द श्यामाप्रसादांच्या तोंडामधून चुकूनहि कधीं निघाला नसेल. नेहरूंच्या मंत्रिमंडळांत असतांना त्यांच्या राज्यसरकारांतलीं अनेक वैगुण्यें वा रहस्यें त्यांना त्या वेळीं समजलीं असतील. पण मंत्रिमंडळामधून बाहेर पडून ते नेहरू-सरकारचे विरोधक झाल्यानंतर त्यांनीं त्या माहितीचा कधीं,

दुरुपयोग केलेला नाहीं.

सार्वजनिक पुरुषांच्या अंगीं असाव्या लागणाऱ्या उमद्या आणि धीरोदात्त स्वभावाचें भरपूर भांडवल श्यामाप्रसादांच्या जवळ होतें. त्या दृष्टीनें विचार करतां नेहरूंचा श्यामाप्रसादांकडे आणि त्यांच्या राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन मात्र अत्यंत पूर्वग्रहदूषित आणि असमंजसपणाचा होता. आणि त्यांच्या-सारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या आणि प्रतिष्ठेच्या पुढाऱ्याला काश्मीर सरकारनें स्थानबद्ध केलें असतां, त्या दंडेलशाहीच्या धोरणाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाठिंबा देऊन नेहरूंनीं त्यांच्या बाबतींत फार मोठा अन्याय केला ह्यांत कांहीं शंका नाहीं. आपण कम्युनिस्ट आहोंत अशी नेहरू केव्हां तरी प्रौढी मिरवतात. तें खरें असो वा खोटें असो, पण प्रतिपक्षाला एखाद्या दुसऱ्या विशेषणानें बदनाम करण्याचें तंत्र त्यांनीं चांगलेंच आत्मसात् केलेलें दिसतें. जातीयवादी मुसलमानांच्या अत्याचारामुळें झालेल्या देशाच्या फाळणीचे जे जे म्हणून कोणी विरोधक असतील त्यांची, ‘ जातीयवादी ’ ह्या शिवीनें सर्रास संभावना करण्यांत त्यांच्या ठोकळेबाज राष्ट्रीयवादाला मोठी धन्यता वाटते. वस्तुतः फाळणी होण्यापूर्वीं पाकिस्तानची मागणी ही ‘ पोरकट, विक्षिप्त आणि मूर्खपणाची ’ आहे असें हेच नेहरू तावातावानें म्हणत होते, आणि फाळणी झाल्यानंतर नेमकीं तींच विशेषणें ते पाकिस्तानच्या विरोधकांना लावीत आहेत; हें आश्चर्य नव्हे काय ? फाळणी होत असतांना पाकिस्तानांतील अल्पसंख्याकांना कोणत्याहि परिस्थितींत आम्ही विसरणार नाहीं असें कंठरवानें ओरडून सांगणाऱ्या ह्याच नेहरूंच्या तळपायाची आग त्याच अल्पसंख्याकांवर होणाऱ्या पाकिस्तानी अत्याचारांचीं वर्णनें ऐकून मस्तकाला जावी हें चमत्कारिक नव्हे काय ? पाकिस्तानसंबंधींचें आतांपर्यंतचें नेहरू-सरकारचें सर्व धोरण दुबळें आणि आत्मघाताचें ठरलें आहे. हें धोरण आतां बदलून अधिक खंबीर केलें पाहिजे असें प्रजासमाजवाद्यांचेंहि मत आहे. पण असें म्हटल्यानें ते ‘ जातीयवादी ’ ठरत नाहींत. देशांतील आर्थिक प्रश्नाकडे दुर्लक्ष करून केवळ जातीयवादाच्या काल्पनिक बागुलबोवाला धोपटण्याचा नेहरूंनीं जो गेलीं दीड-दोन वर्षें सपाटा चालवला आहे, त्याच्यामागलें त्यांचें राजकारण कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. देशांतील अल्पसंख्याकांना घाबरवून त्यांचीं मतें त्यांना मिळवावयाचीं होतीं आणि सार्वत्रिक निवडणुका त्यांना जिंकावयाच्या होत्या, दुसरें काय ? पण आपला मतलब साधण्यासाठीं दुसऱ्यांना बदनाम करावयाचें, हा न्याय कुठला ? पाकिस्तानबाबत भारताचें धोरण पडखाऊपणाचें असूं नये, पाकिस्तानांतील अल्पसंख्याकांचा छळ होऊं नये, काश्मीरचें भारताशीं संपूर्ण ऐक्य व्हावें एवढाच श्यामाप्रसादांचा आग्रह होता ना ? मग तेवढ्यामुळें ते ‘ जातीयवादी ’ आणि ‘ भारताचे शत्रु ’

ठरतात, अन् ‘ काश्मीर हें स्वतंत्र राष्ट्र आहे ’ अशी घोषणा करणारा शेख अबदुल्ला मात्र राष्ट्रवादी आणि भारताचा महान् मित्र ठरतो ! काय न्याय आहे पाहा ! हिंदूंचा पक्षपात करणारें राजकारण जर ‘ जातीयवादी ’ असेल तर जातीयवादी मुसलमानांच्या धोरणाचा अनुनय करणारें राजकारणहि तितकेंच ‘ जातीयवादी ’ ठरतें. भारतीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा श्यामाप्रसादांसारखा प्रचंड पुरस्कर्ता नेहरूंच्या राज्यांत ‘ जातीयवादी ’ ठरावा आणि स्थानबद्धतेमध्यें त्याला मरण यावें ही अन्यायाची परिसीमा होय ! श्यामाप्रसादांच्या या मृत्युलेखांत नेहरूंच्या अनुदार आणि अन्यायी धोरणावर टीका करण्याचें वस्तुतः कांहींच कारण नव्हतें. पण श्यामाप्रसादांच्या मानहानीला आणि मृत्यूला पर्यायानें तेच कारणीभूत झाले हें कसें विसरतां येईल ? श्यामाप्रसादांच्या मृत्यूबद्दल शोक प्रदर्शित करतांना सुद्धां मोठमोठ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांना त्यांच्याशीं असलेल्या मतभेदाचा उल्लेख करणें आवश्यक वाटलें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मौलाना आझाद म्हणाले, “ मुकर्जींशीं असलेले मतभेद त्यांच्या मृत्यूनें नाहींसे केले ! ” वाहवा, दुःख व्यक्त करण्याची ही फारच उत्तम रीत म्हटली पाहिजे ! असो.

शिक्षण, अर्थशास्त्र, उद्योग, तत्त्वज्ञान अशीं श्यामाप्रसादांच्या बुद्धिमत्तेचीं आणि कर्तृत्वाचीं विविध क्षितिजें होतीं. पण स्वातंत्र्याच्या राजकारणांत निर्माण झालेल्या विकृतींचा प्रतिकार करण्यासाठीं त्यांना राजकीय आखाड्यांतच जन्मभर झगडावें लागलें. आयुष्यांतले सर्वोत्तम सन्मान तरुण वयांतच त्यांना मिळाले. मृत्यूनेंहि आपला कृपाकटाक्ष अल्पवयांतच त्यांच्यावर टाकला. राष्ट्राची राज्यधुरा आपल्या प्रचंड बाहूवर वाहून नेण्याचें सामर्थ्य असलेल्या ह्या महान् देशभक्ताला शेवटपर्यंत सत्ताधारी पक्षाशीं झगडण्यांत आपल्या बुद्धिबळाचा विनियोग करावा लागावा आणि सामान्य राजकीय गुन्हेगाराप्रमाणें दूरच्या कोठल्या तरी कारागृहांत ‘ माता ! माता ! माता ! ’ करीत प्राण सोडावा लागावा हा दुर्दैवाचा केवढा दुष्टावा ! नेहरूंच्या दृष्टीला श्यामाप्रसाद कसेहि दिसोत, आमच्या राजकीय ‘ पुरोगाम्यां ’ना श्यामाप्रसाद कसेहि भासोत, पण भारताच्या इतिहासांत देशाच्या ऐक्यासाठीं आपल्या सर्वस्वाचें बलिदान करणारा हुतात्मा असाच सुवर्णाक्षरांत त्यांचा उल्लेख होईल. त्यांचें अपूर्ण राहिलेलें स्वप्न साकार करणें हेंच त्यांचें खरें स्मारक होय !

# ४

# महाराष्ट्राच्या सम्राटाचें निर्याण !

आपल्या सबंध हयातीमध्यें लोकांच्या मनाला तीव्र दुःख होईल असें तात्यासाहेबांनीं कांहीं केलें नाहीं. संयम आणि समतोल वृत्ति हे त्यांच्या स्वभावाचे विशेष गुण होते. अद्‌भुत किंवा चमत्कारिक कांहीं करून दाखविण्याकडे त्यांच्या मनाचा कल नसे. त्यांच्याबद्दल लोकांनीं ज्या ज्या म्हणून कांहीं अपेक्षा धरल्या त्या त्यां त्यांनीं उत्तम प्रकारें पूर्ण केल्या. केळकरांच्या स्वाभाविक चांगुलपणावर लोकांचा विश्वास होता. त्यांच्या हातून सहसा गैर गोष्ट होणार नाहीं असा लोकांचा त्यांच्यावर भरंवसा होता. असें असतां त्यांच्या आयुष्यांत एकच गोष्ट वाईट घडली. एकच गोष्ट अनपेक्षित घडली. जनतेच्या मनाला तीव्र दुःखाचा धक्का देणारी एकच गोष्ट त्यांच्या आयुष्याच्या शेवटीं घडली.— आणि ती म्हणजे त्यांचें मरण ! एवढ्या बाबतींत मात्र तात्यांनीं लोकांना चांगलें चकविलें. अगदीं बनविलें म्हणानात ! त्यांच्या मरणाची बातमी ऐकावयाची आपली तरी कांहीं तयारी नव्हती. कोणाचीहि तशी कल्पना नव्हती. तात्यांची

प्रकृति अतिशय निकोप होती. त्यांचें आरोग्यहि उत्तम होतें. उभा जन्म त्यांनीं श्रमांत आणि कामांत घालविला. तात्या कधीं आजारी आहेत, किंवा मोठ्या दुखण्यानें अंथरुणाला खिळून पडले आहेत, असें मीं तर आजपर्यंत कधीं ऐकलें नाहीं. बहुतेक मोठमोठीं माणसें अधूनमधून या ना त्या दुखण्यानें आजारी असल्याचें आपण ऐकतों. त्यांच्या प्रकृतिमानाच्या चढउताराचीं पत्रकेंहि वर्तमान-पत्रांमधून प्रसिद्ध होतात. तसें तात्यांच्या बाबतींत आजपर्यंत कधीं झालेलें नाहीं. केव्हांहि त्यांना पाहावें, त्यांच्या तोंडावरचें तें नेहमींचें तेज आणि त्यांचें मिष्किल हसूं आणि तो त्यांचा उत्साह आपला सदोदित कायम असे. आपलें आरोग्य उत्तम राखण्यासाठीं त्यांनीं विशेष श्रम किंवा काळजी घेतल्याचें मला माहीत नाहीं. बहुतेक सर्व विषयांची त्यांना आवड असे. पण कोणत्याहि व्यायामाबद्दल त्यांना प्रेम असल्याचें मला कांहीं माहीत नाहीं. त्यांना कसलेंहि व्यसन नव्हतें. कच्च्या शेंगांचे दाणे खाण्याचा फक्त त्यांना नाद होता, हें सर्वांना माहीत आहे. त्याखेरीज ते कशाच्या 'आहारीं' गेल्याचें ऐकिवांत नाहीं. नाहीं म्हणावयाला दुपारचें जेवण झाल्यावर लागलीच अर्धापाऊण तास वामकुक्षी घेण्याचें मात्र त्यांना विलक्षण वेड होतें. या बाबतींत त्यांनीं कधीं अपवाद केला नाहीं किंवा कधीं कोणाच्या भिडेला भीक घातली नाहीं. एकदां खडकीच्या 'वनस्पति बागेंत' आमच्या 'शारदा मंदिरा'चें शिशिर भोजन होतें. त्या भोजनाला तात्या आले होते. बारा वाजण्याच्या सुमाराला जेवण झालें रे झालें कीं तात्या हात धुऊन सरळ आपल्या मोटारींत बसले आणि घरीं जायला निघाले. मी धावत त्यांच्या मोटारीजवळ गेलों व म्हणालों, "तात्यासाहेब, आतां मंडळीच्या गप्पांना खरा रंग भरणार आहे. तुम्ही जर जाल तर आमचा फार विरस होईल!" तेव्हां तात्या जरा चिडक्या स्वरांतच म्हणाले, "मीं तुम्हांला आधीं सांगितलें होतें, कीं जेवण झाल्यावर एक क्षणभरसुद्धां इथें थांबणार नाहीं. प्रत्यक्ष परमेश्वरानें मला भीड घातली तरी माझा परिपाठ मी मोडणार नाहीं." असें म्हणून तात्यांनीं सरळ आपली मोटार तेथून पिटाळली. दुसऱ्या एका प्रसंगीं ते मला म्हणाले, "ही दुपारच्या अर्ध्या तासाची वामकुक्षी ही माझ्या उत्तम प्रकृतीची गुरुकिल्ली आहे."

तात्यांचें शहात्तरावें वर्ष ऑगस्टच्या चोवीस तारखेस सुरू झालें होतें. तीन-चार महिन्यांपूर्वींच मी त्यांच्या घरीं गेलों होतों. त्या वेळीं वार्धक्यामुळें त्यांच्या डोक्याच्या आकारांत फरक होत चालल्याचें एकदम माझ्या लक्षांत आलें. तथापि, एका कानानें कमी ऐकूं येऊं लागण्यापलीकडे विशेष गौणपणा असा मला त्यांच्या प्रकृतीमध्यें आढळून आला नाहीं. त्यांचा उत्साह आणि धांदल अगदीं पहिल्यासारखींच होतीं. मी म्हणालों, "तात्यासाहेब, बडोद्याचे

महाराज आतां इथें आले आहेत, त्यांनीं तुम्हांला तीन वाजतां आपल्या बंगल्यावर भेटायला बोलाविलें आहे."

तात्या चटकन् उद्गारले, नेहमींपेक्षां जरा मोठ्यानेंच ते म्हणाले, "येतों. मी अडीच वाजतां येथें तयार आहें. तुम्ही गाडी घेऊन या." तात्यांचा तो उत्साह पाहून मी तर अगदीं चकित झालों. बरोबर अडीच वाजतां पोषाख करून तात्या माझी वाट पाहात बसले होते. तात्यांच्या बरोबर दुसऱ्याहि पुण्यांतल्या एका वृद्ध कार्यकर्त्यांना मी महाराजांकडे बोलावलें होतें; पण ते गृहस्थ स्वतः तर आलेच नाहींत. उलट तात्यांच्यावर ते भडकून उठले. ते म्हणाले, "या तात्यांना आतां म्हातारचळ लागलेला आहे. कोणी वाटेल त्यानें त्यांना बोलाविलें तरी हा म्हातारा डोक्यावर पगडी घालून आणि खांद्यावर उपरणें घेऊन त्याला भेटायला आपल्या घरांतून तुरूतुरू धावत जाईल!"

मला ते उद्गार ऐकून हसूं आलें नाहीं. उलट त्यामुळें तात्यांच्या स्वभावाचा एक निराळाच पैलू दृष्टीस पडल्यासारखें मला वाटलें. मूळचाच त्यांचा आनंदी आणि आशावादी स्वभाव वयामुळें अधिक प्रेमळ आणि शीतळ झाल्याचें मला दिसून आलें. त्यांच्या बोलण्यामध्यें एक निराळाच आनंद त्या वेळीं माझ्या प्रत्ययाला आला. त्यांचा उत्साह अगदीं शीग भरून सांडत होता म्हणानात! ते महाराजांना म्हणाले, "महाराष्ट्राचा उठाव करण्याचें काम तुम्ही आधीं हातीं घ्या. कोणाच्याही हाताखालीं काम करण्याची माझी तयारी आहे." तात्यांची आणि आपली ही भेट शेवटची ठरणार आहे असें त्या वेळीं मला मुळींच वाटलें नाहीं. गेल्या दोन-तीन महिन्यांमध्यें त्यांचें एक व्याख्यान आणि दोन लेख माझ्या वाचण्यांत आले. हें व्याख्यान त्यांनीं एक ऑगस्ट रोजीं पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्यें केलेलें होतें. एक लेख पंधरा ऑगस्टच्या 'फ्री प्रेस'च्या स्वातंत्र्यमहोत्सवाच्या खास अंकांत आणि दुसरा लेख साप्ताहिक 'लोकमता'च्या दोन ऑक्टोबरच्या गांधीजयंतीच्या अंकांत त्यांनीं लिहिलेला होता. या तीनहि ठिकाणीं प्रकट केलेले त्यांचे विचार मला अतिशय तेजस्वी वाटले. काँग्रेसच्या राजकारणावरील तात्यांचीं मतें मला पूर्वी कधींहि आवडत नसत. त्या बाबतींत मीं त्यांच्यावर अनेक वेळां टीका केली आहे. कित्येक वेळां वाजवीपेक्षां जास्तच कठोर टीका केली आहे असें मला वाटतें. तथापि, या तीन प्रसंगीं त्यांनीं जो अभिप्राय व्यक्त केला तो मात्र मला एकदम पटला. मी त्या वेळीं कोणाला तरी म्हणालों कीं, "तात्यांच्या बुद्धींत एक निराळेंच तेज निर्माण झाल्यासारखें मला अलीकडे दिसतें आहे."

देशाला आज स्वातंत्र्य मिळालें आहे. तें काय वाटेल तें करून सांभाळायला पाहिजे. स्वातंत्र्याच्या रक्षणाचा आधीं विचार व्हायला पाहिजे. हा तात्या-

साहेबांच्या अलीकडच्या विचारांचा मुख्य सूर होता. आणि तो अगदीं बरोबर होता. कॉंग्रेसनेत्यांच्या आजकालच्या वक्तव्यांत नेमका तेवढाच सूर आढळून येत नाहीं. बाकी सर्व असतें. मिळालेल्या स्वातंत्र्याचें रक्षण कसें करावयाचें याची देशाच्या पुढाऱ्यांना जणूं चिंताच नाहीं असें वाटतें. जनतेला सशस्त्र आणि सुसज्ज करण्याऐवजीं जनतेच्या जवळ असलेलीं मोडकींतोडकीं हत्यारें गोळा करून गांधींच्या पायांवर वाहण्याचें काम मात्र जोरांत सुरू आहे. म्हणून कॉंग्रेस-नेत्यांच्या भूमिकेपेक्षां मला तात्यासाहेबांचीच भूमिका जास्त तर्कशुद्ध वाटली. तात्यांची बुद्धि इतक्या वयांतहि अजून बिनचूक काम देते आहे हें बघून मला खरोखरच हर्ष झाला. म्हणूनच त्यांच्या आयुष्याची दोरी अशी अचानक तुटेल असा विचारहि माझ्या मनाला कधीं शिवला नाहीं.

गेल्या मंगळवारीं मी खंडाळ्याला होतों. अकरा वाजतां तात्या गेल्याचा मला मुंबईहून फोन आला. माझा त्यावर मुळीं विश्वासच बसेना. तसाच बाराच्या गाडीनें मी शिवाजीनगरला आलों. बंगल्याबाहेर लोकांची बरीच गर्दी जमली होती. कांहीं टांग्ये आणि मोटारी उभ्या होत्या. तात्यासाहेबांचें अंत्यदर्शन घेण्यासाठीं तरुण मुलांची आणि स्त्रियांची रीघ लागून राहिली होती. मुख्य दारासमोरच्या दालनांतच पलंगावर तात्यांचा देह ठेवण्यांत आला होता. आणि त्यांच्या सर्वांगावर शेवंतीच्या पिवळ्या फुलांच्या हारांची फारच मोठी रास पडलेली. एखाद्या तक्क्याला डोळे मिटून टेकून बसावेत ना, तसे तात्यासाहेब मला दिसले. त्यांचें शरीर निष्प्राण होऊन त्या वेळीं जवळजवळ सात-आठ तास तरी झाले होते; पण मृत्यूचें एवढेंसेंसुद्धां चिन्ह त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हतें. त्यांचा तो सतेज गौरवर्ण, त्यांचें तें भव्य मोठें डोकें आणि त्यांचा तो रुबाबदार गंभीर चेहरा अगदीं होता तसा दिसत होता. ओठ तर अशा थाटांत मिटलेले मला दिसले कीं, जणूं कांहीं आतां डोळे उघडून ते बोलायला सुरुवात करणार आहेत कीं काय कोणास ठाऊक! मीं नामदार गोखले यांचें शव पाहिलें होतें. मृत्यूनंतरहि त्यांचा चेहरा सतेज दिसत होता. तथापि, तात्यासाहेबांच्या इतका तो खचित सुंदर आणि आकर्षक दिसत नव्हता. खरोखर, तात्यांनीं मरणावरहि शेवटीं मात केली. जीवनामधल्या निरनिराळ्या प्रसंगांना आणि संकटांना त्यांनीं जसें शांतपणें व हसून तोंड दिलें तसेंच त्यांनीं मृत्यूचेंहि सस्मित मुखानें स्वागत केलें. काळपुरुष जेव्हां मंगळवारीं पहाटे त्यांना घेऊन जाण्यासाठीं चोरासारखा लपत छपत आला असेल, तेव्हां त्यांना शांतपणें आपल्या अंथरुणावर घोरत पडलेले पाहून त्याची चांगलीच फजिती उडाली असेल. निराशेनें मटकन् तो एकदम खालींच बसला असेल. आपल्या दर्शनानें माणसांचे चेहरे भयभीत आणि भेसूर झालेले पाहण्याची मृत्यूला नेहमीं संवय झालेली, पण आपण आलों तरी हा

महापुरुष निर्विकारपणें झोपी गेलेला पाहून मृत्यूला अगदीं मेल्याहून अधिक मेल्यासारखें झालें असेल. मरणाला मारलें, हा तात्यासाहेबांनीं आयुष्याच्या शेवटीं मिळविलेला फारच मोठा विजय होय, यांत मुळींच शंका नाहीं. मृत्यूच्या भेसूरपणाचा डंखच मुळीं तात्यासाहेबांनीं उखडून काढला. त्यामुळें एक अद्‌भुत गोष्ट मात्र साध्य झाली. ती ही कीं, त्यांच्या मरणाच्या आकस्मिकतेमुळें लोकांना आश्चर्य वाटलें, दुःख झालें, पण त्यांच्या यातना मात्र जाणवल्या नाहींत. तात्यासाहेब आणखी जगले असते तर ते कोणाला नको होते ? पण आयुष्यांतलें प्रचंड जीवितकार्य पुरें झाल्यानंतर अत्यंत सुखाचें मरण त्यांना आलें, या समाधानाच्या भावनेमुळें त्यांच्या वियोगाचें दुःख लोकांना असह्य वाटलें नाहीं. त्यामुळेंच त्यांच्या प्रेतयात्रेमध्यें एक प्रकारचें पवित्र आणि शांतगंभीर वातावरण पसरलें होतें. त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं सारें पुणें शहर जमलें होतें, खरोखरच केळकर महाराष्ट्रसम्राट् होते. आणि म्हणून एखाद्या सम्राटाप्रमाणेंच ते आपल्या राजधानींतून मिरवत मिरवत इहलोकामधून निघून गेले. प्रेमाचा आणि फुलांचा पुणें शहरानें त्यांच्यावर अक्षरशः पाऊस पाडला. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठीं स्मशानांत नदीच्या दोन्ही कांठांवर मिळून एक लाख लोक तरी जमले होते. पुण्याच्या स्मशानांत मृताच्या गौरवाचीं भाषणें ध्वनिक्षेपकावरून होण्याची ही पहिलीच वेळ होय.

स्मशानांत निश्चेष्ट पडलेली ती केळकरांची शांत मूर्ति पाहून तीस-पस्तीस वर्षांच्या त्यांच्या कित्येक आठवणींचा डोंगर माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला. मी अकरा सालीं पुण्यांत राहावयास आलों. तेव्हांपासून आतांपर्यंत त्यांचें महान् जीवन मी एकसारखें पाहतोंच आहें. त्यांचें कर्तृत्व एवढें विविध अन् विस्तीर्ण आहे आणि त्यांचें वाङ्मय इतकें विशाल आहे कीं, त्यांचें नुसतें वर्णन करावयाचें म्हटलें तरी महाभारताएवढा मोठा ग्रंथ होईल. मी माझ्या पिढींतल्या पुण्यामधल्या लोकांना नेहमींच भाग्यशाली समजतों. जें महाराष्ट्रांत इतर कोणालाहि पहावयाला मिळालें नसेल तें त्या वेळच्या आम्हां पुण्यामधील लोकांना विनासायासानें बघावयाला आणि ऐकावयाला सांपडलें. राजकारणाच्या नकाशांत पुण्याला लोकमान्य टिळकांनीं अद्वितीय स्थान प्राप्त करून दिलें होतें. लोकमान्य जरी त्या काळीं कारागृहांत होते तरी साऱ्या देशाचे डोळे पुण्याकडे लागून राहिले होते. ' पुणें बोले आणि महाराष्ट्र डोले ' अशीच केवळ त्या काळची स्थिति नसून ' पुणें बोले आणि हिंदुस्थान हाले ' असें त्या वेळचें पुण्यामधलें वातावरण होतें. पुणें हें त्या वेळीं देशाच्या राजकारणाचें तीर्थक्षेत्र आणि मराठी वाङ्मयाचें विद्यापीठ होऊन बसलें होतें. टिळकांच्या नांवाच्या मोहिनीनें देशांतले मोठमोठे पुढारी आणि वक्ते पुण्याकडे आकर्षिले जात होते. महाराष्ट्रांतले मोठमोठे कार्यकर्ते वेळोवेळीं पुणें शहरामध्यें येऊन जात होते, त्यामुळें पुणें हें व्याख्यानांचें आणि

राजकीय प्रचाराचें एक महान् क्षेत्रच होऊन बसलें होतें. म्हणून त्या वेळीं पुणें शहरामध्यें नुसतें राहणें देखील भाग्याचें झालें होतें. ‘ केसरी ’ तेव्हां महाराष्ट्राचा प्राण होता. आणि त्यामुळें गायकवाडवाड्यांत वावरणाऱ्या व्यक्तींना आणि घडणाऱ्या गोष्टींना एक अद्‌भुत महत्त्व प्राप्त झालें होतें. टिळकांच्या गैरहजेरींत त्यांच्या राजकारणाची ध्वजा वर फडकत ठेवण्याची जबाबदारी नरसिंह चिंतामण केळकर आणि कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या टिळकांच्या दोन तरुण पट्टशिष्यांवर येऊन पडली होती.

त्या वेळीं केळकर हे नुसतेच नरसोपंत होते, तात्यासाहेब नव्हते. आणि खाडिलकर हे साधे कृष्णाजीपंत होते, काकासाहेब झालेले नव्हते. दोघांचींहि वयें चाळिशीच्या आंत होतीं. दोघांच्याहि कर्तृत्वाबद्दल महाराष्ट्राला आशा वाटूं लागली होती. तथापि, दोघांची तुलनाच केल्यास केळकरांपेक्षां खाडिलकरांबद्दल लोकांस जास्त आदर वाटत होता. मात्र याचें कारण खाडिलकरांचें राजकारण नसून त्यांचीं लोकप्रिय झालेलीं नाटकेंच होत, हें सांगणें जरूर आहे. सरकारच्या रोषास पात्र झालेल्या ‘ कीचकवध ’ मुळें खाडिलकरांचें नांव केळकरांपेक्षां जास्त माहीत झालें होतें. व्याख्यानाच्या विशिष्ट लकबीमुळें आणि डोक्यावरच्या लाल पगडीमुळें आम्हां पुण्यांतल्या पोरांना खाडिलकर हे केळकरांपेक्षां जास्त टिळकांसारखे दिसत. त्यामुळें टिळकांचे खरे वारस खाडिलकरच असावेत असें आपलें आम्हांला वाटे. खाडिलकरांचीं भाषणें फार गंभीर असत; बहुधा तीं रुक्षच असत.— आणि कर्कश आवाजांत रेकून बोलण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळें तर पुष्कळ वेळा त्यांचीं व्याख्यानें कंटाळवाणी होत. तथापि त्यांच्या भाषणांतून अधूनमधून वीररसाचा परिपोष होई; आणि जोरानें टाळ्या वाजविण्याची आम्हांला संधि मिळे. केळकरांच्या व्याख्यानामध्यें तो क्वचित् येई. त्या वेळीं त्यांच्या बोलण्यांत विनोदाचा आणि लालित्याचा भाग फारच थोडा असे, असें म्हटलें तरी चालेल. त्यामुळें त्या वेळीं केळकरांबद्दल आम्हांस कधींच आकर्षण वाटूं शकलें नाहीं. सामान्य जनतेंतहि तशीच भावना असावी असें मला आठवतें. केळकर लिहितात चांगले, पण त्यांना बोलतां मात्र मुळींच येत नाहीं, अशीच त्या वेळीं लोकांची समजूत होती. माझे गुरु राम गणेश गडकरी यांचाहि अभिप्राय तसाच असे. केळकरांपेक्षां खाडिलकरांचा ‘ केसरी ’ जास्त आवडे. एकदां केळकर संपादक असतां ‘ केसरी ’ चा एक नवा अंक घेऊन मी गडकऱ्यांकडे गेलों. छपाईच्या जास्त दाबामुळें अग्रलेखाशेजारच्या एका स्तंभाच्या रेघेच्या ठिकाणीं तो अंक उभा फाटलेला होता. तें पाहून गडकरी तोंड वेडेवाकडें करून उद्गारले कीं, “ अग्रलेख लिहितां लिहितां केळकरांची छाती चांगलीच फाटल्यासारखी दिसत आहे मला ! ”

केळकरांचें नांव महाराष्ट्रामधल्या तरुण मंडळीपुढें प्रामुख्यानें त्यांच्या 'तोतयाच्या बंडा' मुळें आलें. नाटककार म्हणून त्या वेळीं खाडिलकरांचा जमाना जोरांत चालू असतां नाट्यलेखनांत दुसऱ्या नाटकानें कीर्ति मिळविणें ही गोष्ट अतिशय कठीण होती. पण ती दुर्घट गोष्ट रंगभूमीवर आलेल्या आपल्या पहिल्याच नाटकानें केळकरांनीं घडवून आणली. त्यानंतर त्यांनीं चारपांच नाटकें रंगभूमीवर आलीं, आणि तीं पुष्कळ यशस्वीहि पण झालीं. तथापि 'तोतयाच्या बंडा' चें यश मात्र त्यांच्या कोणत्याहि नाटकाला मिळालें नाहीं. या नाटकाचे मीं स्वतः वीस-पंचवीस तरी प्रयोग पाहिले असतील. 'चित्ताकर्षक नाटक मंडळी'च्या सर्व नाटकांना मला फुकट प्रवेश असल्यानेंच हें घडूं शकलें हें सांगावयाला नकोच. केळकरांचीं नाटकें रंगभूमीवर आल्यानें एक गोष्ट मात्र विशेष प्रामुख्यानें लोकांच्या नजरेसमोर आली. ती ही कीं, खाडिलकरांपेक्षां त्यांची लेखनशैली जास्त मोहक, काव्यमय आणि विनोदी आहे. या नाटकापूर्वीं आधीं किती तरी वर्षें त्यांचें 'सुभाषित आणि विनोद' हें पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. तथापि, त्या पुस्तकानें त्यांच्या विनोदी बुद्धीची जेवढी जाहिरात झाली नसेल, त्यापेक्षां किती तरी अधिक पटींनीं त्यांच्या नाटकांतील विनोदामुळें झाली. तत्पूर्वीं मराठी रंगभूमीवर कोल्हटकरांचा विनोद, काय तो यशस्वी झालेला होता. तथापि, कोल्हटकरांच्या विनोदांत जी कृत्रिमता आणि क्लिष्टता आढळून येई तिचा मागमूसहि केळकरांच्या नाट्यविनोदांत दिसून आली नाहीं. ते कोल्हटकरांचे समवयस्क आणि सहाध्यायी असल्यानें दोघांचाहि विनोदस्फूर्तींचा उगम समाईक असावा असा अंदाज केल्यास तो चुकीचा ठरूं नये. कोटिबाजपणांतहि केळकर हे कोल्हटकरांना यत्किंचित्‌हि हार जाणारे नव्हते. किंबहुना, कोल्हटकरांपेक्षां केळकरांचा विनोद अधिक घरगुती, मनमोकळा आणि प्रासदिक असे. कोल्हटकरांची विनोदी परंपरा पुढें चालविण्यासाठीं त्यांना जसे गडकरी मिळाले, तसा केळकरांचा विनोदाचा वारसा पुढें चालविण्यास त्यांना कुणी शिष्य मिळाला नाहीं हें जरी खरें असलें, तरी कोल्हटकरांप्रमाणेंच केळकरांचा विनोद स्वतंत्र बुद्धीचा असून त्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडलेली होती.

केळकरांच्या विनोदाची कीर्ति त्यांच्या नाटकांमुळें महाराष्ट्रांत एकसारखी पसरत गेली. केळकरांच्या काव्यात्म वृत्तीचा आणि रसिकतेचा चहूंकडे लौकिक पसरूं लागला. आणि त्यामुळें त्यांच्या व्याख्यानांचे श्रोते त्यांच्याकडून विनोदाची आणि लालित्याची एकसारखी अपेक्षा करूं लागले. 'यशासारखें यशस्वी असें दुसरें कांहींच नाहीं' ही इंग्रजी म्हण केळकरांच्या बाबतींत खरी ठरली. जनता त्यांच्या विनोदाचें आणि रसिकतेचें कौतुक करूं लागल्यापासून त्यांच्या व्याख्यानांची रंगत हळूहळू वाढूं लागली, आणि आवाजाची व अस्खलितपणाची अनुकूलता



ठाणे 96304

नसतांनाहि त्यांचीं व्याख्यानें आकर्षक आणि परिणामकारक होऊं लागली. हळूहळू केळकरांचा दीर्घ व्यासंग, त्यांचा साहित्यशास्त्राचा मौलिक अभ्यास आणि त्यांच्या प्रतिभेची चतुरस्रता प्रकट होऊं लागली. आणि त्यामुळें विद्वानांचें लक्ष त्यांच्याकडे वळूं लागलें. या काळांत गडकऱ्यांचा आणि त्यांचा अतिशय लोभ जडला. आपलें नवीन लिखाण घेऊन गडकरी अनेक वेळां केळकरांकडे जात आणि केळकरहि मुक्तकंठानें त्यांची स्तुति करून त्यांना परत पाठवीत. ज्या दिवशीं 'मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा' हें महाराष्ट्रगीत गडकऱ्यांनीं लिहिलें त्या दिवशीं दुपारीं दीड वाजायच्या सुमारास गडकरी केळकरांकडे धांवत गेले. तें गीत केळकरांना अतिशय आवडलें. गडकऱ्यांची पाठ थोपटून ते म्हणाले, "हें सबंध गीत लवकर पुरें करून टाका. महाराष्ट्रामधल्या प्रत्येक तरुणाच्या तोंडीं हें गीत ऐकूं येईल अशी माझी खात्री आहे." तरुण कवींना आणि लेखकांना उत्साहपूर्वक उत्तेजन देण्याच्या केळकरांच्या ह्या प्रेमळ वृत्तीमुळें साहित्यप्रांतांत त्यांच्या लोकप्रियतेचें वर्तुळ दिवसेंदिवस वाढत गेलें.

चौदा सालीं टिळक तुरुंगांतून सुटून परत आले. त्यानंतर साहजिकच लोकांचें लक्ष टिळकांच्या मूर्तीवर केंद्रित झालें, आणि केळकर-खाडिलकर ही जोडी थोडीशी बाजूलाच सरकल्यासारखी झाली. पुढे टिळकांनीं आपली स्वराज्याची मोहीम सुरू केली आणि त्यांच्या जयजयकाराच्या तुताऱ्या आणि चौघडे देशांत चोहींकडे वाजूं लागले. त्या कोलाहलांत दुसऱ्या कोणाच्याहि कर्तृत्वाला किंवा कीर्तीला वाव मिळणें शक्य नव्हतें. या काळांत केळकर हे टिळकांचे राजकीय मदतगार झाले आणि त्यामुळें राजकीय चळवळ कशी योजावयाची आणि चालवावयाची याचें प्रात्यक्षिकच त्यांना टिळकांकडून मिळालें. या तीन-चार वर्षांच्या काळांत केळकरांचें व्यक्तिमत्त्वच एकसारखें बदलत गेलें. त्यांच्या राजकीय प्रतिभेचा आणि कर्तृत्वाचा पिंड याच काळांत खरा घडत गेला. त्यांच्या विचारांमध्यें अधिक धैर्य, आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणिव याच कालखंडांत प्रथम निर्माण झाली. या सुमारास केळकरांच्या संयमी स्वभावाची आणि सचोटीची कसोटी लागण्याचा एक प्रसंग अनपेक्षितपणें निर्माण झाला. टिळकांना एकसष्टीच्या प्रसंगीं अर्पण करण्यांत येणाऱ्या थैलीपैकीं पसतीसशें रुपये हिशेबात न दाखविल्याचा वहीम अच्युतराव कोल्हटकर यांचेवर आला. अच्युतराव म्हणजे जबरदस्त लेखक, अतिशय लोकप्रिय आणि प्रभावी पत्रकार आणि टिळकांचे परमभक्त. पण त्यांच्या अव्यवहारी आणि गैरहिशेबी स्वभावामुळें ही पैशाची गफलत निर्माण झाली. तथापि, आपल्या हातून घडलेली ही गफलत झाकण्यासाठीं त्यांनीं सारें रान उठविलें आणि फंडाचे चिटणीस केळकर यांचेवर आपल्या लिखाणाचा तोफखाना डागला. केळकरांच्या जागीं दुसरा जर

कोणी माणूस असता तर अच्युतरावांच्या भयानक हल्ल्यामुळें तो सपशेल गारदच होऊन गेला असता. पण केळकरांनीं अच्युतरावांना मुळींच दाद दिली नाहीं. कांहीं काळ केळकरांची बाजू लंगडी आहे असाहि लोकांत भ्रम निर्माण झाला, आणि केळकर थोडेसे अप्रियहि झाले. पण 'लोकमान्य बाळंत झाले' असा स्वतःच्या जिवावर उदार होऊन प्रत्यक्ष टिळकांवर जेव्हां अच्युतरावांनीं हल्ला चढविला, तेव्हां एका लहानशा पत्रानें टिळकांनीं अच्युतरावांना नेस्तनाबूद करून टाकलें, आणि केळकरांची टिळकभक्ति ही अच्युतरावांच्या टिळकप्रीतीपेक्षां अधिक शुद्ध आणि निर्मळ आहे हें लोकांच्या निदर्शनाला आलें. अच्युतरावांच्या प्रत्येक आक्षेपाला उत्तर न देण्याइतके कांहीं केळकर लेचेपेचे नव्हते. पण अच्युतरावांच्या तोंडीं मुळींच लागावयाचें नाही असा त्यांनीं जो निश्चय केला तो शेवटपर्यंत पाळला. केळकरांचा हा आत्मसंयम अलौकिकच होता. तथापि त्या वेळेपासून केळकरांच्या मनांत अच्युतरावांबद्दल जो एकदांचा डूख बसून राहिला तो अगदीं शेवटपर्यंत. अर्थात् त्याबद्दल केळकरांना दोष देतां येणार नाहीं.

वीस सालीं टिळक वारल्यानंतर त्यांचे पट्टशिष्य आणि एकमेव राजकीय वारस म्हणून त्यांच्या राजकारणाचीं आणि कारभाराचीं सूत्रें ओघानेंच केळकरांकडे आलीं आणि वयाच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षीं केळकर महाराष्ट्राचे पुढारी बनले. तेव्हांपासून लोकांची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. महाराष्ट्राला टिळकांचा फार मोठा आधार होता. फार वर्षांनीं महाराष्ट्रांत एक युगप्रवर्तक महापुरुष निर्माण झालेला होता. म्हणून त्याला कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं असें महाराष्ट्राला होऊन गेलें होतें. टिळक महाराष्ट्राचें पूज्य दैवत होऊन बसले. अशा महान् विभूतीचें नांव आणि परंपरा पुढें चालविणें ही गोष्ट काय सामान्य होती? केळकरांसारखा सव्यसाची, चतुरस्र आणि प्रसंगावधानी माणूस त्यांच्यामागें होता, म्हणूनच त्यांनीं ती जबाबदारी मोठ्या चातुर्यानें आणि युक्तीनें निभावून नेली. त्या वेळीं केळकरांच्या जागीं खाडिलकर असते तर काय झालें असतें हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. केळकर हे टिळकांसारखे तेजस्वी आणि खंबीर नसतील; पण ते टिळकांपेक्षां खचित जास्त व्यवहारी होते. टिळक उग्र होते. लोकांना त्यांचें भय वाटे. ते खेळीमेळीनें जनतेमध्यें मिसळूं शकत नसत. त्यांच्या उलट केळकरांचा स्वभाव होता. त्यांची आनंदी आणि खेळकर वृत्ति त्यांना या बाबतींत फार उपकारक झाली. सूर्याचें बिंब जसें काळ्या कांचेमधून पाहावें लागतें, तसें टिळकांचें स्वरूप समजावून घेण्यासाठीं लोकांना केळकरांच्या सौम्य भिंगामधून पाहणेंच सोयीचें पडूं लागलें. त्यामुळें टिळकांपेक्षांहि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य लोकांचा केळकरांशींच प्रत्यक्ष संबंध आला. टिळकांचीं सारीं धोरणें केळकरांना माहीत होतीं. निरनिराळ्या प्रांतांमधल्या पुढाऱ्यांचीं आणि

टिळकांचीं काय सूत्रें होतीं तें फक्त केळकरांनाच अवगत होतें. टिळकांचा सारा पत्रव्यवहार आणि त्यांच्या चळवळीचा व पक्षाचा सारा कारभार पांच-सहा वर्षें केळकरांच्याच हातून घडला होता. म्हणून टिळकांच्या गादीवर बसतांना केवळ त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाखेरीज केळकरांच्या जवळ तसें कांहींच कमी नव्हतें.

टिळकांच्या मरणाचा क्षण हा हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक क्रांतिकारक असा क्षण होता. टिळक गेले आणि त्याच क्षणीं राजकारणाच्या रंगभूमीवर गांधीजींनीं प्रवेश केला. टिळकांच्या राजकारणाचा सर्वांना परिचय होता; पण गांधीजींनीं राजकारणाचें सारेंच तंत्र बदलून टाकलें. क्रांतीचें एक अद्‌भुत तत्त्वज्ञान त्यांनीं स्वातंत्र्याच्या राजकारणांत आणलें. देश त्यामुळें एकदम भारून गेला. सारी जनता एकदम थरारून उभी राहिली. गांधीजींच्या नांवाचा जयजयकार चहूंकडून उठला. लक्षावधि जनता त्यांच्या पाठीमागें येऊन उभी राहिली. एखाद्या जादूगारानें जादूची कांडी फिरवून इकडची दुनिया तिकडे करून टाकावी तसें गांधीजींनीं देशामध्यें करून टाकलें. अशा वेळीं त्यांना विरोध करणें म्हणजे स्वतःची रवानगी वेड्याच्या इस्पितळांत करून घेण्यासारखें होतें. केळकरांच्यावर ही फारच मोठी जबाबदारी येऊन पडली. टिळकांचें नांव राखून पुन्हा गांधीजींच्या नव्या राजकारणांत त्यांना महाराष्ट्राच्या पराक्रमाची परंपरा कायम ठेवायची होती. ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. पण ह्या अवघड कसोटीमध्यें केळकर कांहीं कमी पडले नाहीत. गांधीजींच्या असहकारितेच्या राजकारणांत ते उसळीसारखे एकदम वर आले. आणि गायकवाडवाडा ही महाराष्ट्रामधल्या कॉंग्रेसच्या लढाऊ सैनिकांची छावणी बनली.

केळकर हे त्या वेळीं गांधीजींच्या राजकारणामध्यें किती समरस होऊन गेले होते ह्याचें आज वर्णनहि करतां येणें शक्य नाहीं. त्या वेळचीं पुण्या-मुंबई-मधील त्यांचीं तेजस्वी व्याख्यानें ज्यांनीं ऐकलीं असतील त्यांच्या तीं अजूनहि स्मरणामधून गेलीं नसतील. केळकरांच्या बुद्धिमत्तेला त्या वेळीं असें विलक्षण तेज चढलें होतें म्हणतां ! महाराष्ट्रामध्यें आणि प्रांतांतहि त्यांच्या लोकप्रियतेची खूपच लाट उसळली. मोठमोठे पुढारी केळकरांच्या घरीं येऊन उतरूं लागले. केळकरांशीं चर्चा करूं लागले. आणि केळकरांना कॉंग्रेसच्या अखिल भारतीय राजकारणांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. हजारों लोकांच्या सभेंत, भारतीय पुढाऱ्यांच्या समवेत किंवा अग्रभागीं जेव्हां केळकर प्रवेश करीत तेव्हां टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होई. केळकरांकडे पाहून साऱ्या महाराष्ट्राला त्या वेळीं अतिशय धन्यता वाटे. टिळकांच्या मागें महाराष्ट्राचें नांव राखणारा बुद्धिमान् आणि कर्तबगार पुढारी महाराष्ट्राला मिळाला असेंच ज्याच्या त्याच्या तोंडून उद्गार निघत.

व्याख्यानाच्या वेळीं तर आपल्या तेजस्वी कोटिक्रमानें आणि विनोदानें

केळकर अशी बहार उडवून देत, कीं सांगतां सोय नाहीं. मला आठवतें आहे कीं, एकवीस सालीं असहकारितेच्या चळवळींत एकदां मुंबईच्या मारवाडी विद्यालयांत केळकरांचें असेंच एक जोरदार व्याख्यान चालू होतें. लोकांची विलक्षण गर्दी जमली होती. कांहीं वेळानें गांधीजी तेथें आले. त्यांच्याबरोबर गर्दीचा लोंढा आला. तेव्हां असें ठरलें कीं, आंतल्या श्रोत्यांसमोर गांधीजींनीं बोलावयाचें आणि बाहेरच्या श्रोत्यांसमोर केळकरांनीं भाषण करावयाचें. तसे केळकर बाहेर आले. आंत अर्धापाऊण तास भाषण केल्यावर त्यापेक्षां निराळें असें भाषण बाहेर येऊन केळकर तरी काय करणार? विषय एकच होता. पण केळकरांनीं आपल्या पुनरुक्तीचें कोटिबाज समर्थन करून खूपच बहार उडवून दिली. ते म्हणाले, " ह्या वेळपर्यंत मी आंत जें बोलत होतों तेंच आतां बाहेर बोलणार आहें. नाहीं तर तुम्ही म्हणाल, ह्यांचें आंत एक असतें आणि बाहेर दुसरेंच असतें, पण तसें नाहीं!" श्रोत्यांची हसतां हसतां अगदीं पुरेवाट झाली. केळकर गांधीजींशीं किती समरस झाले होते, ह्याचें एकच उदाहरण म्हणजे त्यांनीं लिहिलेलें 'चरख्याचें गाणें'. या गाण्यांत—

**चरखा नोहे चक्र सुदर्शन**
**आयुध दारिद्र्यासुरमर्दन**
**फिरूं लागल्या क्षण मग अर्ध न**
**लागे होण्या दुःखविमोचन**
**म्हणूनि तत्स्तुति करितांचि राहूं!**

असें म्हणण्यापर्यंत त्यांच्या कल्पनेनें मजल मारली होती. वीस-एकवीस सालीं केळकरांचें महाराष्ट्रांतलें पुढारीपण महाराष्ट्राने बिनतक्रार मान्य केलें आणि 'दे. भ. तात्यासाहेब केळकर' या नांवानें महाराष्ट्र त्यांना मोठ्या प्रेमानें संबोधूं लागला. येथपासून तों बत्तीस सालापर्यंत म्हणजे त्यांच्या वयाला साठ वर्षें पुरीं होऊन ते सेवानिवृत्त होईपर्यंत एक तपभर महाराष्ट्राच्या सर्वांगीण सार्वजनिक जीवनाच्या आघाडीवर ते अग्रभागीं तळपत राहिले.

एकवीस सालीं ते बडोदें येथें भरलेल्या 'महाराष्ट्र साहित्य संमेलना' चे अध्यक्ष झाले. या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं जें भाषण केलें तें गेल्या दोन तपांतील मराठीमधल्या वाङ्मयीन टीकेचा आधार होऊन बसलेलें आहे. या बारा वर्षांत केळकरांच्या सार्वजनिक जीवनाचा व्याप आणि विस्तार एकसारखा वाढतच गेला. महाराष्ट्रामध्यें प्रत्येक ठिकाणीं केळकर हवेसे वाटूं लागले. केळकर ज्या कामांत नाहींत किंवा ज्या संस्थेंत नाहींत तें काम आणि ती संस्था यशस्वी होणें शक्य नाहीं, असेंच जणूं कांहीं समीकरण होऊन बसलें. कोणतीहि सार्वजनिक सभा वा चर्चा केळकरांवांचून रंगणें हें अशक्य होऊन बसलें. सभेच्या

अध्यक्षस्थानीं केळकरच पाहिजेत हा नियम अगदीं ठरूनच गेल्यासारखा झाला. या काळामध्यें मीं केळकरांच्या शेकडों सभा पाहिल्या आणि ऐकल्या. रंगभूमीवर गणपतराव जोशी किंवा बालगंधर्व यांचा प्रवेश होतांना प्रेक्षकांच्या अंगावर हर्षाचे रोमांच जसे तरारून उभे राहत तशा सभेच्या, व्यासपीठावर केळकरांनीं प्रवेश केल्यानंतर प्रेक्षकांच्या अंतःकरणामध्यें आनंदाच्या गुदगुल्या उठत असत. केळकरांनीं सभेंत पाऊल टाकलें म्हणजे सभागृहांतील सारें वातावरण एकदम प्रसन्न होऊन जाई. आजच्या सभेंत ते कांहीं तरी खूपच गंमत उडवून देणार अशी प्रत्येक सभेच्या वेळीं श्रोत्यांची अपेक्षा असे. आणि या अपेक्षेचा भंग केळकरांनीं कधीं एकाहि सभेमध्यें केला नसेल. केळकरांना या आपल्या सामर्थ्याची जाणीव होती. ते डुलत डुलत, खोकत खोकत आणि हसत हसत लगबगीनें जेव्हां सभेच्या उच्चासनावर विराजमान होत, तेव्हां त्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाचें मनोहर तेज चमकत असे. त्यांचे मिस्किल डोळे जणूं कांहीं श्रोत्यांना सांगत असत कीं, " थांबा, तुमच्या ज्या कांहीं माझ्या व्याख्यानाबद्दल अपेक्षा आहेत त्या चांगल्या दुपटीनें आणि तिपटीनें पुरवून तुम्हांला मी चाकितच करून सोडतों. "

महाराष्ट्रांत केळकरांनीं जेवढ्या सभा गाजवल्या असतील आणि जेवढे समारंभ उजवले असतील तेवढे गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रामधल्या एकाहि वक्त्यानें किंवा नेत्यानें भूषविले नसतील. महाराष्ट्रामध्यें अध्यक्षपदाचा त्यांनीं उच्चांकच मोडून टाकला, असें म्हणावयाला हरकत नाहीं. वृत्तपत्रीय आणि साहित्यविषयक प्रचंड लेखनाचा व्याप संभाळून सार्वजनिक कामांचा आणि सभांचा अवाढव्य डोंगर ते आपल्या शिरावर कसे पेलूं शकले हा एक चमत्कारच समजला पाहिजे. पृथ्वीचा भार शेषानें आपल्या मस्तकावर संभाळण्याइतकेंच तें दुष्कर काम होतें. हौस हें केळकरांच्या जीवनामधलें सर्वांत मोठें भांडवल होतें. कोणत्याहि गोष्टीला ' नाहीं ' म्हणणें त्यांना माहीतच नव्हतें. कंटाळा हा शब्दच मुळीं त्यांच्या जीविताच्या शब्दकोशांत नव्हता. श्रम घेण्याचें विलक्षण सामर्थ्य त्यांच्या अंगीं होतें. हातीं घेतलेलें प्रत्येक काम चातुर्यानें तडीस नेण्याची हातोटी त्यांच्याजवळ होती. त्यामुळें महाराष्ट्रांत कुठेंहि कसला वाद उत्पन्न झाला कीं, ती पंचाईत त्यांच्यापुढें येऊन पडे. मग तो वाद एखाद्या सार्वजनिक वा राजकीय संस्थेंतला असो कीं, खाजगी नाटक मंडळींतला असो. अशा वेळीं दोन्ही पक्षांचें समाधान करून सर्वांकडून शाबासकी मिळवून दाखविण्याचें अवघड कसब त्यांना साधलेलें होतें.

तेवीस सालच्या मध्यापासून गांधीजींच्या राजकारणाशीं केळकरांची फारकत झाली. त्या सुमारास कॉंग्रेसमध्यें चित्तरंजन दास आणि मोतीलाल नेहरू यांनीं जो ' स्वराज्य पक्ष ' स्थापन केला त्यामध्यें केळकर हिरिरीनें सामील झाले.

येथून पुढें ते गांधीजींच्या राजकारणाशीं असलेले आपले मतभेद भाषणांतून आणि लेखनांतून निर्भयपणें प्रकट करूं लागले. गांधीजींच्या असहकारितेला टक्कर देण्यासाठीं टिळकांनीं गंगापूर येथें शोधून काढलेल्या प्रतिगामी असहकारितेचें निशाण केळकरांनीं उभें केलें. तथापि, गांधीजींच्या एकसारख्या वाढत गेलेल्या लोकप्रियतेच्या भरतीपुढें केळकरांना प्रत्येक वेळीं हळूहळू मागेंच हटावें लागलें. गांधीजींच्या आध्यात्मिक इंद्रजालानें जनतेचीं मनें एवढीं मोहून गेलीं होतीं कीं शुद्ध तर्कशास्त्रावर आधारलेला केळकरांचा व्यवहारी बुद्धिवाद जनतेच्या डोक्यांत शिरणें अशक्य होतें. केळकर हे नेमस्त प्रवृत्तीचे आहेत, अशी सामान्यपणें लोकांची समजूत असे. पण स्वतःच्या लोकप्रियतेला खर्चीं घालून गांधीजींना निकराचा विरोध करण्याचा जो कडवा निर्धार त्यांनीं दाखवला त्यावरून तरी ते भीरु वृत्तीचे होते असें कोणाला म्हणतां येणार नाहीं. गांधीवादी राजकारणाच्या वेदिकेवर केवळ तत्त्वनिष्ठेनें प्रेरित होऊन केळकरांनीं आपल्या राजकीय जीवनाची आहुति दिली असेंच म्हटलें पाहिजे. अठ्ठावीस-एकोणतीस सालापर्यंत केळकरांनीं कसा तरी तग धरला. एकोणतीस सालच्या शेवटच्या दिवशीं लाहोर येथें हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें निशाण उभारण्यांत आलें, त्यानंतर एक काँग्रेसच्या कार्यकारी मंडळांत तरी राहा नाहीं तर मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सभासदत्वाचा राजीनामा तरी द्या, असा राष्ट्रपति जवाहरलाल नेहरू ह्यांनीं केळकरांना पेंच घातला. तेव्हां काँग्रेसच्या कार्यकारिणीचें त्यागपत्र देऊन केळकर काँग्रेसमधून बाहेर पडले. आणि बत्तीस सालीं तिसऱ्या गोलमेजपरिषदेला जेव्हां ते गेले तेव्हां त्यांनीं उघडपणेंच हिंदुमहासभेचें नेतृत्व पत्करलें.

तेथून ते परत आल्यावर त्यांच्या एकसष्टीचा समारंभ मोठ्या थाटानें महाराष्ट्रभर साजरा झाला. आणि त्यानंतर प्रत्यक्ष राजकारणामधून ते निवृत्त झाले तरीहि गेलीं पंधरा वर्षें त्यांनीं साहित्यांत आणि राजकारणांत भाग घेतला नाहीं असें झालें नाहीं. सामाजिक कार्यांचा संन्यास घेणें त्यांना जवळजवळ अशक्यच होतें. या काळांत महाराष्ट्रीय राजकारणाचें नेतृत्व सामान्य मगदुराच्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हातीं गेलें होतें. तरी जनतेच्या मनावर काँग्रेसचें वर्चस्व अढळ असल्याकारणानें लोकशाही स्वराज्य पक्षाच्या किंवा हिंदुमहासभेच्या वतीनें केळकरांनीं प्रसंगोपात्त केलेला काँग्रेसविरोध निष्फळच ठरला. काँग्रेसच्या व्यासपीठावरून आणि वृत्तपत्रांमधून केळकरांच्यावर प्रखर टीका होऊं लागली. आणि काँग्रेसप्रेमी बहुजनसमाजांत केळकर हे एक विटंबनेचा विषय होऊन बसले. केळकर हे अत्यंत हळव्या मनाचे होते. अगदीं बारीकसारीक अप्रिय गोष्ट देखील त्यांच्या मनाला लागून राही. म्हणून गेल्या दहा-पंधरा वर्षांत झालेली आपली अनन्वित अवहेलना त्यांनीं शांतपणें कशी सहन केली हें त्यांचें त्यांनाच ठाऊक.

राजकारण हें मोठें निर्दय असतें, राजकारणांत शिखरावर बसलेलीं माणसें पायाखालीं तुडवलीं जातात, आणि सांदीकोपऱ्यांत पडलेलीं माणसें एकदम कळसावर चढवलीं जातात. तीस सालापर्यंत महाराष्ट्राच्या अग्रभागीं सूर्याप्रमाणें तळपणारे केळकर गेल्या दहा-पंधरा वर्षांच्या राजकीय वातावरणांत एखाद्या काजव्यासारखे कोपऱ्यांत लुकलुकत पडावेत हें राजकारणाच्या अमानुष निर्दयपणाचें एक क्रूर उदाहरण आहे.

जनतेच्या या उपेक्षेचा केळकरांच्या मनावर परिणाम झाला नाहीं असें मात्र नाहीं. त्यांचा स्वभाव थोडासा चिडखोर बनला आणि रागाच्या भरांत वागतांना त्यांच्या विचारांचा तोलहि सुटला. मतदार गाढव आहेत असें म्हणणारे आणि कस्तुरबा फंडाला जाहीरपणें विरोध करणारे केळकर हे आपल्या संयमी स्वभावाच्या उदात्त पातळीवरून खालीं घसरलेले केळकर वाटतात. तथापि, देशामधल्या आजकालच्या अनेक राजकीय पुढाऱ्यांपेक्षां केळकरांच्या हातून अतिशय कमी चुका घडल्या असेंच निःपक्षपातीपणानें आतां म्हणावयाला हवें. केळकरांचा चौदा वर्षांचा राजकीय वनवास गेल्या वर्षापासून सुटावयाला सुरुवात झाली. मीरतच्या अधिवेशनांत काँग्रेसनें प्रतियोगी सहकारितेचा स्वीकार केला हा केळकरांच्या आयुष्यांतला सर्वांत मोठा विजय होय. काँग्रेसचे अध्यक्ष होण्यापेक्षां तो जास्त मोलाचा जय होय आणि त्यानंतर पंधरा ऑगस्ट रोजीं जेव्हां देशाची फाळणी झाली अन् गांधीवादी अहिंसेचें भेकड आणि राष्ट्रघातकी स्वरूप जेव्हां उघडें पडलें, तेव्हां गांधी-नेहरूंपेक्षां केळकर हे अधिक प्रज्ञावंत आणि द्रष्टे मुत्सद्दी आहेत असें आपोआपच सिद्ध झालें. ‘ स्वराज्य पक्षा ’च्या मोहिमेंतले केळकरांचे ‘ केसरी ’ तले लेख आजच्या राजकीय परिस्थितीच्या प्रकाशांत पुन्हां वाचले म्हणजे गांधीवादी राजकारण किती हास्यास्पद होतें आणि केळकरांचें शहाणपण आणि विवेचन किती अचूक होतें हें आपल्या लक्षांत येतें. जेव्हां देशाचा राजकीय इतिहास यापुढें कोणी लिहावयाला बसेल तेव्हां गेल्या पंचवीस वर्षांच्या राजकारणांत अग्रभागीं वावरलेल्या कित्येक नेत्यांचीं जुनीं मूल्यें तपासून त्याला त्यांच्या वाजवी किंमतीच्या नव्या चिठ्ठ्या परत त्यांच्यावर डकवाव्या लागतील त्या वेळीं केळकरांचें खरें मोल निश्चितपणें प्रकट होईल; व दीड तप त्यांच्या मुत्सद्दीगिरीची अवहेलना केल्याबद्दल जनतेला पश्चात्ताप करण्याची पाळी येईल.

मागील पंधरा वर्षांत केळकरांचें राजकारणामधलें महत्त्व जरी कमी होत गेलें, तरी साहित्यामधलें त्यांचें श्रेष्ठ स्थान होते तसेंच अढळ राहिलें. अडतीस सालीं त्यांनीं लिहिलेलें ‘ समग्र वाङ्मय ’ बारा खंडांमध्यें आणि दहा-बारा हजार पानांमध्यें प्रसिद्ध झालें. ‘ केळकर-वाङ्मया ’चा हा प्रचंड डोंगर पाहून महाराष्ट्रां-

तील जनता आश्चर्यानें थक्क झाली. कोणत्याहि साहित्यांत गुणानें आणि विस्तारानें इतकें अवाढव्य लेखन केलेले प्रतिभाशाली लेखक फारच थोडे निघतील. त्या दृष्टीनें विचार करतां केळकरांचा समग्र लेखनसंभार हा केवळ महाराष्ट्राचेंच नव्हे तर अखिल भारताचें भूषण ठरेल. केळकर-वाङ्मयाचे हे बारा खंड आणि त्या व्यतिरिक्त अगदीं परवांपरवांपर्यंत प्रसिद्ध झालेले त्यांचे अनेक विविध ग्रंथ म्हणजे एक महान् केळकर विद्यापीठच होय. यापुढें महाराष्ट्रांत ज्याला राजकारण, समाजकारण आणि वाङ्मयकारण करावयाचें असेल त्याला या 'केळकर विद्यापीठां'त निदान एक तपभर तरी राहून अभ्यास केल्यावांचून गत्यंतर नाहीं. 'केळकर-वाङ्मय' प्रसिद्ध झाल्यापासून 'साहित्याचार्य केळकर' हे एकदम महाराष्ट्राचे 'साहित्यसम्राट् केळकर' झाले. तें त्यांचें अद्वितीय स्थान त्यांच्या मृत्यूनंतरहि त्यांच्यापासून हिरावून घेणारा लेखक जन्माला येण्यास अद्याप पुष्कळ अवकाश आहे. स्वतः केळकरांनींच महाराष्ट्रांत पुनर्जन्म घेतला तरच तो पराक्रम ते पुन्हा करूं शकतील असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत मराठी भाषेवर आणि साहित्यावर केळकरांच्या लेखनाचा जो अनेकविध परिणाम झालेला आहे, त्याचें समग्रपणें वर्णन करणें या ठिकाणीं शक्य नाहीं. त्यांनीं प्रथम उपयोगांत आणलेले अनेक नवीन शब्द, भाषासंकेत आणि भाषालंकार आज मराठी भाषेच्या भांडारामध्यें समाविष्ट झालेले आहेत. इतकी सुबोध, सोज्ज्वळ आणि प्रासादिक मराठी भाषा लिहिणारा दुसरा लेखक मराठी साहित्यांत आढळून येणार नाहीं.

पुण्यामध्यें एका संमेलनांत कोणाचें वाङ्मय कशासारखें दिसतें हें केळकरांनीं आपल्या रसभरित भाषेमध्यें वर्णन करून सांगितलें होतें : तांबे कवींची कविता कडेवर मूल घेतलेल्या प्रौढ व प्रेमळ तरुणीप्रमाणें दिसते, केशवसुतांची कविता दाभणकांठीं पंचा नेसलेल्या कोरीव मिशांच्या आणि सुदृढ शरीराच्या अस्सल चित्पावन ब्राह्मणाप्रमाणें दिसते, चंद्रशेखरांची कविता या कानापासून त्या कानापर्यंत आडवें गंध लावलेल्या शास्त्र्याप्रमाणें दिसते, गिरीशांची कविता ब्राह्मण तरुणीनें मुद्दाम गुरविणीचा वेष घेतल्यासारखी दिसते आणि अत्रे यांची कविता आपल्या शेजारीं उभे राहून आपल्याला गुदगुल्या करून हसविणाऱ्या आणि क्वचित् प्रसंगीं आपल्या डोळ्यांतून पाणी काढणाऱ्या अस्वलाप्रमाणें दिसते ! केळकरांचें हेंच रूपक त्यांच्या लेखनशैलीला लावून असें म्हणतां येईल कीं त्यांची भाषासुंदरी किर्लोस्कर नाटक मंडळीच्या रंगभूमीवरील 'सौभद्र' नाटकांतील कै. भाऊराव कोल्हटकर यांच्या सुभद्रेच्या भूमिकेप्रमाणें मनमोहक, लडिवाळ आणि प्रौढ अशी वाटते.

वृत्तपत्रीय वाङ्मयाच्या रुक्ष वालुकामय प्रदेशामध्यें लालित्याच्या आणि विनोदाच्या फुलबागा प्रथम केळकरांनींच फुलविल्या. केळकर हे उत्कृष्ट साहित्यिक होते म्हणूनच ते श्रेष्ठ दर्जाचे पत्रपंडित होऊं शकले. त्यांचें राजकीय लेख अनेक अलंकारांनीं, दृष्टान्तांनीं, सुभाषितांनीं आणि हास्यकथांनीं नटविलेले असत.

त्यांचा उपरोध शिवरामपंत परांजप्यांच्याइतका हृदयभेदक नव्हता किंवा त्यांचा विनोद अच्युतराव कोल्हटकरांच्याइतका उत्तानहि नव्हता, हळू-हळू गुदगुल्या करीत करीत आणि हलक्या हातांनीं रेशमी चिमटे घेत घेत ते आपल्या विरोधकांची बंभेरी उडवीत. प्रतिस्पर्ध्यांवर ते चिडले म्हणजे मग त्यांच्या ह्या कलाकुसरीच्या कामाचा नाजुकपणा शिल्लक राहात नसे. श्री. महादेव राजाराम बोडस, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर आणि कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ह्यांचें ‘ मेनका ’ नाटक यांवर टीका करतांना केळकरांना आपला नेहमींचा कलात्मक संयम सांभाळतां आला नाहीं, हें स्पष्टपणें दिसून येतें. आपल्या राजकीय विरोधाचें उट्टें वाङ्मयीन टीकेमधून काढण्याची केळकरांची ही प्रवृत्ति त्यांच्या साहित्यामधील थोर कीर्तीला शोभण्यासारखी नव्हती. वाङ्मयाच्या सर्व प्रांतांत केळकरांनीं संचार करून प्रत्येक वाङ्मयप्रकार आपल्याला साध्य झालेला आहे असें दाखविण्याचा कसोशीनें प्रयत्न केलेला आहे. नाट्य, निबंध, टीका, इतिहास, चरित्र इत्यादि प्रांतांत त्यांनीं अपूर्व यश मिळविलें. पण कादंबरी आणि काव्य ह्या वाङ्मयीन प्रकारांत त्यांना फारसें यश मिळालें नाहीं. त्यांच्या कांहीं कांहीं कविता उत्तम आहेत हें खरें. पण त्यांची काव्यरचना एकंदरींत ढोबळ आणि विस्कळितच होती. नाटकांतलीं पद्यें तर त्यांना मुळींच जमत नसत. ‘ कृष्णार्जुनयुद्ध ’ नाटकामधलीं त्यांनीं केलेलीं पदें दुरुस्त करण्याचें काम त्यांनीं तात्यासाहेब कोल्हटकरांकडे सोपविलें. कोल्हटकरांनीं त्यांचीं सारीं पद्यें रद्द करून समूळ नवीन पद्येंच रचलीं. त्यामुळें केळकर अतिशय चिडले. शेवटीं कवींचीं नांवें न सांगतां कोणतीं पदें उत्कृष्ट आहेत तें निवडून काढण्याचें काम केळकरांनीं एका गवयांच्या पंचायतीकडे सोपविलें. पंचांनीं केळकरांनीं केलेलीं एकूण एक पदें नापास केलीं आणि कोल्हटकरांचीं सारीं पदें पास केलीं.

केळकरांच्या हातून एवढें विविध कर्तृत्व आणि प्रचंड लेखन जें झालें त्याचें कारण म्हणजे त्यांची विलक्षण निरलसता. गेल्या पन्नास वर्षांमध्यें आपल्या आयुष्यांतल्या एकहि क्षण केळकरांनीं कधीं वायां दवडला नसेल. या बाबतींत त्यांची एखाद्या इंग्रज लेखकाशींच तुलना करतां येईल. बहुतेक सार्वजनिक माणसांना आणि साहित्यिकांना गप्पा मारण्याचा अतिशय षोक असतो. त्यांचा गप्पाष्टकांचा घाणा एकदां सुरू झाला म्हणजे तासन् तास त्याला कधीं खळ पडावयाची नाहीं. काळाचा असा विनाकारण अपव्यय करण्याचा केळकरांना

मुळींच नाद नव्हता. केवढाहि मोठा माणूस त्यांच्याकडे आलेला असला तरी काम संपतांच एका क्षणाच्या आंत ते त्याला पिटाळून लावीत. कामावांचून ते कोणाहि माणसाला आपल्या भोंवतीं घोटाळूं देत नसत. जेवढा वेळ म्हणून त्यांना मिळेल तेवढा ते वाचनांत, चिंतनांत आणि लेखनांत घालवीत असत. वक्तृत्वावर त्यांचें एवढें प्रभुत्व असूनहि कोणत्याहि बारीकसारीक व्याख्यानांचीं टिपणें काढून तयारी केल्याखेरीज ते कधींहि व्याख्यानाला जात नसत. प्रत्येक व्याख्यानांत कांहीं तरी नवीन कोट्या, सुभाषितें आणि अवतरणें किंवा नव्या-जुन्या पुस्तकांतील ठळक उतारे वाचून दाखविल्यावांचून ते कधींहि राहात नसत. आपल्या श्रोत्यांच्या ज्ञानांत भर पडावी आणि त्यांची बहुश्रुतता वाढावी याबद्दल ते दक्ष असत. आपलें व्याख्यान एक वेळ मनोरंजक झालें नाहीं तरी चालेल, पण उथळ होतां कामा नये, याबद्दल ते अतिशय काळजी घेत. आपल्या एकसष्टीच्या उत्सवाच्या वेळीं निरनिराळ्या समारंभांच्या वेळीं उत्तरादाखल त्यांनीं जीं भाषणें केलीं त्यांतहि एकदां झालेल्या भाषणाची पुनरावृत्ति दुसऱ्या भाषणात न करण्याचा यशस्वी प्रयत्न करून त्यांनीं आपल्या श्रोत्यांना थक्क करून सोडलें.

गुणग्राहकता आणि निर्मत्सरीपणा हे केळकरांच्या स्वभावांतले दोन अत्यंत उज्ज्वल गुण होते. केळकर म्हणजे होतकरू लेखकांना आणि गुणी लोकांना उत्तेजनाचें एक भलें मोठें भांडारच होतें. आज उदयास आलेले शेकडों लेखक केळकरांच्या या गुणांचा निर्वाळा देतील. कोणीहि नवीन लेखक त्यांच्याकडे आला म्हणजे त्याचें लिखाण ते काळजीपूर्वक वाचीत, आणि त्यांतील गुणदोषांचें सहृदयपणें विवेचन करीत. एकोणीस सालीं गडकऱ्यांच्या निधनावर एक शोकपर काव्य लिहून तें दाखविण्यासाठीं मी केळकरांकडे प्रथम गेलों. त्या वेळीं त्यांनीं माझ्या त्या काव्याचें जें कोडकौतुक केलें तें मी कधींहि विसरलों नाहीं. कोणाहि नवीन नाटककाराचें कसलेंहि नाटक असलें, तरी ते आरंभापासून अखेरपर्यंत त्या नाटकाच्या प्रयोगाला बसत आणि त्यांतलें प्रत्येक अक्षरन् अक्षर लक्षपूर्वक ऐकत. उगीचच पंधरा मिनिटें बसल्या न बसल्यासारखें करून नाटककारावर आपण जणू कांहीं उपकार करतों आहोंत असें दाखविण्याचा संभावितपणा इतर साहित्यिकां-सारखा त्यांच्या अंगीं नव्हता. शाळेतल्या विद्यार्थ्यांसाठीं मीं लिहिलेल्या ‘ गुरु-दक्षिणा ’ या स्त्री-पात्रविरहित नाटकाचा प्रयोग सत्तावीस सालीं किर्लोस्कर नाटक-गृहांत त्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. मीं त्या वेळीं इंग्लंडमध्यें होतों. त्या नाटकाबद्दल गुणवर्णनपर असें जें भाषण त्यांनीं त्या वेळीं केलें तें मीं त्या नाटकाच्या प्रस्तावने-दाखल छापून ठेवलेलें आहे. चौदा वर्षांपूर्वीं मीं लिहिलेल्या ‘ साष्टांग नमस्कार ’ या माझ्या पहिल्या नाटकाचा आरंभींचा प्रयोगहि त्यांच्याच अध्यक्षतेखालीं झाला.

त्या प्रसंगीं ते विनोदानें म्हणाले कीं, “ या नाटकांतल्या विनोदामुळें प्रेक्षकांची एक सोय मात्र चांगली झालेली आहे, ती ही कीं प्रेक्षकांनीं नाटकामधून केव्हांहि उठून जावें आणि केव्हांहि बाहेरून आंत यावें. त्याचें अनुसंधान कांहीं चुकावयाचें नाहीं ! ” केळकर असें म्हणाले खरें, पण स्वतः मात्र रात्रीं दहा वाजल्यापासून तों पहाटे चार वाजेपर्यंत आपल्या खुर्चीवरून एकदांहि न उठतां ते एकसारखे हसत खिंकाळत बसले होते. मीं लिहिलेलें प्रत्येक नाटक आणि चित्रपट बघून त्यांनीं दर वेळेला मला प्रेमानें उत्तेजनच दिलें आहे. माझें ‘ उद्यांचा संसार ’ हें नाटक पाहतांना त्यांच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहात होत्या. नाटक संपल्यावर सद्गदित अंतःकरणानें ते म्हणाले, “ अत्रे, आयुष्याचा अर्क तुम्हीं उकळून काढला आहे. असंच कांहीं तरी लिहीत जा.” मी म्हणालों, “ असं पुन्हा पुन्हा कसं लिहितां येईल तात्यासाहेब ? ” तेव्हां केळकर म्हणाले, “ तुमच्या प्रतिभेला जोंपर्यंत बहर येतो आहे तोंपर्यंत तिजवरचीं निघतील तेवढीं फळें काढून घ्या. थांबू नका ! ” पुढें राजकीय मतभेद निर्माण झाल्यानंतर कधीं कधीं तात्यासाहेबांवर मला कडक टीका करण्याची पाळी आली. पण त्यामुळें त्यांचा मजवरील लोभ मात्र यत्किंचित्‌हि कमी झाला नाहीं. त्यांच्या आजूबाजूला वावरणारीं कांहीं मतलबी माणसें माझ्याविषयीं त्यांचें मन कलुषित करण्याचा वेळोवेळीं प्रयत्न करीत. आणि त्यामुळें कधीं कधीं तात्यासाहेब अतिशय अस्वस्थहि होत असत. एकदां तर त्यांनीं मला पत्र लिहून मीं केलेल्या टीकेचा खुलासा विचारला. पण माझें उत्तर जातांच त्यांचें मन मजविषयीं पूर्वींप्रमाणेंच निर्मळ झालें.

तात्यासाहेबांच्या स्वभावांतल्या या उपजत चांगुलपणाची आठवण झाली कीं आतां डोळ्यांत अश्रू उभे राहतात. गांधीजींचा आणि केळकरांचा विरोध एवढा विकोपाला गेला असतांना सुद्धां कस्तुरबांच्या अंत्यसंस्काराच्या वेळीं ते आगाखान वाड्यांत जावयाला चुकले नाहींत. तेथें गेल्यानंतर गांधीजींची आणि त्यांची दृष्टादृष्ट होतांच एकदम त्यांच्या डोळ्यांतून आंसवांच्या धारा वाहूं लागल्या. गांधीजींचेहि डोळे भरून आले. आणि सद्गदित स्वरानें ते म्हणाले, “ काय विपरीत प्रसंगीं आपली गांठ पडते आहे ! ” एरव्हींच्या आयुष्यांत केळकर भावनाविवश झालेले क्वचितच दिसून येत असत. त्यांच्या आयुष्यांत भावनेला फार कमी स्थान होतें अशी साधारपणें लोकांची समजूत होती. पण त्यांच्या विद्वत्तेच्या आणि वक्तृत्वाच्या गंभीर इमारतीच्या तळाशीं भावनेच्या खजिन्याची केवढी मोठी विहीर दडलेली होती हें प्रसंग आला म्हणजेच जवळच्या माणसांना कळून येई.

केळकरांच्या अनेक बारीकसारीक आठवणी मीं माझ्या मनाच्या कपाटांत आजपर्यंत जपून ठेवलेल्या आहेत. त्या सर्वच कांहीं येथें सांगतां येणार नाहींत. पण त्यांपैकीं दोनच मौजेच्या आठवणी या ठिकाणीं सांगतों. माधवराव

पटवर्धनांच्या अंत्यविधीच्या वेळीं त्यांच्या शिष्यत्वाचीं बिरुदें मिरवणारा एक तरुण कवि स्मशानभूमीवर खूप ओक्साबोक्शीं रडत होता. माधवरावांच्या मरणानें दुःखित झालेल्या लोकांना आपलें दुःख क्षणभर विसरून या कवीच्या अनावर शोकाचें सांत्वन कसें करावें हाच एक प्रश्न पडला. इतक्यांत तात्यासाहेब त्या ठिकाणीं आले. त्यांना पाहतांच "तात्यासाहेब, आपले माधवराव गेले हो गेले !" असा मोठ्यानें हंबरडा फोडून सदर तरुण कवि तात्यासाहेबांना मिठी मारायला जोरानें त्यांच्याकडे धावत गेला. त्याच्या त्या हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करतांना तात्यासाहेबांची जी विलक्षण अवघड परिस्थिति झाली ती बघून त्या शोकाच्या वातावरणांतहि इतरांना आपलें हसूं आंतल्या आंत दाबतां दाबतां पुरेवाट झाली. स्वतः तात्यासाहेब तर त्यामुळें पुष्कळ वेळपर्यंत अस्वस्थ झाल्यासारखे दिसत होते. एकदां पुण्यामधील एका पत्रपंडिताचें लग्न होतें. त्या समारंभाला मी आणि तात्यासाहेब शेजारीं शेजारींच बसलों होतों. वधूवरांना आलेलीं अभिनंदनाचीं पत्रें वराचे एक 'विद्वान्' मित्र जेव्हां वाचून दाखवूं लागले तेव्हां त्यांपैकीं एका पत्रांतील "I congratulate you on this auspicious occasion." हें वाक्य वाचतांना auspicious' ह्या शब्दाऐवजीं त्यांनीं 'suspicious' असा शब्द वाचला. त्याबरोबर तात्यासाहेबांना हास्याची इतकी मोठी उबळ आली कीं ती दाबण्यासाठीं त्यांना माझ्या खांद्यावरच मान ठेवून कित्येक मिनिटें राहावें लागलें. गेल्या मंगळवारीं तात्यासाहेबांच्या शवाला हाच खांदा देतांना त्यांनीं जिवंतपणीं त्या खांद्यावर एकदां मान ठेवलेली होती या आठवणीनें माझ्या पोटांत अगदीं कालवल्यासारखें होऊन गेलें. केळकरांच्या चांगुलपणाच्या आणि मोठेपणाच्या आतां जेवढ्या आठवणी कराव्यात तेवढ्या थोड्याच आहेत. त्यांच्या जीविताचा आणि कार्याचा जों जों अधिक विचार करावा तों तों त्यांच्या आयुष्यांत त्यांना जेवढी कीर्ति मिळाली त्याच्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक कीर्ति मरणानंतर आतां त्यांना मिळाल्यावांचून राहणार नाहीं असा विश्वास वाटूं लागतो. लोकमान्य टिळक आणि 'केसरी' यांजवरील त्यांचें अनन्यसाधारण प्रेम हेंच त्यांच्या मोठेपणाचें खरें रहस्य होतें. 'केसरी'च्या प्रकाशनानें प्रसिद्ध झालेल्या मंगळवारींच त्यांना मरण यावें हें त्यांच्या केसरीवरील अपूर्व निष्ठेचेंच एक चिन्ह नव्हे काय? जें पुणें शहर गेलीं पंधरा वर्षे केळकरांच्याबाबत उदासीन होतें तें हजारोंच्या संख्येनें त्यांच्या कलेवरावर अश्रू आणि फुलें उधळीत त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठीं एकत्र लोटलेलें पाहून माझ्या तोंडून रे. टिळकांच्या दोन ओळी नकळत बाहेर पडल्या—

**जिंकुनि मरणाला**
**जीव कुडींतुन गेला !**

५

# मृत्यूचें चुंबन घेणारा महाकवी

सानें गुरुजींना जाऊन आज सात दिवस झाले. हे सात दिवस मी त्यांचा सारखा विचार करतों आहें. त्यांच्या जीवनाचा विचार करतों आहे. त्यांच्या मरणाचा विचार करतों आहें. त्यांच्या लेखनाचा विचार करतों आहें. त्यांच्या वेदनांचा विचार करतों आहें. त्यांच्या भाषणांचा विचार करतों आहें. त्यांच्या उपोषणाचा विचार करतों आहें. त्यांच्या बसण्याचा विचार करतों आहें. त्यांच्या उभें राहण्याचा विचार करतों आहें. संकोचाच्या भावनेनें सदैव अवघडलेली त्यांची ती आकृति माझ्या डोळ्यांसमोर उभी आहे. ओठांच्या दोन्ही कोपऱ्यांतून डोकावणारें त्यांचें तें ओशाळें हसूं अजून माझ्या दृष्टीपुढें आहे. स्नेहभावानें डबडबलेल्या त्यांच्या डोळ्यांच्या त्या ओल्या कडा अजून मला दिसताहेत. त्यांचें तें पुटपुटणें, त्यांचें कण्हणें, त्यांचें ते सुस्कारे आणि त्यांचें ते हातवारे सारें सारें मला आठवतें आहे.

पुष्कळ वर्षांपासून मी त्यांना बघत होतों आणि त्यांचें वाङ्मय आवडीनें

वाचत होतों. पण त्यांची प्रत्यक्ष ओळख होऊन अशीं आठच वर्षें झालीं. या आठ वर्षांत फारच थोड्या वेळां आम्हीं भेटलों असूं. आणि भेटल्यावरहि फारच थोडा वेळ एकत्र बसून बोललों असूं. आरंभीं आरंभीं ते डोळ्याला डोळाहि देत नसत. वर तरी पाहात, नाहीं तर खालीं तरी पाहात. आणि फारच थोडें बोलत. उगाच वायफळ काय बोलायचें? उपचाराचें बोलणें त्यांच्याजवळ अजिबात नसे. ते नुसते हसत किंवा तसेच स्तब्ध राहात. न बोलणें हेंच मुळीं त्यांचें बोलणें. कधीं कधीं मान खालीं घालून दोन्ही हातांनीं ते माझा हात दाबून धरात आणि अंग घुसळून मनमोकळेपणानें हसत. एवढें झालें म्हणजे संपलें त्यांचें सभाषण. त्यांना बोलावयाला लावणें जसें अवघड, तसें त्यांच्याशीं बोलणेंहि पण फार अवघड. त्यांच्या संकोचवृत्तीनें दुसऱ्याला संकोच वाटे. आणि त्यांच्या अबोल्यानें त्यांच्याशीं बोलणारा माणूसच एकदम ओशाळा होऊन मध्येंच गप्प बसे. पंढरपूरच्या प्राणांतिक उपोषणाच्या नवव्या दिवशीं मी त्यांना भेटलों. मीं त्यांना पाहिलें. त्यांनीं मला पाहिलें. डोळेभेट झाली. आणि दोघांच्या डोळ्यांतून एकदम अश्रू वाहूं लागले. माझी चिंता त्यांना कळली. त्यांचें प्रेम मला समजलें. हीच त्यांची भाषा आणि हेंच त्यांचें बोलणें. समक्ष भेटीपेक्षां ते पत्रांतून अधिक बोलत. त्यांच्या वाणीपेक्षां त्यांची लेखणी जास्त बोलकी होती.

पण एरव्हीं अबोल आणि गोगलगाय असणारे गुरुजी सभेच्या व्यासपीठावर चढले म्हणजे मात्र सिंहासारखी गर्जना करूं लागत. आणि त्यांच्या गर्जनेनें व्यासपीठ आणि सभा गदगदा हाले. लाजाळूच्या वेलीला सूर्यफुलें आलीं आहेत असें वाटे. जनताजनार्दनाचें दर्शन झालें म्हणजे अंगांत कसल्या तरी दिव्य शक्तीचा संचार होई आणि त्यांच्या मुखांतून साक्षात् उपनिषदांची गंगा धोधो वाहूं लागे. ह्या सर्व गोष्टींचें स्मरण मी गेले सात दिवस करतों आहे. हजारों-लाखों माणसांपेक्षां गुरुजी फार वेगळे होते, हें तर उघडच आहे. तुम्ही-आम्ही ज्या जगांत राहतों, त्यापेक्षां गुरुजींचें जग फार निराळें होतें. म्हणून गुरुजी कोण होते याचा पुष्कळांना भ्रम पडलेला आहे. राजकारणी लोक म्हणतात, गुरुजींना राजकारण कळत नव्हतें. साहित्यिक विचारतात, गुरुजींचा साहित्याशीं काय संबंध? आणि स्वतः गुरुजी म्हणत कीं, मला लेखणीच्या लालित्यापेक्षां झाडूचें लालित्य जास्त आवडतें. कोणी म्हणतात, गुरुजी रडे होते. कोणी म्हणतात, गुरुजी वेडे होते, कोणी म्हणतात, गुरुजी संत होते. तर कोणी म्हणतात, गुरुजी कम्युनिस्ट होते. इतक्या साधेपणानें राहणाऱ्या, सरळपणाने वागणाऱ्या आणि सोपें बालबोध लिहिणाऱ्या निर्मळ आणि प्रेमळ माणसाचें जीवन आज पुष्कळांना कोडें होऊन बसलें आहे. आणि त्यांच्या मरणानें तर हें कोडें जास्तच अवघड झालें आहे.

पण गुरुजी कोण होते हें समजल्यावांचून त्यांच्या जीवनाचें कोडें कोणालाहि उलगडणार नाहीं. वर वर पाहाणारास त्यांच्या जीवनांत जो विरोध दिसतो आणि जी विसंगति भासते त्याचें कारण गुरुजींच्या अंतरंगांत काय आहे हें पाहण्याचा त्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं. तसें पाहतां गुरुजींच्या जीवनांत न कळण्यासारखें असें कांहींच नव्हतें. स्वच्छ पाण्यानें भरलेल्या एखाद्या डोंगराच्या टाक्यांत त्यांचा तळ जसा स्पष्टपणें दिसतो, तसें गुरुजींच्या भाषणांत आणि लेखनांत त्यांच्या हृदयाचें प्रतिबिंब स्वच्छपणें दिसत असे. गुरुजी कोण होते ह्याबद्दल मला स्वतःला कधींहि शंका पडली नाहीं. किंवा त्यांच्यासंबंधीं माझा कधीं गैरसमजहि झाला नाहीं. चारच शब्दांत गुरुजींचें वर्णन करावयाचें झाल्यास मी असें म्हणेन कीं, गुरुजी मातृहृदयाचे कवि होते. त्यांच्या रोमारोमांत आणि कणाकणांत लोकोत्तर प्रतिभेचें काव्य भरलें होतें. तुळशीदास, मीराबाई, कबीर आणि तुकाराम ह्यांच्या रक्तांत जें काव्य होतें, तेंच गुरुजींच्या पिंडांत होतें. त्याच घराण्यांत आणि परंपरेंत गुरुजींचा जन्म झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. गुरुजी हे कांहीं नुसते शब्दांचे प्रास आणि यमक जुळविणारे टांकसाळी कवि नव्हते. गुरुजी हें हृदयाचे आणि वृत्तीचे कवि होते. केवळ काव्य लिहिणारे ते कवि नव्हते. काव्य जगणारे आणि काव्य निःश्वसणारे ते जिवंत प्रतिभेचे कवि होते. मानवतेवर मातेप्रमाणें प्रेम करणें ही त्यांच्या जीवनांतील काव्याची प्रेरणा होती. सर्व नद्यांमध्यें गंगा जशी पवित्र, तसे सर्व प्रेमांमध्यें मातेचें प्रेम हें महन्मंगल. किंबहुना मातृप्रेम हीच सर्व प्रेमाची गंगोत्री. या गंगोत्रींत साने गुरुजींनीं आपल्या प्रतिभेचे कलश भरून घेतले म्हणूनच त्यांना आपल्या जीवनांत एवढें महाकाव्य निर्माण करतां आलें. आईच्या दृष्टीनें ते जगाकडे पाहात आणि आईच्या अंतःकरणानें ते मानवतेवर प्रेम करीत. आईला ज्याप्रमाणें आपल्या निरनिराळ्या मुलांमध्यें भेद दिसत नाहीं, त्याप्रमाणें हा हिंदु, तो मुसलमान, हा ख्रिस्ती, तो हरिजन, हा मद्रासी, तो बंगाली, हा मराठी, तो पंजाबी असा गुरुजींनाहि या देशांत राहणाऱ्या लोकांमध्यें कधीं भेदाभेद दिसला नाहीं. आईला सर्व मुलें जशीं सारखीं, तशीं गुरुजींनाहि सर्व माणसें सारखीं वाटत. मुलें मोठीं झालीं, शिकून कर्तासवरतीं झालीं म्हणजे मग आई त्यांच्याकडे विशेष लक्ष न देतां ज्याप्रमाणें पाळण्यांतल्या मुलांवर, रांगणाऱ्या किंवा चालावयाला शिकणाऱ्या मुलांवर आपलें प्रेमसर्वस्व खर्च करते, त्याप्रमाणें समाजांतील सुशिक्षित, सुसंस्कृत आणि प्रौढ माणसांपेक्षां निरक्षर, उपेक्षित नि बहिष्कृत लोकांबद्दल गुरुजींना साहजिकच जास्त प्रेम आणि आस्था वाटे. आपल्या दुखणाईत मुलांची आई ज्याप्रमाणें शुश्रूषा करते, त्याप्रमाणें समाजांतील अनाथांना, अपंगांना, दरिद्र्यांना आणि भुकेलेल्यांना कडेवर उचलून घ्यावें, आपल्या अश्रूंच्या वर्षावानें त्यांचीं दुःखें

धुऊन काढावींत, त्यांना पोटभर जेवूं घालावें, त्यांना अंगभर कपडा लेववावा असें गुरुजींना मनापासून वाटे.

लहान मुलांवरील गुरुजींच्या प्रेमाचें तर वर्णनच करतां येत नाहीं. प्रौढांच्या सांन्निध्यांत लाजाळूप्रमाणें संकोच पावणारे गुरुजी, मुलांच्या सहवासांत सूर्य-विकासी कमळाप्रमाणें आपोआप उमलून हसूं लागत आणि कारंजाच्या धारां-प्रमाणें उचंबळूं लागत. त्यांना पाहून मुलांना आपली आई भेटल्याचा आनंद होई आणि हृदयाचीं कपाटें उघडून तीं आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी त्यांच्याशीं करूं लागत. महाराष्ट्रांतल्या हजारों मुलांशीं त्यांची मैत्री होती. आणि शेकडों मुलांशीं त्यांचा पत्रव्यहार होता. मुलांना स्वयंपाक करून जेवूं घालावें, दुखण्याभाण्यांत त्यांची शुश्रूषा करावी, थोरांच्या नि शूरांच्या गोष्टी सांगून त्यांना पराक्रमी करावें— याचा गुरुजींना निदिध्यास लागून राहिलेला होता. मातेच्या प्रेमाचें आकलन झाल्यावांचून गुरुजींच्या जीवनकाव्याचें रहस्य कोणालाहि उमगणार नाहीं. मातृप्रेमानें गुरुजींचें हृदय एकसारखें ओसंडत होतें. म्हणूनच त्यांच्या वाणींतून आणि लेखणींतून बाहेर पडणारें प्रत्येक अक्षर अन् अक्षर पावित्र्यानें आणि मांगल्यानें ओथंबून निघालें.

साने गुरुजींच्या अंतःकरणांत मातेचें वात्सल्य होतें म्हणूनच जनतेची त्यागपूर्वक आणि निःस्वार्थी सेवा करण्याचें त्यांना वेड लागलें. जनसेवेच्या एकमेव विचारानें त्यांचें जीवन व्यापलेलें होतें. त्याच वृत्तीतून त्यांच्या काव्याचा आणि वाङ्मयाचा उगम झाला. देशाचें पारतंत्र्य नष्ट झालें पाहिजे. समाजांतली सारी विषमता आणि दैन्य दूर झालें पाहिजे. जनतेच्या जीवनांतल्या दलदली हटल्या पाहिजेत. विषारी तणें जळून गेलीं पाहिजेत. अज्ञान आणि भ्रम नाहींसा झाला पाहिजे. सर्व बुरसटलेल्या रूढींचा विध्वंस झाला पाहिजे. नको सरंजामशाही. नको जमीनदारी. नको खोती आणि खाजगी नफेबाजी. नको पिळणूक अन् मिरासदारी. उदात्त विचारांचा आणि उदार भावनांचा समाजावर पाऊस पडला पाहिजे. जनतेच्या बुद्धीला धक्के बसले पाहिजेत. जीवनांत चहूंकडे उठाव झाला पाहिजे. आणि त्याच्यांतून नवसमाज निर्माण झाला पाहिजे. हें एकच विशाल स्वप्न गुरुजींच्या डोळ्यांसमोर तरळत होतें. तें स्वप्न साकार व्हावें एवढ्यासाठीं ते आपल्या वाणीचा आणि लेखणीचा उपयोग करीत होते. बाकीचे कवि आणि लेखक स्वतःच्या वीतभर जगांत आपल्या टीचभर कल्पनांची कृत्रिम जाळीं विणीत बसले होते; तर गुरुजींची वाणी नि लेखणी तमाम जनतेची प्रतिनिधि बनून तिच्या उद्धारासाठीं साऱ्या महाराष्ट्रभर विजेप्रमाणें कडाडत फिरत होती. बाकीचे कवि आणि लेखक आपापल्या खोलीचीं दारें बंद करून स्फूर्तीची आराधना करीत आढ्याकडे डोळे लावून बसले असतां जनतेच्या विराट् आत्म्याला

भेटण्यासाठीं गुरुजींचा आत्मा समाजाच्या प्रत्येक क्षेत्रांतील निरनिराळीं जीवनें तपाशीत भटकत होता. तो मुंबईच्या चाळींतून फिरत होता. दहा हात लांबी-रुंदीच्या खोलींत सहा-सहा कुटुंबें कशीं राहतात तें पाहात होता. साताऱ्यापासून खानदेशपर्यंत शेतकऱ्यांच्या शेताझोपड्यांत तो घुसत होता. खंडोगणती धान्य पिकविणारीं तीं धरित्रीचीं लेकरें उपाशी कां ? त्यांच्या सोन्यासारख्या मुलांबाळांना आठ-आठ दिवस आंब्याच्या कोयींवर आणि चिंचोक्यांवर राहावयाची पाळी कां ? सहानुभूतीचा प्रचंड सागर गुरुजींच्या अंतःकरणांत हेलावत होता. समाजांत जेथें जेथें त्यांना दुःख पाहावयास मिळे, दैन्य दिसे, अज्ञान सांपडे, तहान-भूक आढळे, तेथें तेथें त्यांच्या हृदयाचे बांध आपोआप फुटत आणि त्यांच्या अश्रूंचे आणि सहानुभूतीचे धबधबे धोधो वाहूं लागत. सहानुभूतीनें थबथबलेल्या हृदयानें आणि अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांनीं गुरुजी समाजांत हिंडत असत.

गुरुजींचें सर्व सामर्थ्य त्यांच्या अश्रूंत होतें. त्यांच्या सहानुभूतींत होतें. अश्रू हाच त्यांचा नारायण होता. माझ्या अश्रूंनीं मी पर्वताला बुडवीन, वज्राचा चुरा करीन, पाषाणाचें नवनीत बनवीन — असा त्यांना विश्वास वाटत होता. आणि तसें त्यांनीं करूनहि दाखविलें. शेंकडों वर्षें अस्पृश्यांना बंद असलेलीं पंढरपूरच्या विठोबाच्या मंदिराचीं दारें गुरुजींच्या अश्रूंच्या पुरांत विरघळून गेलीं. बडव्यांच्या काळजांतल्या दगडाचें लोणी झालें. गांधीहत्येनंतर महाराष्ट्राच्या अंतःकरणांत निर्माण झालेली हिंस्र कलुषता गुरुजींनीं आपल्या अश्रूंनीं धुऊन काढली. विद्यार्थ्यांच्या जनसेवेवर येऊं पाहणारें संकट गुरुजींच्या डोळ्यांतल्या नुसत्या अश्रूंच्या दर्शनानें मागल्या मागें पळून गेलें. अश्रूंचें एवढें सामर्थ्य असतांना जग त्यांचा तिरस्कार करतें आणि दुबळेपणा नि रडकेपणा अशा विशेषणांनीं त्यांचा उपहास करतें ह्याचें गुरुजींना फार वाईट वाटे. बैराण वाळवंटांत बागबगीचे आणि मळे पिकविण्याचें सामर्थ्य अश्रूंमध्यें आहे. जगांतील सर्व अपूर्णता नष्ट करून त्याला पूर्णतेच्या परमोच्च पदावर पोहोंचविण्याची शक्ति अश्रूंमध्यें आहे. अश्रूचा बिंदु हाच जविनग्रंथाचा पूर्णविराम आहे. हें अश्रूंचें ओजस्वी उपनिषद् गुरुजींनीं भारताला देऊन ठेवलेलें आहे. गुरुजी हे अश्रूंचे महाकवि होते. त्यांच्या सर्व वाङ्मयांत सहानुभूतीच्या शुद्ध, पवित्र आणि निर्मळ रसाखेरीज दुसरा कोणताहि रस आढळणार नाहीं.

ही सृष्टि म्हणजे परमेश्वरानें लिहिलेलें एक महाकाव्य आहे. प्रत्येक प्राणी आणि त्याचें जीवन हें त्या महाकाव्याचें एक मधुर कडवें आहे असें गुरुजींना वाटे. मनुष्याच्या जगांतील विषमता, अधमता आणि कुरूपता नष्ट होऊन माणसें फुलां-पांखरांप्रमाणें सुखी, सुंदर आणि स्वतंत्र व्हावींत अशी तळमळ त्यांना लागली होती. गुरुजी हे सौंदर्याचे महान् उपासक होते. निसर्गांतील सौंदर्याचें

संशोधन करण्याचें त्यांना लहानपणापासून जबरदस्त वेड होतें. फुलांच्या आणि प्राण्यांच्या सृष्टींत सदैव तादात्म्य पावलेला असा वेडा कवि आम्हीं आमच्या आयुष्यांत तरी दुसरा पाहिलेला नाहीं. गोविंदाग्रजांच्या काव्यांतील 'अंजन कांचन करवंदी'चा उल्लेख ऐकला कीं त्यांच्या अंगावर रोमांच उठत. वासुदेव-शास्त्री खऱ्यांचें 'आंबे नारळी पोफळी' हें काव्य त्यांनीं वाचलें कीं त्यांचें हृदय सद्गदित होत असे. कोणत्या ऋतूंत कोणतीं फुलें फुलतात, कोणते पक्षी गातात, कोणतीं पिकें होतात हें आजकालच्या किती कवींना ठाऊक आहे? गुरुजींना त्याची खडा न् खडा माहिती होती. वसंत ऋतूंत कुड्याच्या झाडांना कशीं फुलें येतात, लाल लाल पळस कसे फुलतात, पानें नसलेलीं पांढऱ्या चांफ्याचीं झाडें कशीं बहरतात, बकुळीच्या बारीकशा फुलांत मध कसा आढळतो आणि फूल उचललें कीं त्यांतून दोन-चार मुंग्या तरी कशा बाहेर निघतात, 'पेरते व्हा, पेरते व्हा' असें पक्षी कसे ओरडतात, रस्त्याच्या थंडगार धुळींत साप कसे येऊन पडतात हें सर्व सर्व गुरुजींना माहीत होतें. खानदेशांतील आंबराया मोहरल्या आणि त्यांच्यावर पिवळा, शेंदरी आणि निळा मोहर दिसूं लागला म्हणजे गुरुजी आनंदानें नाचूं लागत. मोहरलेले आंबे म्हणजे वनदेवतेच्या दिवाणखान्यांतील जणुं कांहीं पुष्पपात्रें असें त्यांना भासे. पावसाळ्यांत गुलबक्षींना कसा बहर येतो, कचेळ्याचीं आणि नागद्रोणीचीं फुलें कशीं फुलतात, आघाडा कसा उगवतो, शरद् ऋतूंत तळीं आणि सरोवरें कमळांनीं कशीं भरून जातात हा प्रत्येक ऋतूंतील सौंदर्याचा बारीकसारीक तपशील गुरुजींनीं आपल्या डोक्यांत भरून ठेवला होता.

अंगणांतील तेलाची वाटी कावळा चोचींत धरून कसा पळवून नेतो, विहिरींतलें कासव हळूच खालून येऊन बेडकाला कसें खाऊन टाकतें, देवळा-शेजारच्या वडाच्या झाडावर चोचींत मेलेला साप धरून गरुड कसा बसतो, कबऱ्या आणि खरबुज्या रंगाच्या चिमण्या अंगणांतल्या केळीजवळ कशा खेळतात, त्यांच्यांतल्या नराचे पंख लालसर असून त्याच्या गळ्याभोंवतीं काळी रेषा कशी असते, आणि लठ्ठ पोटाच्या गंभीर माद्यांचा रंग कसा पिवळसर होतो हें निसर्गांतील सारें सूक्ष्म अवलोकन गुरुजींनीं करून ठेवलें होते. त्यामुळें निसर्गावर त्यांचें इतकें प्रेम जडलें होतें कीं, कावळ्याला दगड मारावयाचें सुद्धां त्यांना धैर्य होत नसे. चुकून लहानसा किडा त्यांच्या हातून चुरडला कीं त्यांना चुकचुक लागून राही. लहानसें फूल, गवताचें पान किंवा किडा जन्माला येण्यापूर्वी किती वर्षें त्यांची उत्क्रांति होत असली पाहिजे ह्याची त्यांना जाणीव होई. आणि इतक्या वर्षांचें निसर्गरचनेचें हें थोर कार्य आपल्या किंवा कोणाच्याहि हातून नाश न पावावें ह्याबद्दल ते सावधगिरी बाळगीत. गुरुजींना अहिंसेचा धडा गांधीजींनीं नाहीं शिकवला निसर्गप्रेमानें शिकवला.

फुलपांखरांच्या पाठीमागें धावावें, त्यांच्या अंगावरची नक्षी बघावी, कोकिळेच्या आवाजाचा वेध घेऊन तिला शोधीत फिरावें, निळ्याभोर आभाळाचें रूप डोळ्यांत सांठवावें, रात्रीच्या वेळीं झाडा–कुरणांतून चाललेली काजव्याच्या प्रकाशाची कवाईत पाहावी, याचा गुरुजींना हव्यास लागून राहिलेला होता. आकाशांतील अनंत नक्षत्रें पाहून ‘ देवाच्या घरचा हा प्राजक्त तर कोणी हलविला नसेल ना ’ असा त्यांना भ्रम पडे. पहाटे समुद्रकिनाऱ्यावर भरती येऊन गेली आणि ओलसर वाळवंटावर चंद्राचा प्रकाश पडला म्हणजे चोहोंकडे चांदी सांडली आहे असें त्यांना वाटे. ही चांदी भरून घ्यावी अशी त्यांना इच्छा होई. एखाद्या डोंगराच्या पठारावर अनंत क्षितिजाकडे ते टक लावून तासन् तास बसत. त्या वेळीं सृष्टिमाता आपल्याला विशाल पाळण्यांत घालून जोजवीत आहे असा त्यांना भास होई. सूर्योदयाचें आणि सूर्यास्ताचें दृश्य बघून परमेश्वरानें आभाळांत सोन्याच्या बँका उघडल्या आहेत असें त्यांना वाटे. वाऱ्याच्या सोसाट्यांत उभें राहावें, भूमातेच्या मांडीवर बसावें, लोळावें, तिच्या धुळीचा अबीरगुलाल सर्वांगाला लावावा, मुसळधार पावसांत स्वतःला ओलेंचिंब भिजवून घ्यावें, समुद्राच्या लाटांचे तडाखे अंगावर घ्यावेत आणि त्यांच्या तुषारांचें आणि फेसाचें अंतर्बाह्य मंगल स्नान आपल्याला घडावें हा गुरुजींना रात्रंदिवस निदिध्यास लागून राहिला होता. अरबस्तानांतील रात्रीच्या वेळेच्या अनंत निःस्तब्ध आकाशानेंच पैगंबराच्या तोंडून कुराण वदविलें. भारतांतल्या नद्यांनीं, पर्जन्यधारांनीं नि अरण्यांनींच वेदांना आणि उपनिषदांना जन्म दिला. निसर्गाच्या हृदयांत शिरून त्याच्या अंतरंगांतले सौंदर्याचे सारे झरे गुरुजी आयुष्यभर घटाघटा प्याले, म्हणूनच त्यांना आपल्या जीवनांत अमर काव्य निर्माण करतां आले !

गुरुजींची काव्यस्फूर्ति ही त्यांच्या स्वतःपुरती मर्यादित नव्हती. ती सामुदायिक झालेली होती. देशांत ज्या ज्या प्रचंड घटना घडत होत्या आणि समाजांत ज्या ज्या क्रांतीच्या लाटा उठत होत्या त्यांचे आघात गुरुजींच्या हृदयावर होत होते. त्यांचीं स्पंदनें गुरुजींच्या आत्म्यामधून थरथरत होतीं. महाराष्ट्रांतील लेखक जनतास्वातंत्र्याच्या आंदोलनाशीं समरस होऊं शकले नाहींत ह्याचा गुरुजींना फार विषाद वाटे. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं झालेल्या स्वातंत्र्याच्या महान् युद्धांत आणि बेचाळीस सालच्या अखेरच्या क्रांतिकारक आंदोलनांत रामायण आणि महाभारत निर्माण होण्याइतके समरप्रसंग भरलेले आहेत असें त्यांना वाटे. या क्रांतियुद्धांत जे जे अभिमन्यु आणि विश्वासराव बळी पडले, त्यांचीं रोमहर्षक चरित्रें आबालवृद्धांना सांगत गुरुजींनीं साऱ्या महाराष्ट्रामध्यें संचार केला. नंदुरबारचा कोवळा शिरीषकुमार, माथेरानचा कोवळा बिब्यावाघ कोतवाल, नऊ गोळ्या खाणारा वडूजचा परशुराम पहिलवान, फासावर चढलेला कराचीचा हेमू

आणि नागपूरचा विष्णु ह्या हुतात्म्यांच्या बलिदानाचे पोवाडे गुरुजी जेव्हां आपल्या काव्यमय वाणींतून गाऊं लागत तेव्हां वीस-वीस पंचवीस-पंचवीस हजार लोकांच्या डोळ्यांतून अश्रूंचे पाझर वाहूं लागत. मृतांना उठवणारे, पाषाणांना विरघळवणारे, पर्वतांना वाचा फोडणारे आणि आकाशाला गहिंवरवणारे जेवढे प्रसंग या देशांत घडले तेवढ्यातेवढ्यांची नोंद गुरुजींनीं आपल्या वाङ्मयांत करून ठेवलेली आहे.

तुकारामानंतर जनतेचा एवढा महाकवि या महाराष्ट्रांत होऊन गेला नाहीं. गुरुजींचा उद्गार हा जनतेचा उद्गार होता. म्हणूनच गुरुजींचें काव्य हें कोटि कोटि जीवांचें वृंदगान झालें. गुरुजी म्हणत, "मोठमोठ्या साहित्यिकांप्रमाणें माझ्या वाङ्मयांत हिरे-मोतीं आढळणार नाहींत. पुष्कळांना तें पै किमतीचें वाटेल. पण भूक लागली असतां हिरे उपयोगी पडत नाहींत. त्या वेळीं पै किंमतीचे डाळेंमुरमुरेच पृथ्वीमोलाचे वाटतात." गरीब आणि श्रमजीवी जनतेचीं सर्व दुःखें आणि दुखणीं दूर व्हावींत ही गुरुजींच्या जीवनांतली एकच तळमळ होती. ती तळमळ गुरुजींनीं आपल्या वाङ्मयांत ओतली आहे. म्हणून त्यांनीं लिहिलेल्या प्रत्येक अक्षराअक्षरांत आणि ओळीओळींत त्यांचें हृदय प्रकट झालें आहे. 'माझ्या वाङ्मयाला हात लावाल, तर माझ्या हृदयाला लावाल' असें ते म्हणत. असे फार थोडे आणि भाग्यशाली कवि नि लेखक जगांत असतात कीं, ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें दर्शन त्यांच्या काव्यांत आणि वाङ्मयांत होतें. साने गुरुजींचें वाङ्मय मात्र असें आहे कीं, वाक्यावाक्यांत आणि कडव्याकडव्यांत तुम्हांला गुरुजींच्या निर्मळ आणि पवित्र मूर्तीचें दर्शन होईल. समाजपुरुषाशीं साने गुरुजी इतके समरस झाले होते कीं, सागराप्रमाणें सर्व नद्या, झरे आणि ओहळ त्यांनीं आपल्या विशाल व्यक्तिमत्त्वामध्यें शोषून घेतले होते. कोकणांतल्या आणि देशांतल्या खेड्यापाड्यांमध्यें हिंडून तेथील म्हाताऱ्या बायांबापड्यांकडून त्यांनीं कहाण्या, उखाणे, ओव्या, गाणीं, गोष्टी, आख्यायिका आणि दंतकथा ह्यांची प्रचंड संपत्ति गोळा करून आणली. महाराष्ट्रामधल्या निरनिराळ्या धंदेवाल्यांशीं दोस्ती बांधून त्यांच्या धंद्यांतील सारी शब्दसंपदा त्यांनीं आपल्या खांद्यावर वाहून आणली. वेद, उपनिषदें, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वर-तुकारामांचे अभंग ह्या विस्तीर्ण सारस्वतसागरांत अवगाहन करून त्याच्या तळांत आढळलेलीं सर्व रत्नें आणि मौक्तिकें त्यांनीं वेंचून आणलीं. महात्माजींपासून त्यांनी सत्याग्रहाची दीक्षा घेतली. रवींद्रांपासून ते सौंदर्यप्रेमाचा मंत्र शिकले. विनोबांपासून भारताच्या संस्कृतीचें हृदय त्यांनीं समजावून घेतलें. सेनापति बापटांपासून त्यांनीं झाडूचें तंत्र उचललें. अशा प्रकारें कोकणामध्यें दापोडी तालुक्यांत उगम पावलेली गुरुजींच्या जीवनाची सरिता दऱ्याखोऱ्यांतल्या ओहळांचे, पानांचे आणि फुलांचे अर्घ्य घेत घेत, प्राचीन सारस्वताच्या अभ्यासानें समृद्ध होत होत आणि आधुनिक

काळांतील मोठमोठ्या पर्वतांच्या पायांचें प्रक्षालन करीत करीत सर्व महाराष्ट्रभर पसरली आणि लक्षावधि लोकांच्या वैराण नि खडकाळ आयुष्यांत तिनें शांतीचीं आणि समाधानाचीं पिकें पिकवून सर्वत्र आनंदीआनंद करून टाकला. वेदांमध्यें वाणीचें वर्णन केलें आहे कीं, "वाणी ही राष्ट्राची आहे. सर्व लोकांचें संगमन करणें हें तिचें कार्य आहे." गुरुजींच्या वाणीनें आणि वाङ्मयानें हेंच अवघड कार्य महाराष्ट्रांत केलें. समाजांतील भेदाची, द्वेषाची आणि सूडाची सर्व भावना नष्ट व्हावी आणि परस्परांत 'जीवांचें मैत्र जडावें, स्नेहभाव उत्पन्न व्हावा, निर्भयता आणि स्वाभिमान निर्माण व्हावा' या एकाच ध्येयानें प्रेरित होऊन गुरुजींनीं आपल्या वाणीची पेरणी केली.

शुद्ध, निर्हेतुक आणि आत्यंतिक प्रेम हीच गुरुजींच्या जीवनाची प्रेरणा होती. या प्रेमाखातर वाटेल तो त्याग करण्याची त्यांच्या मनाची सिद्धता होती. दीपशिखेवर स्वप्राणाची आहुति ओतणाऱ्या पतंगाच्या जातीचें त्यांचें प्रेम होतें. जीवन हा एक महान् यज्ञ आहे हें त्यांचें तत्त्वज्ञान होतें. सृष्टींतली प्रत्येक वस्तु सतत आपलें सर्वस्व दुसऱ्यांना देत असते. चंद्र-सूर्य प्रकाश देतात. निर्झर-सरिता जीवन देतात. लता-वृक्ष फुलें आणि फळें देतात. जगताच्या सुखासाठीं सर्वस्वाचें अर्पण करणें आणि वेळ पडल्यास हवन करणें यांतच जीवनाची खरी पूर्तता आहे असा गुरुजींचा विश्वास होता. त्याचमुळें जीवनाइतकें मरणाचेंहि त्यांना आकर्षण वाटत होतें. किंबहुना जीवनाएवढेंच मरणावरहि त्यांचें प्रेम होतें. जीवनांतलें सौंदर्य आणि रमणीयता केवळ मरणामुळेंच निर्माण झाली आहे असें ते म्हणतात. मरण म्हणजे माहेरीं जायचें. जगन्माउलीला भेटावयाचें. अनंतांत जाऊन यथेच्छ डुंबायचें. जिवाशिवाची भेट करून देणारी मरण ही एक पौर्णिमा आहे. मरण म्हणजे प्रियकराला भेटायला जायचें. मरण म्हणजे गंमत, खेळ. त्यासाठीं रडावयाचें काय कारण आहे? मरण ही जीवनाची परीक्षा आहे. जो मरतांना रडतो त्याचें जीवन रडकें. जो मरतांना हंसतो त्याचें जीवन कृतार्थ. महान् ध्येयासाठीं हें देहाचें मडकें हंसत हंसत फोडावयाला जो तयार होतो तोच भारतीय संस्कृतीचा उपासक. असें मरणाचें सुंदर महाकाव्य गुरुजींनीं किती तरी वर्षें आधीं लिहून ठेवलें होतें. जें काव्य त्यांनीं लिहिलें तेंच त्यांनीं खरें करून दाखविलें. 'मरणांत खरोखर जग जगतें' असलीं मरणावर नुसत्या शब्दांचीं काव्यें लिहिणारे कवि ह्या महाराष्ट्रांत आजवर पुष्कळ होऊन गेले असतील. पण 'आपुलें मरण स्वतःच्या डोळ्यांनीं' पाहणारे तुकारामासारखे आणि मरणाच्या गळ्यांत दोन्ही हात घालून त्याचें कडकडून चुंबन घेणारे साने गुरुजींसारखे महाकवी शतकाशतकामधून एकदांच जन्माला येतात. चंद्रावरच्या सशाची एक काव्यमय गोष्ट गुरुजींनीं सांगून ठेवली आहे : सशाची सत्त्वपरीक्षा करावयाला

देव आला. देव म्हणाला, 'मला खायला दे.' ससा म्हणाला, 'काय देऊं? माझें या जगांत काय आहे? हें माझें शरीर आहे, तें मी आगींत टाकतों, तें खा.' सशानें आगींत उडी टाकली. पण तो जळेना, भाजेना. तेव्हां देव सशावर प्रसन्न झाला, आणि सर्व जगाला दिसेल असें त्याचें चित्र त्यानें चंद्रावर काढून ठेवलें. समाजांतील जातीयता, प्रांतीयता आणि ध्येयशून्यता नष्ट करण्याकरितां गुरुजींनीं जन्मभर प्रयत्न केला. गुरुजी हताश झाले. जणुं कांहीं समाजपुरुष त्यांची सत्त्वपरीक्षाच पाहत होता. गुरुजींनीं सशाप्रमाणेंच एकदम मरणाच्या आगींत उडी मारली आणि स्वतःचें शरीर जाळून घेतलें. त्या चंद्रावरल्या सशाप्रमाणें गुरुजी अमर झाल्यावांचून राहणार नाहींत. देवाला प्रसन्न करण्यासाठीं एका मुलानें आपल्या आईला ठार मारलें आणि तिचें काळीज हातांत घेऊन तो पळत पळत देवाकडे जात असतां वाटेंत ठेंच लागून पडला. तेव्हां त्याच्या हातांतल्या काळजांतून मातेचें हृदय एकदम उद्गारलें, "बाळ, तुला, लागलें तर नाहीं ना?" समाजांतल्या उन्मत्त झालेल्या दैत्यशक्तींनीं साने गुरुजींचा आज बळी घेतला असला, तरी त्यांच्या अमर वाङ्मयांत जिवंत असलेलें त्यांचें मातेचें हृदय यापुढें समाजाचे सारे अपराध विसरून त्याच्या प्रत्येक अधःपतनाच्या वेळीं त्याला उचलून कडेवर घेत जाईल आणि त्यांच्या डोळ्यांतले अश्रू पुसून नि त्यांच्या जखमेवर फुंकर घालून ममतेनें विचारीत राहील कीं, "बाळ, तुला फार लागलें नाहीं ना?" साने गुरुजींचें वाङ्मय मातेच्या वात्सल्यानें अनंत काळपर्यंत महाराष्ट्रांतील तरुण पिढीचें संगोपन करीत राहील यांत मुळींच संशय नाहीं.

# ६

# न विचारतां गेलेले काका !

काकासाहेब लिमयांच्या अनेक आठवणी माझ्यापाशीं आहेत. गेल्या पंधरा वर्षांमध्यें माझ्या आयुष्यांत ज्या ज्या महत्त्वाच्या घटना घडून आल्या, त्यांच्याशीं काकासाहेबांचा कोणत्या ना कोणत्या नात्यानें तरी संबंध आलेला आहे. त्यामुळें त्या गोष्टींचें स्मरण झालें म्हणजे त्या ओघांतच काकासाहेबांची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहते. दूरच्या माणसांना काकासाहेबांचें व्यक्तिमत्त्व प्रथमदर्शनीं फारसें आकर्षक वाटत नसे. दिसावयाला ते आपले चारचौघांसारखे असत. त्यांचा पोषाखहि साधा असे. डोक्याला वाटोळी काळी टोपी, अंगांत गळेबंद लांब कोट, पुढचा सोगा वर खोचलेलें धोतर आणि पायांत वहाणा, असा त्यांचा पोषाख असे. त्यांच्या हातामध्यें नेहमीं असलेली छत्री एवढें एकच त्यांचें वैशिष्ट्य होतें. आधुनिक जीवनाचा त्यांच्यावर मुळींच परिणाम झालेला नव्हता असें म्हटलें तरी चालेल. राहणी अतिशय साधी होती. बोलण्याचालण्यांतहि ते अतिशय प्रांजळ आणि अकृत्रिम होते. चार मंडळींत बसले म्हणजे

ते त्यांच्यामध्यें सहज मिसळून जात. त्यांच्या उपस्थितीमुळें कोणालाहि संकोच वाटत नसे किंवा कसलीहि अडचण होत नसे. ज्या वातावरणांत काकासाहेबांच्या आयुष्याचीं इतकीं वर्षे गेलीं त्या वातावरणांत थोडासा नटवेपणा किंवा मिरवेपणा खपून जाण्यासारखा होता. पण काकासाहेबांना प्रथमच पाहणाऱ्या माणसांचा त्यांच्याबद्दल गैरसमज होई. त्यांच्या चेहऱ्यावरून बघणाराला असें वाटे कीं कोणाच्या अध्यांत किंवा मध्यांत न पडणारे, अबोल वृत्तीचे आणि भिडस्त स्वभावाचे असे हे गृहस्थ असावेत.

पण तशी वस्तुस्थिति मुळींच नव्हती. प्रत्येक गोष्टींत भाग घेण्याची काकासाहेबांना जबरदस्त हौस होती. वायफळ बोलण्याचा त्यांना कंटाळा असे. पण बोलण्यासारखें असलें म्हणजे ते सपाटून बोलत आणि त्या वेळीं मग ते कुणाचीहि भाडभीड ठेवीत नसत. गर्व, आढ्यता व हेकेखोरपणा हे दोष त्यांच्या स्वभावांत औषधाला देखील सांपडले नसते. तथापि त्यांची विचाराची बैठक ठाम आणि निश्चित असे. आपलें म्हणणें पटवून दुसऱ्याच्या गळ्यांत कसें बांधावें या बाबतींत त्यांचा हातखंडा असे. ते हट्टी नव्हते, पण आग्रही मात्र होते. त्यांच्या अंगांतले हे सारे गुण निकट परिचयानंतरच प्रत्ययाला येत. आणि मग त्यांच्या मैत्रीची ओढ अनावर होई. काकासाहेबांच्या सहवासाचा कंटाळा म्हणून कधीं येत नसे. प्रत्येकाला ते हवेसेच वाटत. कधींहि कुणी काकासाहेबांकडे गेलें तरी ते दमल्यासारखे किंवा कंटाळल्यासारखे केव्हांहि दिसत नसत. त्यांच्या चेहऱ्यावरचें तें मंदमधुर हास्य नेहमींच स्वागतासाठीं तयार असे. त्यामुळें त्यांच्या सहवासांत एक प्रकारचा ताजेपणा आणि प्रसन्नता वाटे.

पुण्याला मी राहात असतांना काकासाहेबांचें मला जवळजवळ व्यसनच जडलें होतें असें म्हणावयाला हरकत नाहीं. जेव्हां जेव्हां मला काम नसे किंवा सवड सांपडे तेव्हां तेव्हां गाडी घेऊन मी सरळ काकासाहेबांच्या घरीं जाई. माझ्या मोटारचा कर्णा वाजला कीं, काकासाहेब हंसतमुखानें आपल्या खोलीच्या दारांत प्रगट झालेच म्हणून समजावें. दुपारीं दोन-तीन वाजण्याची वेळ ही काकासाहेबांची अग्रलेख लिहिण्याची वेळ असे. पण पुष्कळ वेळां या गोष्टीचें मला भान राहात नसे. तेथें गेल्यावर मग ही गोष्ट लक्षांत येई. ‘ माझ्या येण्यानें तुमच्या लिहिण्यांत व्यत्यय तर आला नाहीं ना ? ’ असें मी ओशाळेपणानें विचारी. तेव्हां काकासाहेबांचें नेहमींचें उत्तर अगदीं ठरलेलें असे, ‘ तसं नाहीं कांहीं. जवळ जवळ संपतच आलंय् माझं लिहिणं. ’

काकासाहेबांच्या खोलींत एक आरामखुर्ची असे. तिची कापडी खोळ विशेषच खोलगट असे. काकासाहेबांचें लिहिणें होईपर्यंत मी या झोळीमध्यें अर्धवट डोळे मिटून आरामशीरपणें पडून राही. काकासाहेब पालथी मांडी घालून

सतरंजीवर बसलेले असत. कागदाच्या चतकोर तुकड्यावर ते काळ्या फौंटनपेननें झपाझप लिहीत असत. इतक्यांत मधून मधून छापखान्यांतला गडी मुद्रितें घेऊन येत असे. काकासाहेबांचें तें संपादकीय वैभव बघून मला मोठी मौज वाटे. अग्र-लेखाचें काम पुरें झाल्यानंतर मग त्यांच्या व्यक्तिमत्त्वांतला संपादकीय संचार एकदम नाहींसा होई आणि वर्तमानपत्राशीं जणुं कांहीं त्यांचा कांहींच संबंध नाहीं असा त्यांचा चेहरा दिसूं लागे. त्यानंतर काकासाहेब आणि मी गांवामध्यें भटकावयास निघायचे. हळदीकुंकवाच्या दिवसांत बायका ज्याप्रमाणें हरभरे आणि बत्तासे गोळा करीत या घरांतून त्या घरांत जातात तसाच आमचा कार्यक्रम असे. गांवांतल्या बहुतेक व्यक्तींना आणि वल्लींना प्रदक्षिणा घातल्या-वांचून आमचा हा फेरफटका पुरा होत नसे. आमच्या मोहिमेंत किती तरी मनोरंजक साहित्य आणि वार्ता आम्ही गोळा करीत असूं.

काकासाहेबांच्या स्वभावामध्यें ही एक मौज होती कीं, जीवनांतल्या प्रत्येक गोष्टींत त्यांना गोडी वाटे. त्यांच्या रसिकतेला अंत नव्हता. त्यामुळे कोणत्याहि वातावरणांत ते गेले तरी त्या ठिकाणीं ते चटकन् रममाण होत. वृत्तपत्राच्या व्यवसायांतील माणसांनीं सामान्यतः रुक्ष असायला पाहिजे असा त्या काळचा पुण्यांतला संप्रदाय होता. काकासाहेब हे त्याला अपवाद होते. पुण्याच्या रंग-भूमीवर जेव्हां माझीं नाटकें येऊं लागलीं तेव्हां काकासाहेबांच्या स्वभावांतलें हें मर्म मला उमगलें. मराठी रंगभूमीवर काकासाहेबांचें विलक्षण प्रेम होतें, आणि इंग्रजी नि मराठी नाट्याचा त्यांचा व्यासंगहि उत्तम होता. माझ्या प्रत्येक नाटकाचीं जीं विस्तृत परीक्षणें त्यांनीं 'ज्ञानप्रकाशां'त लिहिलीं तीं वाचून मी स्वतः तरी अतिशय थक्क झालों. नाट्यशास्त्रावरील इंग्रजी भाषेतल्या अत्यंत आधुनिक ग्रंथांशीं यांचा चांगला परिचय असावा हें मला त्यांच्या त्या लेखांवरून प्रत्यक्षच आढळून आलें. त्यांना मीं विचारलें, "काकासाहेब, नाटकांवरचीं हीं इंग्रजी पुस्तकें तुम्ही केव्हां वाचलींत?" तेव्हां काकासाहेब मिष्किलपणें हंसून म्हणाले, "तुम्हांला काय वाटलें, वर्तमानपत्री राजकारणाखेरीज दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचें मला ज्ञानच नाहीं काय?"

त्यांच्या एरव्हींच्या बोलण्यावरून त्यांच्या व्यासंगाची आणि ज्ञानाची तिऱ्हाइतांना कल्पना होत नसे. पण माझ्यापुरतें म्हणावयाचें झाल्यास माझ्या डोक्यांतला त्यांच्याबद्दलचा हा भ्रम कधींच नाहींसा झाला होता. निरनिराळ्या विषयांची आणि शास्त्रांची काकासाहेबांनीं केव्हां ना केव्हां तरी जबरदस्त तयारी करून ठेवलेली असावी याविषयीं माझी खात्री पटलेली होती. वाचनाची ही तपश्चर्या काकासाहेबांनीं आयुष्याच्या कोणत्या कालखंडांत केली असावी ही गोष्ट त्यांच्या विनयी स्वभावामुळे त्यांच्या तोंडून समजण्यासारखी नव्हती. याबद्दल

कधीं तरी मी त्यांना विचारीत असे. तेव्हां ते नुसते हंसत आणि गप्प बसत. सदानूकदा त्यांच्या बैठकीच्या खोलींत सरकारी खात्याच्या प्रतिवृत्तांचीं मोठमोठीं निळीं पुस्तकें पडलेलीं असत. तीं पुस्तकें बघून मला अतिशय चीड येई. मी त्यांना म्हणे, "काकासाहेब, या पुस्तकांमध्यें तुम्हांला काय गोडी वाटत असेल ती देव जाणे ! मला तर त्यांना हात लावूं नये असें वाटतें."

त्यावर काकासाहेब गंभीरपणें मला म्हणत, "मग तुम्ही पत्रकार कधींहि होणार नाहीं."

मी विचारी, "कां ?"

ते सांगत, "ज्याला यशस्वी पत्रकार व्हावयाचें आहे त्याला हीं सरकारी निळीं पुस्तकें कादंबरीप्रमाणें आकर्षक वाटलीं पाहिजेत."

पत्रव्यवसायांत शिरण्याच्या माझ्या महत्त्वाकांक्षेवर काकासाहेबांच्या या बोलण्यानें चांगलेंच विरजण पडे. यशस्वी वकिलाप्रमाणेंच उत्तम पत्रकार होण्यास माणसाच्या अंगांत भरपूर गुंडगिरी पाहिजे अशी एक सर्वसाधारण समजूत आहे. सज्जन माणसांना वकिलीच्या आणि वर्तमानपत्राच्या धंद्यांत कांहींच वाव नाहीं अशीच पुष्कळांची कल्पना आहे. ही समजूत अतिशय खोटी आहे हें काकासाहेबांनीं दाखवून दिलें. वकिलींत त्यांचा फारसा जम बसला नाहीं हें खरें. तथापि दुसऱ्याचीं कुलंगडीं बाहेर न काढतां किंवा प्रतिपक्षाची क्रूर बदनामी न करतां सर्वांशीं प्रेमानें आणि भलेपणानें वागूनहि किती यशस्वी संपादक होतां येतें याचा काकासाहेबांनीं महाराष्ट्रास जवळजवळ एक वस्तुपाठच शिकवला असें म्हणावयाला हरकत नाहीं. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्यें वाचकांना जिज्ञासा असते. ह्या जिज्ञासेचें समाधान केल्यावांचून कोणत्याहि संपादकाला आपलें पत्र यशस्वी करतां येत नाहीं हें रहस्य काकासाहेबांनीं ओळखलें होतें. ह्याच दृष्टीनें समाजाच्या सर्व थरांमधून ते स्वतः वावरत असत. समाजामध्यें रोज शेंकडों गोष्टी घडत असतात. पण प्रत्येक गोष्ट कांहीं 'वार्ता' नसते. नाट्य असल्यावांचून कोणत्याहि गोष्टीला वार्तेचें स्वरूप येत नाहीं हें ओळखावयाला पत्रकर्त्याला जी एक प्रतिभा असावी लागते ती काकासाहेबांजवळ होती. 'साध्याहि विषयांत आशय' आहे हें जसें उत्तम कवि जाणतो तसें साध्या साध्या प्रसंगांतलें 'वृत्त' हें प्रतिभाशाली पत्रकार हेरतो.

एकदां पुण्याच्या तुळशीबागेंत मला व्याख्यानासाठीं बोलावण्यांत आलें होतें. तें व्याख्यान ऐकण्यासाठीं माझ्या कांहीं अस्पृश्य मित्रांना तुळशीबागेंत येण्याची इच्छा झाली. पण तुळशीबागेच्या मालकांनीं ही गोष्ट नाकारल्यामुळें तें व्याख्यान रद्द करावें लागलें. या एका लहानशा घटनेमधून कांहीं प्रक्षोभक वृत्त निर्माण होईल अशी मला कल्पना नव्हती. पण काकासाहेबांनीं या प्रकरणावर

‘ ज्ञानप्रकाश ’ चें एक पान खर्ची घालून पुण्यामध्यें अशी खळबळ उडवून दिली म्हणतां कीं सांगायची सोय नाहीं. शिकारी माणूस ज्याप्रमाणें नेहमीं शिकारीच्या शोधांत असतो त्याप्रमाणें काकासाहेब हे नेहमीं वृत्ताच्या शोधांत असत. अशा अनेक वृत्तशिकारी मोहिमेंत काकासाहेब मला बाहेर घेऊन जात. प्रभातनगरच्या दरवाजाशीं शांता आपटे यांनीं अन्नसत्याग्रह केला तो रोमहर्षक प्रसंग या वेळीं मला आठवतो. रात्रीं बारा वाजायच्या सुमारास काकासाहेब माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, “ चला, आपण शांतारामबापूंकडे जाऊं. शांताबाईंच्या उपवासाबद्दलची कांहीं गमतीदार बातमी आपणांला त्या ठिकाणीं मिळेल. ”

मला याबाबत कांहीं फारशी उत्सुकता वाटत नव्हती. तथपि काकासाहेबांनीं आग्रह केला म्हणून आम्ही दोघे शांतारामबापूंच्या बंगल्यावर गेलों. शांतारामबापूहि चिंताक्रांत चेहरा करून आपल्या दिवाणखान्यांत बसले होते. जणूं कांहीं राष्ट्रावर एखादी घोर आपत्ति ओढवलेली आहे असेंच त्या ठिकाणचें वातावरण होतें ! तें पाहून मनांतल्या मनांत मला खूप हसूं आलें. शांताबाईंच्या उपासस्थलाकडून थोड्या थोड्या वेळाच्या अंतरानें बातम्या घेऊन कांहीं ‘ दूत ’ येत होते. अर्ध्या तासाचा कालखंड त्या वेळीं आम्हांला युगासारखा वाटला. इतक्यांत शांताबाईंना तपासणारे डॉक्टर नूलकर त्या ठिकाणीं आले आणि ते मिष्किलपणें हंसून म्हणाले, “ एका अटीवर शांताबाईंनीं उपास सोडायचें कबूल केलें आहे. ”

शांतारामबापू गंभीर चेहरा करून म्हणाले, “ ती कोणती ? ”

डॉक्टर म्हणाले, “ तुम्ही स्वतः शांताबाईंना उपास सोडा असें सांगून त्यांना आपल्या हातांनीं त्यांच्या मोटारींत ठेवलें पाहिजे. ”

शांतारामबापू क्षणमात्र विचारांत पडले आणि नंतर त्यांनीं त्या गोष्टीला रुकार दिला. शक्य तितके गंभीर चेहरे करून आम्ही सगळे जण शांतारामबापूंच्या मागोमाग शांताबाईंच्या उपासक्षेत्रावर गेलों. गादीवर पडलेल्या शांताबाई आपट्यांना शांतारामबापूंनीं उचललें तेव्हां शांताबाईंनीं शांतारामबापूंच्या गळ्याभोंवतीं हात घालून रडायला सुरुवात केली आणि त्यांचे बंधु बाबुराव हे ओक्साबोक्शीं हुंदके देऊं लागले. खरोखरच फत्तराचेंहि काळीज दुभंगून जाईल असा तो हृदयद्रावक प्रसंग होता. काकासाहेब हळूच माझ्या कानांत कुजबुजले, ‘ हें वृत्त प्रेक्षणीय आहे, मुद्रणीय नाहीं.’ शांताबाई आपट्यांची मोटार निघून गेल्यावर मी शांतारामबापूंना म्हणालों, “ माझ्या ‘ ब्रह्मचारी ’ बोलपटांतलें मीं कल्पनेनें लिहिलेलें दृश्य मला प्रत्यक्ष सृष्टींत पाहावयाला मिळेल असें वाटलें नव्हतें. ”

शांतारामबापू माझ्या तोंडावर हात ठेवून मला म्हणाले, “ मेहेरबानी

करून हें कुठें लिहूं नका. ”

मी म्हणालों, “ मला सांगण्याऐवजीं तुम्ही हें काकासाहेबांनाच सांगा. ”

काकासाहेब म्हणाले, “ कोणतें वृत्त छापायचें आणि कोणतें छापायचें नाहीं हें तुम्ही मला सांगण्याची जरूरी नाहीं. ” आणि त्याप्रमाणें अर्थातच काकासाहेब आपल्या वचनाला जागले ! ( मीं मात्र आज तें वचन मोडलें आहे. )

हौस हें काकासाहेबांच्या जीवनांतलें फार मोठें भांडवल होतें. काकासाहेबां-सारखीं हौशी माणसें समाजांत फार क्वचित् आढळून येतात. एकमेकांना आकर्षिणारा ‘ हौस ’ हा आम्हां दोघांमधला एकच समाईक दुवा होता. सार्वजनिक उपव्यापाची मला जेवढी हौस होती तेवढीच भरपूर प्रसिद्धि देण्याची काकासाहेबांनाहि पण हौस होती. सर्वांना साहाय्य करणें आणि सर्वांच्या उपयोगीं पडणें हा काकासाहेबांच्या संपादकीय जीवनाचा एक दुसरा उज्ज्वल पैलू होता. स्वतःची आर्थिक परिस्थिति प्रतिकूल असतांहि किती तरी गरजवंतांना काकासाहेबांनीं स्वहस्तें किंवा परहस्तें पैशाची मदत केलेली आहे. एक प्रसंग मला आठवतो.

‘ सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी ’ च्या कचेरींत ठक्करबाप्पांना भेटावयास एक अस्पृश्य विद्यार्थी आलेला होता. हा विद्यार्थी पुण्याच्या एंजिनियरिंग कॉलेजांत शिकत होता. त्याला महिना कमींत कमी साठ रुपये तरी खर्च येत होता. तथापि हरिजन सेवक संघाकडून त्याला महिना दोन रुपयांची स्कॉलर्शिप मिळत होती. हा विद्यार्थी ठक्करबाप्पांना म्हणाला कीं, “ बाप्पा, महिन्याचा माझा साठ रुपयांचा खर्च. या दोन रुपयांत मी काय करूं ? तुम्ही माझी शिष्यवृत्तीची रक्कम कृपा करून वाढवा. ”

बाप्पा म्हणाले, “ दोन रुपयांपेक्षां एक पैहि मला वाढवतां येणार नाहीं. ”

अस्पृश्य विद्यार्थी म्हणाला, “ मग मी बाकीचे पैसे कुठून आणूं ? ”

बाप्पा रागावून म्हणाले, “ तूं डाळकुरमुरे विकून पैसे मिळव. ”

विद्यार्थी म्हणाला, “ डाळकुरमुरे विकायला माझी तयारी आहे. पण मी अस्पृश्य असल्यानें माझ्या हातचे डाळकुरमुरे विकत घ्यायला कोणीहि तयार नाहीं. त्याला मी काय करूं ? ”

तथापि हें ऐकूनहि बाप्पांच्या अंतःकरणाला कांहीं पाझर फुटला नाहीं. हिरमुसलें तोंड करून तो मुलगा कचेरींतून बाहेर पडला. इतक्यांत तिकडून काकासाहेब चालले होते. त्यांनीं त्या विद्यार्थ्याची सारी हकिकत ऐकून घेतली आणि सद्गदित होऊन ते त्याला म्हणाले, “ आतां या क्षणीं तुला किती रुपयांची जरूरी आहे तें मला सांग. ”

विद्यार्थी म्हणाला, “ पुस्तकांसाठीं आतां मला शंभर रुपये पाहिजे आहेत. ”

त्यावर काकासाहेब त्या विद्यार्थ्याला घेऊन आपल्या एका श्रीमंत मित्राकडे गेले आणि त्याजकडून त्यांनीं त्या विद्यार्थ्याला शंभर रुपये देवविले. आज हा अस्पृश्य विद्यार्थी मध्यवर्ती सरकारांत एक वडा एंजिनियर आहे. काकासाहेबांची आठवण झाली कीं कृतज्ञतेनें त्याच्या डोळ्यांत एकदम पाणी येतें.

ज्यांच्याशीं काकासाहेबांचा संबंध येई त्यांना काकासाहेबांचा मोठा आधार वाटे. अनंत दुःखांनीं भरलेल्या या संसारांत तशी कोण कुणाला मदत करतो? पण माणसाला नुसता शब्दाचा धीर लागत असतो. असा धीर देणारीं माणसें जगांत कुठें असतात? अशा विरळ माणसांपैकीं काकासाहेब हे एक होते. कोणी कितीहि दुःखांत किंवा अडचणींत असला तरी हसत हसत काकासाहेबांना धीराचा एकच शब्द उच्चारला कीं त्याला दहा-वीस हत्तींचें तरी बळ येई. गेल्या दहा-बारा वर्षांत आपत्तींच्या अनेक खिंडींमधून मला स्वतःला जावें लागलें. त्यांपैकीं पुष्कळ प्रसंगीं काकासाहेबांचा प्रेमळ हात माझ्या पाठीवर होता; आणि त्यांचा धीराचा शब्द माझ्या कानांत घुमत होता. त्यामुळें त्या प्रसंगांच्या उग्र आक्रमणाला मी प्रसन्न चित्तानें तोंड देऊं शकलों. पुण्याहून मुंबईस येऊन मला आतां आठ वर्षें झालीं. या काळामध्यें काकासाहेबांचे आणि माझे ऋणानुबंध अधिकाधिकच दृढ होत गेले. माझ्याप्रमाणेंच मुंबईत राहणारे श्री. शिवराम वाशीकर हे काकासाहेबांचे अत्यंत जिव्हाळ्याचे मित्र होते. काकासाहेब मुंबईत आले म्हणजे त्यांना कोणीं 'पळवून' न्यावयाचें अशी आम्हां उभयतांत जणूं कांहीं शर्यत लागून राही. आम्हां दोघांचेंहि समाधान करतां करतां काकासाहेबांची मात्र तिरपीट उडून जाई.

काकासाहेब मुंबईला आले म्हणजे अगदीं फिरायला आल्यासारखेच ते सडे येत. त्यांच्या हातांत एक लहानशी कापडी पिशवी असे. त्यांत त्यांचे कपडे आणि शालजोडी दाबून भरलेली असे. मुंबइंत आल्याबरोबर कुठून तरी फोन करून आपण आल्याची ते मला वर्दी द्यावयाचे. त्यानंतर तास दोन तासांनीं एका हातांत पिशवी आणि दुसऱ्या हातांत छत्री घेऊन 'काय बाबूराव?' अशी हसतमुखानें ललकारी देत त्यांची श्यामल मूर्ति माझ्या कचेरीमध्यें येऊन दाखल होई. ते आल्यानंतर माझ्या हातांतील सारीं कामें स्थगित होऊन जात. इकडच्या तिकडच्या गप्पा मारून आम्ही मोटारींत बसून शहरपरिभ्रमणाला बाहेर पडत असूं. काकासाहेबांच्या संगतींत सबंध दिवस कसा निघून जाई तें कळतहि नसे. संध्याकाळीं जेवण झाल्यानंतर आमच्या बिऱ्हाडाच्या ग्यालरींत समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकेंत आमच्या गप्पाष्टकांची रात्रीची बैठक बसावयाची. टिळकांच्या, गोखल्यांच्या आणि गांधींच्या राजकारणासंबंधीं किती तरी नवीन नवीन गोष्टी काकासाहेब आपल्या घरगुती शैलीनें सांगत असत. अशा गोष्टींचा

त्यांच्याजवळ एक खजिनाच भरला होता म्हणानात ! बोलतां बोलतां मधूनमधून त्यांना एकदम झोप लागे. तेव्हां मी हसून म्हणे, “ काकासाहेब, तुम्हांला झोप आली. ” त्याबरोबर काकासाहेब खडबडून जागे होत आणि बोलणें थांबलें असेल तेथून ते आपलें संभाषण पुन्हा पुढें सुरू करीत. बारा वाजेपर्यंत हा असा कार्यक्रम चाले. नंतर मात्र त्यांना झोप अतिशय अनावर होई. आणि मग ते अंथरुणावर जाऊन पडत.

सकाळीं सहा वाजतां उठून मी त्यांना जागे करण्यासाठीं येई तोंच काकासाहेब आपली पिशवी आणि छत्री घेऊन अदृश्य झालेले असत. तेव्हां माझ्या लक्षांत येई कीं हे पुण्याला गेले असावेत म्हणून. मला न विचारतां एकाएकीं निघून जाण्याची काकासाहेबांची पद्धत जवळजवळ ठरलेली असे. मला विचारलें म्हणजे मी त्यांना जाऊं देणार नाहीं असें त्यांना भय वाटे. ते गेल्यानंतर क्षणभर मला इतकें वाईट वाटे म्हणून सांगूं ! बाहेर ग्यालरींत येऊन लांब कुठें तरी काकासाहेबांची मूर्ति दिसते किंवा काय तें निष्फळपणें न्याहाळून बघण्याचा मी प्रयत्न करी, पण बहुधा काकासाहेब दिसत नसत.

आजहि आपल्या जीवनांतून कोणाला न विचारतां काकासाहेब असेच अचानकपणें निघून गेले आहेत. त्यांची मूर्ति दूरवर न्याहाळून बघण्याचा आपण आतां कितीहि प्रयत्न केला तरी ती पुन्हा आपणांला दिसणार नाहीं. पुन्हा पुन्हा त्यांच्या आठवणी सांगायच्या आणि त्यांच्या चांगुलपणाचें स्मरण करीत बसायचें एवढेंच काय तें आतां आपल्याला करतां येण्यासारखें आहे. मला तर काकासाहेब गेले असें अजूनहि वाटत नाहीं. एका हातांत पिशवी आणि दुसऱ्या हातांत छत्री घेऊन “ काय बाबुराव, काय चाललें आहे ? ” असें हसतमुखानें म्हणत अचानकपणें माझ्या ऑफिसांत ते एखादे दिवशीं येतील असेंच मला अजूनहि वाटतें !

# ७

# भारताचा उद्धारकर्ता महात्मा !

महात्मा फुले, महात्मा कबीर आणि महात्मा बुद्ध ह्या तीन महात्म्यांचे महान् शिष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचें महापरिनिर्वाण एवढ्या आकस्मिक रीतीनें होईल अशी कोणाला कल्पना होती? पांच डिसेंबर रोजीं सायंकाळीं भगवान् सूर्यनारायण जेव्हां अस्तंगत झाला तेव्हां त्याला तरी कुठें माहीत होतें कीं उद्यां सकाळीं आपण दिल्ली शहराच्या क्षितिजावर जेव्हां उगवूं तेव्हां तेथें तो महात्मा आपली जीवनयात्रा संपवून मृत्यूच्या मांडीवर अखेरची निद्रा घेत पहुडलेला आपल्याला दिसेल! सात कोटी अस्पृश्यांनीं पांच हजार वर्षें नरकयातना भोगल्यानंतर त्यांच्या उद्धारासाठीं अखेर ज्या महात्म्याचा अवतार झाला, त्याच्या अवतरकार्याचें सार्थक कुठें होतें न होतें तोंच त्याजवर अशी एकदम झडप घालून स्वतःच्या बदनामीखेरीज मृत्यूनें तरी काय मिळविलें? जुन्या मराठी शाहीराच्या कवितेंत थोडासा बदल करून मृत्यूला असें विचारतां येईल कीं, " कमी नव्हते पृथ्वीत अवांतर प्राणी न्यायाला,' सोडुनि त्यांना

घातलास का ‘ बाबा ’वर घाला ? ” खरोखरच, भारत हा मोठा दुर्दैवी देश आहे. अगोदर येथें महापुरुष शतकाशतकांतून एकदांच जन्माला येतो. आणि तो जन्माला आला तरी ह्या देशांतले कोट्यवधी मूर्ख लोक त्याचें मोठेपण त्याच्या हयातींत मुळीं ओळखतच नाहींत. जिवंतपणीं त्याचा ते अनन्वित छळ करतात. आणि मग तो मेला म्हणजे ऊर बडवून आणि गळा काढून त्याच्यासाठीं शोक करीत बसतात. सगळ्या महापुरुषांचा इतिहास अगदीं सारखा आहे. ख्रिस्त, बुद्ध, कबीर, ज्ञानेश्वर, तुकाराम, गांधी ह्या सर्वांचा त्यांच्या देश-बांधवांनीं अमानुष छळ केलेला आहे. पण आंबेडकर हा ह्या जगांत एकच असा ‘ महात्मा ’ होऊन गेला कीं यमयातनेच्या ज्या भयंकर अग्निदिव्यांतून त्याला सारा जन्म जावें लागलें, तसें जगांतल्या दुसऱ्या कोणाही महापुरुषाला जावें लागलें नसेल ! ह्या पृथ्वीतलावर एकस्या भारताखेरीज ‘ अस्पृश्य ’ समजलीं जाणारीं अगोदर माणसेंच नाहींत. आणि कसलाहि अपराध केला नसतां अस्पृश्यतेची राक्षसी शिक्षा शतनानुशतकें भोगत बसलेल्या अशा दुर्दैवी समाजांत एकहि महापुरुष आतांपर्यंत कधीं जन्माला आलेला नाहीं. जगांतल्या इतर महा-पुरुषांचा समाजानें कितीहि छळ केला असला तरी त्यांच्या छळाचा प्रारंभ कांहीं त्याच्या जन्मापासून झाला नसेल. पण आंबेडकरांना आईच्या स्तनांतील दूध प्राशन करण्याच्या अगोदरच हालअपेष्टेच्या हालाहलाचा प्याला तोंडाला लावावा लागला. सारा समाज ज्याला शिवायलाच मुळीं तयार नाहीं असली विटंबना जगांतल्या कोणा महापुरुषाला कधीं सहन करावी लागली आहे काय ? साऱ्या समाजानें ज्याला जन्मापासून लाथाडलें, प्रेमाचा हात साऱ्या आयुष्यांत एकदां देखील ज्याच्या पाठीवरून समाजानें कधीं फिरविला नाहीं, ज्याच्या विद्वत्तेबद्दल किंवा कर्तृत्वाबद्दल कौतुकानें एक अक्षरसुद्धां कधीं समाजानें उच्चारलें नाहीं, उलट ज्याच्या डोक्यावर राष्ट्रद्रोही, इंग्रजांचा हस्तक, हिंदुधर्माचा शत्रु अशा एकाहून एक भयंकर शिव्यांची आग समाजानें एकसारखी उधळली, त्यानें त्या समाजाच्या रागालोभाची परवा तर कधीं केलीच नाहीं, उलट त्या समाजाविरुद्ध सतत पंचवीस वर्षें बंडाचा झेंडा उभारून देशाच्या राजकीय आणि सार्वजनिक जीवनांतलें परमोच्च स्थान पटकावलें, असा अलौकिक गुणांचा व सामर्थ्याचा पुरुष जगाच्या इतिहासांत कुठें होऊन गेला आहे काय ? आम्हांला तरी माहीत नाहीं. दीडशें वर्षें ह्या देशांत प्रस्थापित झालेली इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें त्यांचीं त्यांचीं नावें देशाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांमधें लिहिलीं जातील. पण धार्मिक आणि सामाजिक पारतंत्र्याच्या नरकांत पांच हजार वर्षें सडत पडलेल्या सात कोटी गुलामांना स्वतंत्र करण्यासाठीं तळहातावर शिर घेऊन जो नरवीर साऱ्या देशाशीं आयुष्यभर एकटा लढला,

त्याचें नांव देखील कदाचित् ह्या देशाच्या इतिहासांत लिहिलें जाणार नाहीं. ही ह्या महापुरुषाच्या जीवनाची सर्वांत मोठी शोककथा ठरणार आहे.

परकीयांशीं जो लढतो तो 'देशभक्त' ठरतो आणि स्वकीयांशीं जो लढतो तो 'देशद्रोही' ठरतो, असा ह्या देशामधल्या राजकीय नीतिशास्त्राचा सिद्धान्त आहे. आणि आंबेडकरांचें दुर्दैव असें कीं ह्या देशामधल्या ह्या शतकांतल्या सर्वांत मोठ्या पुरुषांशीं म्हणजे महात्मा गांधींशीं आणि देशामधली सर्वांत बलाढ्य राजकीय संस्था जी कॉंग्रेस तिच्याशीं जन्मभर झगडावें लागलें. महात्मा गांधींना किंवा कॉंग्रेसला ज्यांनीं ज्यांनीं विरोध केला ती ती मंडळी ह्या देशाच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनांतून सपशेल उठली. त्यांची नांवनिशाणी देखील मागें राहिली नाहीं. आंबेडकरांना हें माहीत का नव्हतें? पण त्यांनीं जाणूनबुजून हा धोका पत्करला. त्यांना तो धोका पत्करण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. 'ब्रिटिशांचे हस्तक आणि देशद्रोही' हे जे भयंकर आहेर टीकाकारांकडून त्यांनीं मिळविले त्याचें कारण गांधी आणि कॉंग्रेस हे देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिशांशीं ज्या वेळीं झगडत होते, त्याच वेळीं सात कोटि अस्पृश्यांच्या स्वातंत्र्यासाठीं आंबेडकरांना गांधींशीं आणि कॉंग्रेसशीं झगडावें लागलें. आंबेडकर जर ब्रिटिशांचे हस्तक आणि देशद्रोही असते तर त्यांना उघडपणें ब्रिटिश सरकारची नोकरी पत्करून परमोच्च सन्मानाचें पद मिळवतां आलें असतें! त्यांच्यासारख्या अलौकिक बुद्धीच्या आणि विद्वत्तेच्या माणसाला ब्रिटिशांच्या राज्यांत दुष्प्राप्य असें काय होतें? बरें, कॉंग्रेसमधें प्रवेश करून महात्मा गांधींची कृपा संपादन करण्याचें त्यांनीं मनांत आणलें असतें तर तीहि गोष्ट त्यांना कांहीं अवघड नव्हती. कॉंग्रेसमधें त्यांनीं पंडित नेहरूंच्या बरोबरीनें सारे सन्मान मिळविले असते. त्यांच्या विद्वत्तेचा आणि सामर्थ्याचा एकहि माणूस आज कॉंग्रेसमधें नाहीं. पण ब्रिटिशांचीं सेवावस्त्रें त्यांनीं अंगावर धारण केलीं नाहींत किंवा कॉंग्रेसच्या 'देशभक्ती'चा गणवेषहि अंगावर त्यांनीं चढविला नाहीं! सात कोटि अस्पृश्यांच्या उद्धारासाठीं त्यांनीं सर्व सुखाचा, सन्मानांचा आणि लोकप्रियतेचा त्याग करून सर्वांगावर कांटेरी वस्त्रें चढविलीं आणि आपलें जीवन रक्तबंबाळ करून घेतलें. अस्पृश्यता-निवारणाचें महात्मा गांधींचे आणि कॉंग्रेसचे मार्ग त्यांना सर्वस्वीं अमान्य होते. अस्पृश्यांकडे पाहण्याची स्पृश्य समाजाची दृष्टि बदलली आणि त्यांचें हृदयपरिवर्तन झालें तरच देशांतील अस्पृश्यता जाईल ही महात्माजींची भूमिका होती. आंबेडकरांना स्पृश्य समाजाची दया, सहानुभूति आणि भीक नको होती. अस्पृश्यता कायद्यानें गेली पाहिजे आणि अस्पृश्यांना कायद्याचें संरक्षण मिळालें पाहिजे असा आंबेडकरांचा आग्रह होता. एवढ्यासाठीं त्यांना इतर जातींप्रमाणें अस्पृश्यांना देशाच्या राज्यकारभारांत त्यांच्या संख्येप्रमाणें वांटा मिळावयाला हवा होता. आंबेडकरांच्या

पूर्वीं अस्पृश्यता–निवारणाचे अनेकांनीं प्रयत्न केले, नाहीं असें नाहीं. पण ह्या सर्व प्रयत्नांचें स्वरूप सामाजिक सुधारणेचें होतें. आंबेडकरांनीं अस्पृश्यता-निवारणाच्या चळवळीला राजकीय स्वरूप देऊन तिच्यांत आमूलाग्र क्रांति घडवून आणली. ही त्यांची कामगिरी अभूतपूर्व आहे. पांच हजार वर्षें सात कोटि अस्पृश्य जनावरां-प्रेक्षां हीन जिणें जगत होते. मेलेल्या मुडद्याचें मांस खाऊन आणि समाजाच्या घाणीचे उकिरडे उपसून त्यांचीं मनें आणि शरीरें सडून गेलीं होतीं. मेल्याहून मेलीं होतीं. ह्या सात कोटि मुडद्यांना जागे करून त्यांच्यामधें तेजाची आणि स्वाभिमानाची ज्योत ज्यांनीं पेटविली आणि आपल्या हक्काचा लढा लढण्यासाठीं जुलमी समाजाविरुद्ध हातांत बंडाचा झेंडा घेऊन त्यांना उभे केलें ते आंबेडकर सात कोटि दलितांना परमेश्वरासारखे वाटले तर त्यांत आश्चर्य काय ?

अस्पृश्यांचा उद्धार कसा करावयाचा आणि कोणी करावयाचा हाच महात्मा गांधी आणि आंबेडकर ह्यांच्यामधल्या[1] वादाचा मुख्य मुद्दा होता. आपण अस्पृश्यांचे एकमेव पालक आहोंत म्हणून त्यांचें प्रतिनिधित्व करण्याचा केवळ आपल्याला आणि काँग्रेसलाच अधिकार आहे हा महात्माजींचा दावा होता. तो आंबेडकरांना सुतराम मान्य नव्हता. भारतांतील साऱ्या अस्पृश्यवर्गाचे पुढारी आपण आहोंत आणि त्यांच्या वतीनें बोलण्याचा आपल्याखेरीज कोणालाहि अधिकार नाहीं असें आंबेडकरांचें म्हणणें होतें. अस्पृश्य समाज हा सामाजिक आणि धार्मिक दृष्ट्या ज्याप्रमाणें हिंदु समाजाचा एक अभिन्न भाग आहे त्याप्रमाणें राजकीय दृष्ट्यासुद्धां त्याचा समावेश बहुसंख्य हिंदु समाजा-मधेंच व्हावयाला पाहिजे. ह्याबाबत महात्माजींचा मोठा कटाक्ष होता. आंबेड-करांचा ह्या गोष्टीला कट्टर विरोध होता. त्यांनीं महात्माजींना त्यांच्या तोंडावर सांगितलें कीं, “ ज्या देशांत आणि धर्मांत मला कुत्र्यामांजरापेक्षां देखील हीन तऱ्हेनें वागविलें जातें, एवढेंच नव्हे पण मला पाणीसुद्धां प्यायला मिळत नाहीं त्या देशाबद्दल आणि धर्माबद्दल मला काय म्हणून प्रेम वाटावें ? मला जेथें राहायला घर नाहीं तो देश माझा कसा ? ज्या देशानें शतकानुशतकें आमच्यावर अन्याय केला आहे, आमचा राक्षसी छळ केला आहे, त्या देशाशीं आम्हांला इमान राखतां आलें नाहीं तर त्याची जबाबदारी आमच्यावर नसून त्या देशावर आहे. लोक मला देशद्रोही म्हणतात. ठीक आहे. मला त्याबद्दल मुळींच वाईट वाटत नाहीं. ह्या देशाबद्दल मला प्रेम वाटावें अशी एकहि गोष्ट माझ्या देश-बांधवांनीं केलेली नाहीं. इतकेंहि असून ह्या देशाची जर कांहीं सेवा माझ्या हातून घडली असेल, तर ती माझ्या देशभक्तीमुळे घडलेली नसून माझ्या सदसद्विवेकबुद्धीमुळें घडलेली आहे.’’ अस्पृश्यांसाठीं जेव्हां आंबेडकरांनीं स्वतंत्र मतदार-संघाची मागणी केली तेव्हां त्याला महात्माजींनीं विरोध केला. ते

म्हणाले, "अस्पृश्य धर्मान्तर करून मुसलमान किंवा ख्रिस्ती झाले तरी मला चालतील. पण अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार-संघ मिळाल्यानें हिंदु समाजांत जी दुफळी पडेल ती मी कदापि सहन करणार नाहीं. मग ह्या गोष्टीला विरोध करतांना माझे प्राण खर्ची पडले तरी मला त्याची परवा नाहीं." आंबेडकर त्यांना म्हणाले, "मुसलमान आणि शीख हे आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या अस्पृश्यांपेक्षां पुढारलेले असतांना तुम्ही त्यांचें स्वतंत्र राजकीय अस्तित्व मान्य करतां आणि अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार-संघाला मात्र विरोध करतां हें कसें ?" ह्या प्रश्नाला गांधीजींजवळ उत्तर नव्हतें. विलायतेमध्यें 'वर्तुळ परिषदे'च्या वेळीं हें उभयतांचें भांडण पराकाष्ठेचें विकोपाला गेलें. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळूं नयेत म्हणून गांधीजींनीं मुसलमानांशींसुद्धां संगनमत केलें. आंबेडकरांनी तर गांधीजींच्या भोंवतालचें महात्मेपणाचें वलयच फोडून टाकण्याचा प्रयत्न केला. आंबेडकर हे मूर्तिभंजक होते. गांधीजींच्या 'माहात्म्या'ची त्यांना काय परवा ? त्यांनीं त्यांना सरळ तोंडावर सांगितलें कीं, "माझा या देशांतल्या 'महात्म्या'वर विश्वास नाहीं. महात्मे लोक नुसती आपल्याभोंवतीं धूळ उडवतात पण समाजाची पातळी उंचावीत नाहींत असा इतिहासाचा दाखला आहे !" ब्रिटिश पंतप्रधानांकडून आंबेडकरांनीं अस्पृश्यांसाठीं स्वतंत्र मतदार-संघ मिळविले. आंबेडकरांचा जय झाला. तेव्हां त्यांना नेस्तनाबूद करण्यासाठीं अखेर महात्मा गांधींनीं प्राणांतिक उपोषणाचें 'ब्रह्मास्त्र' बाहेर काढलें. त्यामुळें 'महात्म्या'चे प्राण वांचविण्यासाठीं आंबेडकरांना अखेर 'पुणें-करारावर' सही करणें भाग पडलें. ही सही करतांना आंबेडकरांनीं काँग्रेसवर जो विश्वास ठेवला त्या विश्वासाचा घात करून पुढें काँग्रेसनें आंबेडकरांना आणि त्यांच्या पक्षाला देशाच्या राजकीय जीवनामधून उठवून लावलें !

जो हिंदु समाज आपल्याला आत्मीयतेनें, सहानुभूतीनें, प्रेमानें आणि माणुसकीनें वागवीत नाहीं त्या समाजामध्यें आपण निष्कारण राहण्यांत काय अर्थ आहे हा विचार वीस वर्षांपासून आंबेडकरांच्या डोक्यांत घोळत होता. त्यांची धर्मांतराची घोषणा त्यांतूनच निर्माण झाली. धर्मांतराचा त्यांनीं ऐहिक आणि आध्यामिक अशा दोन्ही दृष्टींनीं विचार केला. भारतांत अनेक अल्पसंख्यांक असतांना त्यांचा छळ होत नाहीं आणि अस्पृश्यांचाच तेवढा छळ कां होतो ? खेडेगांवांत दोनच मुसलमानांचीं घरें असतात. पण त्यांच्या वाटेला गांव जात नाहीं आणि अस्पृश्यांवर सारखा जुलूम होतो. ह्याचें कारण त्या दोन मुसलमानांच्या घरांमागे साऱ्या हिंदुस्थानांतील मुसलमान समाजाची शक्ति व सामर्थ्य उभें आहे ह्याची हिंदु लोकांना जाणीव असते. अस्पृश्यांच्या मदतीसाठीं कोणीही धावून येणार नाहीं हे त्यांना माहीत असते. अस्पृश्यांना पैशाचा पाठिंबा मिळत नाहीं.

अधिकाऱ्यांचें संरक्षण मिळत नाहीं. ह्या त्यांच्या असहायपणामुळें त्यांच्यावर होणाऱ्या जुलमाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असत नाहीं. हें सामर्थ्य अस्पृश्यांनीं बाहेरून कोठून तरी मिळविलें पाहिजे असें आंबेडकरांना वाटूं लागलें. आध्यात्मिक दृष्ट्या हिंदुधर्मांत अनेक दोष आहेत ह्याचीही तीव्र जाणीव त्यांना होतीच. सर्वांत मोठा दोष म्हणजे चातुर्वर्ण्य. एकानें विद्या शिकावी, दुसऱ्यानें शस्त्र धरावें, तिसऱ्याने व्यापार करावा आणि चौथ्यानें नुसती सेवा करावी. ही व्यवस्था व्यक्तीच्या आत्मोन्नतीला मुळींच पोषक नाहीं, असें आंबेडकरांचें ठाम मत होतें. हिंदुधर्मांत व्यक्तीला प्राधान्य नाहीं. विचार-स्वातंत्र्य नाहीं. त्यामुळें सर्वच हिंदु बौद्धिक गुलामगिरीत सापडलेले असले तरी त्या गुलामगिरीच्या हालाहलांचा अर्क फक्त अस्पृश्यांच्या वाट्याला आलेला आहे. जातिभेद आणि अस्पृश्यता ही हिंदुधर्माची शिकवण आहे. हिंदुधर्मांत राहून जातिभेद नष्ट करूं असें म्हणणें म्हणजे विषाचें अमृत करूं असें म्हणण्यासारखें आहे. जोंपर्यंत जातिभेद आहे तोंपर्यंत अस्पृश्यता ही राहणारच. म्हणून धर्मान्तरावांचून अस्पृश्यांना दुसरा मार्ग नाहीं असा आंबेडकरांचा युक्तिवाद होता. धर्मांतरामुळें आहे त्या परिस्थितींत कांहींच फरक पडणार नाहीं. आजही हिंदु समाजाचा आणि अस्पृश्यांचा काडीमात्र संबंध नाहीं. धर्मान्तरानंतरही तो तसाच राहणार आहे. तथापि, सगळ्यांत आंबेडकरांचा बिनतोड मुद्दा हा होता. ते म्हणाले, " आज अस्पृश्यांचें ' नामान्तर ' करावें ही गोष्ट सर्वांना पटली आहे. महार लोक स्वतःला ' चोखामेळा ' म्हणवितात. कॉंग्रेसवाले त्यांना ' हरिजन ' म्हणतात. अस्पृश्यांनीं ' नामान्तर ' केलें तर चालतें, मग त्यांनीं ' धर्मांतर ' केलें तर काय बिघडतें ? " धर्मांतराचा विचार वैफल्याच्या भावनेमधून निर्माण झाला अशी अनेक लोक आंबेडकरांच्यावर टीका करतात. पण ही टीका खरी नाहीं. आंबेडकरांचा पिंड हा धर्मनिष्ठाचा पिंड आहे. ते नेहमीं म्हणत कीं, " ज्या मनुष्याचा देवावर विश्वास नाहीं, धर्मावर विश्वास नाहीं त्या मनुष्यावर मी तरी विश्वास ठेवणार नाहीं ! " वीस वर्षांपूर्वीं धर्मांतराची घोषणा करतांना ते म्हणाले, " माझ्या धर्मांतराच्या मुळाशीं आध्यात्मिक भावनेशिवाय दुसरी कसलीही भावना नाहीं. " सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास केल्यानंतर बुद्धाचा धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे अशी त्यांची खात्री झाली, म्हणूनच त्यांनीं तो धर्म स्वीकारावयाचें ठरविलें. ते म्हणाले, " बुद्धाचा धर्म हा खरा मानवी धर्म आहे. मानवाच्या संपूर्ण विकासासाठीं तो निर्माण केलेला आहे. तो प्रत्येक आधुनिक आणि बुद्धिवादी माणसाला पटण्यासारखा आहे. बुद्धाची शिकवण अगदीं साधी आणि सोपी आहे. त्या धर्मामधें मनुष्याला पूर्ण वैचारिक स्वातंत्र्य दिलेलें आहे. मानवतेला आणि सदसद्विवेकबुद्धीला ज्या गोष्टी पटतील त्याच त्या धर्मानें मानलेल्या

आहेत. " महात्मा गांधींनीं अस्पृश्यांना 'हरिजन' बनवून ते स्पृश्यांच्या दयेचा आणि सहानुभूतीचा विषय बनवले. पण आंबेडकरांनीं लक्षावधि अस्पृश्यांना 'बुद्धजन' बनवून त्यांच्या मुक्तीचा आणि आत्मोद्धाराचा चिरंतन दीपस्तंभ त्यांच्यासमोर बांधून ठेवला.

हिंदुधर्मावर सूड घेण्यासाठीं आंबडकरांनीं आणि त्यांच्या लक्षावधि अनुयायांनीं बुद्धधर्म स्वीकारला ही गोष्ट खोटी आहे. हिंदुधर्मावर त्यांना सूडच घ्यावयाचा असता तर त्यांनीं इस्लामचा किंवा ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला असता. पण 'भारताच्या इतिहासांत देशाचा आणि धर्माचा विध्वंसक म्हणून माझें नांव रहावें अशी माझी इच्छा नाहीं!' असें ते नेहमीं म्हणत. भारताच्या अखंडत्वावर त्यांची गाढ श्रद्धा होती. घटना समितीच्या पहिल्याच बैठकींत "हिंदुस्थान हा कांहीं झालें तरी अखंडच राहिला पाहिजे. मुस्लीम लीगचें पाकिस्तानचें धोरण चूक आहे!" अशी घोषणा करून आपल्या प्रखर राष्ट्रीय बाण्यानें आपल्या सर्व विरोधकांचे डोळेच दिपवून टाकले होते, 'पाकिस्तान'-वर एक प्रचंड ग्रंथ लिहून देशाची फाळणी करतांना कोणत्या गोष्टींची सावधगिरी घेतली पाहिजे ह्याचें त्यांनीं निःसंदिग्ध मार्गदर्शन केलें होतें. पण घमेंडखोर कॉंग्रेस-नेत्यांनीं त्यांच्या त्या ग्रंथाकडे दुर्लक्ष करून अशा रीतीनें देशाची फाळणी केली कीं ज्यामुळें लक्षावधि लोकांच्या घरादाराच्या आणि प्राणांच्या होळ्या झाल्या. भारताला स्वातंत्र्य प्राप्त होतांच कॉंग्रेस पक्षाशीं आपलें पूर्वींचें सर्व मतभेद विसरून ते मध्यवर्ती सरकारात प्रविष्ट झाले. आणि स्वतंत्र भारताची घटना घडविण्याची सर्व जबाबदारी त्यांनीं पत्करली. ते हिंदुसमाजाचे द्वेष्टे असते तर 'हिंदु कोड बिल' आणून त्यांनीं हिंदुसमाजांत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याचा कधींच प्रयत्न केला नसता. पण त्यांच्या त्या महान् क्रांतिकार्याला प्रतिगामी कॉंग्रेसने सुरुंग लावल्यामुळे त्यांना मोठ्या दुःखानें आणि निराशेनें मध्यवर्ती सरकारमधून बाहेर पडावे लागले. हिंदुधर्म आणि हिंदु समाज सुधारण्याचा त्यांचा तो अखेरचा प्रयत्न होता. तो अयशस्वी झाल्यानंतरच त्यांना भगवान् बुद्धाला शरण जाण्यावांचून दुसरें गत्यंतरच उरलें नाही. दोन महिन्यांपूर्वी बुद्ध धर्माची दीक्षा घेतांना ते म्हणाले, "माझ्या ह्या धर्मांतरानें भारतीय संस्कृतीच्या आणि इतिहासाच्या परंपरेला धक्का न लागेल अशीच मी काळजी घेतलेली आहे." बौद्ध धर्म हा सर्वस्वी भारतीय धर्म आहे. सनातन धर्म तर भगवान् बुद्धाला अवतारच मानतो. प्रत्येक धार्मिक संकल्पात 'गोदावर्याः दक्षिणे तीरे बौद्धावतारे' असा हिंदु लोक बुद्धाच्या नांवाचा उच्चार करतात. म्हणून आंबेडकरांनीं आणि त्यांच्या लक्षावधि अनुयायांनीं बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यामुळे हिंदुसमाजाला दुःख किंवा वैषम्य वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. भगवान् बुद्ध

हा भारताचा नव्हे जगाचा उद्धारकर्ता आहे. पंचवीसशे वर्षांची त्यांची जयंती साऱ्या राष्ट्रानें नुकतीच साजरी केलेली आहे. स्वतंत्र भारताचे राज्ययंत्रही आज भगवान् बुद्धाच्याच नांवानें चालते. त्याचें धर्मचक्र आज आमच्या राष्ट्रध्वजावर आलेलें आहे. सम्राट् अशोकाची सिंहमुद्रा आमची राष्ट्रमुद्रा झाली आहे. बुद्धाचे पंचशील हा विश्वशांति प्रस्थापित करण्याचा एकमेव मार्ग आम्ही आतां स्वीकारलेला आहे. आज जगापुढेंही दोनच मार्ग आहेत. एक बुद्धाचा आणि दुसरा युद्धाचा. राजकारणांत भारतवर्ष जर आज बुद्धाचा अनुयायी झालेला आहे, तर धर्मकारणात त्याचें अनुयायित्व आंबेडकर आणि त्यांचे कोट्यवधि बांधव ह्यांनीं पत्करलें तर त्याबद्दल दुःख मानण्याचें काय कारण आहे ? जिवंतपणीं आंबेडकर जेवढे मोठे होते त्याच्या शतपटीनें आज मृत्यूनंतर ते मोठे झाले आहेत. भारतांत आजपर्यंत पुष्कळ महापुरुष मरण पावले असतील. पण ज्यांच्या मृत्यूनें कोट्यवधि अंतःकरणें रक्तबंबाळ झाली आणि कोट्यवधि नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहिल्या असें महान् मरण आंबेडकरावांचून कोणाच्याही वाट्याला आलेलें नाहीं. आंबेडकरांच्या मोठेपणाबद्दल आणि योग्यतेबद्दल कित्येक लोकांना आतांपर्यंत संशय वाटत होता. पण त्यांच्या महानिर्वाणाचें विराट् दृश्य पाहिल्यानंतर त्यांचे जन्मजन्मांतरींचें शत्रूदेखील त्यांचे भक्त होतील. आंबेडकर हे केवळ सात कोटि अस्पृश्यांचे कल्याणकर्ते नव्हते. तर पंचवीस कोटि स्पृश्यांचे ते उद्धारकर्ते होते. विभूतिपूजा आणि ढोंग ह्यानें साऱ्या हिंदुसमाजाचा अधःपात झालेला होता. म्हणून त्या विभूतिपूजेवर आणि ढोंगावर घणाचे घाव घालून त्या खोट्या मूर्ति आंबेडकरांनीं फोडून टाकल्या. आणि ' बुद्धीची नि मानवतेची पूजा करा ' अशी देशाला शिकवणूक दिली. " मी मूर्तिपूजक नाहीं. मी मूर्तिभंजक आहे. गांधी मला आवडत नसत. कारण भारतावर माझें अधिक प्रेम होतें ! " ह्या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण वाणीत त्यांच्या अमर जीवनाचें रहस्य साठविलेलें आहे. भारताच्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जीवनांत क्रांति घडवून आणण्यासाठीं सारा जन्म ज्यांनीं जुलूम, असत्य आणि ढोंग ह्यांच्याशी निकारानें झुंज दिली असा लोकोत्तर धैर्याचा, वज्रकठोर छातीचा आणि कुसुमकोमल हृदयाचा महात्मा म्हणून डॉ. भीमराव रामजी आंबेडकर ह्यांचें नांव भारताच्या इतिहासांत निरंतर प्रकाशत राहील !

# ८

# तुकोबांचा ' अवतार ' !

महाराष्ट्र हा संतांचा देश आहे. येथें दुसरें कांहीं पिकत नाहीं. पण संतांची वाणी मात्र अमाप पिकते. ही संतांची परंपरा गेलीं सात शतकें महाराष्ट्रांत अखंडित चालू आहे. लोकसेवेचें महान् मंदिर संतांनीं ह्या महाराष्ट्रांत उभारलें. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनीं घातला. नामदेवांनीं त्यांच्या भिंती बांधल्या. एकनाथांनीं त्यावर घुमट चढविला. तुकोबा त्याचे कळस झाले. आणि गाडगे-बाबांनीं त्या कळसावर पताका चढविली. ज्ञानोबापासून तों गाडगेबाबापर्यंत सर्व संतांचें म्हणणें एक. कीं देव हा देवळांत नाहीं, दगडांत नाहीं, माणसांत आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, संतांनीं सात शतकें आकाश-पातळ एक केलें, तरी माणसांतला परमेश्वर अजून लोकांना दिसत नाहीं. त्यांना दगडांतला परमेश्वर दिसतो. गेलीं पन्नास वर्षें ज्या महा-पुरुषानें लक्षावधि लोकांना सतत ओरडून सांगितलें कीं, "बाबांनो, दगडाधोंड्याची पूजा करूं नका रे. माणसांची पूजा करा. ' तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं । ' " ते मानवधर्माचे महान्

प्रचारक संत गाडगे महाराज ह्यांनीं काल रोजीं आपली ऐंशी वर्षांची अलौकिक जीवनयात्रा अखेर समाप्त केली. असा लोकविलक्षण पुरुष ह्या भारतांत ह्यापूर्वी क्वचित्‌च जन्माला आला असेल. त्यांच्या चारित्राचा फारच थोडा भाग जगाला माहीत आहे. त्यांचें मूळ नांव डेबूजी. पण नागपूरकडे त्यांना चापरेबुवा म्हणत. कोकणांत गोधडे महाराज, सातार्‍याकडे लोटके महाराज. गोकर्णाकडे चिंधेबुवा. आणि पुण्या-मुंबईकडे गाडगे महाराज. बाळपण त्यांचें गुरें राखण्यांत आणि शेतीकाम करण्यांत गेलें. शाळेचें कधीं तोंड पाहिलें नाहीं. मग लिहितां-वाचतां कुठलें येणार ? पुढें लग्न केलें. संसाराला प्रारंभ केला. आणि वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी कोणा तरी अज्ञात साधूच्या प्रेरणेनें त्यांना वैराग्य आलें. त्यानंतर घरदार, संसार सोडून बारा वर्षे ते रानावनांत आणि अज्ञातवासांत हिंडत होते. ह्या साधकावस्थेमधें त्यांनीं सर्व देशभर प्रवास केला. एकतारीवर कीर्तनें केलीं. गोरगरिबांच्या जीवनाचा अभ्यास केला. भिकार्‍यांची, लंगड्यापांगळ्यांची, महारोग्यांची आणि जनावरांची सेवा केली. आणि ही तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर एक दिवस ते आपल्या विचित्र अवतारामधें जगापुढें प्रकट झाले. डोक्यावर झिंज्या. अंगावर चिंध्या. तोंडावर दाढी-मिश्यांचें जंगल. एका हातांत खराटा आणि एका हातात मडकें. ह्याच स्वरूपांत गाडगेबाबा गेलीं पन्नास वर्षे एकसारखें जगांत वावरत होते. प्रारंभीं लोकांना कळेना कीं हा माणूस वेडा आहे का दूधखुळा आहे. कुठें कोणाच्या घरांत राह्यचें नाहीं. भीक मागून भाकरीचा चतकोर तुकडा खायचा. खापरांतून पाणी प्यायचें. आणि ज्या गांवीं जायचें तें गांव हातांतल्या झाडूनें झाडून स्वच्छ करायचें. कांहीं दिवसांनीं लोकांना वाटलें कीं, हा कोणी अवलिया दिसतो आहे. त्याबरोबर लोक पाया पडायला गेले कीं, त्यांच्या पाठीवर खराटा मारून ते पळालेच. उभ्या आयुष्यांत त्यांनीं आपल्या पायाला कोणाला हात लावून दिला नाहीं किंवा भूतभविष्य सांगून अन् अंगारे देऊन बुवाबाजी केली नाहीं. कीर्तन हें गाडगेबाबांचें खरें सामर्थ्य. त्यांचें कीर्तन ज्यानें ऐकलें नसेल तो करंटा. आपल्या खेडवळ आणि लाडक्या वर्‍हाडी बोलीमधें तासन् तास ते हजारों श्रोत्यांना मंत्रमुग्ध ठेवीत. काव्य आणि विनोद ह्यांचा धबधबा त्यांच्या मुखामधून वाहावयाचा. गरिबांचा आणि दलितांचा उद्धार हा एकच त्यांच्या कीर्तनाचा विषय. देवळांत जाऊं नका. मूर्तींची पूजा करूं नका. देवापुढें पैसा, फळें ठेवूं नका. तीर्थयात्रेला जाऊं नका. सत्यनारायण पुजूं नका. पोथ्यापुराणांतल्या चमत्कारांवर विश्वास ठेवूं नका. कोणाचा मंत्र नि गुरूपदेश घेऊं नका. प्राण्यांची हत्या करूं नका. सावकाराचें कर्ज काढू नका. अडाणी राहूं नका. ही शिकवण सतत पन्नास वर्षे हजारों कीर्तनें करून गाडगे बाबांनीं जनतेला दिली. सुशिक्षित आणि पांढरपेशा वर्गाच्या माणसांच्या वार्‍याला

गाडगेबाबा कधींही उभे राहत नसत. अडाणी, अपंग आणि दलित ह्यांचा उद्धार हें एकच त्यांचें जीवितकार्य होतें. उभ्या आयुष्यांत बाबांनीं कधीं अध्यात्मवाद सांगितला नाहीं. त्यांच्याएवढा व्यवहारी पुरुष क्वचित होऊन गेला असेल. अंगावर चिंध्या आणि डोक्यावर खापर घालून ह्या अद्‌भुत माणसानें गेल्या पन्नास वर्षांत पन्नास लाख रुपये जमवले. आणि गरिबांसाठीं साऱ्या महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं धर्मशाळा बांधल्या. पंढरपूरला अस्पृश्यांसाठीं एक लाख रुपयांची ‘ चोखामेळा ’ धर्मशाळा बांधून ती त्यांनीं डॉ. आंबेडकरांना देऊन टाकली. ह्या सर्व धर्मशाळांची व्यवस्था बाबांनीं इतकी सुंदर आणि नमुनेदार ठेवली आहे कीं, एखाद्या इंग्रजानें तोंडांत बोट घालावें. एवढे लाखों रुपये जमवून त्यांतील एका सुतळीच्या तोड्याला त्यांनीं कधीं हात लावला नाहीं. असा निरिच्छ आणि विरक्त पुरुष जगामधें क्वचित्‌च जन्माला आला असेल ! बाबा म्हणजे खरोखर एक चमत्कार होता. त्यांच्या अंगामधें अनेक अलौकिक शक्ति होत्या, कीं ज्यांचें आकलन कोणालाही होऊं शकलें नाहीं. गेल्या अर्ध-शतकामधें महाराष्ट्रांतल्या सुशिक्षित पुढाऱ्यांनीं किंवा सार्वजनिक संस्थांनीं समाज-सेवेचें जेवढें कार्य केलें, त्याच्या अनेक पटीनें अधिक प्रभावी कार्य ह्या एका माणसानें हातांत झाडू घेऊन आणि अंगावर चिंध्या घालून केलेलें आहे. रंजल्या-गांजल्यांना ‘ आपुलें ’ म्हणणारा आणि अनाथ आपंगितांना हृदयाशीं धरणारा तो खरा साधु ही तुकोबांची व्याख्या गाडगेबाबांना अक्षरशः लागू पडते. किंबहुना ते तुकाराम महाराजांचेच अवतार होते असें म्हटलें तरी चालेल. माणसांमधल्या परमेश्वराची पूजा करणाऱ्या ह्या अलौकिक साधुपुरुषाच्या अवसानानें महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामधलें एक प्रचंड सामर्थ्य आज नाहींसें झालें आहे !

०० 

# १

# गुरुदेव रानडे

प्रा. रामचंद्र दत्तात्रय रानडे ऊर्फ गुरुदेव रानडे हे गेल्या शुक्रवारीं निंबाळ येथें निधन पावले. आम्हीं आमच्या लहानपणापासून रामभाऊंचे एक अंधभक्त होतों. आयुष्यांत आम्हीं अनेक बुद्धिमान् आणि विद्वान् माणसें पाहिलीं असतील;पण रामभाऊंसारखा बुद्धिमत्तेचा हिमालय आम्ही दुसरा पाहिला नाहीं. त्या बाबतींत त्यांची न्यायमूर्ति रानडे किंवा लोकमान्य टिळक ह्यांच्याशींच तुलना होऊं शकेल. बृहस्पति आणि वाचस्पति कसे असतील ह्याची जर कुणाला माहिती हवी असेल तर रामभाऊंचीच मूर्ति त्याला दाखवावी लागेल. त्यांचें विश्वविद्यालयीन चरित्र तर अद्भुत होतें. मॅट्रिकला आणि इंटरला ते संस्कृत विषयांत पहिले आले. बी. ए. ला गणित घेऊन फर्स्ट क्लास मिळवला. आणि एम्. ए. ला पहिल्या वर्गांत पहिले येऊन त्यांनीं 'चॅन्सलर्स मेडल्' मिळविलें. गणित, संस्कृत आणि तत्त्वज्ञान हे विषय रामभाऊंच्या घरीं अक्षरशः पाणी भरत होते. आम्हीं जेव्हां शाळेंत होतों तेव्हां सारें पुणें रामभाऊंच्या कीर्तीनें दुमदुमत होतें.

त्यांच्या विद्वत्तेमधलें एक अक्षर कळण्याची आमची योग्यता नसतांना आम्हीं त्यांचीं व्याख्यानें ऐकण्यासाठीं फर्ग्युसन कॉलेजमधें त्यांच्या वर्गाला जाऊन दोन-तीन वेळां बसलों होतों. त्यांचें व्याख्यान ऐकतांना आपल्या अंगावरून डेक्कन क्वीन जाते आहे असें वाटे. इंग्रजी भाषेचा त्यांच्या जीभेवरून साक्षात् धबधबा वाहात असे. आणि ऐकणारे त्यांच्या विद्वत्तेच्या महापुरांत अक्षरशः गटांगळ्या खात असत. रामभाऊंची प्रकृति हें त्यांच्या जीवनांतलें एकच वैगुण्य होतें; रामभाऊ म्हणजे अस्थिपंजर होते. चार दोन वर्षांपेक्षां ते अधिक काळ जगणार नाहींत असें त्यांना पाहणाऱ्यांना त्या काळीं देखील वाटत असे. त्यांच्या संवयी मोठ्या चमत्कारिक असत. ते बहुधा जेवत नसत. नुसते चहावरच राह्यचे. त्यांच्या विचित्र संवयीच्या आणि स्वभावाच्या गोष्टी हा त्या वेळीं आमच्या करमणुकीचा आणि कौतुकाचा विषय असावयाचा. ज्ञानाची अहर्निश समाधि त्यांच्या डोक्यांत लागली असल्यानें त्यांचा स्वभाव पुष्कळसा भ्रमिष्ट झालेला होता. कोणाहि विद्यार्थ्यांचें नांव त्यांना आठवायचें नाहीं. पण तो भेटला कीं, ते हंसून म्हणावयाचे, "तुम्हीं ते आपले. हेच ना? हल्लीं कुठें रहाता त्या तिथेंच ना? आणि तुमच्याबरोबर ते आपले हे असावयाचे ते कुठें दिसत नाहींत ते?" एवढें बोलतां बोलतां तत्त्वज्ञानांतला कुठला तरी एक धागा त्यांना सांपडे अन् मग त्यावर त्यांचे प्रवचन एकदां सुरू झालें कीं मग एक तासाची निश्चिती; त्यांच्या तावडींतून कधीं सुटतों असें होई. त्यांचा स्वभावाचा हा विचित्रपणा उत्तरवयांत फार वाढला होता. दर दहा मिनिटानें आपल्या अंगाला खूप घाम सुटला आहे असा त्यांना भ्रम होई. आणि मग ते ताबडतोब आपल्या अंगांतला सदरा आणि धोतर बदलीत. म्हणून त्यांच्या घरांत प्रत्येक खुंटीला एकेक सदरा आणि एकेक धोतर नेहमींच टांगलेलें असे. आपल्या प्रचंड विद्याव्यासंगांत त्यांचा हा चाळा एकसारखा चाललेला असे. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचे ते एक भूषण होते. पण त्या वेळच्या त्यांच्या कित्येक सहकारी प्राध्यापकांना त्यांच्या कीर्तीचा मत्सर वाटूं लागला. म्हणून रामभाऊंना कॉलेज सोडून पुण्यांतच नव्हे, तर महाराष्ट्रामधून बाहेर पडावें कागलें. सव्वीस सालीं 'उपनिषदामधील तत्त्वज्ञानाची विधायक समीक्षा' ह्या त्यांच्या प्रचंड इंग्रजी ग्रंथामुळें त्यांना जागतिक कीर्ति प्राप्त झाली. मोठमोठ्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञान्यांचे डोळेच त्या ग्रंथानें दिपले. असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यानंतर अलाहाबाद विद्यापीठांत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. सतरा-अठरा वर्षें ते त्याच ठिकाणीं होते. कांहीं वर्षें ते अलाहाबाद विश्वविद्यालयाचे उपकुलगुरुहि होते. त्यानंतर त्यांनीं 'महाराष्ट्रांतला अध्यात्मवाद' हा इंग्रजी ग्रंथ लिहिला. महाराष्ट्रांतल्या संत कवींच्या काव्यकृतींमधील निवडक उताऱ्यांची स्वतंत्र पुस्तकेंहि पुरवणी म्हणून

त्यांनीं प्रसिद्ध केलीं. त्यानंतर त्यांच्या विचाराची आणि तत्त्वज्ञानाची दिशाच बदलली. ते अध्यात्मवादी, गूढवादी आणि साक्षात्कारवादी बनले आणि त्याच दृष्टीनें त्यांची पुढील सर्व ग्रंथरचना झाली. अलाहाबादमधून सेवानिवृत्त झाल्या-नंतर ते दक्षिण महाराष्ट्रांत निंबाळ ह्या गांवीं स्थाईक झाले. पुष्कळ वर्षांपासून त्या ठिकाणीं त्यांचा आश्रम होताच. पण सेवानिवृत्त झाल्यानंतर निंबाळ येथील त्यांच्या वास्तव्याला, जीवनाला आणि आश्रमाला निराळेंच स्वरूप आलें. परमार्थ हेंच त्यांच्या जीविताचें ध्येय बनलें. स्वतःसाठीं व समाजासाठीं परमेश्वराचा साक्षात्कार करून घेणें हें मानवी जीवनाचें उद्दिष्ट आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा झाली. त्यांच्या आध्यात्मिक ज्ञानाचा आणि मार्गदर्शनाचा प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठीं जिज्ञासु भाविकांची निंबाळ येथें रीघ लागून राहिली. कित्येक जण त्यांचा गुरुमंत्र घेऊं लागले आणि त्यांच्या प्राध्यापकीय जीवनाचें पर्यवसान साक्षात्कारी साधुपुरुषांत झालें. त्यांचे भक्त त्यांना ' गुरुदेव ' असें संबोधूं लागले. कानडी आणि मराठी भाषेमधून त्यांचीं प्रवचनें होत. आणि प्रवचनामधील संतांचीं भजनें गोड गळ्यानें म्हणून दाखवत. आम्हीं त्यांचीं प्रवचनें कांहीं ऐकलीं नाहींत. पण ज्यांनीं ऐकलीं आहेत त्यांचा अभिप्राय आम्हांला माहीत आहे. त्यांचा भक्तगण त्यांच्यावर बेहद्द खूष असे. पण पुष्कळांना त्यांचीं प्रवचनें क्लिष्ट आणि अनाकलनीय वाटत. तत्त्वज्ञानी म्हणून त्यांचा दर्जा डॉ. राधाकृष्णन् ह्यांच्याहिपेक्षां मोठा होता. पण त्यांच्य प्राध्यापकीय जीवनाचें पर्यवसान आयुष्याच्या उत्तरार्धामधें साधुपुरुषांत होईल अशी क्वचितच कोणाला पूर्वी कल्पना असेल ! ज्ञानाच्या उपासनेंत आणि तत्त्वज्ञानाच्या चिंतनांत ज्यांनीं आपल्या जीवनांतला क्षण न् क्षण घालवला असा एक भारतामधला महर्षि त्यांच्या निधनानें नाहींसा झाला ह्याविषयीं मात्र कुणाचेंहि दुमत होणार नाहीं.

० ०

# १०

# महाराष्ट्राच्या कर्मवीरांना श्रद्धांजलि !

कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांची नि माझी पहिली ओळख १९२९ सालच्या उन्हाळ्यांत तासगांव येथें झाली. प्राथमिक शिक्षकांच्या एका परिषदेचा अध्यक्ष म्हणून मीं तेथें गेलों होतों. त्या वेळीं शिक्षकांच्या खास आमंत्रणावरून भाऊराव त्या परिषदेला आलेले होते. त्या वेळीं त्यांनीं दाढी राखलेली नव्हती. तथापि, त्यांची भरदार शरीरयष्टि, करारी आणि आग्रही मुद्रा आणि ढगाच्या गडगडाटाची आठवण करून देणारा आवाज ह्यामुळें जनतेला आकर्षण करणारें प्रभावी व्यक्तिमत्त्व भाऊरावांना निसर्गतःच प्राप्त झालें होतें. सत्यशोधक समाजाचें एक धडाडीचे कार्यकर्ते आणि ब्राह्मणेतर पक्षाचे नामांकित पुढारी म्हणून भाऊरावांची त्या काळीं विशेष प्रसिद्धि होती. बहुजनांच्या शिक्षणासंबंधीं भाऊरावांच्या मनांत कांहीं मौलिक विचार किंवा कल्पना तेव्हां घोळत असतील असें मला वाटलें नाहीं. तथापि, शिक्षणाबद्दल सर्वसाधारणपणें त्यांना आस्था आणि कळकळ वाटत होती हें त्यांचें जाहीर परिषदेमधलें भाषण ऐकून माझी खात्री झाली.

वक्तृत्व हें त्यांचें फार मोठें सामर्थ्य होतें ही गोष्ट त्याच वेळीं मला उमगली. शिक्षणशास्त्राचा अभ्यास पूर्ण करून त्या वेळीं मी नुकताच विलायतेहून परत आलों होतों, आणि आंतरजातीय विवाह केला होता. त्यामुळें मी भाऊरावांच्या कौतुकाचा विषय झालों होतों. पहिल्याच भेटींत त्यांची आणि माझी मैत्री जमली ती अगदीं शेवटपर्यंत. पुढें कांहीं वर्षांनीं त्यांनीं रयत शिक्षण संस्था काढली आणि तिचें जाळें ग्रामीण विभागांत हळूहळू वाढूं लागलें. पुण्याला फर्ग्युसन कॉलेजच्या पिछाडीला त्यांनीं एक विद्यार्थी वसतिगृह काढलें. तेथें त्यांनीं मला एक लहानशा समारंभाच्या निमित्तानें बोलावलें. त्या वसतिगृहाची अत्यंत अभिनव अशी कल्पना पाहून मी चकितच झालों. जातिभेद मोडण्याची ती एक धाडसी प्रयोगशाळाच होती. स्पृश्य मुलांच्या बरोबर अस्पृश्य मुलांनीं एकत्र रहावयाचें, त्यांच्या समवेत जेवायचें, खेळायचें नि अभ्यास करावयाचा हाच जात्युच्छेदनाचा आणि समाजांत समता प्रस्थापन करण्याचा खरा मार्ग होता, ही गोष्ट भाऊरावांनीं बरोबर ओळखली. अशा तऱ्हेचा प्रयत्न त्यांच्या पूर्वी महाराष्ट्रांत कोणीच केलेला नव्हता. मुलांनीं नुसतेंच शिक्षण घ्यावें अन् ज्ञान मिळवावें, ह्यापेक्षा तें घेतां घेतां त्यांच्या सामाजिक चारित्र्याची घडण व्हावी आणि समतेच्या पायावर निर्माण होणाऱ्या नवसमाजाचे ते आपोआपच घटक व्हावेत, अशी महान् कल्पक आणि विधायक दृष्टि भाऊरावांच्या त्या प्रयोगांत होती. भाऊराव हे नुसतेच शिक्षक किंवा संघटक नसून सामाजिक सुधारणेचे सखोल चिंतन करणारे ते एक तत्त्वज्ञ आहेत, ह्याची त्या वेळेपासून मला जाणीव झाली. वस्तुतः, भाऊराव स्वतः कांहीं फार शिकलेले नव्हते. शिक्षणशास्त्राचा त्यांनीं वाचन किंवा अभ्यास केला होता असेंहि पण नव्हतें. पण बहुजनसमाजाचा उद्धार करण्याच्या तळमळीनें त्यांना एवढें भारून टाकलेलें होतें कीं, त्यांतूनच स्वयंस्फूर्तीनें त्यांचें तत्त्वज्ञान आणि विधायक कार्य जन्माला आलें.' महात्मा फुले ह्यांच्या तात्त्विक विचाराचा भाऊरावांच्या मनावर फार मोठा परिणाम झालेला होता, ह्यांत कांहीं शंका नाहीं. किंबहुना, महात्मा फुले हे एकच त्यांचें दैवत होतें. बहुजनांचा नि दलितांचा उद्धार त्यांना शिक्षण देऊन जागृत केल्याखेरीज आणि आत्मोन्नतीचीं सूत्रें सर्वस्वीं त्यांच्या हातीं सोपविल्याखेरीज होऊं शकणार नाहीं, ह्याच महात्मा फुले ह्यांच्या मूलभूत सिद्धान्तावर भाऊरावांनीं आपल्या प्रचंड जीवीतकार्याची उभारणी केली होती. फुल्यांच्या चळवळीचें प्रारंभींचें स्वरूप केवळ धार्मिक होतें. तेंच सत्यशोधक समाजानें पुढें चालविलें. त्यांतून ब्राह्मणेतर चळवळीचा उगम होऊन धार्मिक विचार बाजूला पडला नि तिला सर्वस्वीं राजकीय स्वरूप प्राप्त झालें. पण राष्ट्रीय आंदोलनांत ही चळवळ पुढें विसर्जन पावल्यानंतर तिचें विशुद्ध शैक्षणिक स्वरूप तेवढें बाकी उरलें. आणि

तेंच भाऊरावांनीं नेमकें उचललें. ह्यांतच भाऊरावांचें द्रष्टेपण दिसून येतें. इंग्रजी अमदानी सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रांतल्या सर्वच थोर पुरुषांनीं शिक्षणप्रसारावर आपलें शक्तिसर्वस्व एकत्रित केलें. महाराष्ट्रामधल्या सर्व प्रमुख शहरांतून उच्च शिक्षणाच्या नि दुय्यम शिक्षणाच्या शेंकडों संस्था निघाल्या. त्यामुळें पहिल्या पन्नास वर्षांत शहरें हींच शिक्षणाचीं केंद्रें बनलीं आणि सुशिक्षितांचें प्रमाण तेथेंच झपाट्यानें वाढत गेलें. शिक्षणाचें हें लोण ग्रामीण विभागांतील अज्ञ आणि गरीब जनतेपर्यंत नेऊन पोहोंचविण्याचा विचारसुद्धां ह्या काळांत कोणाच्या डोक्यांत आला नाहीं. ह्या उपेक्षित कार्याची धुरा भाऊरावांनीं आपल्या एकट्याच्याच मानेवर घेऊन गेल्या पंचवीस वर्षांत त्या कार्याचा जो विराट् विस्तार करून दाखवला तो आधुनिक काळांतला एक महान् चमत्कारच समजावयाला हवा !

पुढें कांहीं वर्षांनीं भाऊरावांना भेटावयाला साताऱ्याला जाण्याचा अनेकदां प्रसंग आला. त्या वेळीं तेथें त्यांच्या कार्याचा होत असलेला विस्तार पाहून मी तर थक्कच होऊन जाई. प्रारंभीं त्यांचा कटाक्ष केवळ समतेवर असे. त्याला त्यांनीं पुढें श्रमाची आणि स्वावलंबनाची जोड देऊन आपल्या प्रयोगाचें स्वरूप आमूलाग्र बदलून टाकलें. खेडेगांवांतील गरीब आईबापांच्या मुलांनीं पैशाच्या अभावीं शिक्षण घ्यायचें कसें आणि सरकारी मदतीच्या अभावीं चालकांनीं शैक्षणिक संस्था चालवावयाच्या कशा ह्या बहुजनसमाजामधें शिक्षणाचा प्रसार करण्याच्या कामांतल्या दोन प्रचंड अडचणी होत्या. आणि त्या सोडविण्याचें प्रसंगावधान किंवा कल्पकता कोणीहि तोंपर्यंत दाखविली नव्हती. पण भाऊरावांनीं ह्या प्रश्नाच्या मुळाशींच घाव घातला आणि तो सोडविण्याचे कामीं विलक्षण यश मिळवलें. महाराष्ट्रामधील प्रचलित शिक्षणपद्धतीमधें भाऊरावांनीं अशा रीतीनें फार मोठी क्रान्ति घडवून आणली. दुय्यम आणि महाविद्यालयीन शिक्षण केवळ पुस्तकी आणि पोषाखी झालेलें होतें. त्यामुळें सुशिक्षित तरुणांमधें बलाचा, तेजाचा आणि आत्मविश्वासाचा अभाव तीव्रतेनें जाणवल्याखेरीज रहात नसे. स्वतःचें शिक्षण पूर्ण करण्यासाठीं उन्हातान्हांत शेतामध्यें किंवा डोंगरावर रक्ताचें पाणी करावयास लागतें आणि हाडाचीं काडें करावयास लागतात, ही कल्पना भाऊरावांनीं आपल्या सर्व विद्यार्थ्यांच्या मनावर इतक्या उत्कृष्ट रीतीनें बिंबवली, कीं त्याचें दृश्य फळ ताबडतोब सर्वांना पाहावयाला मिळालें. भाऊरावांच्या संस्थेंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचें वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व अगदीं लांबूनहि ओळखतां येऊं लागलें. अशा रीतीनें 'श्रम, स्वावलंबन आणि समता' ह्या तीन तत्त्वांवर आधारलेला भाऊरावांच्या शैक्षणिक कार्याचा वटवृक्ष ग्रामीण महाराष्ट्रांत झपाट्यानें पसरूं लागला. त्यांनीं काढलेल्या प्राथमिक आणि दुय्यम शाळांची संख्या शेंकड्यांनीं वाढूं लागली. एक शाळा चालवावयाची तर कोण

उरस्फोड करावी लागते! जमाखर्चाचीं टोकें जुळवतांना कोण तारांबळ उडते ! दांतांच्या कण्या करून किती पायपिटी करावी लागते आणि किती उंबरठे झिजवावे लागतात हें ज्याचें त्यालाच माहीत. भाऊरावांनीं तर शेंकडों शाळांचा बोजा आपल्या डोक्यावर उचलला होता. त्याच्या जोडीला आणखी त्यांनीं महाविद्यालयाची प्रचंड जबाबदारी अंगावर घेतली. सर्व संस्थांचा वार्षिक अर्थ-संकल्प लाखाच्या घरांत जाऊन ठेपला. पण हा सर्व खर्चाचा डोंगर मोठ्या धैर्यानें आणि हिंमतीनें सालोसाल भाऊराव ओलांडीत असत. कुठे पालकांकडून धान्य जमव, विद्यार्थ्यांकडून शेतीचें उत्पन्न वाढव, त्यांना शिष्यवृत्त्या मिळवून दे, सरकारकडून नाना तऱ्हेच्या ग्रँटस् संपादन कर, अशा भाऊरावांच्या हजारों खटपटी अहोरात्र चालू असत. त्यांच्या कार्याची उपयुक्तता आणि आवश्यकता जशी जशी सर्वसामान्य जनतेला कळू लागली, तसतशी अगदीं साधारण सांपत्तिक परिस्थितीमधलीं माणसेंसुद्धां त्यांना आर्थिक सहाय्य करावयास वेगानें धांवत येऊं लागलीं. सार्वजनिक संस्थांसाठीं लोकांकडून प्रचंड प्रमाणावर द्रव्यसहाय्य मिळवणारी गोपाळराव देवधर किंवा अण्णासाहेब कर्वे ह्यांच्यासारखीं मोठमोठीं माणसें महाराष्ट्राला माहीत आहेत. पण भाऊरावांनीं त्यांच्यावरहि कडी करून दाखविली. या बाबतींत भाऊरावांची गाडगे महाराजांशीं तुलना करतां येईल. रंकापासून तो राजापर्यंत जेवढें जेवढें सहाय्य म्हणून संस्थेला मिळवितां येईल तेवढें तेवढें भाऊरावांनीं मिळवून दाखविलें आणि हें सर्व जगड्व्याळ कार्य करीत असतांना एका क्षणाचीहि विश्रांति म्हणून कशी ती भाऊरावांनीं घेतली नाहीं. आपल्याच संस्थांत शिकून तयार झालेल्या अनेक विद्यार्थ्यांना परदेशीं शिक्षणाला पाठवून त्यांनीं आपल्या विविध संस्थांचीं सूत्रें त्यांच्या हातीं सोपविलीं आणि जबाबदार कार्यकर्त्यांचें एक व्यापक जाळें निर्माण केलें. तथापि भाऊरावांच्या उंचीनें आणि बरोबरीनें कार्य करणारा पुरुष कांहीं त्यांना जोडीदार म्हणून मिळूं शकला नाहीं. शैक्षणिक कार्य करीत असतांना राजकारणापासून आणि समाजकारणा-पासून भाऊरावांनीं स्वतःला कांहीं नेहमींच अलिप्त ठेवलें नव्हतें. त्यांच्या रागीट आणि निर्भय वृत्तीमुळें कधीं कधीं त्यांच्या तोंडून कांहीं राजकीय घटनांबाबत असे कांहीं जळजळीत अभिप्राय व्यक्त होत कीं त्यांच्या धगीनें अनेकांचीं कातडीं करपून जात. गांधीहत्येनंतर त्या वेळचे मुख्य प्रधान बाळासाहेब खेर ह्यांच्याशीं भाऊरावांचा जो जाहीर खटका उडाला तो अद्याप अनेकांच्या स्मरणांत असेल. त्यामुळेंच त्यांच्या संस्थेवर सरकारी अवकृपेचें सावट आलें. तथापि, त्या संकटां-तूनहि धीमेपणानें आणि संयमानें भाऊरावांनीं मार्ग काढला.

भाऊरावांच्या नि माझ्यामधें महात्मा फुले हा एक फार मोठा दुवा होता. 'श्यामची आई' ह्या चित्रपटानंतर जेव्हां मी 'महात्मा फुले' हा चित्रपट

काढण्याचें जाहीर केलें तेव्हां भाऊरावांना जो आनंद झाला त्याचें वर्णन मला करतां येत नाहीं. त्यांनीं मला मुद्दाम पत्र लिहून कळविलें कीं, "मी कांहीं तुमच्या नाटकांचा नि चित्रपटांचा मोठा भोक्ता नाहीं. मला त्याची विशेष गोडी नाहीं, पण 'महात्मा फुले' ह्यांच्या जीवनावर तुम्ही काढीत असलेल्या चित्रपटानें मला मात्र तुमच्या जीवनाचें आणि कलेचें सार्थक होईल याविषयीं माझ्या मनांत तिळमात्र शंका नाहीं." पुढें या चित्रपटांत 'सूत्रचालका'चें काम करण्यासंबंधीं मी जेव्हां त्यांना विनंति केली तेव्हां ती त्यांनीं आनंदानें मान्य केली. त्या वेळीं त्यांच्या पायांना विलक्षण सूज आली होती. त्यांना उठतां येत नव्हतें कीं हालतां येत नव्हतें, तशाहि परिस्थितींत मी सतत सहा-सात तास त्यांच्याकडून काम करवून घेतलें आणि तें त्यांनीं मोठ्या उत्साहानें आणि आनंदानें केलें. पुढें संपूर्ण चित्रपट तयार झाल्यानंतर जेव्हां मी तो त्यांना दाखविला तेव्हां त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. 'शेंकडों व्याख्यानें देऊन किंवा ग्रंथ लिहून जें महात्मा फुल्यांचें चरित्र किंवा तत्त्वज्ञान कोणाला विशद करतां आलें नसतें, तें तुम्हीं ह्या चित्रपटात अत्यंत प्रभावी रीतीनें प्रकट केलें आहे;' अशी माझी मुक्तकंठानें त्यांनीं प्रशंसा केली. 'सर्व महाराष्ट्रांत हा चित्रपट मी स्वतः दाखवीत फिरेन आणि त्यावर व्याख्यानें देईन!' असेहि उद्गार त्या आनंदाच्या भरांत स्वयंस्फूर्तीनें त्यांनीं काढलेले मला आठवतात. आर्थिक दृष्ट्या 'महात्मा फुले' हा चित्रपट यशस्वी होऊं शकला नाहीं, हें जेव्हां त्यांना पुढें समजलें तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें. प्रारंभापासून ते सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळींत असल्यानें ते ब्राह्मणांचे द्वेष्टे आहेत असें त्यांच्याविषयीं कित्येकांच्या मनांत किल्मिष असे. पण तें कांहीं खरें नव्हतें. तीस वर्षांच्या आमच्या स्नेहांत चुकूनहि कधीं असा प्रसंग आला नाहीं कीं, ज्या वेळीं त्यांच्या शब्दांत वा कृतींत जातीयवाद प्रकट झालेला मला दिसून आला. भाऊराव हे जातिभेदाचे नि वर्णसंस्थेचे मोठे जाज्वल्य टीकाकार होते. ब्राह्मण आणि मराठे ह्यांच्यामधील सामाजिक दोषांवर ते कडाडून हल्ला चढवीत. पण तसें करण्यांत त्यांच्या मनांत द्वेषाचा वा सूडाचा तिळमात्र अंशहि नसे. समाज कल्याणाच्या पोटतिडकेनें ते तसे बोलत. पुण्याला कांहीं वर्षांपूर्वीं न्या. गजेंद्रगडकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं जी 'पहिली सामाजिक परिषद' भरली होती, त्या वेळीं 'महाराष्ट्रानें यापुढें ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाला मूठमाती दिल्याखेरीज त्यांचा उद्धार होणें अशक्य आहे' असे जाहीर उद्गार त्यांनीं काढले होते. त्या वेळीं शेंकडों श्रोत्यांनीं टाळ्यांचा जो कडकडाट केला, तो अद्याप माझ्या कानांत निनादतो आहे. भाऊराव स्वभावानें अत्यंत उमदे आणि निर्मळ असल्यानें ते एकादेवेळीं रागाच्या भरात फटकळपणानें कांहींहि बोलले तरी अंतःकरणाच्या उंचीवरून कधीं ते खालीं उतरलें नाहींत. स्वार्थाचा विचार तर चुकून त्यांच्या अंतःकरणाला

शिवला नाहीं. किंबहुना त्यांचें सबंध आयुष्य म्हणजे ध्येयसाधनेचा एक प्रचंड यज्ञच होता. स्वत:चें जीवन असें त्यांना मुळीं उरलेंच नव्हते. म्हणून समाजाचा संसार करणाऱ्या एखाद्या योग्याचें वैराग्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत प्रकाशित झालेलें दिसत होतें. ह्याच तपश्चर्येच्या सामर्थ्यावर 'पद्मविभूषण' ही पदवी किंवा 'डी. लिट्.' चा अत्युच्च सन्मान आपोआप त्यांच्या पायाशीं येऊन पडला. अण्णासाहेब कर्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्याप्रमाणेंच महाराष्ट्राच्या इतिहासांत कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांना स्वतंत्र स्थान आहे. गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्राला घडवण्याचें कार्य ज्या ज्या महापुरुषांनीं केलें त्यांच्या मालिकेंत भाऊराव पाटलांचा प्रामुख्यानें समावेश करावा लागेल. महाराष्ट्रांत ज्ञानाची गंगोत्री चिपळूणकर, टिळक आणि आगरकर ह्यांनीं निर्माण केली. तिचे प्रवाह कर्व्यांनीं स्त्रीवर्गामध्यें पोहोंचविले. तर बाबासाहेब आंबेडकरांनीं आपल्या लक्षावधि अस्पृश्य बांधवांच्या घरांत ती ज्ञानाची गंगा पोहोंचवून त्यांच्या उद्धाराचा मार्ग मोकळा करून दिला. पण त्या ज्ञानगंगेचे असंख्य प्रवाह भाऊ-रावांनीं महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून, शेतांतून, रानांतून आणि दऱ्याखोऱ्यांतून नेऊन, महाराष्ट्रांतील बहुजनसमाजामध्यें एक नवीन सामर्थ्य आणि आत्मविश्वास निर्माण केला. महाराष्ट्राच्या उपेक्षित प्रदेशांत भाऊरावांनीं केलेल्या या शिक्षणाचें पेरणीचे जोमदार पीक प्रकट होऊन कणसाला यावयाला अद्याप अवकाश आहे. पण तो हंगाम जेव्हां येईल, तेव्हां त्याच्या समृद्धीनें महाराष्ट्राचा चेहरामोहरा आमूलाग्र बदलून जाईल याविषयीं कोणाच्याहि मनांत शंका असण्याचे कारण नाहीं. श्रम, स्वावलंबन आणि समता ह्या तीन तत्त्वांवर आधारलेलें भाऊरावांचें जनता शिक्षणाचें कार्य आतां यापुढें एकसारखें वाढवीत नेऊन त्यांचें 'जनता विश्वविद्यालया'-चें ( Rural University ) विशाल स्वप्न लवकरांत लवकर साकार करण्याचा अचाट प्रयत्न यापुढें महाराष्ट्रांत व्हावयाला हवा. पण द्विभाषिक राज्य जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत हें ध्येय कसें साध्य होणार ? संयुक्त महाराष्ट्र निर्माण झालें तरच भाऊरावांच्या प्रचंड कार्याचा गौरव आणि उरलेल्या आकांक्षांची पूर्ति होणार आहे. भाऊरावांनीं महाराष्ट्रावर करून ठेवलेल्या उपकारांच्या स्वरूपाचें मूल्यमापन करण्याची वेळ अद्यापि आलेली नाहीं. पण ती जेव्हां येईल तेव्हां महाराष्ट्राच्या भावी पिढ्या साताऱ्याच्या डोंगरावर अनवाणी पायांनीं आणि उघड्या डोक्यानें उभ्या असलेल्या भाऊराव पाटलांच्या प्रचंड आणि धिप्पाड मूर्तीकडे कृतज्ञेच्या भावनेनें आणि ओलावलेल्या नेत्रांनीं पाहत रहातील ह्यांत काय शंका आहे ?

१५३०४

# ११

# महर्षींचें स्वर्गारोहण

भारतरत्न महर्षि अण्णासाहेब कर्वे ह्यांनां काल सकाळीं आपल्या कर्मभूमीवर वयाच्या एकशें पांचाव्या वर्षीं आपला देह ठेवला आणि स्वर्गारोहण केलें. आधुनिक भारतामधला अण्णा हे एक अद्‌भुत चमत्कार होते. 'शतायुषी' अण्णांसारखा समाधानी, कृतकृत्य आणि भाग्यशाली पुरुष कालपर्यंत तरी भारतांत दुसरा क़ोणीच नव्हता. अण्णा ज्या काळांत जन्माला आले तो काळ निदान महाराष्ट्रांत तरी अल्पायुषी महापुरुषांचा होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर अवघ्या बत्तिसाव्या वर्षीं निधन पावले. आगरकर एकोणचाळीसाव्या वर्षीं गेले. न्यायमूर्ति तेलंग आणि ना. गोखले पन्नाशीच्या आंतच कालवश झाले. आणि लोकमान्य टिळकांचा काळ जरी चौसष्टाव्या वर्षीं झाला असला तरी ते अल्पायुषी होते असेच म्हणावयाला हवें. या सर्व महापुरुषांचा उदयास्त अण्णांना आपल्या डोळ्यांनीं पाहावयाला मिळाला. खरोखरच, अण्णा म्हणजे भारताच्या इतिहासांतील एका क्रांतिकारक शतकाचे शेवटचे साक्षीदारच होते. महाराष्ट्राच्या

सामाजिक इतिहासाचे तर ते महान् शिल्पकारच होते. पासष्ट वर्षांपूर्वी अनाथ स्त्रियांच्या उद्धाराचें जें एक लहानसें रोपटें अण्णांनीं 'एरंडवना 'मधें लावलें, त्याचें रूपांतर हजारों महिलांचा उद्धार करणाऱ्या एका विराट् वटवृक्षामध्ये झालेलें 'ह्याच देहीं अन् ह्याच डोळां' बघण्याचें भाग्य अण्णांना लाभलें ही अण्णांची केवढी पुण्याई म्हटली पाहिजे! अण्णांनीं आपल्या जीवनांत जे जे म्हणून मनोरथ रचलेले होते, ते ते सारे यथासांग पूर्ण होऊन त्यांची संपूर्ण प्रगति आणि समृद्धि झालेली बघण्याइतकें निरामय आणि निरपघात जीवन अण्णांना लाभावें हा केवढा चमत्कार! अण्णा ज्या काळांत जन्माला आले तो काळ भारताच्या इतिहासामधला अत्यंत बिकट आणि भयानक असा होता. गेलेलें स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठीं भारतानें केलेला 'सत्तावनी संग्रामा 'चा पहिला अचाट प्रयत्न पराभूत होऊन धुळींत मिळालेला होता. त्यामुळें देशांत सर्वत्र निराशेचें आणि भीतीचें शबल वातावरण पसरलें होतें. अशा काळीं भारताला राजकीय दास्यांतून मुक्त करणारा लोकमान्यांसारखा क्रांतिकारक वीर जसा जन्माला आला, तसा हिंदुसमाजातील राक्षसी रूढींविरुद्ध बंड करणारा अण्णांसारखा धाडसी सुधारकहि जन्माला यावा हा एक मोठा योगायोगच म्हटला पाहिजे. बहुजनसमाजाच्या मनावर रूढ धर्माचा एवढा जबरदस्त पगडा बसलेला होता कीं, त्यामधें यत्किंचित्‌हि हस्तक्षेप करूं इच्छिणाऱ्या माणसाचा समाज-सुसरीनें चावून चावून प्राण घेतला असता. या देशांतील लोकांची मनोवृत्ती अशी कांहीं विचित्र आहे कीं, राजकीय क्रांतिकारकांना जनता आपल्या डोक्यावर घेऊन नाचते, तर सामाजिक क्रांतिकारकांना हत्तीच्या पायांनीं तुडवितें. राजकीय क्रांतिकारकांना जास्तींत जास्त भीति कोणती? तर तुरुंगांत जाण्याची! फार झालें तर फांसावर लटकण्याची! पण सामाजिक क्रांतिकारकांना केवळ जन्मभरच नव्हे, तर पिढ्यान् पिढ्या काळ्या पाण्याची शिक्षा भोगावी लागते आणि रोजच्या रोज मरणापेक्षांहि भीषण यमयातना भोगाव्या लागतात. म्हणून राजकीय 'क्रांतिकारकां 'च्या तुलनेनें सामाजिक 'क्रांतिकारकां 'ची संख्या कोणत्याहि काळामधें नेहमीं अत्यल्पच असते. महात्मा फुले, कर्मवीर आगरकर, महर्षि कर्वे आणि डॉ. आंबेडकर ह्यांना आपल्या समकालीन समाजाकडून जो अनन्वित राक्षसी छळ सहन करावा लागला त्याच्या एकेक करुण कहाण्या ऐकल्या तर हृदयाला पीळ पडतो आणि डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागतात. दलितांच्या आणि दुःखितांच्या आरोळ्या ऐकून त्यांच्या साहाय्याला धांवणाऱ्या साधुसंतांचे हे सारे अवतार समाजाच्या दृष्टीनें वांकडें पाऊल पडलेल्या एका गरोदर गतभर्तृकेच्या दुर्दैवी जीवनाच्या दर्शनानें अण्णांच्या आयुष्यांत क्रांति झाली आणि त्यांनीं एका विधवेशीं पुनर्विवाह करण्याचें 'अघोर पातक'

केलें ! त्या काळांत ब्राह्मणानें विधवेशीं पुनर्विवाह करावयाचा म्हणजे कोण महापातक ! एखाद्या ब्राह्मणानें एक सोडून दहा रखेल्या राजरोसपणें आपल्या घरामधें ठेवल्या असत्या, तर त्या वेळच्या समाजानें त्याच्या धाडसाचें आणि 'लोकोत्तर पौरुषा'चें कौतुक केलें असतें ! पण विधवेशीं– अन् लग्न करावयाचें अब्रह्मण्यम् ! अब्रह्मण्यम् ! त्यानंतर सनातनी समाजानें अण्णांचा नि त्यांच्या पुनरूढा पत्नी 'बाया' ह्यांचा जो अमानुष छळ केला त्याची आठवण झाली कीं अंगावर कांटा येतो. कांहीं बेशरम बुड्ढे अण्णांना सरळ तोंडावर विचारीत कीं 'व्यभिचारावर पांघरूण घालण्यासाठीं पुनर्विवाह करून आतां हे धंदे तुम्ही आरंभले आहेत काय हो ?' अन् कांहीं चांडाळांची तर 'बाया'ला 'काय ग लग्नाच्या वेळीं तुला किती महिने गेले होते ?' असे उघड उघड विचारण्यापर्यंत मजल गेली होती ! एवढेंच नव्हे तर अण्णा नि त्यांच्या पत्नी ह्यांच्याविरुद्ध रोजच्या रोज वेड्यावांकड्या अफवा उठवण्याची समाजकंटकांनीं शिकस्त केली. पण त्या सर्व अग्निदिव्यांतून अण्णा व त्यांच्या पत्नी मोठ्या धैर्यानें आणि संयमानें सही-सलामत बाहेर पडल्या. ह्याचें एकच कारण म्हणजे अण्णांचें लोकविलक्षण व्यक्तिमत्त्व. अण्णांची शरीरयष्टीच मुळी अशी होती कीं ती, कोणाच्या डोळ्यांत जशी भरायची नाहीं, तशी सलायचीहि पण नाहीं. अण्णा कधीं कोणाच्या तोंडाला लागले नाहींत कीं कधीं कोणाच्या वाटेला गेले नाहींत. आपल्या लहानशा पायवाटेनें मान खालीं घालून ते मुकाट्यानें जन्मभर चालत गेले. त्यांतून त्यांचें वर्तन धुतल्या तांदुळासारखें शुद्ध आणि शिस्त पोलादासारखी कठोर. एकच गोष्ट ठरलेल्या वेळीं आणि ठरलेल्या रीतीनें एखाद्या तपस्व्याच्या कठोर निर्धारानें त्यांनीं आजन्म केली. त्यांच्या नियमितपणापुढें घड्याळें झिजलीं अन् वेळापत्रकें फाटलीं ! लहान मुंग्या प्रचंड वारुळें बांधतात खरीं. पण त्यासाठीं असंख्य मुंग्या खपतात. पण अण्णांनीं केवळ 'आपुलिया बळें' एखाद्या मुंगीप्रमाणें वर्षानुवर्षें, प्रतिदिन आणि प्रतिक्षण खपून महाराष्ट्रामध्यें महिला संस्थांचें नि कार्यकर्त्यांचें जें प्रचंड वारूळ, नव्हे प्रचंड पर्वत, उभा केला आहे तो आजच्या काळांतला एक चमत्कारच समजला गेला पाहिजे. आणि एवढें प्रचंड कार्य करून अण्णा आपले नामानिराळे ! त्यांना कशाचेंच कांहीं नव्हतें. अभिमान नव्हता, निराशा नव्हती कीं दुःख नव्हतें. अण्णांचें वैराग्य आणि अनासक्ति मोठमोठ्या ऋषिमुनींना सुद्धां लाजवील अशीच होती. एकशें पांच वर्षांच्या आयुष्यांत ते एक क्षण सुद्धां स्वतःच्या सुखासाठीं किंवा भोगासाठीं जगले नाहींत. स्त्रीजातीच्या उद्धारासाठीं अण्णांनीं हें जें अभूतपूर्व बलिदान केलें त्याला भारताच्या इतिहासांत तोड नाहीं. कांही वर्षांपूर्वी ज्यांच्याबद्दल समाज-कंटकांनीं कोणताहि अपशब्द म्हणून बोलावयाचें बाकी ठेवलें नाहीं, त्या

अण्णांनीं ‘ अग्निकाष्ठे ’ भक्षण करून समाजसेवेची अशी कांहीं अघोर तपश्चर्या केली कीं, ज्यांच्याबद्दल एकहि वावगा शब्द कुणाला उच्चारतां आला नसता असे भारतांतले ते एकमेव अद्वितीय अजातशत्रु ‘ महर्षि ’ बनले ! गेल्या पन्नास वर्षांत या देशांत अनेक राजकीय आणि सामाजिक वादळें उठलीं. त्यांच्या झंझावातामध्यें अनेक ‘ महापुरुष ’ पाचोळ्यासारखे उडून गेले. पण ह्या वादळाचा अण्णांना कधींहि उपसर्ग झाला नाहीं. ध्रुवाप्रमाणें एकदां जे ते लोकादराच्या अत्युच्च शिखरावर आरूढ होऊन बसले ते आतां कायमचेच ! त्यांच्या वयाला जेव्हां शंभर वर्षें पूर्ण झाली, तेव्हां महाराष्ट्रांत आजपर्यंत कधीं कोणाला प्राप्त न झालेली ‘ भारतरत्न ’ ही पदवी राष्ट्रपतींनी त्यांना समर्पण केली. आणि ‘ भारतरत्न ’ पदावर आरूढ झाल्यानंतर अण्णांनीं दुसऱ्या एका ‘भारतरत्ना’ला जें ‘ चौदावें रत्न ’ दाखविलें तो वृत्तान्त तर पराकाष्ठेचा रोमहर्षक आहे ! ‘ शतायुष्यपूर्ती ’चा जो गौरवसमारंभ मुंबईला राज्यपाल श्रीप्रकाश ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला, त्या प्रसंगीं पं. जवाहरलाल नेहरू मुद्दाम हजर राहिले. त्या वेळीं भाषण करतांना पं. नेहरूंनीं अण्णांची भरमसाट स्तुति केली. ते म्हणाले, “ पूज्य अण्णा, तुम्ही प्राचीन भारतामधल्या ऋषीसारखे आहांत, तुम्ही आम्हांला आशीर्वाद द्या ! ” नेहरूंना वाटलें कीं ‘ भारताच्या पंतप्रधानकीचा वारसा जन्मोजन्म नेहरू घराण्यांत चालो ! ’ असा अण्णा आपल्याला आशीर्वाद देतील ! पण नेहरूंना आशीर्वाद देण्याऐवजीं त्यांच्या डोक्यावर अण्णांनीं एक ॲटम बॉंबच भिरकावला. ( त्या वेळीं संयुक्त महाराष्ट्राचें आंदोलन जोरांत होतें. ) अण्णा म्हणाले, “ माझ्या आयुष्यामधल्या सगळ्या आकांक्षा आतां पूर्ण झालेल्या आहेत. माझी आता एकच इच्छा उरली आहे. ती ही की, माझ्या डोळ्यादेखत मला महागुजरात आणि संयुक्त महाराष्ट्र निर्माण झालेले पहावयास मिळोत ! ” अरे बापरे ! अण्णांच्या तोंडून त्यांची ही अखेरची इच्छा बाहेर पडतांच लोकांनीं संयुक्त महाराष्ट्राचा गगनभेदी जयजयकार केला. पं. नेहरू, राज्यपाल श्रीप्रकाश आणि यशवंतराव चव्हाण ह्यांचे चेहेरे त्या वेळीं अगदीं पाहण्यासारखे झाले. उभ्या आयुष्यांत अण्णा हे राजकारणापासून अलिप्त राहिले. राजकारणावर तोंपर्यंत त्यांनीं कधीं अवाक्षरहि उच्चारलें नव्हतें. पण भारताच्या पंतप्रधानांसमोर संयुक्त महाराष्ट्राची घोषणा करून अण्णांनीं आपल्या शंभर वर्षांच्या जीवनमंदिरावर रत्नजडित सुवर्णकळसच चढवला. खरे महर्षि ! खरे भारतरत्न ! अण्णांच्या त्या अमरवाणीने संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला एक महान् नैतिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आणि त्यांच्याच आशीर्वादानें अवघ्या दोन वर्षांच्या आत ‘ संयुक्त महाराष्ट्रा ’चें स्वप्न साकार झालेलें स्वतःच्या डोळ्यांनीं पाहण्याचें भाग्य अण्णांना लाभलें ! शंभर वर्षे स्त्रियांच्या उद्धाराचा

सतत निदिध्यास घेणारा असा अद्वितीय समाजसुधारक, असा वैराग्यशाली स्थितप्रज्ञ कर्मयोगी आजपर्यंत भारतांत क्वचितच होऊन गेलेला असेल. अशा या युगप्रवर्तक सुधारक-संताच्या पवित्र चरणीं आमचीं कोटि कोटि लोटांगणें !

०० 

८९२९२ दि. ११।१।६
२५५६ ६१२

# १२

# विन्स्टन चर्चिल

विन्स्टन चर्चिल गेले ! आयुष्यभर ज्या बेडर झुंजारपणानें ते जगले, त्याच बेडरपणानें मृत्यूशीं अखेरच्या क्षणापर्यंत निकरानें झुंजत झुंजत त्यांनीं प्राण ठेवले. वार्धक्यानें सगळीं गात्रें विकल झालेलीं, मेंदूच्या पक्षाघातानें शुद्धबुद्ध हरपलेली. अशा जर्जर अवस्थेंतही रोमारोमांतल्या दुर्दम्य जीवनाशेचा नि प्रबळ इच्छाशक्तीचा कोट उभारून, साक्षात् कलिकाळाला त्यांनीं दहा दिवस रोखून ठेवलें आणि मगच हें जग सोडलें. आपल्या साहसी जीवनांत ज्या यमराजाला त्यांनीं वारंवार चकवले होते, त्या यमराजानें त्यांच्यावर अखेर मात केली खरी ! पण त्या आधीं रुग्णशय्येची रणशय्या करून वृद्ध चर्चिलनीं देहाचा तसू तसू त्याच्याविरुद्ध ज्या निग्रहानें लढवला, त्यामुळें त्या सर्वसंहारक यमराजालाहि त्या मर्त्य पण मर्द मानवाकडून आपल्याला पुन्हा हार खावी लागते कीं काय अशी धास्ती शेवटपर्यंत वाटत होती नि त्यामुळें त्याचे हात कचरून, त्याचे आवळते पाश पुनः पुन्हा ढिले पडत होते. ज्या कणखर वृत्तीनें चर्चिलनीं जीवनाचें

आव्हान स्वीकारलें, त्याच कणखर वृत्तीनें मृत्यूच्या आव्हानाशीं अशा रीतीनें दोन हात करीत त्यांनीं आपला अवतार समाप्त केला. चर्चिल यांचें निधन केवळ एका व्यक्तीच्या आयुष्याची अखेर नाहीं. त्यांच्या अंतामुळें उभ्या जगाच्या इतिहासामधील एका पुऱ्या कालखंडाचें अखेरचें पान मिटलें गेलें आहे. या विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्यें ज्यांनीं सबंध पृथ्वीला आपल्या बलिष्ठ बाहूंचा विळखा घालून सारें भूमंडळ गदगदां हालविलें आणि अवघ्या मानवजातीचें भवितव्य आपल्या हाताच्या बोटांवर चाळविलें, अशा ऐतिहासिक महापुरुषांपैकीं चर्चिल हे अखेरचे होते. केवळ शारीरिक अस्तित्वाच्याच नव्हे, तर जगड्व्याळ राजकीय कर्तृत्वाच्या दृष्टीनेंहि त्यांच्याइतका दीर्घायुषी नेता जगामधें आजवर क्वचितच झाला असेल. त्यांच्या नव्वद वर्षांच्या आयुष्यापैकीं १९०० ते १९६४ ही सतत पासष्ट वर्षें ते ब्रिटिश पार्लमेंटचे लोकनियुक्त सभासद होते. ही केवळ एक घटना देखील त्यांच्या दीर्घकालीन नि अखंड राजकीय कर्तबगारीची साक्ष देण्यास पुरेशी आहे. पण केवळ या एकाच नव्हे, तर प्रत्येक बाबतींतच चर्चिल यांचें जीवन म्हणजे आधुनिक युगामधील एक अद्‌भुत चमत्कार आहे. चर्चिल यांचा जन्म ब्रिटनमधल्या मार्लबरो या शतकानुशतकांपासून प्रख्यात नि सन्माननीय अशा उमरावी घराण्यांत झाला. त्यांचे वडील रँडॉल्फ चर्चिल हे ब्रिटनमधले एक अग्रगण्य मुत्सद्दी नि कांहीं काळ ब्रिटनचे पंतप्रधानहि होते. पण विन्स्टन बालपणापासूनच एवढा हूड, अनावर, हट्टी, फटकळ, तऱ्हेवाईक, व्रात्य नि दांडगाईखोर होता, तसेंच शाळेच्या अभ्यासामधली त्याची प्रगतीहि एवढी जेमतेम होती कीं, हें पुंड कार्टें आपल्या घराण्याच्या प्रतिष्ठेला काळें फांसणार असा घोर रँडॉल्फ यांना सतत लागलेला असे. आपल्या या दिवट्या चिरंजिवांना सुधारण्याचे सगळे प्रयत्न अपेशी ठरल्यावर रँडॉल्फ यांनीं वैतागून त्याला अखेर लष्करामधें ‘ चिकटवून ’ दिलें. तेवढ्यांत, मूळच्या हॉलंडमधल्या, पण दक्षिण आफ्रिकेंत स्थायिक झालेल्या ‘ बोअर ’ राज्यकर्त्यांशीं ब्रिटनचें युद्ध सुरू झालें. त्या युद्धाचे ‘ चक्षुर्वैसत्यम् ’ वृत्तान्त ब्रिटिश वृत्तपत्रांना पुरविण्याची नोकरी विन्स्टननें पत्करली नि लष्करी वार्ताहर म्हणून तो दक्षिण आफ्रिकेंत गेला. तेथें त्याच्या धाडसी स्वभावाला भरपूर वाव मिळाला नि युद्धाच्या प्रत्यक्ष आघाडीवर अत्यंत धोक्याच्या ठिकाणीं जाऊन त्यानें मिळवलेले वृत्तान्त ब्रिटिश वृत्तपत्रांमधें चांगलेच गाजले. ही कामगिरी बजावीत असतांनाच बोअर सैन्याच्या तावडींत तो सांपडून त्याला कैदेमधें डांबण्यांत आलें. पण तेथून तो शिताफीनें निसटला नि दोन दिवस केवळ ‘ चॉकलेटवर ’ भूक भागवीत लपत-छपत, पायपीट करीत तो ब्रिटिश सैन्याच्या ठाण्यावर दाखल झाला. बोअर लष्करी तुरुंगाच्या प्रमुख अधिकाऱ्यानें त्या ‘ फरारी युद्धकैद्याला ’ पकडण्यासाठीं पन्नास पौंडांचें बक्षीस

लावलें होतें. पुढें अनेक वर्षांनंतर चर्चिल ब्रिटनचे पंतप्रधान झाल्यावर त्या अधिकाऱ्यानें आपल्या त्या हुकुमाची एक प्रत खिलाडूपणें चर्चिल यांच्याकडे पाठविली नि तिच्यासोबत विनोदानें लिहिलें कीं, "माझ्या कैदेंत ब्रिटनचा भावी पंतप्रधान आहे याची कल्पना नसल्यानें आपल्या आदरातिथ्यांत त्या वेळीं माझ्याकडून कांहीं कसूर झाली असल्यास क्षमा असावी." चर्चिल यांनीं तेवढ्याच खिलाडू वृत्तीनें त्याला पाठविलेल्या उत्तरांत लिहिलें कीं, "तुझ्या कैदेंतून निसटलेले अस्मादिक म्हणजे ब्रिटनचे भावी पंतप्रधान होते याची जर तुला जाणीव असती, तर तूं मला पुन्हा पकडण्यासाठीं नक्कीच पन्नास पौंडांपेक्षां जास्त मोठें बक्षीस जाहीर केलें असतेस." बोअर युद्धामध्यें चर्चिलनें बजावलेल्या साहसी कामगिरीमुळें त्याच्या नांवाचा ब्रिटनभर पुष्कळच बोलबाला झाला. तें युद्ध संपल्यावर चर्चिल ब्रिटनमधें जेव्हां परतला, तेव्हां एकंदर रागरंग पाहून त्यानें राजकारणांत उडी घ्यायचें ठरवलें आणि तो पार्लमेंटसाठीं उभा राहून निवडूनहि आला, तेव्हांपासून चर्चिल नि ब्रिटनचें राजकारण यांचा जो संबंध जडला, तो गेल्या वर्षीं म्हातारपणामुळें चर्चिल निवृत्त होईपर्यंत कायम राहिला. पण राजकारणामधेंहि सरळ सुतासारखा वागला, तर तो चर्चिल कसला! त्याच्या अवखळ, आग्रही, तडफदार स्वभावामुळें नि फटकळ भाषेमुळें त्याच्या पक्षामधल्या धिम्या वृत्तीच्या नि संथ करणीच्या सहकाऱ्यांबरोबर त्याचें मुळींच पटेनासें झालें. प्रथम, कॉन्झर्वेटिव्ह अथवा टोरी (पुराणमतवादी) पक्ष बुरसटलेला नि कल्पनाशून्य असल्याचें ठरवून चर्चिलनें तो पक्ष सोडला नि तो लिबरल (उदारमतवादी) पक्षामधें दाखल झाला. पण मग तो पक्ष आळणी वाटून त्यानें परत कॉन्झर्वेटिव्ह पक्षामधें प्रवेश केला. यामुळें त्या दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांमधें तो अप्रिय झाला, पण असें असतांहि चर्चिलची प्रचंड कार्यशक्ति एवढी निर्विवाद होती कीं, १९१४ ते १९१८ मधल्या पहिल्या महायुद्धाच्या काळांत त्याला मंत्रिमंडळामधें घेण्यांत आलें. तेथें त्यानें आंखलेल्या योजनांचें जुनाट साच्यामधल्या कांहीं सेनाधिकाऱ्यांनीं योग्य पालन न केल्यानें जें अपयश आलें, त्याचें खापर चर्चिलच्या माथ्यावर फुटलें. पण ती बदनामी त्यानें न डगमगतां सहन केली. पहिल्या महायुद्धानंतर सबंध जगांत प्रचंड उलथापालथी झाल्या. रशियामधें क्रांति होऊन तेथें कम्युनिस्ट राजवट प्रस्थापित झाली. जगभर समाजवादाच्या आंदोलनाचा प्रसार झाला. ब्रिटिश साम्राज्याच्या गुलाम देशांमधें स्वातंत्र्य-लढ्याची लाट उसळली पण चर्चिलचा वैचारिक नि भावनात्मक पिंड ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या जुन्या जमान्यांतला होता. तो जर साडेतीनशें–चारशें वर्षांपूर्वीं राणी इलिझाबेथच्या कारकीर्दीमध्यें जन्माला आला असतां, तर पोलादी चिलखत नि शिरस्त्राण चढवून त्यानें देशोदेशीं दिग्विजय करीत ब्रिटिश साम्राज्याचा

विस्तार वाढवला असता, त्याचप्रमाणें राणीच्या दरबारामधला एक मुत्सद्दी, रगेल नि रंगेल सरदार म्हणून तो गाजला असता. पण दुर्दैवानें चर्चिलचा जन्म ब्रिटिश सम्राज्याच्या अस्तकालीं झाला. ब्रिटनच्या जगड्व्याळ वर्चस्वाचें नि साम्राज्यवादी वैभवाचें चर्चिलचें स्वप्न त्या काळांतील वस्तुस्थितीला धरून नव्हतें, म्हणूनच बदलत्या परिस्थितीशीं चर्चिलचें जमेना. भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याचे नेते म्हणून गांधीजी गोलमेज परिषदेसाठीं विलायतेला गेले, तेव्हां ‘ अर्धनग्न फकीर ’ म्हणून चर्चिलनें त्यांची हेटाळणी केली आणि दुसरें महायुद्ध संपल्यावरहि “ मी राणीचा मुख्य प्रधान झालों आहे तो कांहीं ब्रिटिश साम्राज्याचें विसर्जन करण्यासाठीं नव्हे, ” असे उद्दाम उद्गार काढून, त्यानें भारताला स्वातंत्र्य देण्याचें साफ नाकारलें. रशियन क्रांतीनंतर रशियावर स्वारी करून तेथील कम्युनिस्ट राजवट उलथून पाडण्याचा त्यानें प्रयत्न केला आणि दुसरें महायुद्ध संपल्यावरहि अमेरिकेमधें फल्टन येथें भाषण करून, रशियन बोल्शेविझमचा शस्त्रबळानें निःपात करण्याची डरकाळी त्यानें फोडली ! केवळ कम्युनिझमलाच नव्हे तर ब्रिटिश मजूर पक्षाच्या मवाळ ‘ गुलाबी समाजवादालाहि ’ चर्चिलनें अखेरपर्यंत कट्टर विरोध केला. त्या मजूर पक्षामधल्या डाव्यांचे अध्वर्यु अर्नेस्ट बेव्हन हे चर्चिलइतकेच फटकळ जिभेचे होते, यामुळें पार्लमेंटमधे त्या दोघांची अशी कांहीं खडाजंगी उडे कीं कांहीं विचारूं नका ! चर्चिलच्या या कडव्या पुराणमतवादामुळें पहिल्या महायुद्धानंतर तो ब्रिटिश जनतेमधें कमालीचा अप्रिय झाला. खरें पाहतां शांतताकालीन नेत्याला लागणारे सहनशीलता, संयम, विधायक दृष्टि, इत्यादि गुण चर्चिलच्या अंगीं नव्हते, पण तो एक अप्रतिम युद्धनेता होता, यामुळें रणवाद्यांच्या तालावर थयथय करणाऱ्या नि शत्रूवर चौखूर चाल करण्यास सरावलेल्या घोडदळामधल्या एखाद्या उमद्या नि उच्छृंखल घोड्याला टांग्याला जुंपावें, तशी स्थिति शांतताकाळामधें चर्चिलची होत असे. पण जगावर दुसऱ्या महायुद्धाचें महासंकट कोसळलें, तेव्हां मात्र चर्चिलच्या महान् कर्तृत्वाची खरी कसोटी लागली. जर्मनीमधें हिटलरचा नि नाझी पक्षाचा उदय झाला, तेव्हांपासून त्यामुळें ब्रिटनला धोका आहे असें चर्चिल टाहो फोडून सांगत होते, पण हिटलर केवळ कम्युनिस्ट रशियावरच चाल करील नि त्या युद्धामधें त्या दोघांचाहि विध्वंस होऊन, जगभर ब्रिटनची मिरासदारी अनायासें स्थापन होईल अशा शेखमहंमदी मनोराज्यामधें टोरी पक्षाचे नेव्हिल चेंबर्लेन आदि सत्ताधारी गर्क होते. पण त्यांच्या त्या मनोराज्याचें गाडगें अखेर फुटलें नि दुसऱ्या महायुद्धाला तोंड लागलें. तेव्हां चेंबर्लेनला राजीनामा द्यावा लागला नि चर्चिलच्या दूरदर्शित्वामुळें नि झुंजार वृत्तीमुळें ब्रिटनचें पंतप्रधानपद अटळपणें त्याच्याकडे आलें. ‘ मी केव्हां ना केव्हां ब्रिटनचा पंतप्रधान होणार ’ ही चर्चिलची

अनेक वर्षांपूर्वींची प्रतिज्ञा अशा रीतीने पूर्ण झाली, पण अशा वेळीं कीं, त्याच्या जागीं कुणी कच्च्या दिलाचा इसम असता तर तो हृदयक्रिया बंद पडून तत्काळ मरण पावला असता. त्या वेळीं ब्रिटनची युद्धाची तयारी मुळींच नव्हती. बेल्जम नि फ्रान्स यांच्या सीमेजवळील डन्कर्कच्या किनाऱ्यावर ब्रिटिशांच्या नि फ्रेंचांच्या साडेतीन लाख फौजेपैकीं निम्याहून अधिक सैनिक हिटलरी फौजांच्या चढाईत ठार मारले गेले होते नि इतरांना मिळेल त्या जहाजांतून, अथवा होडग्यांतून ब्रिटिश खाडी ओलांडून कशीबशी माघार घ्यावी लागली होती. फ्रान्सच्या भ्रष्ट, अंदाधुंद नि फंदफितुरीनें पोखरलेल्या राजवटीचा हिटलरी फौजांच्या चढाईपुढें धुव्वा उडायला लागला होता. अशा स्थितींत ब्रिटनला वांचवण्याची अतिमानवी जबाबदारी चर्चिलवर येऊन पडली, तेव्हां तो एकान्तामधें ढसढसा रडला. पण त्यापाठोपाठ त्यानं ब्रिटिश जनतेला जो संदेश दिला, त्यानें सबंध राष्ट्रामधें जणुं दैवी रुद्रशक्तीचा संचार झाला. त्यानं सुरुवातीलाच प्रांजलपणें सांगितलें कीं, "मी तुम्हांला रक्त, घाम, श्रम आणि अश्रू यांच्याहून अधिक कांहीं देऊं शकत नाहीं." पण त्यापाठोपाठ त्याने गर्जना केली, "आम्ही शत्रूशीं भूमीवर लढूं, रस्त्यावर लढूं, कुंपणांमधें लढूं, शेतांमधें लढूं, सागरावर लढू, आणि जर हा देश सोडण्याची वेळ आली तर समुद्रपार जाऊन त्याच्याशीं लढूं, पण विजय मिळेपर्यंत लढण्याचं थांबणार नाहीं." त्या युद्धकाळातील चर्चिलचीं भाषणें म्हणजे वीररसपूर्ण वाङ्मयाचे अमर नमुने आहेत. केवळ बोलूनच थांबला नाहीं, तर अहोरात्र आपल्या बुद्धिमत्तेचें, निर्धाराचें नि कर्तृत्वाचें सर्वस्व पणाला लावून त्यानें ब्रिटनला रणसज्ज बनवलें. लंडनवर हिटलरच्या विमानदळाचा भयानक बॉंबवर्षाव होत असतांहि चर्चिल निधड्या छातीनें सैन्यतळावर हिंडत असे. त्याच्या त्या बेछूट साहसामुळें त्याच्यावर एक-दोनदा जवळ जवळ प्राणसंकटेंहि कोसळलीं होतीं. पण त्याच्या त्या निर्भयपणामुळें ब्रिटिश जनतेला मृत्युंजय शौर्याचा जणुं मूर्तिमंत आदर्शच लाभला. ब्रिटनचें आणि जगाचें हिटलरच्या सैतानी नाझीशाहीपासून रक्षण करण्याच्या त्या ऐतिहासिक कार्यासाठींच जणुं विधात्यानें चर्चिलला घडवला होता. दुसरें महायुद्ध संपल्यावर ब्रिटिश जनतेनें चर्चिलला बाजूला सारलें. पण त्या महायुद्धांत ब्रिटनला विजय मिळवून दिल्याबद्दल त्याच्याविषयीं कृतज्ञतेची भावना मात्र त्या जनतेनें सदैव कायम ठेवली. पण चर्चिल हा केवळ युद्धनेताच नव्हता. वैयक्तिक जीवनांत तो अत्यंत रसिक होता. तो एक उत्कृष्ट चित्रकार होता. त्याचें भाषाप्रभुत्व विलक्षण होतें. ब्रिटनच्या इतिहासाविषयीं त्यानें लिहिलेले ग्रंथ त्याच्या गाढ विद्वत्तेची साक्ष द्यायला पुरेसे आहेत. त्यानं युद्धकाळांतील आठवणींचा जो ग्रंथ लिहिला आहे, तो केवळ इतिहासवाङ्मयाचाच नव्हे तर जगामधल्या ललितसाहित्याचा एक श्रेष्ठ नमुना

आहे. चर्चिलमध्यें आयुष्यामधील सर्व सुखांचा उपभोग घेण्याची विलक्षण आसक्ति होती. नेता नि मित्र म्हणून उमदा होताच, पण त्याच्याइतका उमदा शत्रूहि आढळणें कठीण. म्हणून चर्चिलचे विचार नि करणी ज्यांना पटत नसत, त्यांचीं मस्तकेंहि त्याच्यापुढें आदरानें झुकल्याखेरीज राहात नसत. असा तो महापुरुष आतां गेला. पण जीवनाचा कांठोकांठ भरलेला प्याला पुरा प्राशन करून मग गेला, इतिहासावर आपलें कायमचें शिक्कामोर्तब करून गेला. गेल्यावरहि स्मृतिरूपानें चिरंजीव झाला. याहून अधिक भाग्यशाली मृत्यु तो कोणता!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलां
अनुक्रम 62272 वि. निबंध
क्र. 15756 ग्रं. क्र. 5211

# १३

## तात्या गेले !

अखेर आज तात्या गेले; आमचे तात्या सावरकर गेले ! मृत्यूशीं जवळ जवळ ऐंशी दिवस प्राणपणानें झुंज देतां देतां शेवटीं तात्या कामास आले. मृत्यूची अन् तात्यांची झुंज गेलीं साठ वर्षें चाललेली होती. दहा सालीं तात्यांनीं आपलें मृत्युपत्र लिहिलें; तेव्हां त्यांनीं स्पष्टच सांगितलें, कीं;

**कीं, घेतलें व्रत न हे आम्हीं अंधतेनें**
**लब्ध प्रकाश इतिहास–निसर्ग–मानें,**
**जें दिव्य, दाहक म्हणून असावयाचें,**
**बुद्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें !**

तात्या सावरकर कोण आहेत हे पुष्कळांना माहीत नाहीं. तात्या हे कवि आहेत, कादंबरीकार आहेत, नाटककार आहेत, लघुकथाकार आहेत, निबंधकार आहेत. मराठीप्रमाणें इंग्रजी भाषा त्यांच्या पायाचे तीर्थ घेते. त्यांच्या लेखनाचे एकंदर आठ खंड असून त्यांची साडेपांच हजार पानें होतात. मराठी भाषेंत विपुल लेखन करणारे पुष्कळ लेखक होऊन गेले आहेत. हरि नारायण आपटे, विठ्ठल सीताराम गुर्जर, नाथ माधव इत्यादि. पण तात्या सावरकरांएवढें प्रचंड लेखन

करणारा एकहि लेखक मराठी भाषेत आजपर्यंत होऊन गेलेला नाहीं. तात्यांची गंमत ही कीं ते नुसते क्रांतिकारक नव्हते, ते केवळ कवि आणि कादंबरीकार नव्हते, ते निबंधकार आणि नाटककार नव्हते, ते भारतीय इतिहासांतील एक चमत्कार होते. इंग्रजांनीं हा देश जिंकून निःशस्त्र केल्यानंतर पौरुषाची नि पराक्रमाची राखरांगोळी झाली. ती राख पुन्हा पेटवून तिच्यांतून स्वातंत्र्यप्रीतीचा आणि देशभक्तीचा अंगार ज्यांनीं बाहेर भडकविला, त्या ज्वलज्जहाल क्रांतिकारकांचे वीर सावरकर हे निःसंशय कुलपुरुष आहेत. भारतीय शौर्याचा आणि पराक्रमाचा तेजस्वी वारसा घेऊन सावरकर जन्माला आले. इतिहासाच्या धगधगत्या कुंडामधून त्यांचा पिंड आणि प्रज्ञा तावूनसुलाखून निघाली. सत्तावन्नच्या स्वातंत्र्यसमराची धग देशांतून नष्ट झालेली नव्हती. किंबहुना वासुदेव बळवंत फडक्यांच्या आत्मयज्ञाच्या वातावरणामधेंच सावरकरांचा जन्म झाला. चाफेकरबंधूंनीं दोन जुलमी इंग्रज अधिकाऱ्यांचें क्रांतिदेवतेच्या चरणीं बलिदान केलें. त्यांच्या प्राणज्योतीनें चेतविलेलें यज्ञकुंड भडकवीत ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे असा सावरकरांना साक्षात्कार झाला. घरांतल्या अष्टभुजादेवीपुढें त्यांनीं शपथ घेतली कीं, " देशाचें स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मी मारतां मारतां मरेतों झुंजेन ! " वयाच्या चौदाव्या वर्षीं मृत्यूला आव्हान देण्याची प्रतिज्ञा सावरकरांनी केली, आणि ती विलक्षण रीतीनें खरी करून दाखविली. सशस्त्र क्रांतीच्या मार्गानें जाण्याची केवळ प्रतिज्ञा करूनच सावरकर स्वस्थ बसले नाहीत, तर त्यासाठीं त्यांनीं क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळाची स्थापना करून श्रीशिवजयंतीच्या आणि गणेशोत्सवाच्या निमित्तानें क्रांतिकारकांची त्यांनीं संघटना निर्माण केली अग्निरसाच्या कारंजाप्रमाणें स्वातंत्र्याची ज्वलज्जहाल काव्यें सावरकरांच्या अलौकिक प्रतिभेमधून उचंबळूं लागलीं. स्वातंत्र्यलक्ष्मीला ' अरिरुधिराचें स्नान ' घातल्यावांचून ती प्रसन्न होणार नाहीं, ह्या मंत्राची जाहीर दीक्षा देशांतील तरुणांना देऊन सशस्त्र क्रांतीची मुहूर्तमेढ सावरकरांनीं ह्या शतकाच्या प्रारंभीं रोवली ही गोष्ट महाराष्ट्र विसरूं शकत नाहीं ! सात सालच्या अखेरपासून देशांत बॉम्बचे आणि पिस्तुलाचे आवाज ऐकूं यावयाला लागले. बाँबचे पहिले दोन बळी आठ सालच्या प्रारंभीं खुदीराम बोस ह्या अठरा वर्षांच्या क्रांतिकारक तरुणानें मुझफरपूर येथें घेऊन सशस्त्र क्रांतीचा मुहूर्त केला. सत्तावनी क्रांतियुद्धांत अमर झालेल्या हुतात्म्यांची शपथ घालून सावरकरांनीं भारतामधल्या क्रांतिकारकांना त्या वेळीं बजावलें कीं, ' १० मे १८५७ रोजीं सुरू झालेला संग्राम अद्याप संपलेला नाहीं. सौंदर्यसंपन्न भारताच्या डोक्यावर विजयाचा देदीप्यमान मुकुट जेव्हां चढेल, तेव्हांच हा स्वातंत्र्यसंग्राम संपेल ! ' अशा रीतीनें वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षीं सावरकर हे भारतांतल्या सशस्त्र क्रांतीचे सूत्रधार बनले. आठ सालच्या

जुलै महिन्यांत लोकमान्य टिळकांना सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा झाली. त्यानंतर विलायतेमधील भारत मंत्र्यांचे सहाय्यक सर कर्झन वायली ह्यांना एका मेजवानीच्या प्रसंगीं मदनलाल धिंग्रा ह्या पंचवीस वर्षांच्या तरुणानें गोळ्या घालून ठार केलें. धिंग्राजी फांशी गेले. त्यांच्या फांशीनंतर अवघ्या साडेचार महिन्यांनी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन ह्यांना भर नाटकगृहांत अनंत कान्हेरे नि त्याचे दोघे सहकारी ह्यांनीं गोळ्या घालून ठार केलें. त्यानंतर लंडनमधें आपलें क्रांतिकार्य निर्वेधपणें करणें सावरकरांना शक्यच नव्हतें. अडीच महिन्यांनंतर त्यांना पकडून ' मोरिया ' बोटींतून स्वदेशीं पाठवण्यांत आले असतांना त्यांनीं मार्सेल्स बंदरांत एका पहांटे पोलिसांचा पहारा चुकवून बोटीमधून समुद्रांत उडी मारली. ही उडी म्हणजे वीर सावरकरांच्या पराक्रमाच्या सुवर्णकळसच होय. ही त्यांची उडी त्रिखंडांत गाजली. त्यानंतर ब्रिटिश सरकारनें सावरकरांवर खटला भरून त्यांना दोन जन्मठेपींच्या शिक्षा दिल्या. त्या वेळीं सावरकर अवघे अठ्ठावीस वर्षांचे होते. भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामाला आंतरराष्ट्रीय स्वरूप देणारे सावरकर हे पहिले क्रांतिकारक होते. म्हणूनच ' भारतीय क्रांतिकारकांचे मुकुटमणि ' असें त्यांना म्हटलें जातें. क्रांतिकारक सावरकरांचें अवतारकार्य येथें समाप्त झालें. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं जर सावरकर यूरपमध्यें मोकळे असते, तर ' आझाद हिंद 'चा झेंडा त्यांनीं सुभाषबाबूंच्या आधीं तेथें फडकाविला असता ह्यांत काय संशय ! म्हणून आम्हीं म्हणतों कीं भारताच्या सशस्त्र क्रांतीचा सावरकर हे ' पाया ' आणि सुभाषचंद्र हे ' कळस ' आहेत ! भारतांत गेल्या दीडशें वर्षांत अनेक क्रांतिकारक होऊन गेले. पण स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखा महान् क्रांतिकारक आजपर्यंत केवळ भारतांतच नव्हे, पण जगात झालेला नाहीं. वीर सावरकरांनीं हजारों पानें लिहिलीं. उत्कृष्ट लिहिलीं. तुरुंगामधें दहा हजार ओळी तोंडपाठ करून एका आचार्‍यामार्फत त्या भारतात पाठवल्या. कॉंग्रेसच्या राज्यांत सावरकरांना कांहीं किंमत राहिली नाहीं. उलट, गांधीजींचे खुनी म्हणून त्यांना पकडून त्यांची जास्तींत जास्त मानहानि अन् बदनामी करण्याचा भारत सरकारनें प्रयत्न केला. पण त्या अग्निदिव्यांतून ते सहीसलामत सुटले. मानवी जीवनांत असा एक विषय नाहीं कीं ज्यावर सावरकरांनीं लिहिलेलें नाहीं. त्र्यायशीं वर्षांचें जीवन ते जगले. त्यांना आता जीवनांत रस म्हणून राहिला नाहीं. आत्मार्पण करण्याचे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले. आजपर्यंत महापुरुषांनीं आणि साधुसंतांनीं जें केलें त्याच मार्गानें जाण्याचा त्यांनीं निर्धार केला. कुमारिल भट्टानें अग्निदिव्य केलें. आद्यशंकराचार्यांनीं गुहाप्रवेश केला. वैष्णवाचार्य गौरांगप्रभूंनीं जगन्नाथपुरीच्या श्यामल सागरांत ' हे कृष्ण, हे श्याम ' असा आक्रोश करीत प्रवेश करून जलसमाधि घेतली. ज्ञानेश्वरांनीं वयाच्या एकविसाव्या वर्षीं आळंदीला समाधि

घेतली. समर्थ रामदासांनीं शिवरायांच्या मृत्यूनंतर अन्नत्याग करून रामनामाच्या गजरांत आत्मार्पण केलें. एकनाथांनीं गंगेमध्यें समाधि घेतली. तुकोबा 'आम्ही जातो आमुच्या गांवा। आमुचा रामराम घ्यावा।' असें म्हणत म्हणत वैकुंठाला गेले. त्याचप्रमाणें स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांनीं प्रायोपवेशन करून आत्मार्पण करविण्याचें ठरविलें. कारण, त्यांना ह्या आयुष्यांत इतिकर्तव्य म्हणून कांहींच उरलें नाहीं.

**धन्योऽहम। धन्योऽहम।**
**कर्तव्यं मे न विद्यते किंचित्**
**धन्योऽहम। धन्योऽहम।**
**प्राप्तव्यम् सर्वमद्य संपन्नम् ॥**

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दि.

# १४

## महाकवि सावरकर

क्रांतिकारक पुरुष हे क्वचित्‌च साहित्यिक असतात आणि साहित्यिक हे क्वचित्‌च क्रांतिकारक असतात. पण सावरकर हा जगामध्यें असा एकच क्रांतिकारक होऊन गेला, कीं जो साहित्याच्या नि क्रांतीच्या शिखरावर आरूढ झालेला होता. किंबहुना साहित्यानेंच त्यांना क्रांतीची वाट दाखविली. साहित्याचा असा एक भाग नव्हता कीं ज्यामध्यें सावरकरांनीं वैभवानें संचार केलेला नाहीं. ‘कवि हा जन्मावा लागतो’ असें वचन आहे. तें सावरकरांच्या बाबतींत सर्वस्वीं खरें आहे. सावरकर हे कवि म्हणूनच जन्माला आले. जन्मापासून सरस्वती त्यांच्या जिव्हाग्रावर नाचत होती. आणि सरस्वती आरंभापासून देशभक्तीचीं गाणीं गाऊं लागली. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनीं ‘स्वदेशीचा फटका’ रचला. त्या फटक्यामधला त्यांचा त्वेष नि आवेश पहाण्यासारखा आहे :

आर्य बंधु हो, उठा उठा का
मठासारखे नटा सदा ।
हटा सोडुनी कटा करूं या
म्लेंच्छपटा ना धरूं कदा ।

**काश्मीराच्या शाली त्यजुनी**
**अलपाकाला का भुलता ?**
**मलमल त्यजुनी वलवल चित्तीं**
**हलहलके पट का वरिता ?**

रँडसाहेबाचा वध केल्यामुळें चाफेकर-बंधु नि रानडे फांशी गेले; त्याव' सोळा वर्षांच्या सावरकरांनीं फटका लिहून शेवटीं अगदीं उघडपणें सांगितलें कीं,

**कार्य सोडुनि अपुरे पडला झुंजत ।**
**खंती नको पुढें ।**
**कार्या चालवुं गिरवुनि तुमच्या**
**पराक्रमाचें अम्ही धडे ।**

रँडसाहेबांचा खून करणाऱ्या चाफेकरांच्या पराक्रमाचे आम्हीं धडे गिरवूं! अशी वयाच्या सोळाव्या वर्षीं सावरकरांनीं जेव्हां प्रतिज्ञा केली त्याच वेळीं खऱ्या क्रांतिकारक सावरकरांचा जन्म झाला. ' स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन चाफेकर फांसावर चढले. त्यांच्या प्राणज्योतीनें जातां जातां चेतविलेली शत्रुंजय वृत्ति, यज्ञकुंडांत समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणें असेल तर त्याचें दायित्व आपल्यावरहि पडत आहे, हा विचार माझ्या मनांत बळावूं लागला ' असे सावरकरांनीं आपल्या आत्मवृत्तांत लिहून ठेवलेलें आहे. अगदीं त्याच मानसिक प्रक्षोभावस्थेंत आपल्या घरांतील ' अष्टभुजा देवी 'समोर एकाग्रचित्त करून त्यांनी शपथ घेतली कीं, " देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मी मारतां मारतां मरेतों झुंजेन ! " काव्यांतून क्रांति आणि क्रांतीमधून काव्य हें सावरकरांच्या जीवनाचें रहस्य होतें. स्वातंत्र्यप्राप्ती-साठीं हौतात्म्य केलें पाहिजे ही कल्पना त्यांच्या मनामध्यें पहिल्यापासून मूळ धरून बसली. म्हणून ज्या ज्या वीरांनीं देशासाठीं आत्मार्पण केलें त्यांच्या त्यांच्या चारित्रांचे पोवाडे रचून जनतेला ऐकवावयाचे असा त्यांनीं निर्धार केला. त्या निर्धारांतून त्यांचे ' सिंहगडाचा पोवाडा ' आणि ' बाजी देशपांड्याचा पोवाडा ' हे दोन अप्रतिम पोवाडे निर्माण झाले. १९०६ सालीं आम्ही आठ वर्षांचे असतांना सावरकरांचा 'सिंहगडाचा पोवाडा' आम्ही सासवडच्या गणपति मेळ्यांत गाइला. त्या वेळीं त्याच्या ज्या ओळी आमच्या स्मरणांत राहिल्या, त्या आजहि आठवतांना आमच्या सर्वांगावर कंप उठतो. वाहवा ! वाहवा ! असें काव्य आधुनिक काळांत कोणत्याहि कवीनें लिहिलेलें नाहीं. ऐका त्या सावरकरांच्या अमर ओळी :

**धन्य शिवाजी, तो रणगाजी,**
**धन्यचि तानाजी ।**
**प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गा जी ।**

गेलीं साठ वर्षें ह्या ओळी आम्ही गुणगुणतों आहोंत. आम्ही आयुष्यांत पुष्कळ काव्यें वाचलीं ऐकलीं अन् लिहिलीं पण ! पण सावरकरांच्या 'सिंहगडाच्या पोवाड्या'सारखें काव्य आम्ही कधींहि वाचलें नाहीं. जेव्हां सिंहगडाच्या डोणागिरी कड्यावर यशवंती घोरपडीच्या कमरेला बांधलेल्या दोरावर तानाजी चढूं लागले, तेव्हां सावरकरांच्या प्रतिभेमधून पुढील ज्वलन्त ओळी प्रकट झाल्या :

तानाजि चढूं लागले ।
सद्भाग्य चढूं लागले ।
स्वातंत्र्य चढूं लागले ।

सांभाळी रे, म्लेंच्छा आला ।
आला तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गा जी ।

सिंहगडाच्या पोवाड्यानंतर सावरकरांनीं श्री बाजी देशपांड्याचा पोवाडा लिहिला. त्याची सुरुवात :

जयोऽस्तु ते श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे ।
स्वतंत्रते भगवती, त्वामहं यशोयुतां वंदे ।

ह्या स्फूर्तिदायक ओळींनीं त्यांनीं केली.

जय स्वतंत्रतेचा बोला ।
जय राष्ट्रदेविचा बोला ।
जय भवानिकी जय बोला ।

अशा तऱ्हेचा क्रांतिकारक जयजयकार करण्याचें सामर्थ्य त्या काळीं फक्त सावरकरांच्या वाणींत होतें. पुढें सावरकर विलायतेला गेले. मध्यंतरीं सर कर्झन वायली आणि नाशिकचे कलेक्टर जॅक्सन ह्यांचा खून झाला. त्यामुळें सावरकरांवर ब्रिटिश सरकारची वक्रदृष्टि झाली. आपण आतां लौकरच पकडले जाऊं, पुन्हां आपल्याला भारताला परत जातां येणार नाहीं ह्या जाणिवेनें अत्यंत व्याकुळ होऊन सावरकरांनीं 'ब्रायटन' च्या समुद्र किनाऱ्यावर 'सागरास—' ही आपली अमर कविता लिहिली :

ने मजसी ने परत मातृभूमीला ।
सागरा प्राण तळमळला !
शुक पंजरिं वा हरिण शिरावा फांशीं ।
ही फसगत झाली तैशी ।

भू-विरह कसा सतत साहुं ह्या पुढतीं।
दशदिशा तमोमय होती।
जरि आंग्लभूमि भयभीता। रे
अबला न माझिही माता। रे
कथिल हे अगस्तिस आतां रे।
जो आचमनीं एकाची तुज प्याला।
सागरा प्राण तळमळला!

हें काव्य सावरकर अंदमानमध्ये असतांना कोणी तरी महाराष्ट्रांत आणलें. आणि तें चोरून चार मंडळींत म्हणतांना आमच्या अंगावर त्या वेळीं जे रोमांच उठत त्याचें आज वर्णन करणें शक्य नाहीं. दोन जन्मठेपेची शिक्षा घेऊन जेव्हां सावरकरांनीं अंदमानच्या नरकपुरींत प्रवेश केला, त्या रात्रीं कारागृहाच्या जाळ्यामधून आकाशांत दिसणारे 'सप्तर्षि' पाहून त्यांनीं त्यांच्यावर अमर कविता लिहिली. तिच्या जवळजवळ पांचशें ओळीं होत्या. विश्वरत्न जयंतराव नारळीकर ह्यांनीं 'विश्वस्वरूप' ह्या विषयावर बोलतांना असे उद्गार काढले कीं, "ह्या विश्वांत मानवापेक्षांहि बुद्धिमान् अशा प्राण्यांचें अस्तित्व असावें असें मला वाटतें. मानवापेक्षांहि सूक्ष्म विचारशक्ति असलेले प्राणी या विश्वांत वसति करून असावेत आणि ते आपल्याला संदेश पाठवीत असावेत, पण ते आकलन करण्याचीं साधनें नि ज्ञान आपणाजवळ नसल्यानें दूरध्वनीच्या तारांवरील कीटकांना त्या तारांमधून चालणारें संभाषण जसें समजत नाहीं, तसें त्यांचें ते संदेश आपणांस समजत नाहींत!" आतां पंचावन्न वर्षांपूर्वीं सावरकरांनीं 'सप्तर्षि' ही जी कविता लिहिलेली आहे, तिच्यांत नारळीकरांनीं सांगितलेलें वरील सत्य त्यांनीं काव्यात्मक स्वरूपांत सांगितलेलें आहे, हें आश्चर्य नव्हे काय?

रस, रूप, गंध, शब्द स्पर्शांसी
जाणतोच तनु ज्यासी।
वसती वसुधेवरती अपुल्या
आम्हां समान मनुजांसी।
उत्क्रांति गतिपरत्वें वा जे
इंद्रियरसासि अनुभविती।
पांचाहूनि या अधिका नानाविध
जीं विकीर्ण ही भवतीं।
आम्हांसि अगोचर परि यास्तव
गोचर जयाप्रति असती।

**गौप्यें विगूढ सृष्टिचि, कीं मानव**
**असे तिथें वसतीं।**

'जगन्नाथाचा रथोत्सव' हें तीनच कडव्यांचें काव्य आहे. पण त्या एका काव्यानें सावरकरांना कवि म्हणून अमर केलेलें आहे. जगन्नाथपुरींत प्रतिवर्षीं जगन्नाथाच्या रथाची मिरवणूक म्हणजे एक उदात्त नि विशाल प्रतीक आहे. त्यांत जगन्नियंता जगन्नाथ गतीचे अश्व जुंपलेल्या दिक् क्षितिजांच्या रथांत बसून काळाच्या अतूट उतरणविरून कोठें तरी जात आहे, याबद्दल कवीनें साश्चर्य प्रश्न केलेला आहे. ह्या कवितेमधील रूपक उलगडून सांगण्याचा जर प्रयत्न केला, तर एक सांगोपांग लेखच लिहावा लागेल, असें तात्यासाहेब केळकर म्हणतात. विद्वत्व आणि कवित्व हातांत हात घालून चाललेलें ह्या कवितेंत दिसतात. अंदमानच्या बंदीवासांत असतांना कारागृहाच्या भिंतींवर त्यांनीं आपलें 'कमला' हें खंडकाव्य लिहिलें. अगदीं लहानपणापासून 'पानिपत' ह्या विषयावर महाकाव्य लिहिण्याचें सावरकरांनी ठरविलें होतें. ह्या महाकाव्याचा एक भाग म्हणून त्यांनीं 'कमला' काव्य लिहिलें. हें काव्य वाचतांना कविकुलगुरु कालिदासाच्या 'रघुवंशा' चा एखादा सर्गच वाचल्याचा भास होतो. कल्पना-सौंदर्यानें बहरलेलें एवढें रमणीय शृंगारकाव्य मराठी भाषेंत दुसरें नाहीं. ह्या काव्याची पार्श्वभूमि अतिशय भव्य आणि उदात्त अशी आहे. कल्पनांची कोमलता तर पराकाष्ठेची आहे. शृंगारानें थोडीशी सीमा ओलांडलेली आहे. तरी त्या शृंगाराच्या माथ्यावर वीररसाने पाय ठेवलेला आहे. ह्या काव्यांतल्या शंभर-सव्वाशें ओळींत सावरकरांनीं बागेंतल्या फुलांचें जें वर्णन केलें आहे, त्याला मराठी वाङ्मयांत दुसरी तोड नाहीं. प्रत्यक्ष 'कालिदास' च मराठींत अवतरल्याचा भास व्हावा, इतकी उपमांची सुंदर पखरण नि शृंगाराची मनोहर खुलावट 'कमला' काव्यांत साधलेली आहे.

**सुरम्य मखरामाजी रमणी मग जें बसे।**
**श्लोकांत कालिदासाच्या उपमाच तशी दिसे॥**

हें मखराच्या शोभिवंत चौकटींत बसलेल्या ऋतुमती आणि लावण्यवती कमलेचें वर्णन वाचून उपमाप्रभू कालिदासानें सुद्धां कौतुकानें मान डोलावली असती 'कमला' प्रमाणें 'गोमांतक' ह्या प्रदीर्घ काव्यांत उज्ज्वल प्रतिभा नि भव्य जीवनदर्शन असून तंत्रदृष्टीने सुद्धां तें 'कमले' प्रमाणेंच महाकाव्य ठरणारें आहे. ह्या काव्यांतील उपमादृष्टान्तादि अलंकारांची बहारदार योजना नि कथानकाचा स्वाभाविक विकास यांमुळें ह्या काव्याचें वैभव अवर्णनीय झालेलें आहे. 'कमला' हें काव्य सावरकरांनीं 'अनुष्टुभ्' वृत्तांत लिहिलेलें असलें तर 'गोमांतक' हें

काव्य स्वयंनिर्मित अशा ' वैनायक ' वृत्तांत लिहिलेलें आहे. प्रासाची नि यमकाची बंधनें न पाळतां आणि त्याचबरोबर तीं न सोडतां गद्याच्या आवेशानें जें म्हणतां येतें तें ' वैनायक ' वृत्त. महाकाव्याला हें वृत्त अत्यंत अनुकूल आहे. सावरकरांचा एकंदर काव्यसंग्रह चारशें डेमी आकारांच्या पृष्ठांचा आहे. सर्व काव्यांतून देशभक्तांचा ज्वालाग्राही रस उकळतो आहे. स्वातंत्र्यप्रेमाचा वह्नि प्रत्येक काव्याच्या ओळीओळींमधून भडकतो आहे. मराठी भाषेंत आधुनिक काळांत कवि पुष्कळच होऊन गेले; पण देशभक्तीनें आणि स्वातंत्र्यप्रेमानें ओथंबलेलें महाकाव्य फक्त सावरकरांनींच लिहिलेलें आहे.

# १५

# शेवटचा प्रणाम

वीर सावरकरांचें चरित्र जेवढें गावें आणि जेवढें सांगावें तेवढें थोडेंच आहे. त्यासाठीं एखादा व्यासासारखा किंवा वाल्मीकीसारखा महाकवीच हवा होता. कारण, सावरकरांचें चारित्र म्हणजे एक ' महाभारत 'च आहे. भारतीय युद्ध फक्त अठरा दिवसच चाललें होतें. पण सावरकरांच्या जीवनाचा संग्राम तेविसाव्या वर्षापासून तो त्र्याऐंशीव्या वर्षापर्यंत अखंड साठ वर्षं चालला होता. आपली मातृभूमि स्वतंत्र व्हावी म्हणून त्यांनीं जन्मापासून जणुं कांहीं प्राणयज्ञच आरंभलेला होता. त्या यज्ञांत त्यांनीं कशाकशाच्या आहुति म्हणून अर्पण केल्या? आपल्या तारुण्याची. आपल्या संसाराची. आपल्या घरादाराची. आपल्या शरीराची आपल्या सुखसर्वस्वाची. देशासाठीं त्यांनीं आपल्या साऱ्या आयुष्याची जाळून राखरांगोळी करून टाकली. स्वदेशावर प्रेम करणारे देशभक्त आजपर्यंत जगांत काय कमी होऊन गेले? पण त्या देशप्रेमासाठीं एवढ्या अनन्वित यातना भोगणारे, एवढें पराकाष्ठेचें हौतात्म्य पत्करणारे आणि एवढ्या प्राणांतिक

अग्निदिव्यांतून जाणारे किती देशभक्त जगाच्या पाठीवर आढळतील बरें ? सावरकरांच्या जीवनांतली प्रत्येक घटना कादंबरीपेक्षांहि अद्‌भुतरम्य आहे. शोकान्त नाटकापेक्षांहि अधिक भयानक व रोमांचकारी आहे. आयुष्यांत त्यांच्यावर संकटांचे डोंगरच्या डोंगर कोसळले. आपत्तीच्या विजा कित्येकदा तुटून पडल्या. मृत्यूनें तर त्यांचा जन्मभर पाठलाग केला. परंतु त्यांच्या मस्तकावर परमेश्वरानेंच जणु कांहीं वरदहस्त ठेवलेला होता, किंवा एखाद्या जबरदस्त मांत्रिकानेंच त्यांचें जीवन मंतरून ठेवलेलें होतें. म्हणून आपला देश स्वतंत्र झालेला स्वतःच्या डोळ्यांनीं पाहण्याचें भाग्य त्यांना लाभलें. एकोणतीस साली 'संपूर्ण स्वातंत्र्या'ची घोषणा केल्याचें श्रेय पंडित नेहरू ह्यांना दिलें जातें. पण त्याच्या आधी पंचवीस वर्षें – कीं ज्या वेळीं 'स्वराज्य' शब्द उच्चारल्याबद्दल काळ्या पाण्याची शिक्षा होत असे, त्या वेळीं संपूर्ण राजकीय स्वातंत्र्याची उघडपणें घोषणा करण्याचें अचाट धैर्य सावरकरांनी दाखविलें होतें. भारतीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्याबद्दल नेहरूंची प्रशंसा करण्यांत येते. पण भारतीय स्वातंत्र्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रांतिकारकांची संघटना स्थापन करून दाखविण्याचा चमत्कार सावरकरांनीं वयाच्या तेविसाव्या वर्षीं करून दाखविला होता. शाई आणि लेखणी हातीं नसतांना हजारो ओळींचीं काव्यें रचावयाचीं आणि तीं इतरांना पाठान्तर करावयाला लावून जनतेपर्यंत पोहोंचवावयाचीं, असले अलौकिक चमत्कार वैदिक काळांत होत असत, असें म्हणतात. पण विसाव्या शतकांत ते सर्व चमत्कार सावरकरांनीं करून दाखविले. गेल्या अर्धशतकांत भारतांत एकापेक्षांहि एक महान् असे अनेक वक्ते होऊन गेले. त्यांपैकीं जे प्रभावी वक्ते होते, त्यांचीं व्याख्यानें फार थोड्यांना समजत आणि ज्यांच्या व्याख्यानाला लाखों लोक जमत, त्यांच्याजवळ वक्तृत्व बेताचें असे. पण लाखों लोकांना आपल्या झंझावाती वक्तृत्वानें हालवून आपल्या विरोधकांची दाणादाण करून सोडणारा सावरकरांसारखा झुंझार वक्ता आधुनिक काळांत दुसरा झालाच नाहीं. भारतांत लेखक पुष्कळ झाले आणि क्रांतिकारकहि पण पुष्कळच झाले ! पण जवळ जवळ दहा हजार पानांचें अमर वाङ्मय लिहिणारा युगप्रवर्तक क्रांतिकारक ह्या जगांत तरी कोणी झाला आहे काय ? ज्याला भारतीय क्रांतीचा अभ्यास करावयाचा आहे, त्याला सावरकरांच्या ह्या साहित्यसागरांत अवगाहन केल्यावांचून गत्यंतरच नाहीं. छत्रपति शिवाजीमहाराजांपासून तो सत्तावनी स्वातंत्र्यसंग्रामाचे सेनापति नानासाहेब पेशवे ह्यांच्यापर्यंत जे जे ह्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं तळहातावर शिर घेऊन लढले आणि ब्रिटिशांच्याविरुद्ध ज्या ज्या वासुदेव बळवंत फडक्यांसारख्या वीरांनीं बंडाचे झेंडे उभारले, त्यांचा त्यांचा संचार सावरकरांच्या अंगांत झालेला होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर,

लोकमान्य टिळक आणि शिवराम महादेव परांजपे ह्यांची राष्ट्रप्रेमानें रसरसलेली ज्वलंत प्रतिभा सावरकरांच्या ओठांवर नाचत होती. म्हणून क्रांतिरसाचीं कारंजीं सावरकरांच्या वाणींतून आणि लेखणींतून एकसारखीं उचंबळलेली आढळून येतात. राजकारणांत सावरकर हे जेवढे क्रांतिकारक होते, तेवढेच सामाजिक क्षेत्रांतहि ते ज्वलंत नवमतवादी होते. जातिभेद आणि अस्पृश्यता ह्यांचें उच्छेदन करून हिंदुसमाजांत समता आणि सामर्थ्य प्रस्थापित करण्याचा त्यांनीं आयुष्यभर प्रयत्न केला. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत ‘ हिंदु ’ धर्मातील रूढ आचारांची नि विचारांची एवढी विटंबना मिशनऱ्यांनीं आणि साहेबांनीं केलेली होती, कीं ‘ हिंदु ’ माणूस म्हटला म्हणजे तो वेडगळ, अजागळ आणि रानटी असलाच पाहिजे असा त्या शब्दाचा पर्याय होऊन बसला. त्यामुळें सुशिक्षित माणसाला आपण ‘ हिंदु ’ आहांत असें सांगण्याची त्या काळीं लाज वाटूं लागली. महात्मा गांधींनीं तीच परंपरा निराळ्या रीतीनें पुढें चालवून काँग्रेसच्या राजकारणांतून ‘ हिंदु ’ शब्दाची हाकालपट्टी करून टाकली. आणि हिंदुत्वाचा अभिमान धरणें म्हणजे शुद्ध जातीयवाद आहे, असा त्यावर कायमचा शिक्का मारून ठेवला. सावरकरांचें हिंदुत्वनिष्ठ राजकारण ही गांधीवादी राजकारणाची एक प्रखर प्रतिक्रिया होती. सावरकरांचें ‘ हिंदुत्व ’ हे धर्मवाचक नव्हतें तें राष्ट्रीयत्ववाचक होतें. गांधी हे वर्णाश्रम धर्माचे कैवारी होते, तर सावरकर हे वर्णाश्रम धर्माचे वैरी होते, ही खरी गंमत आहे. देहाच्या तुकड्यांची भाषा गांधीजींनी कितीहि केली असली, तरी मुसलमानांना खूष करण्यासाठीं देशाचे तुकडे करावयाला अखेर गांधीजी तयार झाले. पण स्वतःच्या देहाचे तुकडे तुकडे झाले असते तरी भारताची बोटभर जमीन दुसऱ्याला द्यावयाला सावरकर कधींहि तयार झाले नसते. हा गांधीजी आणि सावरकर ह्या दोघांच्या देशभक्तीमधला महत्त्वाचा फरक आहे. देशाची फाळणी केल्यानंतर हिंदु-मुसलमानांचें ऐक्य होईल हें गांधी-नेहरूंचें स्वप्न किती फोल ठरलें, तें आज जगजाहीर आहे. सावरकर हे हिंदु-राष्ट्रवादाचे कट्टर प्रणेते असले तरी ते कोणत्याहि धर्माचे द्वेष्टे नव्हते. पण देशभक्तीच्या बाबतींत भारतांत राहणाऱ्या कोणत्याहि धर्मीयाला वा जातीयाला कसलीहि राष्ट्रद्रोही सवलत द्यावयाला ते तयार नव्हते. त्यांची हिंदुत्वाची व्याख्या इतकी व्यापक होती कीं, ह्या भारताला जो आपली पुण्यभूमि आणि पितृभूमि मानतो, तो हिंदु—मग त्याचा व्यक्तिगत धर्म कांहीहि असो. हिंदुसभेच्या अध्यक्ष-स्थानावरून त्यांनीं ‘ सावरकर—भारता ’चें काय स्वरूप राहील ह्याचा तपशील-वार आराखडा रेखाटलेला आहे, त्यांतला कांहीं भाग येथें देतों : ‘ सावरकर-भारतां ’त जात, पंथ, वंश किंवा धर्म ह्यांचा विचार न करतां सर्व नागरिकांचे हक्क आणि कर्तव्यें सारखीं रहातील. सर्व अल्पसंख्याकांच्या भाषेला, धर्माला,

संस्कृतीला योग्य तें संरक्षण दिलें जाईल. पण त्यांना देशामधें स्वतंत्र राज्य बनविण्याचा वा बहुसंख्याकांच्या कायदेशीर हक्कांवर आक्रमण करण्याचा अधिकार दिला जाणार नाहीं. सर्व नागरिकांना उच्चाराचें, विचाराचें, पूजेचें आणि सभेचें मूलभूत स्वातंत्र्य सारखेंच उपभोगितां येईल. मात्र सार्वजनिक शांतता, व्यवस्था आणि आणीबाणी ह्यांच्या रक्षणार्थ जेव्हां ह्या स्वातंत्र्यावर निर्बंध घातले जातील, तेव्हां ते धार्मिक किंवा वांशिक दृष्टीनें घातले न जातां केवळ राष्ट्रहिताच्या दृष्टीनेंच घातले जातील. एका माणसाला एक मत हा हक्क सर्व नागरिकांना सारखाच राहील. मतदार-संघ संयुक्त रहातील. नोकऱ्या गुणांचा विचार करून दिल्या जातील. प्राथमिक शिक्षण सक्तीचें आणि मोफत राहील. हिंदी ही देशाची राष्ट्रभाषा आणि संस्कृत ही देवभाषा राहील. नागरी ही राष्ट्रीय लिपि राहील. हिंदूंचें फसवणुकीनें आणि जबरदस्तीनें धर्मान्तर करतां येणार नाहीं. हिंदुसमाजांत जाति रहाणार नाहींत. आंतरजातीय विवाहाला उत्तेजन देण्यांत येईल. प्रेतांचें दहन विजेनें करण्यांत येईल. वगैरे वगैरे. त्याखेरीज उद्योगधंद्यांचें आणि शेतीचें राष्ट्रीयीकरण करणें, जमीनदारी नष्ट करणें, औद्योगिक नफ्यांतलें मोठें प्रमाण कामगारांना वांटणें ह्या समाजवादाच्या मूलभूत कल्पना सावरकरांनीं आपल्या 'घटनें'त मांडलेल्या आहेत. सावरकरांनीं केवळ क्रांतीचाच विचार केला नव्हता. तर देशाच्या विधायक राजकारणाचाहि त्यांनीं अत्यंत आधुनिक दृष्टिकोणांतून विचार केला होता, त्याची पुष्कळांना कल्पना नसेल. सावरकर हे जसे स्वप्नाळू कवि होते, तसे ते कर्मयोगीहि होते. ते द्रष्टे होते, तसे योद्धेहि होते. ते क्रांतिकारक होते, तसे वास्तववादीहि होते. आपल्या त्र्याऐंशी वर्षांच्या आयुष्यांत त्यांनीं भारताच्या स्वातंत्र्याखेरीज आणि उद्धाराखेरीज कशाचाहि विचार केलेला नाहीं. त्यांच्या श्वासांत भारताचें प्रेम आणि निःश्वासांत भारताची चिंता भरलेली होती. देशाच्या संरक्षणाचा तर सावरकरांखेरीज दुसऱ्या कोणत्याहि देशभक्तांनी किंवा नेत्यांनीं विचारहि केलेला नाहीं. भारताला सैन्याची आतां काय जरूरी आहे असें उघडपणें विचारणारे दीड शहाणे नेते काँग्रेसमधें ह्या क्षणीं आहेत. गांधीजींच्या अहिंसेनें इतकीं वर्षें राष्ट्राची दिशाभूल आणि अधोगति झालेली होती. चीननें पराभव केल्यानंतर मग भारताचे शेवटीं डोळे उघडले आणि सैनिकीकरणावांचून देशाला तरणोपाय नाहीं ह्या सावरकरांच्या आदेशाचें महत्त्व देशाला कळून चुकलें. आम्ही तर म्हणतों 'बावीस दिवसां'च्या 'त्या' युद्धांत भारतीय जवानांनीं पाकिस्तानी सेनेचा जो धुव्वा उडवला तो शास्त्रीजींच्या मुत्सद्देगिरीचा जसा जय आहे, तसा तो सावरकरी तत्त्वाचाहि प्रचंड विजय आहे. जसा जसा काळ पुढें जाईल, तशी तशी वीर सावरकरांनीं ह्या देशाची केवढी देदीप्यमान सेवा केली हें पुढील पिढ्यांना

कळून चुकेल. सावरकरांच्या ‘ मृत्युंजय ’ जीवनावर अखेर त्यांच्या आत्मार्पणानें जो सुवर्णकळस चढविला, त्याला जगांत तोड नाहीं. जो मृत्यु जन्मभर त्यांच्या-मागें हात धुऊन लागला होता, आणि ज्याला त्यांनीं आपल्या अंगाला एकदाहि स्पर्श करून दिला नव्हता, त्या मृत्यूला त्यांनीं अखेर ‘ मारलें ’ अन् मग ते मरण पावले. असे ‘ इच्छामरणी ’ तपस्वी भारतांत किती आढळतील ? गांधीजींना दुसऱ्यानें मरण दिलें. सावरकरांनीं आपण होऊन मरण पत्करलें. वा रे वा ! कोण महात्मा अन् कोण हुतात्मा ? कॉंग्रेसच्या राजवटींत भारतीय स्वातंत्र्याचा खरा इतिहास लिहिला जाणें मुळीं शक्यच नाहीं. पण ही राजवट कांहीं अमरपट्टा घेऊन आलेली नाहीं. जेव्हां भारतीय स्वातंत्र्याचा खरा इतिहास लिहिण्यासाठीं उद्यांचे इतिहासकार बसतील, तेव्हां विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभी असलेली आणि ब्रिटिश साम्राज्याच्या छाताडावर पाय ठेवून भारतीय स्वातंत्र्या-साठीं साऱ्या जगांत टाहो फोडणारी स्वातंत्र्यवीर सावरकरांची तेजस्वी मूर्ति त्यांना प्रथम रंगवावी लागेल ! भारताच्या ह्या आद्य स्वातंत्र्यवीराला आज ‘ दैनिक मराठ्या ’चा अखेरचा प्रणाम !

# १६

# महाराष्ट्राचे रँग्लर गेले

सर रघुनाथ परांजपे हें जग सोडून गेले! भारतीय विद्वत्तेच्या आकाशांतील एक देदीप्यमान तारा निखळला. गणित शास्त्राच्या हिमालयाचें एक उत्तुंग शिखर अकस्मात् लुप्त झालें. महाराष्ट्रीय शिक्षण रत्नांच्या तेजस्वी मालिकेंतला कौस्तुभ मणी हरपला. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या एका महान् देशभक्ताला त्याची मायभूमि कायमची मुकली. गंगाजळासारख्या एका निर्मळ जीवनाचा प्रवाह कायमचा आटला. राष्ट्रामधील विविध क्षेत्रांत उच्च पदांवर विराजत असलेल्या अनेक कर्तबगार व्यक्तींच्या ऋषितुल्य गुरूचा अवतार समाप्त झाला. गणितशास्त्रामधली 'रँग्लर' ही जगन्मान्य अत्युच्च पदवी संपादन करणारा पहिला भारतीय म्हणून सर रघुनाथ परांजपे हे महाराष्ट्रामधें नि भारतामधें सर्वत्र 'रँग्लर परांजपे' या नांवानेच प्रसिद्ध होते. त्यांच्या निकटवर्तीयांमधें ते अप्पासाहेब अथवा अप्पा म्हणून ओळखले जात. केवळ एकोणऐंशी दिवसांपूर्वी, १६ फेब्रुवारी १९६६ रोजीं त्यांनीं आयुष्याचीं नव्वद वर्षें पूर्ण करून एक्याण्णवाव्या वर्षांत

पदार्पण केलें म्हणून त्यांच्या वाढदिवसाचा भव्य समारंभ पुण्यामधें साजरा करण्यात आला. त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमधील त्यांचे एक माजी शिष्य या नात्यानें भाषण करतांना आम्हीं सांगितलें होतें कीं, “ रँग्लर परांजपे यांचे मामेभाऊ महर्षि अण्णासाहेब कर्वे एकशें चार वर्षें जगले, त्याप्रमाणें रँग्लर परांजपे किमान शंभर वर्षें तरी जगतील अशी अपेक्षा करायला हरकत नाहीं. ” पण आमची आणि अप्पासाहेबांच्या अगणित मित्रांची, चाहत्यांची, शिष्यांची नि भक्तांची ती प्रार्थना यमाच्या दरबारी रुजू झाली नाही आणि त्यांच्या वाढ-दिवसाचा सोहळा साजरा होऊन शंभर दिवस लोटण्याच्या आंतच त्यानें त्यांच्या भोंवतीं आपले पाश टाकले. अप्पासाहेब परांजपे यांना आम्ही गेलीं पन्नास वर्षें ओळखत होतों. आम्ही फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी असतांना ते आमचे गणिताचे प्राध्यापक होते. त्या वेळीं आमची राजकीय निष्ठा लोकमान्य टिळकांच्या चरणीं वाहिलेली होती; पण आमच्या शैक्षणिक आणि सामाजिक निष्ठा मात्र अप्पांच्या चरणीं समर्पित होत्या. तेव्हांपासून त्यांच्यावर आम्ही जी भक्ति करीत आलों तिच्यामधें अखेरपर्यंत कधींहि अंतर पडलें नाहीं आणि तेव्हां-पासून अप्पासाहेबांनीं आमच्यावर जें प्रेम केलें, तें कधीं उणें झालें नाही. अप्पासाहेबांच्या आवडत्या गणित विषयाच्या भाषेंतच बोलायचें तर, आम्हांला त्यांच्याविषयीं वाटणारा परम आदर आणि त्यांना आमच्याविषयीं वाटणारी आपुलकी यांना केवळ बेरजेचे नि गुणाकाराचेच नियम लागू होते, यासंबंधामधें वजाबाकीला आणि भागाकाराला स्थानच नव्हतें. अप्पासाहेबांचें वर्तन, चारित्र्य आणि कार्य एवढें थोर आणि शुद्ध होतें कीं, त्यांच्या कट्टर शत्रूलाहि त्यांच्यापुढें मस्तक नमवण्याचा मोह होणें अनिवार्य होतें. अप्पासाहेब परांजपे हे वैदिक परंपरेच्या एका ब्राह्मण घराण्यांत जन्मले. पारायण—जपे अशी त्यांच्या परांजपे या आडनांवाची व्युत्पत्ति आहे. त्या वैदिक संस्कारांचे सुपरिणाम अप्पासाहेबांच्या उच्चारांत, विचारांत आणि आचारांत अखेरपर्यंत सुस्पष्टपणें दिसत असत. अप्पासाहेबांच्या आईवडिलांना एकंदर तेरा मुलें झालीं. अप्पासाहेब हे त्यांतलें सातवें अपत्य. तेरा मुलांमुलींच्या त्या मातापित्यांना आपल्या या सातव्या मुलाला शकुंतला परांजपे ही संततिनियमनाचा प्रचार करणाऱ्या मुलीचें पितृत्व लाभणार आहे याची कल्पनाहि नसेल असें आम्हीं कधीं कधीं विनोदानें म्हणतों. अप्पासाहेबांच्या वडिलांची सांपत्तिक स्थिति विशेष संपन्न नव्हती. अप्पासाहेबांचे मामेभाऊ महर्षि धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांनीं अप्पा-साहेबांना शिक्षणासाठीं मुंबईला आणलें नसतें, तर रँग्लर परांजपे आणि सर रघुनाथ परांजपे म्हणून ख्याती पावण्याऐवजीं कदाचित् ‘ रघुनाथभटजी परांजपे ’ म्हणून भिक्षुकी करण्याचीच पाळी त्यांच्यावर आली असती. पुढें महर्षि

कर्व्यांनीं एका विधवेशीं विवाह केल्यामुळें त्यांना वरिष्ठ वर्णीय समाजानें वाळीत टाकलें, तेव्हां त्या बहिष्काराची झळ अप्पासाहेबांनाहि लागली. तरीहि महर्षि कर्वे यांच्याविषयीं अप्पासाहेबांना वाटणाऱ्या कृतज्ञतेंत आणि आदरांत कधीं अंतराय आला नाहीं. अप्पासाहेब हे एवढ्या कुशाग्र बुद्धीचे विद्यार्थी होते कीं, शालान्त परीक्षेपासून बी. एस्‌सी.च्या पदवी परीक्षेपर्यंत सतत पहिल्या क्रमांकानें ते उत्तीर्ण होत गेले. १८९६ सालांत भारत सरकारची शिष्यवृत्ति मिळवून ते उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला जे गेले, तेथें तोपर्यंत एकाहि भारतीयाला न मिळालेली 'रँग्लर' ही गणितशास्त्रांतली अत्युच्च पदवी मिळवूनच ते १९०२ मध्यें परत आले. भारत सरकारनें त्या वेळीं त्यांना आय्. ई. एस्. मधील उच्चाधिकाराची जागा देऊ केली होती. पण इंग्लंडमधील वास्तव्यांत दादाभाई नौरोजी, बॅप्टिस्टा काका इत्यादि थोर देशभक्तांशीं अप्पासाहेबांचा परिचय झाला होता आणि त्यांच्यापासून त्यांना देशसेवेची दीक्षा मिळालेली होती. महर्षि कर्वे यांचा आदर्श तर प्रथमपासूनच त्यांच्यापुढें होता. मात्र केवळ राजकीय चळवळीच्या आखाड्यांत उतरल्यानेंच देशसेवा होऊं शकते असें अप्पासाहेब मानीत नसत. म्हणून पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी या शिक्षणसंस्थेंत दरमहा केवळ पंचाहत्तर रुपये एवढ्या अल्पवेतनावर आजीव सेवक म्हणून काम करण्याचें व्रत त्यांनीं स्वखुषीनें पत्करलें. त्या संस्थेच्या फर्ग्युसन कॉलेजमधें ते प्रथम गणिताचे प्राध्यापक आणि नंतर प्राचार्य झाले. तेव्हांपासून शिक्षणक्षेत्राशीं त्यांचा जो संबंध जडला तो वार्धक्यामुळें ते कार्यनिवृत्त होईपर्यंत कायम राहिला. अप्पासाहेबांच्या हाताखालून शेंकडों, हजारों, नव्हे लाखों विद्यार्थी शिकून तयार झाले. त्या सर्वांच्या मनांत अप्पासाहेबांविषयीं नितांत भक्ति, अथांग आदर आणि अपार आदर आहे. याला अपवाद एकच. तो म्हणजे ना. सी. फडके. "माझ्या साहित्यसेवेतील स्मृति" या ना. सी. फडक्यांच्या पुस्तकांत त्यांनीं आपलें एके काळचे गुरु असलेल्या अप्पासाहेब परांजपे यांच्यावर अत्यंत कुत्सित नि क्षुद्र वृत्तीचे आळ घेतलेले आहेत. पण ना. सी. फडक्यांना सूर्यावर थुंकून स्वतःची फजिती करून घेण्याची संवयच आहे त्याला काय इलाज ! अप्पासाहेबांनीं त्यानंतरच्या आपल्या आयुष्यांत त्या वेळच्या मुंबई इलाख्याच्या विधिमंडळाचे सदस्य, नंतर १९२१ सालांत इलाख्याचे शिक्षणमंत्री, पुढें पांच वर्षें इंग्लंडमधें 'इंडिया कौन्सिलचे' सभासद, भारतांत परतल्यावर लखनौ विद्यापीठाचे कुलगुरु, ऑस्ट्रेलियामधील भारताचे हायकमिशनर, पुणें विद्यापीठाचे कुलगुरु इत्यादि मोठमोठ्या राजकीय आणि शैक्षणिक जबाबदाऱ्या स्वीकारून जें महत्कार्य केलें त्याचें वर्णन करण्यासाठीं एक वेगळा प्रचंड गौरवग्रंथच लिहावा लागेल. हें विविध कर्तृत्व करीत असतांना अप्पासाहेबांनीं आपल्या बुद्धिवादी

आणि मानवतावादी निष्ठांशीं कधींहि प्रतारणा केली नाहीं. गौरव आणि टीका सारख्याच नम्रतेनें आणि शांतपणें त्यांनीं झेलली. संपत्तीचा आणि कीर्तीचा लोभ त्यांनीं धरला नाहीं. आपल्या बुद्धिमत्तेची, विद्वत्तेची, कर्तबगारीची आणि निःस्वार्थीपणाची जाहिरातहि त्यांनीं केली नाहीं. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या भगवद्गीतेंतील वचनाप्रमाणें निरपेक्ष नि निःस्पृह बाण्यानें ते जगले आणि यश स्वतः होऊन त्यांच्या पायाशीं लोळण घेत आलें. सार्वजनिक जीवनांत अप्पासाहेब जेवढे कणखर होते, तेवढेच ते प्रेमळ होते. गणितासारख्या गंभीर विषयांत ते जेवढे रमत असत, तेवढेच हास्यविनोदामधें ते फुलत असत. वैयक्तिक जीवनांत ते जेवढे साधे होते, तेवढेच ते रसिक होते. 'साष्टांग नमस्कारा' पासून 'तो मी नव्हेच' पर्यंत आमचें एकहि नाटक पाहण्याचें अप्पासाहेबांनीं कधीं चुकवलें नाहीं आणि प्रत्येक खेपेस त्यांनीं आमचें कौतुक केलें, याचा आम्हांला फार मोठा अभिमान वाटतो. बुद्धिमत्तेमधें मेरू पर्वतासारखा उंच, विद्वत्तेमधें सागरासारखा खोल, अंतःकरणानें आकाशासारखा विशाल, कर्तृत्वामधें सूर्यासारखा प्रखर आणि स्वभावानें पौर्णिमेच्या चंद्रासारखा शीतल, वैयक्तिक जीवनांत नुकत्याच डंवरलेल्या दंवबिंदूसारखा निष्कलंक आणि पारिजातकासारखा कोमल असा हा महाराष्ट्राचा प्रातःस्मरणीय महापुरुष आतां आपल्याला सोडून गेला आहे. महाराष्ट्राच्या इतर अनेक विभूतींप्रमाणें अल्पायुषी न होतां ते नव्वद वर्षे पूर्ण होईपर्यंत कृतार्थ जीवन जगले हें महाराष्ट्राचें महद्भाग्य होय. त्यांच्या मृत्यूमुळें त्यांचे बंधू, त्यांची कन्या शकुंतला आणि लाडकी नात सई यांच्यावर दुःखाचा कडाच कोसळला आहे. पण त्या दुःखामधें सारा महाराष्ट्र सहभागी आहे. महाराष्ट्राच्या त्या अद्वितीय नरश्रेष्ठाच्या स्मृतीला भुईपर्यंत मस्तक लववून अश्रुपूर्ण नेत्रांनीं आणि कृतज्ञ अंतःकरणानें आज आम्ही नम्रतेनें वंदन करीत आहोंत.

# १७

# सोनोपंतांचा वैकुंठवास !

अखेर सर्वांना ज्याचें गेले कित्येक दिवस भय वाटत होतें तेंच घडलें. महाराष्ट्रांतल्या वारकरी सांप्रदायाचें विख्यात भगवद्भक्त, श्रीज्ञानेश्वरीचे महान् संशोधक नि संपादक, संत-वाङ्मयाचे आजन्म अभ्यासक, व्यासंगी उपासक, निष्ठावंत प्रचारक आणि रसाळ प्रवचनकार, सर परशुरामभाऊ कॉलेजचे भूतपूर्व प्राचार्य ह. भ. प. शंकर वामन (सोनोपंत) ऊर्फ मामासाहेब दांडेकर, एम्. ए. हे काल मंगळवारीं आषाढ शु. १४ ला सकाळीं हृदयविकाराचा एकाएकीं झटका येऊन वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षीं वैकुंठवासी झाले. गेल्या दोन-तीन वर्षांपासून सोनोपंत अधूनमधून बरेचसे आजारी पडत असल्याच्या बातम्या येत. पण या वर्षीं आषाढाच्या प्रारंभापासून त्यांच्या प्रकृतींत एकाएकीं गंभीर बिघाड झाल्याच्या वार्ता-एकसारख्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होऊं लाग ल्यापासून त्यांच्याबद्दल आदर वाटणाऱ्या असंख्य मराठी जनतेला त्यांच्याबद्दल साहजिकच चिंता वाटूं लागली. तथापि, त्याचबरोबर त्यांची प्रकृति हळूहळू सुधारण्याचीं चिन्हें दिसूं लागल्याचें वार्ता-

पत्रहि अवघ्या सहा दिवसांपूर्वीं त्यांचे पुण्याचे डॉक्टर वाय्. व्ही. फाटक ह्यांनीं वृत्तपत्रांना धाडलें होतें. त्या वार्तापत्रांत डॉ. फाटकांनीं शेवटीं असें म्हटलें होतें कीं, " दांडेकरांची वृत्ति आनंदी दिसत आहे. ते पूर्ण सावध आहेत. त्यांना काल थोडा अशक्तपणा जाणवत होता. पण आज त्यांत थोडा बदल झालेला आहे. म्हणजे त्यांच्या प्रकृतींत सुधारणा होत आहे. आपण या दुखण्यांतून पार पडूं, असा आत्मविश्वास त्यांना वाटूं लागला आहे." हें वृत्त वाचल्यानंतर साहजिकच चिंतेची तीव्रता कमी होऊन सोनोपंतांना लौकरच पूर्वीप्रमाणें प्रकृतिस्वास्थ्य लाभेल असें सर्वांना वाटूं लागलें होतें. एवढ्यांत आषाढी एकादशीहि उलटून गेली. मनांत म्हटलें कीं, पंढरीची इतक्या वर्षांची कधींहि न चुकलेली त्यांची वारी यदा चुकली तर चुकूं दे. पण वैकुंठीच्या वारीचा इतक्या जवळ आलेला योग ज्या अर्थीं चुकला त्या अर्थीं पांडुरंगाला अद्याप त्यांच्याकडून महाराष्ट्राची सेवा करून घ्यावयाची आहे असें दिसतें. पण कसचें काय अन् कसचे काय ? मोठ्या वारीचें बोलावणें त्यांना पुढें तीन दिवसांनीं आलें आणि आपल्या सहस्रावधि वारकरी भक्तांना दुःखसागरांत लोटून ते वैकुंठाची वाट चालूं लागले ! आतां शुभ्रवस्त्रें आपादमस्तक परिधान केलेली सोनोपंतांची ती पराकाष्ठेची गौर आणि हंसतमुख मूर्ति महाराष्ट्राला पुन्हां दिसणार नाहीं. त्यांच्या कीर्तनानंदांत तासन् तास तल्लीन झालेल्या त्यांच्या हजारों भक्तांना त्यांच्या मुखांतून उचंबळणाऱ्या भावभक्तीच्या अमृताचा आस्वाद फिरून घेतां येणार नाहीं. महाराष्ट्रांतल्या बहुजनसमाजांत वारकरी पंथाचा केवढा प्रसार आहे आणि वैष्णव धर्माचें त्यांचें वेड केवढें अपरंपार आहे ह्याची आंग्लशिक्षित मध्यमवर्गीयांना जवळ जवळ मुळींच कल्पना नाहीं, असें म्हटलें तर त्यांत कांहीं चूक होणार नाहीं. महाराष्ट्रांतल्या अशा या लक्षावधि ' ग्यानबा–तुकारामा 'च्या भक्तमंडळींत सोनोपंत दांडेकरांनीं गेलीं कित्येक वर्षे जी पराकाष्ठेची लोकप्रियता मिळवून ठेवली होती, तिची फारच थोड्या मध्यमवर्गीयांना माहिती असेल. त्यांच्या प्रवचनांची नि कीर्तनांची जाहिरात थोडीच कोणी करीत होते ? पण अमुक अमुक ठिकाणीं सोनोपंत दांडेकरांचें प्रवचन वा भजन ठरलें आहे ही बातमी कोणी कोणाला सांगावयाचा अवकाश कीं, ती एखाद्या रानांतल्या वणव्याप्रमाणें बहुजन समाजांत झपाट्यानें फैलावत जात असे. मग कांहीं विचारूं नका. आधल्या रात्रींपासून म्हातारेकोतारे, बायकामुलें नि भाविक श्रोते आपापल्या जागा आठ-आठ दहा-दहा तास त्या ठिकाणीं धरून बसावयाचे. गेल्या पाऊणशें वर्षांत सोनोपंतांपेक्षां अधिक उच्च विश्वविद्यालयीन शिक्षण घेतलेले अनेक विद्वान् प्राध्यापक आणि त्यांच्याहूनहि जास्त नामांकित तत्त्वज्ञानी पंडित ह्या महाराष्ट्रांत होऊन गेले असतील, पण पुणें शहरांतील एका श्रेष्ठ दर्जाच्या महाविद्यालयाचें प्राचार्यपद भूषविणाऱ्या ह्या तत्त्व-

ज्ञानाच्या आधुनिक प्राध्यापकानें महाराष्ट्रामधल्या बहुजन समाजाच्या अंतःकरणांत जें प्रेमादराचें स्थान मिळविलेलें होतें, तसें आजपर्यंतच्या कोणत्याहि पाश्चात्त्य विद्याविभूषितानें महाराष्ट्रांत मिळवलेलें नाहीं, ह्यांत एका अक्षराचेंहि असत्य नाहीं. जुन्या परंपरा आणि नव्या कल्पना ह्यांच्यामधें भावभक्तीचा जिवंत जिव्हाळा निर्माण करून त्यांची सोनोपंतांनीं अशी कांहीं सोज्वळ सांगड घालून ठेवली होती कीं, तिच्या कचाट्यांतून सर्वसामान्य सांसारिकांना निसटून बाहेर पडणें कठीणच पडे, म्हणून ते हा चमत्कार महाराष्ट्रांत करूं शकले. इंग्रजांनीं या देशांत नवीन शिक्षण आणलें. नवीन विज्ञान आणलें. नवीन संस्कृति आणली. नवीन धर्महि आणला. हें सगळें खरें, पण त्याबरोबर शेकडों वर्षांच्या अग्निदिव्यांतून या देशांत तगलेली जीवनाचीं अमर मूल्यें त्यांनीं नेस्तनाबूत करून टाकलीं, त्यामुळें देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळून एकवीस वर्षें झालीं तरी जनतेचा नैतिक आणि सांस्कृतिक अधःपात आतां इतका झपाट्यानें होत चालला आहे, कीं उद्यां या भारताचें काय होणार हें जगड्व्याळ 'प्रश्नचिन्ह' सर्वांच्या डोळ्यापुढें आज उभें राहिलेलें आहे. सोनोपंतांनी जुनें सोडलें नाहीं. त्यांनीं नवें पकडलें. नि तें जुन्यावर चढविलें नि जडविलें. म्हणून आपल्या नांवाप्रमाणें त्यांनीं महाराष्ट्राचें सोनें केलें. सोनोपंतांनीं आपल्या आयुष्यांत अनेक मौल्यवान् कार्यें केलीं. त्या सर्वांचा नामनिर्देश स्थळसंकोचास्तव येथें करतां येणार नाहीं. पण १९५३ च्या आषाढी एकादशीच्या पुण्यदिनीं त्यांनीं जी 'सार्थ ज्ञानेश्वरी' प्रसिद्ध केली, ते त्यांच्या अनेक वर्षांच्या अभ्यासाला आणि संशोधनाला आलेलें अमर फळ होय. मराठी साहित्यांत राजवाड्यांच्या 'ज्ञानेश्वरी' नंतर दांडेकरांच्याच 'ज्ञानेश्वरी'चें नांव घेतलें जातें. म्हणून ती आवृत्ति प्रसिद्ध करून त्यांनीं 'ज्ञानेश्वरी'च्या भक्तांवर नि अभ्यासकांवर जे प्रचंड ऋण करून ठेविलें आहे, तें कधींहि फिटणारें नाहीं. सोनोपंत दांडेकरांना हें 'ज्ञानेश्वरी'चें वेड कुणी लावलें ? त्याचा उल्लेख त्यांनी आपल्या 'सार्थ ज्ञानेश्वरी'च्या अर्पणपत्रिकेंत केलेला आहे. तिच्यांत ते म्हणतात, 'ज्यांच्या सहवासानें व कृपेनें मला ज्ञानेश्वरीची आवड निर्माण झाली, त्या वैकुंठवासी गुरुवर्य विष्णुबुवा जोगमहाराज ह्यांस अत्यंत कृतज्ञतेनें हा ग्रंथ अर्पण केला असे.' विष्णुबुवा जोगांसारखे 'स्वानंद-सुख-निवासी महाराज' गुरु लाभल्यानंतर 'ज्ञानेश्वरी'तल्या सर्व गुप्त धनाचा साक्षात्कार सोनोपंतांना कां होऊं नये बरें ? ह्या 'सार्थ ज्ञानेश्वरी'ला सोनोपंतांनीं १४५ पृष्ठांची प्रदीर्घ, मार्मिक नि स्फूर्तिदायक प्रस्तावना लिहिलेली आहे. दांडेकरांचें ज्ञानेश्वरविषयक सर्वच सिद्धान्त टीकाकारांना मान्य आहेत असे नव्हे. डॉ. शं. दा. पेंडसे नि महाराष्ट्र सारस्वतकार ह्यांनीं कांहीं त्याच्याशीं मतभेद व्यक्त केले आहेत. तथापि, त्यामुळें दांडेकरांच्या संशोधनाचें महत्त्व नि मौलिकता

सुतराम् कमी होत नाहीं. ‘ ज्ञानेश्वरी ’च्या ओव्यांचा अर्थ अत्यंत सुबोध नी रसाळ भाषेंत देऊन त्यांतील अनेक गहन स्थळें सर्वसामान्य वाचकांच्या आटोक्यांत आणून सोडण्यांत सोनोपंतांनी कमालीचें यश मिळविलें आहे. त्याखेरीज ‘ ज्ञानेश्वरीं ’तील कठीण शब्दांचा कोश शेवटीं जोडून तर सर्वसामान्य अभ्यासकाचा मार्ग त्यांनीं अत्यंत सुकर करून ठेवला आहे. त्या दृष्टीनें आज उपलब्ध असलेल्या ‘ ज्ञानेश्वरी ’च्या सर्व आवृत्तींमधें दांडेकरांचीं ‘ सार्थ ज्ञानेश्वरी ’ जास्तींत जास्त उपयुक्त आणि सुबोध आहे असें आमचें स्वतःचें मत आहे. महाराष्ट्रांत ‘ ज्ञानेश्वरी ’चा अभ्यास करणारे मोठमोठें विद्वान गेल्या शतकांत होऊन गेले. जोग महाराज, साखरे महाराज, भारदेबुवा, भिंगारकरबुवा, कुंटे, माडगांवकर, राजवाडे हीं नांवें तर सर्वविश्रुत आहेतच. त्याखेरीज प्रा. न. र. फाटक, प्रा. सोनोपंत दांडेकर, डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. त्र्यं. ग. धनेश्वर, केळकर, श्री. ना. बनहट्टी, बाळाचार्य खुपेरकर, डॉ. हर्षे, अ. का. प्रियोळकर नि प्रा. रा. ना. वेलिंगकर अशीं अलिकडच्या अधिकारी ‘ ज्ञानेश्वरी ’ संशोधकाचीं किती नांवें घ्यावींत ? पण त्या सर्वांमधें सोनोपंत दांडेकरांनीं आपल्या वैशिष्ट्यपूर्ण विद्वत्तेनें आणि संशोधनानें स्वतंत्र नि वेगळें स्थान मिळवून ठेवलें आहे, ही गोष्ट कोणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं. ही गोष्ट महाराष्ट्र सरकारच्या लक्षांत येऊन १९०९ सालीं प्रसिद्ध झालेल्या ( नि आतां दुर्मिळ झालेल्या ) राजवाड्यांच्या पहिल्या ‘ ज्ञानेश्वरी ’ प्रतीचें संशोधन करून तिची सुधारून दुसरी आवृत्ति काढण्यासाठीं सरकारनें प्रा. सोनोपंत दांडेकरांच्या अध्यक्षतेखालीं चार विद्वानांचें एक ‘ ज्ञानेश्वरी मंडळ ’ १९५६ च्या मार्चमधें नेमलें. राजवाडे प्रतीची सुधारणा करणें म्हणजे कांही चेष्टा नव्हती. तेवढ्यासाठीं ज्ञानेश्वरीची जुन्यांत जुनी हस्तलिखितें मिळवल्याखेरीज राजवाड्यांच्या प्रतींत सुधारणा करणें अशक्य होतें. म्हणून एकनाथपूर्वकालीन पाठांचीं हस्तलिखितें ज्या व्यक्तींकडे असतील ती त्यांनीं या ‘ ज्ञानेश्वरी मंडळा ’ला उसनवार द्यावींत, अशी सरकारतर्फे जाहीर विनंती करण्यांत आली. पण तिचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. मग या ‘ ज्ञानेश्वरी मंडळा ’ला सभासदांनीं स्वतःजवळचींच हस्तलिखितें दिलीं. कांहीं प्रयत्नपूर्वक इतरांकडून उसनवार आणलीं. आणि एवढा प्रचंड खटाटोप करून राजवाडे प्रतीचें संशोधन केलें अन् ‘ ज्ञानेश्वरी ’ची दुसरी सुधारलेली आवृत्ति १९६० सालीं प्रसिद्ध केली. ही दुसरी आवृत्ति इतकी लोकप्रिय झाली कीं ती अवघ्या सहा महिन्यांत सर्व खपली. म्हणून ‘ ज्ञानेश्वरी ’ची दांडेकर संपादित तिसरी सरकारी आवृत्ति १९६३ मधें पुन्हां छापून प्रसिद्ध करणें भाग पडलें. श्री ज्ञानेश्वरी हा महाराष्ट्र–सारस्वताचा सुवर्णकळस होय. भगवद्गीतेंतील तत्त्वज्ञान सर्वांना कळावें नि समजावें म्हणून तें स्फूर्तिदायक काव्यांतून

सांगणारा ' ज्ञानेश्वरी 'च्या तोडीचा एकहि प्रतिभाशाली ग्रंथ कोणत्याहि भारतीय भाषेंत दुसरा नाहीं. कालांतरानें अनेक कारणांमुळें ज्ञानेश्वरी मूळ शुद्धस्वरूपांत राहिली नाहीं. तिच्यांत अनेक दोष शिरले. मूळ संहितेंत पुष्कळच बदल झाला. म्हणून ' ज्ञानेश्वरी 'ची अनेक हस्तलिखितें महत्प्रयासानें मिळवून अत्यंत चिकित्सक बुद्धीनें ती तपासावयाची नि पाठभेदाची छाननी करून ' शुद्ध ' स्वरूपांत ' ज्ञानेश्वरी ' तयार करायची हें केवळ साहित्यकार्य नव्हते. हें धर्मकार्य होतें. हें देवकार्य होतें. तें महाराष्ट्रांतल्या अनेक अधिकारी पुरुषांनीं केलें. पण त्यांत ईश्वरी आशीर्वादामुळें म्हणा किंवा गुरुकृपेमुळें म्हणा ह. भ. प. सोनोपंत दांडेकरांना विशेष यश मिळालें, ह्यांतच त्यांच्या माहात्म्याचें यश आहे. त्यांच्यासारखा स्वयंप्रकाशी नि साक्षात्कारी ' ज्ञानेश्वर '-संशोधक इतक्या अनपेक्षित नि अकल्पित रीत्या जावा ही ' ज्ञानेश्वर–भक्तांची ' कधींहि न भरून येणारी हानि आहे. तथापि त्यांनीं केलेल्या ' ज्ञानेश्वरी '– संशोधनामुळें त्या ग्रंथाच्या अध्ययनाचा, अध्यापनाचा नि मननाचा महाराष्ट्रांत अधिक प्रसार होवो आणि त्यामुळें

पुढतीं पुढतीं पुढतीं
इया ग्रंथा पुण्यसंपत्ती
सर्वसुखीं सर्वभूतीं
संपूर्ण होई जो !

हें ज्ञानोबांनीं मागितलेलें पसायदान सफल करण्याचें पुण्य सोनोपंतांना लाभो, एवढीच रुक्मिणी–पांडुरंगाच्या चरणीं आमची प्रार्थना आहे !

# १८

# वेदमूर्ति सातवळेकर

वेदमूर्ति, महर्षि, महामहोपाध्याय, साहित्यवाचस्पति, डॉक्टर ऑफ लिटरेचर, डॉक्टर ऑफ लॉज, गीतालंकार, विद्या-मार्तंड, पद्मभूषण, पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांना तीन साडेतीन महिन्यांच्या आजारानंतर मृत्यु आला तो दिवसहि नेमका लो. टिळकांच्या स्मृतीशीं संलग्न असलेला असाच असावा हा योग विलक्षण आहे ! पं. सातवळेकर दीर्घायुषी, गाढे विद्वान् म्हणून देशभर प्रसिद्ध होते. तसेच ते कडवे राष्ट्रभक्तहि होते. किंबहुना त्यांच्या वेदान्ताच्या खोल व्यासंगाला त्यांची उज्ज्वल देशभक्ति हीच खरी प्रेरक होती. "यः क्रियांवान स पंडितः" हे सुभाषित सातवळेकरांच्या बाबतींत संपूर्णपणें खरें होतें. दिनांक १९ सप्टेंबर १८६७ रोजी त्यांचा एका खेड्यांत सामान्य आईबापांच्या पोटीं जन्म झाला. शंभर वर्षांचें दीर्घायुष्य भोगून ते परवां निधन पावले तेव्हां ते स्वतः त्रिखंडकीर्ति पंडित म्हणून सर्वांच्या गौरवास पात्र झालेले महापुरुष होते ! महर्षि दयानंद सरस्वती आणि प्रो. मॅक्समुल्लर यांच्या वेदांसंबंधींच्या विचारांनीं प्रभावित

होऊन पंडितजी वेदांच्या व्यासंगाकडे वळले आणि जन्मभर कष्टून त्यांनीं अतुलनीय अशी कामगिरी करून ठेवली आहे. देशभक्ती, स्वातंत्र्य आणि वेदाभ्यास या तिन्हींची सांगड त्यांनीं घातल्यामुळें त्यांना अनेक वेळां सरकारी रोष पत्करावा लागला, पण ते ध्येयच्युत कधींहि झाले नाहींत. हैदराबाद, औंध, हीं संस्थानें आणि पंजाब नि गुजरात असे परप्रांत त्यांनीं आपल्या कार्यासाठीं पसंत केले. स्थळ बदललें तरी कार्य तेंच चालू ठेवलें ! व्यक्तिगत शुचिर्भूत जीवन अखंड विद्याव्यासंग, लोकहिताची तळमळ, नि जाज्वल्य देशभक्ति या गुणांमुळें पंडित सातवळेकर हे वंदनीय महर्षिपदाला पोहोंचले. पारडी येथील त्यांच्या 'स्वाध्याय मंडळा'चा परिसर म्हणजे प्राचीन ऋषींच्या आश्रमासारखा पवित्र वाटे ! या आश्रमाला भेट देऊन महर्षि पंडित सातवळेकरांच्या सहवासांत कांहीं काल घालवण्याचें भाग्य आम्हांला लाभलें याचा आम्हांला सदैव अभिमानच वाटतो ! पंडितजींचें चारित्र अथांग सागरासारखें आहे. तें सारें सांगायचें झालें तर एक मोठा ग्रंथच लिहावा लागेल. पण 'जग लेशेंहि महद्यशें तरते' असें कविवचन असल्यामुळें पंडितजींच्या आदर्श चरित्राचें थोडेंसें संकीर्तन या प्रसंगीं आम्ही करीत आहोंत— पंडितजी हे मूळचे सावंतवाडीचे. त्यांच्या संस्कृत विद्येचा पाया तेथें घालण्यांत आला. जन्मतःच त्यांना चित्रकलेचें वेड. तेव्हां त्यांनी स्वतःला त्या कलेला वाहून घेतलें. ते महान् चित्रकार झाले. त्या काळीं ते दक्षिण हैदराबाद संस्थानांत स्थाईक झाले. तेथें त्यांनीं वेदांचा अभ्यास सुरू केला. अथर्ववेदामधील मातृभूमीच्या वंदनाचें वैदिक गीत जेव्हां त्यांनीं प्रसिद्ध केलें, तेव्हां निझामानें त्यांना हद्दपार केलें. तेव्हां ते महाराष्ट्रांत औंध संस्थानांत येऊन स्थायिक झाले. औंध संस्थानचे राजे बाळासाहेब प्रंतप्रतिनिधि ह्यांचा त्यांच्यावर फार लोभ जडला. कांहीं काळ त्या संस्थानच्या मंत्रिपदावर त्यांची नेमणूक देखील झाली. त्याच सुमारास त्यांनीं औंधला वेदांचा अभ्यास करण्यासाठीं 'स्वाध्याय मंडळ' ही संस्था काढली आणि वेदांच्या संहिता छापण्यास सुरुवात केली. पुढें अठ्ठेचाळीस सालीं गांधीजींचा खून झाला. दक्षिण महाराष्ट्रांत भयंकर अत्याचार, प्राणघात आणि जाळपोळ झाली तेव्हां त्यांनीं आपला सर्व संसार गुजरात राज्यातल्या पारडी ह्या गांवीं हलविला, तेथें त्यांनीं एकोणीस एकर क्षेत्रफळाच्या अत्यंत निसर्गसुंदर अशा वनभूमींत आपल्या नवजीवनाला प्रारंभ केला. ते लाहोरला आर्यसमाजांत दहा वर्षें होते. नंतर हिमालयांत कांगडी येथें दोन वर्षें होते. गुजरातेंत गेलीं वीस वर्षें ते होते. संस्कृत, हिंदी, गुजराती आणि मराठी भाषा ह्या त्यांच्या घरीं पाणी भरीत. महात्मा गांधींना गीता त्यांनींच समजावून सांगितली आणि त्यांना संस्कृत भाषा पण त्यांनींच शिकविली. संस्कृत भाषा कशी बोलावी या विषयावर पंडितजींनीं चोवीस क्रमिक पुस्तकें तयार

केलेलीं आहेत. ह्या पुस्तकाचा जर नुसता सहा महिने अभ्यास केला तर कोणाहि माणसाला उत्तम संस्कृत बोलतां येईल. पंचवीस-तीस वर्षें त्यांनीं वेदांच्या अभ्यासाला स्वतःला वाहून घेतलें होतें. वेद चार आहेत. ऋग्वेदामध्यें देवतांच्या गुणांचें वर्णन आहे. यजुर्वेदामध्यें नाना प्रकारचे यज्ञ कसे करावेत हें सांगितलें आहे. सामवेदामध्यें अनेक मंत्रांचें उत्तम स्वरांत गायन कसें करावें तें आहे. अथर्ववेदमाध्यें ब्रह्मज्ञान आहे. ह्या सर्व अथांग वेदसागरांत दोन-अडीच तपें ते अहोरात्र अवगाहन करीत होते. सारे वेद जवळ जवळ त्यांना मुखोद्गत असत. वेदांच्या अर्थांचें आणि आशयांचे त्यांनीं जेवढें मनन आणि चिंतन केलेलें होतें तेवढें भारतांत आजपर्यंत क्वचितच कोणी केलें असेल. वेदांच्या पाठशुद्ध संहिता तर त्यांनीं छापून प्रसिद्ध केलेल्या आहेतच, पण अथर्ववेदाचें विषयवार विश्लेषण करून त्याचे पांच निरनिराळे ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केलेले आहेत. चारहि वेदांतील निरनिराळ्या देवतांविषयक उल्लेखांचा त्यांनीं स्वतंत्र ग्रंथ तयार केला. सामवेदाचा त्यांनीं सुबोध अनुवाद केला. हे सर्व लेखन त्यांनीं मुळांत हिंदी भाषेंत केलेलें असून त्याचा अनुवाद त्यांनीं मराठी आणि गुजरातीमध्येंहि करवून घेतलेला आहे. अलीकडे ते ऋग्वेदाचा अनुवाद करण्यांत गुंतलेले होते. आपल्या ‘ स्वाध्याय मंडळा’ मार्फत त्यांनीं केलेल्या एकंदर प्रकाशनांची संख्या चारशेंपर्यंत भरेल. आपल्या शतकी आयुष्यांत पंडितजींनीं ही जगड्व्याळ कामगिरी करून ठेविली आहे, तिच्याकडे जनतेचें आणि सरकारचें आजपर्यंत जेवढें लक्ष जावें तेवढें गेलेलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आधारानें तुम्हांला सांगतों आहे. ‘कुराणां’त प्रत्येक अध्यायाच्या वर गोष्ट आहे. पंडितजी एकदां आम्हांला खेदानें म्हणाले देखील, “ बायबल हा ख्रिस्ती लोकांचा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठीं ‘बायबल सोसायटी’ला तेरा कोट रुपये मिळाले. पण वेदांच्या प्रकाशनासाठीं मला तेरा लाख रुपये देखील कोणी देण्यास तयार नाहीं, काय सांगावें ? ” महाराष्ट्र सरकार किंवा गुजरात सरकारनें पंडितजींच्या ह्या कार्याला कवडीची देखील मदत केली नाही. केंद्र सरकार मात्र कांहीं प्रमाणांत त्यांना आर्थिक मदत करी. अशाहि प्रतिकूल परिस्थितींत पंडितजींनीं आपलें ज्ञानसाधनेचें अग्निहोत्र एकसारखें प्रज्वलित ठेवलेलें होतें. या ज्ञानयज्ञाविषयीं आम्हांला ते एकदां सहज सांगत होते कीं, “ वेद हे जुने आहेत ही जी सर्वसाधारण समजूत आहे ती चुकीची आहे. आजहि ज्या गोष्टींचे शोध लागलेले नाहींत त्यांची नोंद वेदांत आहे. उदाहरणार्थ, सतत तीन रात्र नि तीन दिवस अंतरिक्षांतून संचार करणाऱ्या विमानांचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. अशा तऱ्हेची विमानें आज ह्या मितीला जगांत नाहींत. त्यांना कांहीं कालावधीनंतर तरी जमिनीवर उतरावें लागतें. युद्धामध्यें जर एखाद्या वीराचा पाय तुटला तर त्याऐवजीं ताबडतोब लोखंडाचा पाय बसवून त्याला पुन्हां

युद्धाला उभा करण्याची वैद्यकीय व्यवस्था त्या काळीं होती. मनुष्य कितीही वृद्ध झाला तरी त्याला तारुण्य देऊन संतति निर्माण करण्याचें सामर्थ्य त्या काळीं देतां येत असे. पाश्चात्त्य लोक जेव्हां या देशांत आले तेव्हां त्यांची सैन्यव्यवस्था आपल्यापेक्षां अधिक शिस्तबद्ध नि प्रभावी होती म्हणून ते आपला पराभव करूं शकले. पण ऋग्वेदांत 'मरुद्गणा' चें जें वर्णन दिलें आहे त्यांत पाश्चात्त्य सैन्याप्रमाणें संघटना कशी करावी ह्याचें तपशीलवार मार्गदर्शन करण्यांत आलेलें आहे. 'मरुत्' ह्याचा अर्थ काय? जोपर्यंत उठतां येतें आहे तोपर्यंत लढत लढत जो मरतो तो 'मरुत्'. अथर्ववेदावद्दल लोकांत गैरसमज आहे. पुष्कळांना वाटतें. कीं त्यांत जादूटोणे किंवा मंत्रतंत्र ह्यांची माहिती आहे. तसें नाहीं. अथर्ववेदांत राजकारण, व्यवहार, आरोग्य, दीर्घायुष्य इत्यादी जीवनावश्यक गोष्टींचें ब्रह्मज्ञान भरलेलें आहे. आमचें सारें संगीत सामवेदावर आधारलेलें आहे. सामवेद ज्या तऱ्हेनें म्हटला जातो त्या तऱ्हेनें जर तो म्हटला तर ऐकणारांच्या मनावर तो काय चमत्कार करतो त्याचा एक प्रयोग करून आम्ही पाहिलेला आहे. एका इस्पितळांत एक माणूस आजारी होता. त्याला उठतां सुद्धां येत नव्हतें. तेव्हां ध्वनिमुद्रित केलेला सामवेदाचा कांहीं भाग आम्हीं त्याला पंधरा मिनिटें ऐकविला. त्याबरोबर तो एकदम उठून आपल्या खाटेवर बसला. हे सर्व प्रयोग करून पाहिले पाहिजेत! त्यानंतर हिंदुसमाजाचा अधःपात कां झाला ह्यासंबंधीं बोलतांना पंडितजी आम्हांला म्हणाले, "ह्या देशावर मुसलमानांचीं जीं आक्रमणें झालीं त्यांमध्यें आमच्या साऱ्या विद्येचा नाश झाला. त्या लोकांना ज्ञान किंवा संस्कृति ह्यांच्याबद्दल कवडीचाहि आदर नाहीं. वस्तुतः आमच्या हिंदुधर्माचा प्रसार भारताबाहेर किती तरी लांब लांबच्या देशांत झालेला होता. अहो, 'मक्का' म्हणजे काय? तर 'महाकाय' चा तो अपभ्रंश आहे. ते मूळ महादेवाचें देऊळ होतें. तेथें चारशें महादेवांचीं लिंगें होतीं, त्यांपैकीं तीनशें नव्याण्णव लिंगें महंमदानें फोडलीं एकच लिंग शिल्लक ठेवलें. तोच त्यांचा 'काबा.' हें इस्लामिक 'एन्सायक्लोपीडीया' च्या 'आलीफ (अ) लाम (ल) आणि (मीम) म' अशीं अक्षरें लिहिलीं असतात त्याचा अर्थ कोणाहि अरबी विद्वानाला सांगतां येत नाहीं. त्याचा अर्थ 'ॐ' असा आहे हें मी सांगतों. एवढेंच नव्हे तर 'कुराणा' चा पहिला मंत्र हें आपल्या 'अग्ने, नय सुपथान राये विश्वान' या वैदिक मंत्राचें अक्षरशः भाषांतर आहे. दुसरी गोष्ट सांगतो. सबंध कुराणांत गाय मारावी अन् गाईचें मांस खावें असें कोठेंहि सांगितलेलें नाहीं. उलट गाईचें संरक्षण करावें असें पंचवीस ठिकाणीं सांगितलेलें आहे. ही कुराणाची आज्ञा जर मुसलमानांनीं अक्षरः पाळली तर हिंदूंचें नि मुसलमानांचें भांडण होण्याचे कांहीं कारण आहे काय? माझें सर्व मुल्ला–मौलवींना आव्हान आहे

कीं, गाईचें रक्षण करावें, गोमांस खाऊं नये असें कुराणांत सांगितलें नाहीं असें त्यांनीं उघडपणें सांगावें ! मुसलमानांइतकेंच हिंदुधर्माचें नुकसान जर कोणी केलें असेल तर बौद्धांनीं. बुद्धाचा धर्म अज्ञानावर आधारलेला आहे. जीवन हें दुःखानें भरलेलें आहे, जीवनांत अर्थ नाहीं. आयुष्य क्षणभंगुर आहे. शरिरांत मलमूत्र–श्लेमा भरलेला आहे. असल्या नैराश्यवादाचा बुद्धानें प्रचार केला. सर्वसामान्य लोक आळशी असतात, त्यांना या नैराश्यवादानें आकर्षित केलें. सुख हें प्रयत्नानें मिळतें. प्रयत्न न करतां स्वस्थ बसलें म्हणजे दुःख तुमच्या पांचवीला पुजलेंच आहे. वेद सांगतात या जगांत कांहीं क्षुद्र नाहीं. कांहीं क्षणभंगुर नाहीं. हें सर्व ‘ ब्रह्म ’ आहे. ह्या मानवी शरिरांत मल–मूत्र–श्लेष्मा नाहीं. देवतांचें निवासस्थान आहे हें शरीर. डोळ्यांत सूर्य, वाणींत अग्नि, बुद्धींत ब्रह्म अशा रीतीनें ‘ सर्वाह्यस्मिन्देवता गावो गोष्ठ इवासते ’–म्हणजे ज्याप्रमाणें गाई गोठ्यांत रहातात त्याप्रमाणें सर्व देवता ह्या मानवी देहामध्यें राहतात. अहो, आपण काय क्षुद्र आहोंत. बुद्ध म्हणतो त्याप्रमाणें नाहीं. आपण ‘ इंद्र ’ आहोंत– म्हणजे शत्रूचें विदारण करणारे ! आपल्या अवयवांना ‘ इंद्रियें ’ कां म्हणतात ? कारण त्या अवयवांतून इंद्राची साक्षात शक्ति प्रकट होत असते ! पण हें बुद्धाला समजलें नाहीं, म्हणून सगळा घोटाळा झाला. इंद्राची शक्ति दाखवण्यासाठीं हा ‘ इंद्रीय ’ शब्द बनला आहे. या ‘ इंद्रशक्ती ’नें शरिरांत ह्या इंद्रियांचीं छिद्रें निर्माण केलेलीं आहेत. ‘ मी पहाणार ! ’ असें ह्या शक्तीनें म्हणतांच नेत्रांच्या ठिकाणीं छिद्र उत्पन्न झालें. मी श्वासोच्छ्वास करणार, असें म्हणतांच नाकाच्या ठिकाणीं छिद्र उत्पन्न झालें. सारांश, मी ब्रह्म आहे, मी इन्द्र आहे ही प्रयत्नशील जाणीव माणसानें सतत आपल्या मनांत ठेवली पाहिजे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे वेदांचा अर्थपूर्ण अभ्यास केल्यावांचून भारताचा उद्धार होणार नाहीं ! ” अशा तेजस्वी विचारांचा हा ‘ वेदपुरुष ’ ब्रह्मीभूत झाल्यानें साक्षात् वेदविद्येनेंच आपले डोळे मिटून घेतल्यासारखे झाले आहे. शुद्ध आदर्श चारित्र्याचें जसे पंडितजी हे चालतेबोलते मूर्त रूप होते तद्वत् प्राचीन वेदविद्यांचा ते म्हणजे महासागरच होते ! पंडित सातवळेकर हे भारताला ललामभूत असे महापुरुष आधुनिक काळात जन्मले याबद्दल महाराष्ट्राला सदैव अभिमानच वाटेल ! त्यांच्या मृत्यूनें झालेली भारताची हानि कधींहि भरून येण्यासारखी नाहीं. प्राचीन विद्येच्या या महासागराला आम्ही भक्तिभावानें आदराचे अर्घ्य अर्पण करतों !

REFBK-0017304



१८३०४